Rs 59 -

Áhítatok:

KÂVYASANGRAHA. 26.

THE POEMS

OF

AMṚITARÂYA.

A POPULAR MARÂTHÎ POET OF THE MÂHÂRASHTRA.)

EDITED WITH

CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY

VÂMAN DÂJÎ OKA,

HEAD MASTER, HIGH SCHOOL, RAIPORE.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂM JÂVAJÎ,

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRṆAYA-SÂGARA' PRESS.

Bombay.

1896.

काव्यसंग्रह. २६.

महाराष्ट्रकविअमृतरायकृत

कवितासंग्रह.

कीर्तनसुखार्थ झाला अवतारचि अमृतराय जीवाचा, ।
भलत्या मुखांतुनि अशी सुरसखनि निघेल काय? जी वाचा. ॥

मोरोपंत—सन्मणिमाला.

हा

वामन दाजी ओक,

हेडमास्तर, हायस्कूल, रायपुर.

यांनीं अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन
अनेक हस्तलिखित प्रतींवरून शुद्ध करून
तयार केला.

आणि

मुंबईत जावजी दादाजी यांच्या "निर्णयसागर" छापखान्याचे मालक
तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केला.

१८९६.

.... | १२-

महाराष्ट्र भाषेचें आणि कवितेचें

आस्थापूर्वक अध्ययन

करूं पाहणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

सप्रेम अर्पण करतों.

'काव्यसंग्रह'कार.

अनुक्रमणिका.

१. हा कटिबंध अमृतरायकृत नसून जयरामसुतकृत आहे. नजरचुकीनें अमृतरायाच्या संग्रहांत सामील झाला आहे.

परिशिष्टें.

अमृतरायकृत पदांतील पाठभेद.

पृष्ठ १२७, पद ८७ चरण ४ पाद ४.

'तोचि हरी जाणा गे'

पृष्ठ १२७, पद ८८ चरण १ पाद ३.

'गळां पडे उगाचि म्हणे चेंडु दे गे माझा'

पृष्ठ १२७, पद ८८ चरण ४ पाद १.

'ऐसें ह्याचें दुःख बाई'

पृष्ठ १२७, पद ८९

वेडा तामसा जोगी देखिला गे माय ।
भिकेचे तुकडे मागून भोपळ्यांत खाय ॥ ध्रुवपद. ॥
स्मशानिं ज्याचें रहाणें लोळे राखेंत ।
दंत दाढ विक्राळ दिसे अद्भुत ।
प्यां प्यां वाजवि शिंगी भंवतालि भुतें ।
आतां खाइलसा दिसतो कोण तिकडे जाय ॥ वेडा० ॥ १ ॥
हातिं एक लोखंडाचें शस्त्र त्याला तिन धारा ।
दुसरें कुऱ्हाडीवाणी वागवी बरा ।
डुम डुम वाजवि डमरू बोले हरीहरा ।
भं भं वाजवि शंख हसूं येतें गे माय ॥ वेडा० ॥ २ ॥
खडबड काळे मणके वोवुनियां माळा ।
केवढें थोरलें पेंडें वेडियाचे गळां ।
जन्म जोड हातांत विभुतिचा गोळा ।
अखंड वोढी राव भांग धुंद होवोनि राहे ॥ वेडा० ॥ ३ ॥
तिनशेंसाठ ठिगळ्याची गोधडी बरी ।
शंभर वांवे दोरा काढुनि कूसरी ।
षडचक्राचे बूटे दिसे गोजरी ।
वेड्यानें कोठून चोरून आणली कीं काय ॥ वेडा० ॥ ४ ॥
उठवण कर एक वैल त्यावरी बसे ।
जुनाट जोगी वेडा निरंजनी वसे ।
त्याचे पाठीं लागलें सद्भावपिसें ।
म्हणे अमृत मज दावा वेडियाचे पाय ॥ वेडा० ॥ ५ ॥

अमृतराय.

कीर्तनसुखार्थ झाला अवतारचि अमृतराय जीवाचा; ।
भलत्या मुखांतुन अशी सुरसखनि निघेल काय जी! वाचा? ॥

मोरोपंत—'सन्मणिमाला.'

प्रत्येक कवीचे समग्र ग्रंथ छापून झाले ह्मणजे त्या कवीविषयीं जी माहिती मिळण्यासारखी असेल ती मिळवून वाचकांस सादर करावी, असा आह्मीं संकल्प केला आहे. त्यास अनुसरून अमृतरायाची जितकी कविता उपलब्ध झाली आहे, तितकी छापून प्रसिद्ध केली आहे. आतां त्याच्या संबंधानें जी माहिती उपलब्ध आहे, ती येथें देण्याचा विचार आहे.

जीवनवृत्त–अमृतराय हा देशस्थ आश्वलायन ब्राह्मण होता. ह्याचें जन्म शालिवाहन शके १६२० मध्यें बहुधान्य संवत्सरीं झालें. हा विडाजवळील एका खेड्यांत राहत असे. मोंगलाच्या पदरीं विसामोरो ह्मणून एक मुत्सद्दी होता, त्याच्याकडे नोकरी असल्यामुळें यास मुख्यतः औरंगाबादेस राहावें लागे.

असें सांगतात कीं हा कांहींसा थट्टेखोर असल्यामुळें ह्यानें एकदां मध्वमुनी ह्मणून एक साधु होते त्यांची थट्टा केली. तीवरून मध्वमुनीश्वर त्यास यत्किंचितही रागें न भरतां एवढेंच ह्मणाले कीं, 'तुला परमेश्वरानें अमृतासारखी वाचा दिली आहे, शिवाय आईबापांनींही तुझें नांव अमृतराय असें ठेविलें आहे, असें असतां त्या वाणीचा तूं असा उपयोग करावास हें योग्य नाहीं.' हें स्वामींचें बोधपर भाषण ऐकून त्यास पश्चात्ताप झाला, व तेव्हांपासून यानें आपल्या वाणीचा चांगला उपयोग करण्याचा निश्चय केला. एखादा पर्वत आड आल्यानें जशी नदीच्या जलौघाची दिशा बदलते, तशीच अमृतरायाच्या जीवनयात्रेची दिशा या गोष्टीनें बदलली, असें ह्मटलें पाहिजे.

अमृतरायाच्या वृत्तींत असा पालट झालेला पाहून मध्वमुनीश्वरस्वामींनीं त्यास आपले गुरु अद्वैतानंद यांजकडून अनुग्रह करविला–अशी दंतकथा आहे, परंतु ती खरी नसावी असें वाटतें. यास प्रमाणः–'अविनाशसंदेहहरण' नामक प्रकरणांत त्यानें आपली गुरुपरंपरा दिली आहे, व आपल्या गुरूचें नांव 'अंबिकासरस्वती' होतें असें दर्शविलें आहे. तसेंच 'ध्रुवचरित्रा'च्या शेवटीं (पृ० १४ श्लो० २०) आपल्या मातापितरांचीं नांवें सांगून 'अंबाजिता अमृत पावन नाम ज्याला' असा आपल्या गुरुच्या नांवाचा उल्लेख केला आहे. तसेंच पृष्ठ १०१ पद १० चरण ३ यांत

'अंबा फळला'=अंबिकासरस्वती फळ देता झाला—असें ह्मणून आपल्या गुरूच्या नांवाचा उल्लेख केला आहे. आतां मध्वमुनीश्वर मात्र अमृतरायाचा समकालीन असून त्याच्या उपदेशानें त्यास उपरति झाली असावी, व पुढें त्यानें अंबिकासरस्वतीपासून उपदेश घेतला असावा, असें ह्मणण्यास कांहीं बाध येत नाहीं. हा अंबिकासरस्वती श्रीशंकराचार्यांच्या शिष्यपरंपरेपैकीं एक साधु होता.

अमृतराय गुरूपदेश घेतल्यावर सर्व कामकारभार सोडून कीर्तन करूं लागला. कीर्तनामध्यें कथासंदर्भास अनुरूप अशी कविता तात्कालिक स्फूर्तीनें करून ह्मणत असे. तो कडकडीत वैराग्यानें राहात असे. त्याच्या वैराग्याबद्दल एक आख्यायिका आहे ती अशीः—

'वैराग्यभाग्यासारिखें भाग्य नाहीं' हें अमृतरायानें केलेलें पद आहे. (पृ० ४८ पद ११३ पहा.) त्याची तेव्हां लोकांत बरीच प्रसिद्धि झाली. तें एका बैराग्याचे कानीं आलें. तेव्हां स्वतः अमृतरायाचें प्रेम वैराग्यावर किती आहे हें प्रत्यक्ष पहावें ह्मणून तो औरंगाबादेस आला. पाहतो तों अमृतराय तर मोठा झोंकदार पोषाक करून झोंपाळ्यावर बसले आहेत, व खुशाल झोंपा घेत आहेत. तें पाहून बैराग्यानें अमृतरायास विचारिलें कीं, 'वैराग्यभाग्यासारिखें भाग्य नाहीं' हें पद आपलेंच ना! अमृतरायानें 'होय' ह्मणतांच बैराग्यास राग आला. तो ह्मणाला, 'बोलणें सोपें पण करणें फार कठिण आहे. आपण भाग्याचा उपभोग खुशाल घेऊन लोकांस वैराग्याचा उपदेश करावा, यांत फायदा तो कोणता?' अमृतराय ह्मणाले, 'हें देहप्रारब्ध आहे.' बैरागी ह्मणाला, 'ठीक आहे. आपलें देहप्रारब्ध आपल्याबरोबर आहेच. आपण माझ्याबरोबर वनवासास चलावें.' अमृतराय ह्मणाले, 'फार चांगलें.' पुढें तो गोसावी व अमृतराय औरंगाबाद सोडून लांब एका निर्जन वनांत आले. जेथें वनांत चिटपांखरूंही नाहीं अशा ठिकाणीं अमृतरायास बसवून आपण गांवांत भिक्षा मागण्यास निघून गेला. इकडे अमृतरायाचा एक शिष्य मोठा सरकारी कामदार होता, तो त्या मार्गानें येत होता. त्यानें अमृतरायास पाहतांच तेथें मुकाम केला, व अमृतरायास चाकरांनीं मऊ परांच्या गादीवर निजविलें व ते त्याचे पाय चेपूं लागले. इतक्यांत गोसावीबोवा भिक्षेहून आले. पाहतात तों अमृतरायाचा निराळाच थाट! तो पाहतांच अमृतरायाचें भाषण त्यास खरें वाटलें. मग तो अमृतरायाचें शिष्यत्व पतकरून त्याच्या आज्ञेनें निघून गेला.

अमृतरायाचें कीर्तन फार रसाळ होतें असें मोरोपंताच्या वर्णनावरून स्पष्ट होतें. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं याचें कीर्तन करविलें होतें, व कीर्तन ऐकून ते फार खूष झाले अशी लोकप्रसिद्धि आहे.

याच्या आईचें नांव उमा, व बापाचें नांव शंकर (ध्रुवचरित्र–पद्य २० पृ० १८ पहा.) होतें. याहून जास्त माहिती उपलब्ध नाहीं.

याचें देहावसान शके १६७५ चैत्र शुद्ध ६ श्रीमुखनाम संवत्सरीं झालें. याचें वय मरणसमयीं ५५ वर्षांचें होतें.

कवितासंग्रह.–अमृतरायकृत जीं काव्यें आमच्या संग्रहीं होतीं, व जीं आमच्या रसिक सन्मित्रांनीं आस्थेनें शोध करून मिळवून आमच्याकडे पाठविलीं, त्या सर्वांचें प्रकाशन करून तीं आमच्या वाचकांस अर्पण केलीं आहेत. अमृतरायाची कविता फारशी नाहीं. आहे तींतही सबंध आख्यानें फार थोडीं आहेत. वर्णनपर कविता फार आहे. कटिबंधांपैकीं 'शुकचरित्र,' 'ध्रुवचरित्र,' 'सुदामचरित्र' हे फार मोठे आहेत. व यांत कवीचें चातुर्य दृष्टीस ढळढळीत पडतें. अमृतरायाची एवढीच कविता जरी वाचून पाहिली, तरी त्याच्या कवितेंतले प्रसादादि गुण नजरेस पडल्याशिवाय रहाव-याचे नाहींत. 'दामाजीचरित्र' हें प्रकरणही बरेंच मोठें आहे, व सरसही आहे. मुख्यसें कथानक निवडून काढून त्यावर काव्य लिहावें, असा कवींचा संप्रदाय साधा-रणतः असतो; परंतु कालिदासासारख्या कवींस कथानक निवडण्याची गरज लागत नाहीं. कुबेरानें यक्षाला शाप दिला, तो अरण्यवासास गेला व त्यानें मेघाबरोबर आपल्या स्त्रीस निरोप पाठविला; एवढ्याशा कथानकावर आमचे कविकुलगुरु 'मेघ-दूता' सारखें सुमनोहर काव्य तयार करितात! तसाच कांहींसा प्रकार अमृतरायाचा आहे, असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. 'ध्रुवचरित्र,' 'शुकचरित्र' हीं ह्मणजे मोठीं निवडक कथानकें आहेत असें नव्हे, पण तींच प्रकृत कवीस आपली प्रतिभा किती उज्ज्वल आहे हें दाखविण्यास पुरलीं! वर्णनपर कटाव बरेच आहेत, परंतु ते लहान लहान आहेत. पदें अनेक विषयांवर आहेत. कांहीं भक्तिपर आहेत, कांहीं उपदेशपर आहेत, कांहीं प्रासंगिक आहेत. आणखीही पुष्कळ कविता न मिळालेली अशी असण्याचा बराच संभव आहे. प्रकृत कवीनें हिंदी भाषेंत 'रुक्मिणीस्वयंवर' रचिलें आहे, असा सर्वतोमुख लोकप्रवाद आहे; परंतु तें अद्याप उपलब्ध झालें नाहीं, हें दुर्भाग्य होय.

सरणी अमृतरायाची वाणी अमृतलहरीसारखी सुधास्राविणी आहे. मराठी भाषेंतील उच्च प्रतीच्या कवींत त्याची गणना करण्यास कांहीं हरकत नाहीं. याची कविता प्रासप्रचुर असल्यामुळें ती नुसती ऐकणारासही गोड वाटते, मग जो अर्थाकडे दृष्टि देऊन ती वाचील तो तन्मय झाला ह्मणून काय नवल! प्रकृत कवीनें कर्णमधुर कविता केली आहे तरी उगीच क्लिष्टपणा येईल अशी रचना कोठेंच आढळत नाहीं. वर्णनास एकदां आरंभ झाला ह्मणजे यांत योग्य ठिकाणीं योग्य शब्दयोजना

व्हावयाचीच, असें पाहून त्याच्यापुढें मराठीभाषा हात जोडून उभी असावी असें वाटतें. त्याचें जन्म औरंगाबाद येथें झालें असल्यामुळें त्या शहरांतलें अपारवैभव, आणि यवनांचा इष्कबाजपणा त्याच्या मनांत प्रतिबिंबित झालेला दिसतो. त्यामुळें त्याच्या वर्णनास अनेक स्थळीं दिलदारपणा व झोंकदारपणा आला आहे. मराठी भाषेप्रमाणेंच हिंदीभाषा त्याला अवगत असल्यामुळें त्याची दोन्ही भाषांतील कविता सारखी रसाळ आहे. अमृतरायाची कविता कडाका छंदांत आहे. तरीं साकी, दोहा, घनाक्षरी इत्यादि वृत्तांतही त्याची कविता आहे. थोडेसे श्लोक आहेत. पैकीं कांहीं श्लोकांत (पृ० ९७ पहा.) वर्णन केल्याप्रमाणेंच प्रकृत कवीची अर्धांगी असली (कदाचित् तें सामान्यत्वेंकरून स्त्रियांचेंही वर्णन असेल) तर ती त्यांच्या वैराग्यवृत्तीस उत्तेजन देणारीच होती असें म्हटलें पाहिजे. प्रसंगानुरूप वर्णन करण्यांत कवीचा किती हातखंडा आहे हें पहावयाचें असल्यास 'गणपतिवर्णन'—कडवें २; 'ध्रुवचरित्र'—कडवीं ४,५; 'शुकचरित्र'- कडवीं १,२,३,९; 'सुदामचरित्र'—कडवीं १,२ ४,६; 'भीष्मप्रतिज्ञा' इत्यादि स्थळें पाहावीं. अमृतरायाच्या काव्यांत प्रसादगुण विशेष आहे. भक्तिरस ओतप्रोत भरला आहे. कटावांत प्रासानुप्रासांची गर्दी दृष्टीस पडते, तरी ती ओढून ताणून आणलेली आहे असें दिसत नाहीं. कवीची स्वाभाविक रचनापद्धति तशी असावी असें वाटतें. पदें अगदीं साधीं आहेत, तरी त्यांत हृदयंगमत्व नाहीं असें नाहीं. मुक्तेश्वराचें महाभारत वाचूं लागलें म्हणजे रसिक डोलतच राहतात; परंतु 'कौतूहलरामायण' वाचूं लागतांच त्यांची निराशा होते. तसें अमृतरायाचें नाहीं. जो रंग कटिबंधांत आहे, तोच रंग 'दामाजीचरित्रां'त आहे, आणि तोच रंग 'देव तो रे! तो रे!' अशा किरकोळ पदांतही आहे. ही गोष्ट कांहीं लहान नाहीं. 'दामाजीचरित्र' करुणरसानें ओथंबलें आहे. विठ्ठलानें विठ्या महाराचें रूप घेतलें याचें चित्र कवीनें रेखिलें आहे, त्यापेक्षां कोणता कल्पक चित्रकार अधिक चेतोभिराम चित्र काढील! विठ्या महाराचें बोलणें ऐकून बादशाहा बादशाही सोडून वेडा झाला म्हणून नवल तें काय? प्रसाद पहावयाचा असल्यास पद ९,२२,४८,११३ इत्यादि पहावीं. वैराग्याबद्दल तर कवीनें जागोजाग मार्मिक वर्णन केलें आहे. (पदें-११२,१२१,१२२ इत्यादि पहा.) अमृतरायाचा उपदेश मनावर ठसा उठविण्यासारखा असून फारच सौम्य शब्दांनीं गुंफिलेला आढळतो. (पदें ४०,४५,५०,५९,६०, ६१,७०,पहा.) उगीच कोरडे ओढिले आहेत असें नाहीं. यामुळें अमृतरायाच्या कीर्तनाचा परिणाम श्रोत्यांच्या मनावर फार उत्तम घडत असेल, असें अनुमान करण्यास जागा आहे. उपदेशाचा हा प्रकार ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. मनास पाझर आणून वर्ण्यविषय श्रोत्यांच्या मनांत भरवून देण्याची कला अमृतरायास चांगलीच साधली होती. (पदें ११२,१२१,१२२ इत्यादि पहा.)

प्रकृत कवीची कविता दिसण्यांत जरी थोडी दिसते तरी छंद मोठा असल्यामुळें तींत अनेक विषय येऊन गेले आहेत. संस्कृतांत 'बाणोच्छिष्टं जगत्सर्वम्' अशी म्हण आहे, त्यासारखाच प्रकृत कवीचाही प्रकार दिसतो. त्याच्या काव्यांत अनेक प्रकार अनेक ठिकाणीं येऊन गेले आहेत. 'शुकचरित्रां'त गर्भवासाचें दुःख, अनेक जन्म, पापपुण्याचीं फळें, यांचें वर्णन आहे. 'सुदामचरित्रां'त कृष्णाच्या अपरिमित भाग्याचें व सुदाम्याच्या दारिद्र्याचें वर्णन आलें आहे. 'राधावर्णनां'त अनेक अलंकारांचें वर्णन आहे. 'कृष्णलीलें'त कृष्णाच्या बाळलीलांचें व चटोर पोरांचें वर्णन आलें आहे. 'द्रौपदीवस्त्रहरणां'त अनेक तऱ्हेच्या आणि अनेक ठिकाणीं त्या काळीं उत्पन्न होणाऱ्या वस्त्रांचें वर्णन आलें आहे. 'जीवदशावर्णनां'त गर्भवासादि दुःखांपासून अपार वैभवाच्या शिखरावर पोंचेपर्यंतचें वर्णन आहे. शिवाय वेगळालीं अनेक प्रकारचीं वर्णनें अन्यत्र आहेतच. या अपूर्व अनेक प्रकारांच्या सन्निवेशामुळें अमृतरायाची कविता वाचणारास नुसता काव्यरसपानाचाच लाभ घडतो असें नाहीं तर त्या वेळच्या देशस्थितीचें, रीतीभातींचें, आचारविचारांचें, ऐतिहासिक दृष्ट्याही ज्ञान होण्यासारखें आहे.

अमृतरायाच्या काव्यांत प्रसंगविशेषीं शृंगार, वीर, हास्य, बीभत्स इत्यादि रसही अंगभूत आहेत. 'शुकचरित्रां'त शृंगार व वैराग्य यांचा मासला पहावयास सांपडेल. वीररस 'भीष्मप्रतिज्ञे'त आढळेल, 'नारदी' व 'सुदामचरित्र' यांतील वर्णनचमत्कार हे हास्यरस उत्पन्न करण्यासारखे आहेत व 'वेडा तामसा जोगी' हें साधेंसें पद बीभत्सरसाचें मूर्तिमंत उदाहरण होय.

भाषा—अमृतरायाची भाषा साधी, सरस व प्रौढ आहे. तींत शब्दांचीं वेडींवांकडीं रूपें केलेलीं फारशीं नजरेस येत नाहींत. अमृतरायास हिंदीभाषा किती चांगली येत असे हें सांगावयास त्यानें तींत मराठीसारखीं सरस कवनें केलीं आहेत एवढें सांगणें पुरे आहे. संस्कृताचें ज्ञानही त्यास चांगलें असावें असें त्याच्या भाषापद्धतीवरून दिसतें. त्यानें श्रीमद्भागवत, रामायण, भारत, काशीखंड, मार्कंडेयपुराण, योगवासिष्ठ इत्यादि ग्रंथ वाचले असावे असें त्याच्या कवितेवरून दिसतें.

लेखकपरंपरेनें घडत आलेले प्रमाद व संस्कृतहिंदी या भाषांची मिसळ यांमुळें त्याची सर्व कविता लावण्यास सुलभ नाहीं. अमृतरायाची भाषा सर्व काव्यांत सारखी नाहीं; कोठें गीर्वाणवाणीच्या संगतीनें प्रौढ बनलेली, कोठें हिंदीच्या सहवासानें झोंकदार झालेली, कोठें साध्या रूपानें प्रकट होणारी–आहे. या वैचित्र्यामुळें ज्या प्रकारचा वाचक असेल त्या प्रकारचें रूप धरून ती करमणूक करणारी आहे. याच कारणानें ती आबालवृद्धांस संतोष करणारी आहे. कोणी 'मुंडमथन करि जननिजनक

निजरुंडमालधर' यांत रममाण होईल, तर कोणी 'तमाम ऐने काम मुलायम' यांत गुंगेल; कोणी तर 'देव भेटेल कैसा? । आग्रह हो जरि ऐसा' इत्यादि साध्या कवनांत आनंद मानील. इतर कवींच्या कविता भिन्न भिन्न रसांच्या आवडीप्रमाणें भिन्न भिन्न ठिकाणीं रुचिकर होतील परंतु अमृतरायाचें तसें नाहीं. त्याची वाणी कोणासही अमृतरसाच्या पानानें संतुष्ट करून सोडिल्याशिवाय राहणार नाहीं. नुसतीं 'प्रभाती' या नांवाखालीं मोडणारीं पदें (पृ० १४३–१४५) जरी कोणीं एखाद्या साध्या गायकाकडून ऐकिलीं तरी तो अमृतरायाच्या काव्यमकरंदावर मिलिंदायमान होऊन जाईल अशी आमची पक्की खातरी आहे.

अमृतरायास उर्दू, आरबी व फारशी या भाषांचेंही चांगलें ज्ञान असावें असें त्याचें 'सुदामचरित्र' (पृ०७६-८३) 'पूतनावधाख्यान' (पृ० ७४-७६) इत्यादि प्रकरणें वाचलीं असतां ह्मणण्यास कांहीं हरकत आहे असें वाटत नाहीं.

विद्वत्ता—अमृतरायाला मराठी, संस्कृत, हिंदी, फारशी, आरबी व उर्दू भाषा येत होत्या हें वर सांगितलेंच आहे. व्यवहारांत त्याचें चांगलें लक्ष्य असल्याशिवाय हुबेहुब वर्णनें उठवतां येतील हें तर ह्मणावयासच नको. अनेक ठिकाणची जी माहिती त्यानें आपल्या कवितेंत गोविली आहे, ती बहुश्रुतपणाशिवाय प्राप्त होण्यासारखी नाहीं. हिंदीभाषा त्यास कशी करतलामलकवत् होती हें त्याच्या हिंदी कवितेवरून कळण्यासारखें आहे. संस्कृत भाषेचें ज्ञान किती होतें हें 'ध्रुवचरित्रां'तील चूर्णिका वाचल्यानें कळून येईल. मराठीविषयीं तर बोलावयासच नको; कोणताही कटाव वाचला असतां त्याचें वर्णनचातुर्य आणि महाराष्ट्रभाषानैपुण्य सहज लक्षांत येईल. आतां त्याच्या कवितेंत दोष अगदीं नाहींत, असें नाहीं. परंतु असले तर ते फारच कमी आहेत. एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे कीं 'एको गुणः खलु निहंति समस्तदोषान्' एक गुण असला तर सर्व दोष नाहींसे होतात; पण प्रकृत कवीच्या कवितेंत गुणांचें पारडें खालींच बसेल, यांत शंका नाहीं. कोठें ऱ्हस्वाचें दीर्घ, दीर्घाचें ऱ्हस्व, अप्रशस्त समास, ग्राम्य शब्द इत्यादि दोष त्याच्या कवितेंत मधून मधून आढळतात. परंतु असे दोष त्या वेळची स्थिति पाहिली असतां क्षम्य आहेत असें ह्मटल्यास कवीची वाजवीपेक्षां जास्त तरफदारी केल्याचा दोष आमच्यावर येईल असें वाटत नाहीं. सारांश, अमृतरायाच्या कवितेंत दोष अगदीं थोडे आहेत व जे आहेत तेही कवितेच्या बाह्यांगाच्या (प्रासानुप्रासाच्या) व अंतरंगाच्या (अनेक सुरसांच्या गर्दींत) वाचक गुंग झाला ह्मणजे त्याच्या लक्ष्यांत येत नाहींत. याची शब्दयोजना अशी कांहीं सुरस, सभर्तक, विपुलार्थसूचक, श्रवणमधुर व मनोरम आहे कीं याची कविता वाचीत असतां वृत्ति इतकी तल्लीन होते कीं दोषैकदृक् पुरुषाला आपल्या वृत्तीस चळवळ

करून देण्यास वावच सांपडत नाहीं. याच्या कवितेंत कांहीं जे दोष असतील—कारण निर्दोष असें कांहीं नाहीं—ते कोण्या सांदडींत दडून पडले आहेत हें समजत नाहीं.

अमृतरायाच्या कवितेविषयीं आह्मांस काय वाटतें हें सांगितलें आहे. तें 'भिन्न-रुचिर्हि लोकः' या न्यायानें कोणास अग्राह्य वाटेल, कोणास अपूर्ण वाटेल व कोणास अरुचिकरही वाटेल हें आह्मी जाणून आहों. यास्तव या लेखांत कोणास कांहीं गैर अथवा संशोध्य आढळल्यास मेहरबानी करून आह्मांस कळवावें अथवा छापून प्रसिद्ध करावें असें सविनय सुचवून अमृतरायाच्याच वाणीनें 'क्षणभर अमृत-मधुरगुण ऐका हो' [अमृतराय—पदसंग्रह—पद १५ पृ० १०३] अशी रसिकांस प्रार्थना करून प्रस्तुत लेखाची परिसमाप्ति करितों.

अमृतरायकृत कटाव, पदें, वगैरे.

गणपतिवर्णन.

(कटाव.)

आनंदें वंदावा गणनायक तो । मंगलदायक तो ॥ ध्रुवपद. ॥

मुंडमथन करि जननि, जनक निज रुंडमालधर, अमळकुंड तो, तृतियनयन परि, तनय विनयविभु, वक्रतुंड जिथें, धुंडिराज करिं, शुंड सरळ, मुनि धुंडिति जनिं वनिं, झुंडनिका बहु, विकटतुंड, गणपुंडरीक, मणिहारप्रलंबित, कुंडलीशकटिबंधतनूद्भव पुंडदमन, मणिकुंडल श्रुतियुगिं, गंडस्थळिं अळि, चंद्रखंडधर, गुणगणमंडित, कीर्ति अखंडित, खंड दुरितचय, पंडितगामिनि, तांडव करि जो, पद्मभवांडीं, मंडलाकृति, चंडपराक्रम, वितंडखंडन, विपक्षदंडन, स्वभक्तमंडन, सुरवर मुनिवर सकल चराचर पावन करि निज प्रसाद देउनि, पुरवि मनोरथ, विघ्नविनाशक तो ॥ मं० ॥ १

परमकृपालय, भालविलसदलि मालदान रसपान करिति, कलिकाल कांपति, परनिर्दाळण करित समरिं जो, पानन करि सुरचालक त्रिभुवनिं, शंभुबाल भवजाल तेच जंजाळ कटनकरवाल, स्मरण तें, सप्तताल करि नृत्य सरस तो, झुण झुण झुण झुण कणित नूपुरें, खुळ खुळ खुळ खुळ वाळे वांकि पदिं, फुं फुं फुं करि नागबंध कटिं, लळ लळ लळ लळ ललित कुंडलें, चप चप चप चप न्यस्त पाउलें, किणि किणि किणि किणि क्षुद्रघंटिका, दण दण दण दण उठति मंजुरव, गुं गुं गु गुं भ्रमर गुंजती, खण खण खण खण ताल वाजती, धिद्धिद्धिलांग मृदंगरव मृदु, धिमि धिमि धिमि किट, थ थ थ थ थरिकिट थरिकिट, सरिगमपधनी, निधपमगरिसा, समस्वर मुखिं भेद अलापित, स्वर वर्तुनियां, वेष्टनसंगित, तननं तननं रागरागिणी, ध्रुपद त्रिवटगति, गद्यपद्य विभु हृद्य सद्य करि, प्रबंधनिबंध, जगनल लगबग, विसरुनि तटस्थ, मौन्यमुद्रा, धरुनि सादर, समुदाय आयकतो ॥ मंगल० ॥ २

शूर्पकान विभु, गान सरस करि, तानमानबंधान यथास्थित, विमानिं सुरवर, मानवति मनीं, वर्णुनि सुमनीं, दानव मानव थकित मानसिं, देहभान निज नेणति किंनर, कनकवसनपरिधानविराजित, सिद्धिबुद्धिसह शोभमान तो, सृष्टिस्थितिअवसान करि क्षणिं, वरप्रदान दे, प्रधानपुरुष तो समान जगनग,

कीर्तिमान तो, वर्तमान आवर्तमान भवि, तारि धरुनि अभिमान सुजनीं, अमृतराय कवि सदापदा नमि, वारणमुख तो, विघ्ननिवारण, स्थिरचरकारण, चारण वर्णिति, त्रिभुवनधारण उदरिं करित जो, धर्मस्थापन आगम विरची, धर्मविधायक तो ॥ मं० ॥ ३

जगदंबावर्णन.

(कटाव.)

आनंदें वंदिली आतां । जगदंबा माता ॥ ध्रुवपद. ॥

जिच्या मुकुटिं लोपति रविकोटी, केश निल कुटिल, वेणिकाजुटि त्रिगुण बिणवटि, गळां ताइत पेटी, निखिल समपटी, कस्तुरि मळवटी, केशरी उटी, किं विलसित चंद्ररेख तळवटीं, भ्रुकुटि धनुकोटि, ओढोनि करि उभय नयन शर सुटी, भवविभव लुटी, प्रपंचभय लुटी, नेत्रयुगकृपापांग सुखदटी, नासिकसरतटीं बेसर जणु राजहंस शेवटीं, अधरयुगपुटीं, निगम पुटपुटी, वदनिं द्विजदाटी, रुचिर हणुवटी, केयुर बाहुवटीं, हातसरघटित शोभति मनगटीं, शिवाचें मन गुंतुन राहिलें हनुवटी, चरणतल किसलयदल पर्णकुटी, उपासकांसि संरक्षि गोरटी गोमटी, तूं हिमगिरिबेटी, नाजुक धाकुटी, शंभुसह पटीं बसलिस, सुर भेटीस येति, ब्रह्मविष्णुच्या कोटी, वेलपाटीरवाटी, विमानांच्या थाटी, मुखिं भाट बोलति माय मोठी, वंदोनि भातरोटी, केळें नारळें ओटींत, आत्मरूप पांटींत भरभरुन वांटिती, सुरविटप वाटित जय जय शंकरवनिता जगदंबा० ॥ १

अखंड परशिवनिडांत सखीसह क्रिडा करित, मुखिं विडा, द्युमणि तानवडा, लज्जित कानवडा, जडित करीं चुडा, अलख शिरीं जुडा, प्रथित पदीं जुडा, वल्लित मऊ खडा, कौस्तुभ खडा, हृदयकुचगडांत मणिगणलडा लोंबति, कोण विडा, भज जाय पिडा, किमर्थ ही इडा, कां हो इंद्रिय कोंडा, अंबेचा भक्त गुंडा, तयासि हत्ती घोडा, चित्तानुरूप जोडा, सुपुत्रधन जोडा, विस्तीर्ण योग्य वाडा, कल्पतरूच्या झाडाचा बाग घरिं, गाडा भरुनि मोहरा, हांडा भरुनि हिरे, पांडा पांडासि मोठा तांडा, गाई म्हशी झेंडा, येताति विप्रझुंडा, म्हणती 'पात्रें मांडा रे मांडा,' नित्य मांडा जेवण नित्य लोकीं, निर्दोष कीर्ति, भुक्ति मुक्ति योग युक्ति, ज्ञानशक्ति सद्विरक्ति, लाहुनियां काशीवास, भेटीलागीं भाग्यवान, भालचंद्र भागवत, भागीरथी सुरसरिता ॥ जगदंबा० ॥ २

सहज रजतनग नभीं, सुरभिसम उभी, मदन जिच्या नाभीमाजि, शंभुसि नाभी, अंतरिं आत्मलाभी, निरत ब्रह्मलोभी, व्यापक शुभाशुभीं, काष्ठ जिवीं स्तंभीं, मृत्तिका जेंवि कुंभीं, आब्रह्मस्तंभदर्भा, परमाणूच्याही गर्भी, तुरगइभ-इभी, रणांत दुंदुभी, वाजवि शस्त्र करभि कभी, नाग चित्ते शरभ शरभी, त्याहि भीमनादें भय धरिलें शुंभनिशुंभीं, अंबेनें रणांत मारिले दोघे दंभी, प्रताप स्वारी विजयाची चौंर डोल कुंभी, जयजयकार वाजंत्री वाजति पुढा-रंभीं, कोतवाल नंदी वरित आनंदित शूळपाणी, हस्तिदंताची पालखी पाणी, सोन्याचें ढाळुनी काम खिलगारी, विश्वकर्म्या हातींची रचिली वक्रदांडी, तेथें आसन मांडी, तळीं तक्ये मांडी, स्वामीकार्तिक धुंडीसहित चाले चंडीपुढें, धांवती वायुवेग अश्वारूढ गुढ्या धरुनी मुख्य देवांच्या कामिनी, करी तमाम हाटक हस्त खंडीं, मानस क्षीब भक्तीचें शृंगार पिंडि पिंडि, त्या बाणरा-वणचंडीआदि शिवगणाच्या दर्शना येति झुंडी, ते 'हरहर महादेव' उच्चारिती तोंडीं, श्रियाळ वृत्त खंडीं, वाटेंत मोतिं मुष्टिनें टाकिति खंडी खंडी, ऐशी अंबा जीवन्मुक्ता अन्नपूर्णा, भर्गाचें भाग्य वर्णा, अमर समर गण समरसती चरणीं तळीं उतरुनि शशि नमिती अनुपमित अमृतरूप अगणितगुणभ-रिता ॥ जगदंबा० ॥ ३

ध्रुवचरित्र.

(कडाकाछंद.)

प्रथम ब्रह्मदेव देवापासुनि, मुख्य शतरूपा, स्वायंभु मनू त्याच्या तनू-पासुनि, प्रियव्रत सुशील आत्मनिरत, दुजा लोकभरण, सौख्यकरण, उत्ता-नचरण[1], विहिताचरण, वृद्धवयीं श्रीहरिसी शरण. त्याला दोघी स्त्रिया, तयां-मधें एक प्रिया आवडती सुरुचि, तिचा आवडता उत्तम, तो मांडिवरी बसवि; तेथें नावडती सुनीति, तिचा ध्रुवहि पावे, बसूं धावे, टाकी अंकीं पाय, त्याला वांजे सापत्नमाय, कलहकारिणी बलाय मारी शब्दशस्त्रघाय; म्हणे, 'पोरा-परता जाय. जाय वृथा करिसि काय ? हा तों अनधिकारी काय. तुझा बसाया! चा ठाय नोहे नोहे नेणे राय! कां रे पुरला आयुर्दाय? भाग्य दाय नसे तूज; ऐक राज्यसांप्रदाय. हा समुदाय तों मंदीय[2]; तुला व्याली सापत्नमाय.' ऐकुनि मोकलुनी धाय, रुदन करित वायवाय, वायसाचे परी वाक्यचुंचुसायकांनीं टों-

---

१. उत्तानपाद. २. मांडीवर ३. माझा.

चियला, बायको अपायरूप बोलतसे उपाय, 'सुकृतआय पदारें करुनि घे व्य-वायविमुख मुनीशिवाय नुमजतसे दिव्यईशदर्शनपर्याय अंतरस्थ तो अमाय, तया श्रीहरीसि गाय, तूं गाय अर्जवूनि मनीं एकनिष्ठ ध्याय, त्याच्या कृपाबळें माझें उदर राजसुत सराय येथें येऊनियां समाय, तेव्हां नृपाजवळि बसें कदा न घडे अंतराय, हाचि समज अभिप्राय. गाय वांसराचे परी मुला! मला हेचि माय बोभाय जननि मजचि बरा शिकुनि घेइं न्याय, न पावसी प्रत्यवाय, पिशिल राज्यदुग्धसाय, हरिरसायण सेविल्यावीण व्यर्थचि व्यवसाय, वेगीं अपसर सर मागें हो.' । त्याला देव साह्य झाला हो. ॥ १

असें परिसतां उत्तानचरणनृपाचें संतान, तान गिळुनि गेला, धसति उरीं दुष्टवचनबाण, भान तुटे तशी आननगत भा निसरुनि भानु होता उभा सभा-सदांत भास त्या नभास भासला इभावरी समान, तें इभावरील पतनतुल्य भं-गला गुमान, जणूं कलंडलें विमानराजमान गलित मान, तळीं मानव करि भान, करी मानसांत जाणपणें जाणवली संचरली ग्लानि रुक्मबाण झाला म्लान, आलें वाटलें निदान, परदान शांति कीं गृहानळीं घृतावदान, दान कृपण देत तदा न तोष दानवासि, दानवारि झोंबल्या उदानवारि, तेविं तो सुजाण मानी विपरित विंदाण, प्राण जाईल तरी जावो, परी ज्ञान नको वैरिणीचें, अर्जवूं भगवान्, ईचें थान करूं पान, हेंचि विषासमान, ते अपानसाम्य बोल फोल पान, वृथा पुंगीवीण पान, रुचति किमपि न सोपान शमन, तसें अहो चुक्या नसुनि मुक्या शिरीं मुक्या मुक्या बुक्या, जशा वाग्गद्गद दण दण दण रुदन करित जननि-सदनिं आला हो. । त्याला देव साह्य झाला हो. ॥ २

असा मनुकुलमणि तोकें, सुश्लोक येत मातृगृहीं. शोकविवश झोक जात, म-त्सरविष ओकतसे, घोक करित शब्द फोक सांगतसे थोक थोक, गोकटाक्ष व-त्सावरि कोकनदमुखी, तशी त्रिलोकुनी सुलोक वाक्य आकर्षुनि करि विवेक, बोल बोलिली सुनीत, 'ध्रुवा! नव्हे साधु रीत. नीतशास्त्र तूं अधीत. हें कथितही ऐकियलें नयेचि धीत व्यर्थ सांडुनि दे क्षीत, भीतदायक हरि जीत, आतां सा-वध सावध, होय हरिपदीं विनीत, भक्ति दुर्लभ अवनींत, हेंचि सेवीं नवनीत, करिल शीतळ बहू पीतवसनगीत गाय वीतमोह प्रीत धरीं कृष्णरूप वर्णिलें श्रु-तींत परब्रह्म सर्वातीत ब्रह्मदेव संस्तवीत, त्याचें दैवत उपवीत, न तें कधींही

१. गृहस्थाश्रमास विमुख. २. ध्रुवबाल. ३. सुपारीवांचून. ४. बालक. ५. उत्तमकीर्ति ज्याची असा.

लपवीत, प्रगट भूषण मिरवीत तसें आपण व्हावें, लव्हू वत्सा! पावसी प्रतीत, सुरुचि वचन वदे तप करिं हें रुचिकर मज उमजतसे, तूं समज समज हित बरवें, तुझा बाप आजा पणजा सकलराज्य पूजा टाकुनि, देव पुजा वोजा करुनि, ध्वजा लाविति प्रतापाच्या; गजालागुनि योजावया महावत शिरीं जाउनी पिंजारोनी पंजा रोवी जसा तसा धिवसा देउनी श्रुति विरचित खचित रवें उचित बोध केला हो. । त्याला देव साह्य झाला हो. ॥ ३

'मुला! वय तुझें लहान, तुला लागल्या तहान, उदक न मिळतांचि हान, धैर्य पाहिजे महान, तुझी बाल्यबुद्धि असो आतां मजपाशीं गहाण, हें शहाणपण त्यजुनि संतपायिंची वहाण होउनि फिरसि तेव्हां देव भेटल, संशय तुटल, दुःख अटल, सौख्य वाटल, विषय विटल, दुरित घटल, लाज फिटल, कुमति सुटल, नयनपटल कांटल पुढें वाटल नेत्र येउनि नेटल, प्रेम दाटल, विठ्ठलकृपा होय तेव्हां तुझें माझें बरें होइल, जाइल दैन्य, येइल भाग्य, देइल देव ध्रुवपद मग सार्वभौम राज्य एथिल, कथिल जसें सोन्यापुढें, कथिल कोण स्वहित तुला, शिथिल देह नोहे तोंवरि मथिलें पाहिजे निगमोदधी, आतां सुता! तप करिं करिं, जाई रे वेगीं. रति धरिं हरिपायिं हो.' । त्याला देव साह्य झाला हो. ॥ ४

ऐकुनि मातेचे बोल दिला वनाकडे डोल, पुढें दऱ्या खोऱ्या खोल, खोल पर्वताचे गोल, कैंची उदकाची ओल, गोटे मोठेमोठे, वाटेमधें कांटे, तेणें फाटे पाय. वाटे दुःख महा, जाती उपवासें झोल, बळें सांभाळितो तोल, वदन कोमाइलें, अधरसहित सुकले कपोल, काकपक्षही अलोल, वरुनि तपन तपत खडतर, जणुं वर्षति विंगोळ, उठति मृगजळकल्लोळ, येती उष्णाच्या आह्या, पायीं छाल्यी भाजति, बाह्या पांघुरणावीन, राह्यालागुनि ठाव नाहीं, वृक्षकोटरढोल, चित्तवृत्तिहि आंदोलताति, मोल नसे असें राज्य मानियलें फोल, 'आतां काय करूं? कसें करूं? कसा हरी मला भेटल? कसा दिसल? केव्हां पाहिन? राहिन पायीं' म्हणुनि परम आवडिनें, प्रेमभरें रडे, पडे, झडे, पुढें धीर वीर पुरुष बरें सुरतरुसम परगुरुवर नारदमुनि देखियला हो. । त्याला देव साह्य झाला हो. ॥ ५

चुकामुकीमाजि माय देखतांचि वाडेकोडें बाळ जसें गळां पडे, तसा योग

१. महान. २. धातुविशेष. ३. गाल. ४. झुलपंदी. ५. सूर्य. ६. निखारे. ७. मृगजळाच्या लहरी. ८. ज्वाळा.

येउनि घडे, देवऋषी देखुनि दिठीं, बळें पायीं घाली मिठी, 'ध्रुवा! ऊठ ऊठ.' म्हणत, तरी उठाउठीं किमपि नुठी मिठी मुठीमाजी चरण धरुनि, कठिणवाक्य-रहित वदे नारद साकर मिठी तसें, बोबडें बाळक साबडें बोलत, 'दाखवा दे-वदेव भेटुनि माझे करीं मनोरथ पूर्ण, तूर्ण कृपा करुनि सांगा जी.' म्हणुनि वा-रंवार विनवी हो. । त्याला देव साह्य झाला हो. ॥ १

(चूर्णिका.)

'रे रे आदिराजवंशावतंसा! स्वराज्यसरोवरवियोगितबालकलहंसा! अंसाव[1]-रोनि गलितोत्तरीयपुंसा! चौंसांचा[2] गर्भ कंसारी गंवसावयालागिं धिंवसा[3] धरो-नि वागतोसि निश्वसनविराजधिंसा, तरी येथ पाहिजे मुख्य अहिंसा, तेव्हांच हरि-दर्शनें होशील हिंसा[4], अंगिकारावी उत्तरमीमांसा, शीर्णपर्णानिलाहारें[5] शुष्क करावें स्वदेह मांसा, संसारदुःख विध्वंसावयालागिं आत्मप्रशंसाविवर्जित परमहंसा-चिया पदपांसामाजि सांसारिकजनरहित असावें केवळ विविक्तदेशीं[6], त्यक्त-द्वेषयुक्त वासना दुर्वासना रहित मृद्वासनावरि मैत्र्यादि वासनायुक्त हरिउपासना क-रित बसावें आब्रह्मादिभुवनभोगीं रुसावें, यदृच्छालाभ संतुष्ट द्वंद्वातीत विमत्सरपणें विलसावें, अमानित्वादिसाधन भगवद्गीतेसि पुसावें, अंतर्बाह्य वैराग्यभाग्यामाजि योग्य सदाचरणें मानस कसावें, दुराग्रह वितंडवाद न करोनि सच्छास्त्रसद्गुरु-वाक्य परिसावें, तार्तीयभागउर्वरितशार्वरींत[7] उठावें, निरलसपणें चित्त ठसावें, ब्राह्ममुहूर्तापासूनि शय्यासनस्थपर्यंत नित्यापरोक्ष परब्रह्मवस्तु आपण अनु-भवुनि ब्रह्मरंध्रीं सहस्रदलपंकजीं सद्गुरुध्यानमानसपूजनअजपाजपनिवे-दनानंतर प्रातःस्नानसंध्या ब्रह्मसनातनजप करोनि यथापद्धति वैदिकतांत्रि-कमिश्रित परमेश्वरार्चन आरंभावें, पुरुषसूक्तोक्तरीत्या षोडशोपचारें यद्वा च-तुःषष्ट्युपचारामाजि यथापद्धति लब्धोपचारें तन्मयतेनें शैली, दारुमयी, लेप्या, लेख्या, सैकती, अथवा सूर्यमंडळीं, जळीं, स्थळीं, अष्टमूर्तिस्वरूप श्रीहरीसि पुजावें, मग स्वस्तिकासनीं मीलिताधर वियोग दंतपंक्ति अस्पष्टरसना समकायशिरोग्रीव अर्धोन्मीलितनेत्र तत्वमुद्राधृतहृत्कमळीं विष्णूचें ध्यान करावें, चरणकमल नाभी-कमल कमलालयश्रीहृत्कमल कमलमालामंडितहस्तकमलीं कमल मुखकमलीं नेत्र-कमल हा विमलकमलविग्रह भक्तमनोभ्रमर जीवनसाधक नेत्रषट्पदाराम[8] स-

१. खांद्यावरून. २. चार वेद आणि सहा शास्त्रें यांचा. ३. इच्छा. ४. थंड. ५. सुकलेलें पान आणि वायु यांच्या भक्षणानें. ६. एकांतदेशीं. ७. तिसऱ्या हिशानें शेष राहिलेल्या रात्रींत. ८. नेत्ररूप भ्रमरांची बाग.

जलजलदश्याम कनकमुकुट कनककुंडल कनकहार कनककेयूर कनककटक सौंदर्यकटकाकृति अकपट अतिनिकट कनकपटालंकृत कनकवृष्टिकारक परमप्रसन्न ईषद्धास्यवदनप्रसादाभिमुखवरदानयुक्तचतुर्भुज शंखचक्रगदापद्मपीतांबरधरश्रीवत्सकौस्तुभ आपादलंबिनी वनमाला कालत्रयाबाधितसत्यज्ञानानंतानंदैकमूर्तिच्या एकैकावयवीं चित्त स्थिर करीत जावें, अंघ्रितलापासूनि शनैःशनैः अजितस्वरूप जितावें, मग अखंडाकाराकलितवृत्तिनें नखशिखपर्यंत चिंतावें, चिंतितां चिंतितां स्वेदरोमांचकंपवाग्गद्गदादिसात्विकाष्टभावें भगवत्प्रेमानंदमग्नतेनें साक्षात्कारें सकल मनोरथ सिद्धमनोरथ होउनि निजानंदपदीं पावावें,' ऐसा बहु बहुप्रकारें सज्जनसंप्रदायें शिक्षिला, मग दीक्षाधिकारार्थ पूर्णकृपाकटाक्षें लक्षिला, वरदपद्महस्तें मस्तक स्पर्शिला, दक्षिणश्रवणीं लागोनि श्रवणमनादिइंद्रियांसि न कळतां प्रणवसहित द्वादशाक्षर वासुदेवमंत्र उपदेशिला, तो आत्मषट्कोपनिषदोक्तस्वात्योदकबृहद्बिंदु श्रवणशुक्तिपुटीं प्रवेशला, तो अहमादि वासुदेवसर्वनित्यानुभवें अंतःसमुद्रीं उज्ज्वलितमुक्ताकारें आवेशला, एवं श्रीसद्गुरुराजनारद ब्रह्मवीणापाणिश्रीनारदवासुदेवें ध्रुववासुदेवातें वासुदेवत्व हें स्मृति देतां तो वासुदेव स्वतःसिद्ध पहिलेंचि प्राप्तिवत्प्राप्त मानूनि कृतकृत्यपण राहिला, कंठगतचामीकरवद्गुरूपदिष्टआदर्शदर्शनें वस्तु लाभला, अपरिहार्य उपकारकर्ता ब्रह्मपुत्र देशिकराय प्रदक्षिणोनि नमस्कारिला, यानंतर निर्गुणप्रतीतितें पावला असतांहि सगुणसाक्षात्कारार्थ मधुवनीं चालिला, तेथें भगवत्सांनिध्य जाणोनि प्रशस्त कालिंदीतटीं स्थिर जाहला हो. । त्याला देव साह्य झाला हो. ॥ ७

(कडाकाछंद.)

पांचां वरुषांचें मूल, कदां न करि मूळमूळ, खाउनि फळें कंद मूल, करी पातक निर्मूळ, मूळमंत्र जपुनि देव पुजी जाणुनि वाहे फूल, सेवुनि कालिंदिचें कूल, नेसुनि वैल्कलें दुकूल, ध्यानीं मानस अनुकूल, जेव्हां भुकेचि ये भूल, तेव्हां म्हणे वाय हूल, बांधुनि धैर्याचा पूल, कधीं न पेटवी चूल, जसा शूळपाणी धुर्ळामध्यें कंथा ना झूल, सुखें डुल्लतसे भक्तिपथें टाकित पाऊल, शुद्ध जेविं तूल हळू वस्तु मात्र वासुदेव हेंचि धन करी वसूल, कदां व्याकुल नव्हे गोकुलपतिसि बकुलकुसम मुकलेंसें वाहे सुकलें पान मोकली तरु तें उकलुनि, मग सकल दिवस ढकलुनि, खाय केंलरवशिशु विकल न तो अक-

---

१. सुवर्णाची बाहुभूषणें. (ज्यांला अंगदें म्हणतात तीं.) २. तीर. ३. वृक्षाच्या सालीरूप पाटाव. ४. मधुरस्वर ज्याचा. (शिशूचें विशेषण.)

कुनि मन शिकल करुनि शाकशकल पिकलेंसें फळ तुळसिचें दळ अंजळिनें जळ घेउनि, असुनि विजनिं बसुनि, अजन हरिचें पुजन करित भजनचि प्रिय झाला हो. । त्याला देव साह्य झाला हो. ॥ ८

सदा मानसीं वितृष्ण. बळें सोशितसे उष्ण, पुढें कृष्णमृगा देखुनि म्हणे, 'कृष्ण कृष्ण कृष्णगड्या वृष्णिकुलोत्तंस महाविष्णुदेव तूंचि काय? कृष्णातटीं जन्मलासि, कृष्णाहिदमन, तुवां कृष्णा रक्षिलि, दिससि कृष्णसारथी, अखंड कृष्णमुनी वर्णितसें, आसाई करूं.' वदुनि नमन करी क्षणक्षणा प्रदक्षिणासहित चित्त दक्षिणा देउनि, गवतभक्षणार्थ घालि धरुनि ब्रह्म लक्षणासुलक्षणाविचक्षणाग्रणी तृणासनीं बसवितां मृणालमृदुभुजें घृणा त्यजूनि त्यासि आलिंगी विना कळगुणापरी गुणासि गुण गुण गुण गाय तरुत्वचा झुणा नेसुनि उणा भाव दिसों नेदी खग नग मृग अग ढग ते हरिजिवलग झग झग मग भगणसहित गगन धरुनि जग नग भगवंत सकल भक्तिभानु उगवला तो तन्मय. तेणें कृष्णरूप झाला हो. । त्याला देव साह्य झाला हो. ॥ ९

(चूर्णिका.)

सांप्रत कलंकी अवतार झाला नसतांहि म्लेच्छसंहारादिभगवच्चरित्रें व्यासाज्ञेनें जयदेवादिकीं अष्टपदींत वर्णिलीं. तीं श्रोत्यांहीं साधुसाधु शब्दें अतिसत्कारें आकर्णिलीं, अधुनाहि भाविभगवद्गुणानुवादवर्णनपरिणालिका चालिली, याचप्रकारें नारदें ध्रुवातें हरिकथापरिपाठी सांगीतली, 'रे रे ध्रुवा ताता! पूर्ण परब्रह्म रामकृष्णादि अवतार पुढें जन्मतील, त्यांची लीला निःशंक गात जावी; लज्जा त्यजावी; चरित्रें पाठ करावीं; नामें दीर्घस्वरें उच्चारावीं.' हे आज्ञा स्मरोनि ध्रुव मधुवनचारी उत्तमाधिकारी यमुनातीरविहारी कृतशौच दंतधावनोत्तर प्रातःस्मरणपूर्वक स्नानसंध्यादिक आवश्यक आचरोनि, हरिकीर्तनीं रंगला, करतालिकायुक्तनर्तनहावभावसहित नामावर्तन करूं लागला. हरिचर्चानुकीर्तनामाजी यमुनेचें नीलोदक घननीलहरिमय पाहे; तंव प्रवाहजलौघीं मत्स्य देखतां मत्स्यावतारहरीसी वाहे. तो न बोलतां म्हणे, 'त्राहें त्राहें'. पुढें कांसव अवलोकितां वासवानुजकूर्मावतार जाणोनि तटस्थ राहे तो अंतरीं हरिपण क्षणेक लाहे. मग हरिनाममंत्रोच्चारें अवगाहे. त्रिदेहस्थितीनें दोन चार हात वाहे. तों जळपान करितां सूकर देखिला. तो वराहावतार लेखिला. म्हणे, 'वसुंधरा दंष्ट्रेसि

---

१. कालियाला दमविणारा. २. द्रौपदी. ३. अर्जुनाचा सारथी. ४. व्यास. ५. दया. ६. प्रवेशे. ७. पृथ्वी.

धरिली ते तुम्हीं काय ?' केली बहुधा सर्वभूताश्रयें करोनि टेंविली. तंव अंघ्रि सिंह विलोकितां म्हणे, 'जय जय नरहरी ! तुज चिंतितां चिंतितां तत्काळ होय नर हरी. जय जय भवगजकेसरी ! परिहरीं भेदमति दूसरी. जय जय अंतर्यामी वामना ! आतां आवरीं या मना. जय जय भार्गवरामा ! तुम्हीं कां न वरिली श्री रामा? जय जय दाशरथी श्रीरामचंद्रा ! सांद्रानंदविग्रहसमुद्रा ! जय जय श्री कृष्ण ! यशोदानंदवर्धन ! गोवर्धनोद्धरण ! पूतनातृणावर्तअघबकधेनुकवत्स-अरिष्टकेशिकुवलयापीडकंसचाणूरकालयवनादिअसुरमर्दन ! जनार्दनार्जुनर-थाश्वचाळक ! पांडवप्रतिपाळक ! बाळक मी तुज आठवितों. केव्हां भेट देसी, कैं वैकुंठींहून येसी; प्रसन्न होय श्रीमद्धृषीकेशी ! आलिंगीन हृदयेशीं. चरण मार्जीन केशीं. याप्रकारें सर्वस्मरणपूर्वक कृष्णस्मरणीं प्रवर्तला. ॥ १०

(कडाकाछंद.)

कृष्णगीत गात गात, समाधिस्थ उभा राहे, शुभाचरणसहित सर्व सुभापणें आवरोनि नभामध्यें उभारिला भाला, तटस्थ तमा इभालागिं भार देतां नाव जशी डगमगिती, तेविं भुमी सलिल शैल कानन कंपायमान ध्यानसहित प्राणरोधें लोक सकळ विकळ होउनि वैकुंठा शरण गेले; चरण धरुनि म्हणति, 'देवा ! मरण आलें काय नेणों. करणें कांपताति. सांग आतां बा ! करणें कैसें ? सांग तरणोपायासि. उदरभरणाविण गेलों.' अमृततरण घोटवेना तरुणतरणितुल्य ताप मुखा परहित तापभरें आपशुष्क अधर देखुनि जगद्व्याप मेघगंभीर[1] संलाप करुनि आश्वासि, 'सुरवर हो ! भिऊं नका ध्रुवबाळक तप करितो त्यासि मी प्रसन्न होतों. सर्व तुम्ही सुखी व्हाल, सुधा प्याल, ल्याल गाउनि घ्याल माझें नाम, भवव्याळरहित[2] व्याल पुत्र पौत्र; अरे ! न्याल माझी मूर्ति मनीं ध्याल, तैं भ्याल काय, भवालागीं त्याल, बरें निर्भय मग याल निजानंदपदीं.' असें वदुनि दुःखदहन सहनशील गहनाशय वहन करुनि गरुड, दिव्य गरुडध्वज ध्रुवापुढें आला हो. । त्याला देव साह्य झाला हो. ॥ ११

(चांणक्य.)

स्वस्ति श्रीमत्षड्गुणैश्वर्यसंपन्न सर्वांतरात्मा सर्वोत्तम सर्वेश्वर जीवजंतुमात्रै-कमनःसाक्षिसच्चिदानंदैकविग्रहें ध्रुवाकडे अवलोकिलें. तंव तेणें आपुलें ध्यान धरिलें. निर्विकल्पसमाधिस्थ प्राणस्पंदरहित अंगुष्ठाग्रीं उभा राहिला. बहुज-

१. मेघासारिखें गंभीर भाषण. २. प्रसवाल.

न्मार्जित स्वल्पकाळें अलभ्य लाभ लाहिला. जितानिल जितक्रोध समाहितांतःकरणें अनाहिताख्यचक्रीं द्वादशदलकमलीं ध्यानैकनिष्ठ बाह्यविलोकनीं अनासक्त जाणोनि सर्वोत्कृष्ट अचिंत्य अप्रतिहतयोगशक्तिद्वारा स्वांतस्थ निजरूप अनंतें गुप्त केलें. महत्प्रयत्नें साधिलें तें न दिसतां प्रौढात्प्रौढतरमति ध्रुवबाळकें निर्बुजूनि नेत्र उघडोनि निरखिलें. तंव तेंचि सन्मुख संनिध पुढें देखिलें. तें सत्वाश्रयें सत्वलभ्य मूर्तिमंत सप्तकोटिसूर्यकोटिचंद्र कोटिविद्युत्प्रकाशास्पद निरामय निर्द्वंद्व नित्यशुद्ध निरतिशयानंद यति भूतप तमालनील त्रिभुवनकमनीय चित्र नयनीं रेखिलें. सावयव परब्रह्म जवळी उभें ठाकलें. मग अष्टांगें दंडवत्प्रणामिलें. अहंदेहत्व गाळिलें, वासुदेवोऽहमिति सदहंकारचंदनखंड भगवच्चरणसाहणेवरि उगाळिलें. कृतांजलि परम नम्र स्तवावया उद्युक्त, परि मन वाचेसहित मौनावलें. टकमक उगेंचि पाहूं लागलें. अद्भुतअमायिकदर्शनें वेडावलें. तंव देवें ब्रह्ममय अंबुवत्कंबुमुखें कपोल स्पर्शिले. तेणें श्रुतिशिरोभागर[1]हस्य स्फुरद्रूपपणें स्तोत्र आरंभिलें. तें 'योऽन्तः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्ताम्' इत्यादि द्वादश श्लोक द्वादशादित्यवच्छ्रीमद्भागवतीं चतुर्थस्कंधीं प्रसिद्ध श्रवण होतां जगदीश प्रसन्न झाला. वरदान बोलिला. षट्त्रिंशत्सहस्रवर्षें[2] सप्तद्वीपवतीचें अविकळ राज्य करीं. मज नित्य असेंचि हृदयीं धरीं. सकळ मनोरथ पूर्ण होती. सर्व शत्रु शरण येती. संतति संपत्ति आरोग्य बलवान् नित्य निष्कंटक राज्य केलियावरि अढळ ध्रुवलोकीं बसावें. ज्योतिश्चक्र नियमावें. धान्यखलाचे मेढीस वृषभवेढीसमान प्रौढी वर्णोनि ध्रुवपदातें सप्तऋषी प्रदक्षिणा करिताती. तितें अक्षय अचळ आकल्प साम्राज्य कुलोत्तमातें अर्पूनि आपण हरि अंतर्धान पावला. ॥ १२

(कडाकाछंद.)

असें पावुनी वरदान, देशिकें केलें प्रस्थान; मार्गीं आठवी हरि बाप चित्तीं सांठवी संताप, अहा! झाला कृष्णवियोग, त्याविण जावो जळो भोग, नश्वर काय करूं? हें भाग्य कसें हरपलें? वैराग्य गेलें औदासिन्य अनर्घ्य. छी! छी! वैभव अश्लाध्य कां हो! मागितलें म्यां राज्य? जें कां सत्पुरुषाला त्याज्य. ठकिलों मायेनें मी मूढ, नोहें साधननिस्पृहरूढ, चुकलों परमार्थाची वाट, हा तों प्रपंच दुर्गम घाट, पाहुनि डोळां कृष्ण उदार मूर्खें हरविला मंदार, झाला आत्मसुखासि उदार, केव्हां भेटल जगदुद्धार? यापरि देववियोगें दुःखित

---
१. उपनिषद्रहस्य. २. छत्तीस हजार वर्षें.

आठवुनि हरिपाय सुशीतळ भूतळ पंथ हळु हळु चालुनि सत्तावंत निजनगरा-
समीप आला हो. । त्याला देव साह्य झाला हो. ॥ १३

(चूर्णिका.)

पूर्वोक्त कथासंबंधें श्रीनारदें आपुलें इच्छित वासुदेवतत्व ध्रुवहृदयीं ठेवोनि
साधनार्थ यमुनातटमार्गस्थ करुनि आपण उत्तानचरणराजधानी प्रवेशला;
रायें सुवर्णासनीं बैसविला; पाद्यार्घ्याचमनमधुपर्कादिकें सांग पूजिला; स्वराज्य
निवेदूनि विनम्र सचिंत उभा ठेला; कां जो पुत्रवियोगदुःखातिशयें दुखावला,
तो सर्वज्ञब्रह्मपुत्रें ध्रुवाचें कुशळ भगवत्प्रसादऊर्जितक्षिप्रदर्शनलाभ सूचवोनि
स्वस्थ केला आपण त्रिजगद्गुरु षड्जऋषभगांधारमध्यमपंचमधैवतनिषाद या
सप्तस्वरीं महती वीणा टणत्कारोनि 'नारायणनारायण'गजरें ब्रह्मलोकीं
चालिला. तंव इकडे वैष्णवशिरोरत्न ध्रुव येतो, हे वार्ता वार्तिकांहीं राजयाप्रती
सांगीतली. ॥ १४

(कडाकाछंद.)

ध्रुवागमन ऐकतांचि भूप हर्ष मानितसे तट तट तट तुटति कसे; पूर्वदिशे
पूर्ण चंद्र समुद्रासि जसा दिसे, उचंबळूनि गर्जतसे; सूर्योदय देखतांचि कमळ
जसें विकसतसे; वार्तिकांसि गोष्ट पुसे, वरी खिसेभरित होन त्यांसि अर्पितसे,
हंसे बहुत, खासे खासे वस्त्रजोडे ज्यांसि उंच कतक ठसे सेवकांसि वांटितसे;
याचकाचें दरिद्र तें दिगंतांत पळुनि वसे; दानशूर नराचिया शिरावरी उत्तान-
चरण दिसे सुसेमखिल जातरुप जसें कढुनि जाणों जळुनि विलसतसे, तेज
जसें फांकतसे, टवटवी मुखीं वसे, विप्रसहित सुप्रसन्न. क्षिप्र दिव्य रथीं बसे सु-
प्रसिद्ध सुप्रभ्रहय अप्रतिहतवेगवंत कोतवाल पुढें स्तल भूमी म्हणुनि कदां भूतळ
अनळ तीन ते कार्तस्वरभूषित गजराज ते विराजताति, लख लख लख लघु-
पताक चतुरंगसैन्यभार स्त्रियांसहित राणा तो रानामध्यें ध्रुवालागीं आणावया
आला हो. । देखुनि विस्मय बहु झाला हो. ॥ १५

(चूर्णिका.)

श्रीमन्मार्कंडेयवसिष्ठादिचिरंजीवमाळामणिमेरु, वैष्णवाग्रगण्य भगवत्प्राप्ति-
पुरुषोद्यानसुरतरु, तो निजपुत्र रायें रथातळीं उतरोनि उचलिला, हृदयीं
आलिंगिला, सर्वांचि आदीं सुरुचि सापत्नमाता ध्रुवें धांवोनि वंदिली. ते
निर्मळांतःकरणें 'चिरंजीवचिरजीव'शब्दें गौरवोनि समाधान पावली. तदुत्तर

मुख्य सुनीती जननी परिष्वंगोनि[1] विजयीपुत्रसुखें सुखावली. उत्तमबंधूसहित इष्टमित्रगणगोत्रप्रधानप्रजादिक सकळ सभा संतोषली. मग प्रश्रयावनत दांत पितृमर्यादशील राजकुमार नृपें स्वहस्तें हस्तिनीवरि बैसवोनि स्वस्थ परमाल्हादितचित्तें वाजत गाजत वैदिकब्राह्मणमंत्रघोषपुरःसर मिरवत मिरवत नगरामधूनि स्वगृहीं अमात्यशालेमाजि आणिला उत्साहभरित सभा करुनि बैसविला जंव जंव ध्रुवाचिया लेंकुरपणांत बुद्धीचें धैर्याचें भक्तीचें ज्ञानाचें वैराग्याचें स्नानसंध्यादिक सुशीळतेचें तपाचें हठयोगाचें नारदसत्समागमाचें भगवत्प्राप्तीचें आश्चर्य करोनि महर्षि देवर्षि स्तविति तों तों राजा सुख मानोनि कितेकां दिवसां प्रजांचें मनोगत जाणोनि मनोगतानुरूप ध्रुव राज्यासनीं बैसवोनि आपण ब्रह्मारण्यामाजि निघाला. तेथें वानप्रस्थ शब्दब्रह्मनिष्णात[2] स्वानुभवीं महानुभावें सुस्वरूपपरमहंसाचिया मुखें वेदांतश्रवणें सम्यग्ज्ञानक्रियासहितपणें ब्रह्मीभूत होऊनि विज्ञानानंदीं समरस झाला हो. । त्याला देव साह्य झाला हो. ॥ १६

याप्रकारें ध्रुवें अप्रच्युतैश्वर्यअच्युतप्रसादाप्तपरमसार्वभौमत्व भोगित असतां उत्तम बंधू मृगयासक्त व्यसनासक्त राक्षसांहीं वनामाजी मारिला, सापत्नमाता सुरुचि पुत्रशोकाक्रांत शांत झाली, तत्प्रतीकारार्थ 'अराक्षसी पृथ्वी करीन' या निश्चयें युद्ध करितां ध्रुवें नारायणास्त्रप्रयोगें राक्षससमुदाय संहारिला, आवेशीं भरला, तो स्वायंभु मनु विमानारूढ देवर्षिब्रह्मर्षिमहर्षिपरिवेष्टित अंतरिक्षीं येऊनि निवारिला. 'रे रे उत्तानांघ्रिपुत्रा! मम पौत्रा! परमपवित्रा! सूत्रात्मा हरि एक जाणोनि भूतमात्रातें त्रास न देति, त्याचिया मित्रा उपनिषद्रहस्योपदेशपात्रा. पुरे पुरे हे अनुचित भूतहननयात्रा, नको नको रे! लोकमारकमात्रा, वासुदेवमहामंत्राचिया विश्वयंत्राचा भंग करितां धात्रा क्षोभलीया; तूं अस्वतंत्राचिया गात्रास सौख्य कसें होईल? क्षात्रातें आवरोनि स्वक्षेत्रासी जावें. क्रोधासि वर्जावें; तरिच हरिनाम गर्जावें, सर्वभूतसुहृत् शांत होत्साता हरिचरित्रात्मक स्तोत्रातें पढावें, हें पितामहवाक्य श्रोत्रांत येतां नेत्रांत विमलांबु मालालंकारभूषणें निर्दोष यशस्वि दिग्विजय ध्रुव आत्मनगरीं येऊन प्रजापालन सप्तसमुद्रवसनावसुमतीचें राज्य करितां षट्कषट्कें सहस्रवर्षें क्रमिलीं; स्वर्गीं रसातळीं देवासी दुर्लभ ते विध्युक्त भोग भोगीतां अंतरीं वैराग्यवल्ली अंकुरली, ते सर्वभूतदयालता 'यत्करोषि यदश्नासि' इत्यादि सर्वकर्मभगवदर्पणवृक्षाश्रया आत्मविचारसुपुष्पिता जीवन्मुक्तिसफलिता ध्रुवलोकपर्यंत

---

१. आलिंगोनी. २. शब्दब्रह्माच्या पारास पोंचलेला.

विस्तारली, रूपवती गुणवती कुलवती स्त्री अनुकूल त्रिया त्यागिल्या, अनुकूल पुत्र अनुकूल प्रधानसहित अनुकूल प्रजा उपेक्षिल्या, चामीकरचित्रितदांतमचकीं मृदु तूलिकापय:फेनस्वच्छपटाच्छादितसपरिच्छद शय्या कंटकसमान परिगणिल्या, निष्कंटक राज्यसंपत्ति मणिमयस्तंभस्फटिककुड्यगतप्रवालजाल वैडूर्यसोपान सौधविद्रुमतोरण रत्नखचित मंदिर रत्नदीपोज्वलित सुवर्णभूमिका उखरवत् तुच्छ मानिल्या, हें अवघें परमार्थासि परमविक्षेपरूप अनुकूळही अतिप्रतिकूळकालोपसृष्ट जाणोनि विशुद्ध आत्मवर्त्म मीमांसमान बदरिकाश्रमीं पातला, तपोभूमिकेशीं रातला, ते नरनारायणीं शाला, विशालानाम्नी आत्मवश्याला सुलभ तेथ कल्परहित वल्कलवसन दर्भपवित्रांगुल गोपीचंदनविभूतिलिप्तांग तुलसीरुद्राक्षमालाधारणसचक्रांकित द्वादशशालिग्रामशिलार्चन कंदमूलफलाशन अकिंचनजनसमागमपरमसात्विकाविर्भावें हरिकीर्तन करितां करितां वैकुंठींहूनी विमान उतरलें. अष्टादशसिद्धिसामग्रीनें भरिलें. तद्दर्शनें संचितक्रियमाण सरलें उतरलें, प्रालब्ध तें केवळ सुखादृष्ट ध्रुवस्थान ध्रुवपणें आकल्प उरलें. नंद सुनंदादि भगवत्पार्षदगणीं ध्रुवातें विनविलें, तुवां पांचवे वर्षीं श्रीहरीसि प्रत्यक्ष प्रसन्न केलें, तेणें हें विमान पाठविलें. तरि अविलंबें ध्रुवलोकीं चलावें.' ॥ १७

हे भगवदाज्ञा स्वीकारोनि ध्रुवें विष्णुस्वरूप विष्णुदूतांसहित विमान पूजिलें. प्रदक्षिणोनि प्रणामिलें. सुनीतिहृदयनंदनें विमानामाजि आरूढावया इच्छिलें. तंव काळें येऊनि प्रार्थिलें, 'हें मर्त्यशरीर माझें, मज पाहिजे अर्पिलें.' मग मृत्युलागीं समीप बोलाविलें. त्यासि चरणीं लाविलें. एक पाय रिकेबींत देऊनि अश्वारूढ व्हावें, यापरी काळाचे मस्तकावरी वाम चरण ठेवोनि सव्यचरणें विमानामाजि वेघला. कृतांतमूर्धा स्पर्धारहित अर्धा सोपान करून कृष्णकथानिर्धारें ऊर्ध्वलोकीं वेंघला. जयजयकारें देवीं गंधर्वीं स्तविला. झाला सर्वांला संतोष. केले घण घण घंटा घोष, किन्नर यश गाती निर्दोष. वाजती टाळ विणे मृदंग. गंधर्व गाऊनि करिती रंग. विमान वेगें चाले फार. वर्षती पुष्पांचे संभार. तों आठवे सुनीति माय, ऊर्ध्वपंथीं दुःख न माय, 'टाकूनि आलों मी जननीस, हरिविण आश्रय नाहीं जीस.' ऐसें करितां अनुमान, देवें दुसरें भव्य विमान, सुनीती माता पावूनि मान, भासे शतरूपेशीं समान. जाय पुढें ते ब्रह्मपदा. मग आपणही ध्रुवलोकीं अक्षय हर्षे अत्युत्कर्षे वर्षे कल्पस्थायी होउनियां बैसला. ॥ १८

१. विचार करणारा. २. मनुष्याचें शरीर. ३. काळाचें मस्तक.

(ओव्या.)

हें ध्रुवचरित्र उदार । श्रवण पठण जो करी निरंतर, ।
तो ध्रुवासमान हो नर । ऐसें श्रीहरी बोले. ॥ १ ॥
चतुर्थस्कंधीं भागवतीं । विदुर मैत्रेय संवादती ।
श्रीशुक आणि परिक्षिती । संस्तविती ध्रुवकथा ॥ २ ॥
बाळक देखोनियां आळिकें । कीर्तनाचिया कौतुकें ।
ध्रुवासी ध्रुवपदभातुकें । जगन्नायकें दीधलें. ॥ ३ ॥
तया हरीचें अगणितश्रेय:पददातृत्व । आणि ध्रुवाचें बाळपणींचें सत्व ।
या दोहींसमान महत्व । न भूतो न भविष्यति ॥ ४ ॥
काशीखंडीं अद्भुत महिमा । व्यास वर्णी चरित्रगरिमा ।
स्वर्गमार्गीं विष्णुशर्मा । देवदूतीं बोधिला. ॥ ५ ॥
जयामाजी श्रेष्ठ जप । जयामाजी श्रेष्ठ तप ।
ध्रुवचरित्र ब्रह्मरूप । नित्य नि:शंख जपावें ॥ ६ ॥
प्रचेते करिती यज्ञसत्र । तेथें नारद ब्रह्मपुत्र ।
प्रेमें गाय ध्रुवचरित्र । श्लोकत्रय भागवतीं ॥ ७ ॥ १९

(श्लोक.)

माता उमा परम, शंकर तात झाला, अंबाजिता अमृत पावन नाम ज्याला, ।
तेणें यथामति कथा कथिली ध्रुवाची, घे भुक्ति मुक्ति निज जो नर नित्य वाची.

शुकचरित्र.

(कटिबंध.)

श्रीशुकयोगींद्रानें रंभेचा गर्व हरिला. ॥ ध्रुवपद. ॥

गर्भी असतां ज्ञान झालें, श्रीशुकानें जिविं तें धरिलें, जन्मजरामयमरण वारिलें, भवभयातें संवारीलें, तपसामर्थ्यें ताप हारिले, विवेकमंत्रें मन आंवरिलें, विषयपसारे दूर सारिले, आशय वेदांतींचे वरिले, अशेष जे जे भोग भोगिले, शुकअर्भका गर्भजाचणी, द्वादश वर्षें अतिप्रकर्षें, अवयव उदरीं आकर्षुनियां, निकर्ष करुनी वर्षें बारा, गर्भदरीचा अती उबारा,

१. म्हातारपण व रोग. २. संसार. ३. वेदग्रंथांतील शेवटचे ग्रंथ म्ह० उपनिषदें. ४. मूल.

क्षुधानळाचा ताप दुवारा, अधोवदनीं, क्लेशसदनीं, जारत्रंधनीं, मूत्रआधणीं, दाथर विष्टा पिष्टफळासम उकडत होता जठराग्नीनें; त्वचा हि कोमळ, नाकीं तोंडीं जंतू बुळबुळ वळवळताती; तळतळ होतां कळकळ जिवास; पूंयपंकीं कारागृहवास, कुश्चळ दुर्गंधीचा त्रास, सर्व रोधिले श्वासोच्छ्वास, सोहं सोहं हा निजध्यास, वैराग्याचा जिविं हव्यास, 'बाहेर पडतां मी अभ्यास, करीन साधन बहु सायास, ताप ही साहिन, शीत न पाहिन, क्षुधेसि खाइन, मनासि घेउन वनासि जाइन, तृषेसि लाविन आले वाटे हरिनामाचे घेइन पेटे, उतरुनि भवनदि जाइन नेटें, फोडित कर्माचीं हि कपाटें, झोडिन वासनेचे कांटे, उपडिन अभिमानाचीं बेटें, उत्पाटिन मी मोक्षकपाटें,' ऐसा गर्भी ध्यास लागला. मातेचा जीव बहू भागला. व्यास म्हणे, 'इस रोग लागला.' उग्र औषधी रेच योजिला. 'मंत्रप्रयोगें जाळिन याला, समंध ऐसा कोण जन्मला?' ऐसें जाणवि श्रीकृष्णाला, श्रीहरि बोले त्या गर्भाला, शुकापरि पढवीता झाला, म्हणवुनि शुक हें नाम तयाला, कर्मकथा कथिता झाला श्रीहरिला. ॥ श्रीशुक० ॥ १

पुससी, कोण तो मी ऐसा! अनादि जीव तो नामें कैसा? पापपुण्यमिश्रित सरीसा, अंगुष्ठासम लहान उलीसा, तो मी सूक्ष्म स्थूळीं भरलों, लक्ष चौऱ्यांशी भरूनि पेणें, दुरोनि झालें येथें येणें, दडी दीधली पापभयानें, माझी ऐका अपूर्व कथनें, स्वधर्म सांडुनि अधर्म वाटे, कुकर्म जीवा गोड वाटे, अनर्थ तेथें कर्मचपेटे, मर्म तयाचें कर्म फळे, मग कृमी होऊनि भ्रमणी चक्रीं, भ्रमदुःखानें काळ क्रमीं मी; मी मी म्हणतां मेंढा झालों, चंडीपाशीं मुंडि खंडिलों, काळचक्रामाजि भरडलों, बुरूड होउनि दुरंड्या केल्या, कोष्टी होउनि पैंठ्या विणिल्या, परस्त्रियांतें पाहतां दृष्टी, अंध होय त्या पापें कष्टी, विषयप्रयोगें अंग कुष्टी, अन्नदानें स्वदेहपुष्टी, द्रव्यदानें नित्य तुष्टी, अदत्तयोगें पात्रें उष्टीं, चाटीं श्वान होउनि इष्टी, भिक्षा तांदुळ न घालि मुष्टी,

---

१. मूक हाच अर्थ. २. गर्भाच्या सभोंवतीं असणारें वेष्टण (वार). तीन प्रकारच्या जीवकोटी आहेत:—जरायुज, अंडज, उद्भिज. ३. मोदक उकडते वेळीं गवताची भर भांड्यांत घालतात ती. ४. पू हाच चिखल. ५. नदींतून तरण्याकरितां भोपळे इत्यादि साधन घेतात तें. ६. दार. ७. पोपटासारखा. ८. मार्ग चालतांना विश्रांतीकरितां केलेला मुक्काम. ९. दैवीं. १०. दोऱ्यांचीं कुकडीं. ११. सुताच्या गुंड्या. १२. यज्ञ.

तरिच कीटक कोरड काष्टीं, हरिनामाची न करी गोष्टी, दर्दुर[1] होउनि ओरडें सृष्टी, ब्रह्मकुळींचा आचार भ्रष्टी, तरीच गर्दभ भार पृष्टीं, अतिथीतें ठेवुनि उपवासी आपुल्या काया बहुतचि पोशीं, धनी असोनी विपत्ति सोशीं, पुरून ठेवणें पूर्वठेवणें ऐसा दोषी, घुशी होउनि घुसें बिळांतचि, बिडाल[2] काळा मूषक म्हणें मी, सूकर[3] नामा डुकर होउनि उकिर उकरडा उकरलो. ॥ श्रीशुक० ॥ २

सुंदर काया तीर्थ स्नानें, पोटशूळ हा भूतद्रोहानें, गजादि वहनें कृपाद्रवानें, दुष्ट जन्म घे उपद्रवानें, परद्रव्याचें करितां हरणें, दरिद्रतापें तापुनि मरणें, रक्तपिती चोरितांचि सोनें, क्षयरोगी हा वृत्तिक्षयानें, अनेक दुःखें अनृत भाषणें, व्याघ्रादिक हे गळाबंधनें, अस्वल होती रीण गिळोन, नेत्र झांकुनि जुंपिति घाणीं, वनीं वाघुळा अधोवदनी, पंक्तिभेद जिहिं केला त्यांनीं, धर्म करी त्या मोडा केला, गर्भखोडा प्राप्त झाला, प्रसूतिसमयीं आडवा आला, शस्त्रें छेदुनि लुंडवा केला, लक्ष चौऱ्यांशी हा बाजार, करी बेजार, बहु जोजार, हजार वर्षे कारागार, देह सर्पाचे, काकबकाचे, गृध्रघुकाचे, स्थावराचे, फिरत फिरत मग ईशदयेनें, कर्मभुमी नरदेहीं येथें, स्मरणीलागीं मेरू जैसा, शतायूष तें अमोल्य थोडें, जन्मलों मी गर्भी स्मरतां, सोहं कोहं बाहेर पडतां, विसरें हें मी, भुलोनि कातां, गृहसुत हें मी देह गेह मी, माया मोहें मामा मामी काका काकी ताई माई आई बाई बहिनी वहिणी विहिणी मेहुणी इत्यादिक हे कर्मकहाणी या नाल्याच्या गुंडाळ्यानें गुंडाळुनि बंडाळचि झालों; चांडाळचि मी, मोहें यांचा, अचळावाचा नरस्तुतीचा, काम वस्तुचा आर्जवाचा, हरिहराच्या भजनावांचुनि श्रीहरी, जन्मोजन्मीं काळ क्रमिला. ॥ श्रीशुक० ॥ ३

भय पापाचें कांहिंच न धरीं, पुराणकीर्तन देवद्वारीं, तांबुलभक्षण कुष्ट शरीरीं, कर्मे वर्मे निंदा करीं, टिटवीजन्म त्या पक्ष्यांभितरीं, गुरुशिष्याशों विद्या चोरी, होय पिंगळा तो निर्धारीं; अनुचित प्रतिग्रह ब्राह्मण घेतां, गंडमाळा होती अद्भुता; परद्रव्याचा अपहार करितां, परक्षेत्रिंच्या गाई वळितां,

---

१. बेडूक. २. मांजर. ३. डुकर. ४. जेथें अक्षर दीर्घ असून ऱ्हस्व वाचलें पाहिजे तेथें त्या दीर्घ अक्षरावर ˘ अशी अर्धचंद्राकार खूण केली आहे व जेथें अक्षर ऱ्हस्व असून दीर्घ वाचलें पाहिजे तेथें ऱ्हस्व अक्षरावर – अशी कुंकवाच्या चिरीसारखी खूण केली आहे. ५. उपजीविकासाधन. ६. हस्तपादरहित. ७. बगळा. ८. घुबड. ९. मण्यांची माळ. १०. माळेच्या मध्यभागाचा मोठा मणी. ११. पांखरांत. १२. पक्षिविशेष. १३. दान घेणें. १४. शेत.

अल्पआयुषी होय तत्वतां; सत्पूरुष अणि प्रजा पीडितां, व्याघ्र सर्प ते होति तत्वतां; साधुन्छळणीं वंशक्षयता; देवद्वारींचे तरू तोडितां, छाया मोडितां, पांगुळ होती जाण तत्वतां; जारकर्मि ते वेश्या जाणा; स्त्रीपुरुषांचें गुह्यश्रवणें, दासी किंवा कुंटिण होणें; सेवकासि जो त्रासी पूर्ण, तोची मोळ्यावाहक जाण; [1]सेवक होउनि स्वामि जाचणें, श्वान होउनी बहू हिंडणें; ब्रह्मराक्षस बहु अभिमानें; देवालयाचें तेल चोरणें, मार्जार होउनि गुरगुर करणें; त्रास मातापितया देती, मर्कट होउनि वृक्षीं फिरती; क्षत्रिय म्हणवुनि युद्धीं पळती, सिमा लोटिती, कवनें निंदिती, सत्पुरुषांची निंदा करिती, वृश्चिकरिसादि जन्म पावती; वेदशास्त्र जे उगें निंदिती, द्वेष करिती महापुरुषांचा, तस्कर होउनि नाश तयाचा; बंधूवंधू वैर करीती, मत्स्य होउनी जळीं विचरती; सद्गुरुचें जे ज्ञान पाहती, त्यांची होय दग्ध संपत्ति; मार्गस्थाचे वस्त्रासि हरी, प्रेतवस्त्राचा तो अधिकारी; ज्ञान सांगुनि आचरण न करी, धुळी होय तो पृथिवीवरी; दासी स्वामीसेवा न करी, मगरी होति त्या जळाभीतरी; कन्याविक्रयिं कसाय झाला; गोरस विकि तो मद्यपि झाला; बहुतांशीं अपमानी त्याला, पिशाचयोनी जन्म दीधला; श्राद्धीं जेउनि स्त्रिया भोगिती, म्लेच्छउदरीं जन्म पावती; दोघी स्त्रिया जे कां करिती, एकीचें जे चित्त राखिती, सारमेयाच्या शरिरावरती, गोचिड होउनि तरतरताती; उदक कोंडितां मूत्र कोंडतो; पृथ्वीपतिची निंदा करितो, उदरीं अग्नी मंद होतो; ग्रहणसंधी करितां भोजन, पित्तरोग त्या होय दारुण; परबाळा परदेशीं विकणें, वचनीं गुंतुनि पालट करणें, गलितकुष्टदुर्गंधि साहणें; अपराधाविण स्त्रीस जाचणें, एक अंग तें जाय तयानें; ब्राह्मणाचें अन्न हरणें, वंश शून्य हें शास्त्रि पहाणें; गुरु संत आणि माता पीता, त्यां उपहासितां, वाचा जाउनि होय दुःखिता; ब्राह्मणवृंदा त्रासचि देतां, व्याधी तिडका लागती कुंथा; श्रुतिशास्त्राचे श्रवणिं अनादर, बधिर होउनी हिंडे फार; पशू पीडितां कर्कश नार; परस्त्रियेसी भोगी जरी, जन्मोजन्मीं स्त्री न मिळे तरी; जीवमात्र ते पीडि परोपरी, रोग फेंफरें होय शरीरीं; गुरुत्यागी उपजत मृत्यु; भानुसन्मुख मुततां नित्य, तरुणपणीं ते जाती दंत; कीर्तनभंगीं रौरव सत्य; शूद्र स्वमुखें वेद पढत, परधर्मे तो नरक यथार्थ; तीर्थयात्रेशीं जे जात, मोडा करितां होय अपेशी; अन्न भक्षितां एकादशी, न बोलवे तें पाप आम्हांसीं; विप्र जेवितां जो उपहासी, अरुचिरोग होय त्या

१. विंचू. २. आम्लक. ३. चोर. ४. कुत्रे.

मुखासी; परस्त्रीगमनें परमे सोशी; गुरुद्रोही ब्रह्मद्रोही, पंडुरोग त्या न सुटे पाहीं; गुरुकुलसंकट न निवारीजे, संग्रहणी तयिं व्यथा उपजे; ब्रह्मकुळीं उपजोनी जाण, पंचयज्ञ जो न करी पूर्ण, रोग जलोदर त्या दारुण; अग्नि लावून सदन जाळणें, जाउनि नेत्र तो अपवित्र; कीर्तन आवडेना तिळमात्र, कर्णमूळ त्या रोग विचित्र; पुराणश्रवणीं हरीकीर्तनीं, जाउनि निजतां अजगर झाला; अतिवादें तो संनिपातला; देवपुजेनें वीट आला, मारि शिरा खंडितां हाकांला; पुस्तक चोरुनि मुकाचि झाला; नमन करीना जो संताला, कठोरवचनें त्रास दीधला, बहु जन्माचा बहु जोजार, त्रास पावलों वारंवार; नुलंघवे हा मायापूर,' अशिं वाक्यें हीं शूकमुखींचीं, परिसुनि साचीं, परम प्रीतिचीं, श्रवण करी जगदात्मा ज्याचीं, धरी चित्तिं त्या मुक्ति फुकाची, अनुभवाची, जन्मांतरिंची, ऐकतांचि तेधवां श्रीहरि हास्य करुनि काय बोलिला. ॥ श्रीशुक० ॥ ४

पुण्यलता हे फळासि आली, कृष्णें जिभली अशि चालविली, 'पापशृंखळा हे तुज कळली, तरि कां माता हे शिणवीली? निघोनि आतां सोड माउली. स्वरूपसत्ता पाहें आपुली. मनासि बोधुनि वनासि जावें, ब्रह्मभावें जनासि ध्यावें, धनासि अणि स्त्रीजनासि भ्यावें, नातरि माया फिरविल वांया, भरविल बा! या आडरानें, रामावांचुनि निकाम रा[१]मा, भुलविल तुजला, देइल टोला, चौऱ्याशींचा दाविल झोला.' कृष्ण बोलतां शूक निसटला, भ्रष्टला प्रपंचांतुनि गेला, तैसा नाहीं आला गेला, पडला षे[२]ट्शत्रूंच्या डां[३]ई, वासनेला मारुनि घाई, जाळुनि अंगीं भस्म चर्चिलें; जीवित जाण असें खर्चिलें, वाणिद्वारा ब्रह्म चर्चिलें, जिवित अर्चिलें, प्रबोध हृदयीं शिरकविला. ॥ श्रीशुक० ॥ ५

हृदयिं धरित करिं पल्लवग्रंथी, प्रेमभरित हृद्विवेकपंक्ति, छेद्रित ऐसें जेणें न घडे, जन्म सांकडें, द्वयारोकडें, प्रसूत भूत, नूतन सरिता, संकोच रस्ता, विस्तारें श्रम, लिहितां दस्ता कागद न पुरे, पुरे पुरे हे आस्ता, ऐशी शास्ता घडली, धास्ता खाउनि, द्वै[४]पायनसुत पै[५]यपानातें अव्हेरुनियां, घोर वनातें, न घडे जन्म तों तत्क्षणातें, दर्शित ज्याची, ज्ञानदशा जग मृ[६]षाचि भासे, मृगीदृं[७]शा भ्रमवि अशा तेव्हां, व्यासमनीं हव्यास उठीला, श्वास सांडिला, अशा अशा बाळासि पहावें, कास घालुनी पृष्ठि धावला, वियोगदुःखें ओष्ट सूकला, 'शुक, शुक' ऐशी हाक मारुनी, शुक डोळीयां मूख दाखवी, 'अरे पुत्र! क्षणमात्र उभा

१. स्त्री. २. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर. ३. द्वेषांत. ४. व्यासपुत्र शुक. ५. दूध पिणें. ६. खोटें. ७. स्त्री.

रे!,' मोह कळवळे येति उबारे, नेत्रीं चळचळ अश्रुधारा, श्मश्रूअधरावरोनि ढळतां, आकळितां नाकळेचि ममता, चक्षू पुसतां पक्षि शुकाचा, वृक्ष आणि तृण पक्षि बोलति, 'ॐशब्दें जो प्रणव महावाक्याचा ध्याता, ध्याताध्यात ध्यान धारणा, जन वन ज्ञानामृतदृष्टीनें, सृष्टि सिंचुनी शीतळ केली, निवांत झाली, तात! तात! चित्तांत, आप विख्यात मात हे सर्वांतरि हे, निरंतर असतां, अंतर मानुनि, अभ्यंतर कां जाळुनि घेशी, आलों ना मी गेलों कोठें, जन्मलों ना मेलों नसतां, भ्रांत दुःख विश्रांत होउनी, शांतपणें सिद्धांत विवरुनी, असें पहावें, आवरणशक्ति, पंच महाभूतांची व्यक्ती, उभी ठाकतां, बंधमुक्तिचा, शब्द रूढला, अविद्याभ्रम जिवास घडला, अहंब्रह्म सिद्धांत उडाला, भाव बुडाला, मोहजळाचा आला पूर, आत्मा संनिध असतां दूर, हुरहुर जिवास, गुरु ज्ञानाचें अंजन नसतां कानकोंडा प्रपंच फोल, कोंडा कांडुन अभिमानाचा धोंडा बांधुनि, भवलोंडा जो त्यांतचि बुडती, तसें नको रे!, आयुष्याच्या अवधी अधीच, सहा वयोनि सावध व्हावें, सत्य सनातन असें पहावें, घटीं घटाकृति, मठीं मठाकृति, आकाश विकृति नसतां भासे, प्रतीविकारें तैसा आत्मा पिंडींचा तो ब्रह्मांडींचा, परमात्मा उपनाम पावला, अहंतत्व तें सोऽहं असतां, कोऽहं विभ्रमयोगें विसरे, वेदीं जें वंदिजे ब्रह्म तें निरामय असे, आराम विलसे, नित्य निर्गुण सत्य सनातन, ज्ञानानंतध्यानातीत, सजल नदींत, चंद्र जैसा दिसे उदीत, सत्याधारें तैसें तया, विश्वघटांत, व्यास न मान, गुरू जैमान, श्रुति प्रमाण, या वाक्यानें गतागती आत्म्याला नाहीं, देह जेथिंचा तेथें पाहीं, पंच भूतांची असतां खंती, कां बा! करसी भांवावुनियां, वियोग म्हणसी, देहाभिमानें मीं तूं सखया!, पंचभुतांच्या संगें जिव हा, वासनेच्या अंगें सोंगें, घेउनि रंगुनि जन्मुनि मरणें, अणि जननीचे जठरीं भरणें, कर्मे करणें तीं निस्तरणें, भव तरणें तें न घडे जाणा, गुरुचरणाविण प्रपंचघाणा, त्यासि जुंपिला अज्ञान जीव हा, मोह अंध पशु द्वंद ग्रामिचा, देह झोंपडीमध्यें मी तूं हेचि झांपडी, नेत्रबंधनी फिरति बापुडीं, काळहि निष्ठुर होउनि थपडी, न कळे हा मी कोण कैसा, येणें कोठुनि जाणें कोठें, मार्ग दीर्घ तो, क्रमुनि भ्रमुनियां, ऐसें न करितां नाना योनी, माता माझी मी मातेचा, पिताचि झालों, तिचा पुढें मग

---

१. दाढी. २. ओंकार. ३. 'तत्त्वमसि' म्ह० तें (ब्रह्म) तूं आहेस, हें वाक्य. ४. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश. ५. अज्ञान. ६. बहिरा, निर्लज्ज. ७. षट् शत्रु. ८. शाश्वत. ९. बदल, फेरफार. १०. जामीन.

कांत होउनी अंत पावलों, अकांत करिती, प्रिया पुत्र मग क्रिया अचरती, श्रद्धायुक्त श्राद्धें करिती, निर्मोहत्वें परत परत तूं.' ऐसें म्हणतां शूक किरानें, मधुर गिरेनें, क्षीरनिराचा निवाड करितां, अज्ञानाचें कवाड व्यासें उघडुनि अंतरिं विवरीं तत्वें विवरुनियां मग आत्मत्वेशीं मुख्य पदीं निज सख्य करुनियां, भागवताख्य पुराणपत्रें, व्यास पवित्रें करिं तीं धरितां भित्तिचित्र हें, विश्व मृषा हे विचित्र हरिची लीळा दर्शित आली प्रेतीति महामुनिला. ॥ श्रीशुक० ॥ ६

पापभयें वैराग्य जयाला, वेंसनविहिन शुक वनासि गेला, अशन त्यजुनियां खाय भुकेला, योगासनासि घालुनि बसला, नमन करुनि गुरु कृष्णकृपेला, उन्मनिचा तो मार्ग शोधिला, 'तत्त्वमसि' महावाक्य बोधिला, कामक्रोधसमुदाय छेदिला, नित्य ब्रह्म निर्वाण लाधला, स्वानंदामृत घटघट प्याला, आनंदाचा ढेंकर दिधला, आत्मा सेवुनि स्वस्थ बैसला, संतोषाचा बाग लाविला, दुराविलें त्या नष्ट आशेला, शाल दुशाला कशास त्याला? तोडुनि टाकी मोहपाशाला, काय नियमं यम करिल अशाला? 'अशासि येथें कशासि आणितां? त्यासि मसाला, करील कोणी झणी कसाला,' बोले कृतांत आत्मदुतांला, जिताचि मेला निकाम झाला, जीवन्मुक्त शुक म्हणती त्याला, बहु देणें मग नलगे ज्याला, असो बिचारा त्यास विचारा येईल तैसें बरें म्हणावें, उगें पहावें. इंद्र स्वभावें अभाव त्याचा मनांत येउनि, प्रेरी त्या रंभासुंदरिला. ॥ श्रीशुक० ॥ ७

अनुष्ठान तपकळा लोटल्या, तपतेजें दश दिशा दाटल्या, पुण्यनद्या शक्राच्या आटल्या, सुकृतबळें जरि शुका भेटल्या, ऋणानुबंधें गांठी तुटल्या, इंद्रमनीं कल्पना ऊठल्या, तेव्हां त्याच्या शक्ति सूटल्या, युक्ति खुंटल्या, वृत्ति वीटल्या, जैसें श्वान वेमनासाठीं, मार्गस्थाच्या लागे पाठीं, स्वभावदुःखें होउनि कष्टी; तैसा तेणें देवेंद्रानें, योगींद्रानें यत्न मांडिला, रत्न सुरवरी, सभेसि रंभा आणि मेनका तिलोत्तमादिक स्वर्गगामिनी पाचारुनियां इच्छित सांगे, म्लान वदनें, 'पुण्यामृत शुकाचें हरुनी; दोहन करणें मोहनरूपें.' रंभा वहिनी चतुर शहाणी, अवनीभुवनीं वनीं शुकाच्या परामृशातें जावें म्हणुनी

१. पोपट. २. गोड वाणी. ३. दूध व पाणी. ४. खातरी. ५. नम्र. ६. जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या, व उन्मनी या पांच स्थितींतील शेवटची म्ह० पांचवी ७. तें तूं आहेस. ८. ब्रह्मसुख. ९. दुहेरी शाला, जोडशाल. १०. शिक्षा. ११. यम. १२. ओकलेला पदार्थ. १३. कोमेजलेलें.

अनिहर्षानें, शतयज्ञाची आज्ञा वंदुनि, करी प्रतिज्ञा; शक्रसभेसी उभी राहुनी वक्र पाहुनि, हांसुनि बोले, 'टइन झोले, भले भले मी चेववीले, पंचविषय मग सेववीले, धांउनि आमचा मुखरस प्याले, तपक्षयानें सर्वेचि भ्याले, आणिक धांवले, वनीं पावले, तपें तावले, नेत्र लाविले, झालें गेलें बरें विसरले, तपोधनानें सवनहि झाले, आसन तुमचें थरारिलें, मग आम्हां प्रेरिलें. तेथें जाउनि, गाउनि नाचुनि, पुष्पदृधानें दोहुनि, घेउनि मोहनयंत्रें, विश्वामित्रादिक सत्पात्रें, वात अंबु अणि गळीत पत्रें, भक्षुनि तपती, असुचीं सूत्रें, वेधन वक्रें, पाहुनि मुत्रें जैसें कुत्रें, तैसें पाठी लागुनि येती ते क्षणमात्रें, तपें वाळलीं ते तनुगात्रें, त्याला मुंगी येउनि लुंगी, सुटली स्मरगुंगी, तें तेव्हां इंगित इंगित जवळचि आलें, नको नको म्हणतां गळांचि पडलें, भुजें वेष्टुनी, तपा भ्रष्टवुनि, निसटुनि तुमच्या सभेसि आल्यें, ते हे रंभा अंभोदधिजा, जाणतसां परि मानितसां मज, द्या द्या वीडा, दाविन क्रीडा, मोहवेडा मीं घालिन खोडा, करीन वेडा शुक कीडा, थोड्या वयाचा, धडा मनाचा मोडुनि याचा, कडामनावरुनीयां मग मी सडाचि धडधड धांवत आणिन.' ऐशी रंभा गोड बोलुनी, होडैविडा उचलुनी हस्तकिं, मस्तकिं धरिला. ॥ श्रीशुक० ॥ ८

इंद्र म्हणे, 'गे चंद्रवदने! चंद्रहार घे चंचलनयने! चित्रविचित्र हिं चिरें भूषणें, चंदनचर्चित सुगंधानें, हार चमेली चंपा सुमनें, चतुरपणें वंचवीं युक्तिनें, निश्चल मुनिमन चंचळ करणें, मुखचंद्रानें चंद्री लावुनि, नयनचकोरें, करी भिकारें, बहुप्रकारें विकारवातें, चित्त तयाचें, तपोवित्त हळु जपूनि घ्यावें,' सहस्रनयनें गौरवोनियां. सौरंभजननी सहास्य वदनें 'अवश्य' वदली 'वश्य करिन मी,' नमन करुनियां गमन करीतां, शचिपतिलागुनि, रतिपति मागुनि, वसंत घेउनि, हास्यवदना, हृदयशुतिनें, विद्युत्तेज ते ललना जाल्या, उचिताकृतिनें विकृति पावे, विवेक वृत्ति, तैशा अनृती, तथापि तृप्ति, गान तान संगीत पयोधर, शीत तेथ मंद सुगंध वात सह, सुरवर किंनर गंधर्वादिक, सर्वचि ते वयगर्वे स्फुरती, अवघ्या कुशला सकाम कामिनि. सौदामिनिशा दिव्य शरीरीं, भव्य भूषणें, प्रभाकराच्या उग्र प्रभेचा भोळा जन मग लाभ लाभला, भला मनाला

---

१. इंद्र. २. रूप, रस, गंध, शब्द, स्पर्श. ३. पाणी. ४. गळलेलीं पानें. ५. महानगी. ६. मदन. ७. पैजेचा विडा. ८. वस्त्रें. ९. फुलें. १०. ठकवी. ११. इंद्र. १२. रंभा. १३. मदन. १४. वीज. १५. सूर्य.

आला प्रेमा, बा[1]ळालिंगनिं ताळा घालुनि म्याला, मग त्या परहीताला पडेल घाला, लोश माळा गळांच घालिती, छळोनि घाला, समुदायें प्रमदा येक[2]सला, सकळा ही विमानवहनीं, समान नक्षत्रांच्या पंक्ती, दिशा रंगती, निशा भंगती अंगप्रभेनें, उजळे तनु ते सोज्ज्वल वस्त्रें, मं[3]जन करुनी, कज्जल किंचित चिरी लावुनि, दिसति हिरे पाचूचे हार, फार सुमनांचे ते भार मस्तकिं वरिले, हस्तकिं धरिले, सन्मुख सखया अर्पण करिती, दर्पण पाहुनि सिं[4]धुजानना, मूखइंदुवरि तिलकबिंदु सुरंग रेखिला, अंबुजमुखिनिं मुनिवृंद भेदिला, एक शूक मुनि, त्याहि द्विजवरे, भाळिं विजवरे, धिक्कारिलें अनुसंधानें, ध्यानयोग हा जुनाट चंदन, नंदनवनिंचा, आनंदानें अंग चर्चिलें, हृदयपिंडिका त्यांसि अर्चिलें, उद्वेदुनियां आकर्णे हृदया भितरुनि कामें भरुनि पातले, अरुण रंगें, कंचुकीं चित्तें धरुनि राहिले, तरुणजनांचीं हरूनि चित्तें; अशाच येती कितीक जाती, मुनी तापसी ऋषी दिगंबर, अमरतेज परि पा[5]मर झाले, विप्रादिक बहु क्षि[6]प्रा भक्षुनि, प्राप्ति इच्छिती स्त्रीअधराची पं[7]योधराची, पिंवळ्या अंगीं उट्या केशरी बु[8]ट्या भरजरी, नक्षत्रासम बे[9]सर नाकीं, हातांत गजरे, श्रीहरिनामीं, प्राण्या! भज रे, अंतरिं त्यज रे, त्यज रे! त्यज रे! अशा मोहातें, अशा नागिणी कुरळकेश त्या, सरळवेणिया, मुं[10]क्तालंकृत श्रे[11]णि नं[12]गांच्या, तांबुल वदनीं सिंहकटी त्या, कटिसूत्रें, कटिं ज्यांच्या सुवर्णरत्नेंजडित, [13]तंडिद्वाससम भांग भरुनियां द्वादश अंगीं सांग अभरणें मं[14]तंगगमना, उं[15]त्तुंग कच ते पतंग जैसे, तंग ताठ [16]हृद्वंध अशा परी, अंग बराबर अनंगाचें, दं[17]ळें सबळाचें, कवि अबळा यां, बळेंचि म्हणती, चपळा एकी, बुबुळा फिरवुनि, लोकत्रय हा दुबळा करिती, चित्त वित्त तें समस्त हरिती, पुढें प्रेरिती वसंतकामा, अं[18]निळ रिकामा, सिं[19]धुसमा देउनी तयातें, धाडि धाडिली, पावे जेथें अगण्य पुण्यारण्य शुकाचें, विकट वनीं त्या निकट जाउनी विनोदवाचा उपक्रमो आदरिला. ॥ श्रीशुक० ॥ ९

वसंत संतत सुं[20]लता प्रसवी, कं[21]दर्पाची सत्ता बसवी, सं[22]मीरदर्प हि वायू सुचवी, पुं[23]ष्पवाटिका रम्य नेटका, टाकंटीका विस्तीर्ण चेटका वस्ति खेट[24]का, मंत्रें समान सूत्रें साधुनि, कळा कूसरी निबीड दूरी, शीतळ छाई, विकसित

१. क्रिया. २. एकदम. ३. स्नान. ४. चंद्रमुखी. ५. गरीब. ६. खीर. ७. स्तन. ८. वेलबुटीदार भरजरी वस्त्रें. ९. नथ. १०. मोत्यें. ११. पंक्ति. १२. दागिने. १३. विजेसारख्या तेजस्वी. १४. गजगामिनी. १५. पुष्ट. १६. चोळया. १७. सैन्य. १८. वायु. १९. समुद्र. २०. उत्तम वेली. २१. मदन. २२. वायु. २३. बाग. २४. खेडेगांव.

जाई जुई शेवती, चमेली चंपा गंधमालती, मंदाराच्या सरळ्या पंक्ती, कोरांटी बहु रंग रंगिती, आराटीची नाहीं जाती, फुलें मोगरे पिंवळीजाती, गोकर्णी गोकर्ण आकृती, एक मुकुती तुळशी नवती, जैसे चेंडू फुलले झेंडू, गेंद शेंदरे लोक आदरें कानिं खोविती, तुरे लाविती. घट्ट फुलांचे बट्टमोगरे, द्वार पांगरे निंद्य कळीचे कळवळती, भळभळीत फुलले, मल्लिकांच्या दीर्घ वल्लिका कलिका फुलल्या, अपार जेथें पारिजात, जळिं वारिजात, कर तरंग ते, भांतभातचे वात त्यांत बहु मात करीतो, वनस्पतीचा गुण विखरीतो, खडे दुपारीं, फुले दुपारी, सरळ सुपारी गगन चुंबिती, द्राक्षघडातें पक्षि भक्षिती, क्षितीबराबर शीतळ नीतळ सपाट वाहती पाट जळाचे, थाट दाट तत्प्रफुल्ल वृक्षीं फाट नसे, परि वाटेमधिं चोहाटे बांधिले. रत्नशिळा लखलखाट, त्यांच्या कळा फांकती, मधुर शब्द कोकिला गुंजती, गुंजारवती सकळांमध्यें, बकुळाच्या सम कुळाभोंवते अलीकुळाचे वृंद हिंडती, मंदमारुतें वृक्ष डुल्लती, नागकुळें परिमळें झुल्लती, शूक शुकातें स्पष्ट बोलती, 'अरिष्ट तुज हें आलें' म्हणती, धारिष्टातें हरूं पहाती, मुख्य अघाती श्रीरागानें गीत गाती, ऐशी विवशी, तुज खायासी, वश्य कराया लक्ष लाविती, दक्ष मुनी तो अक्षकपाटें अक्षय देउनि, क्षेमरूपें सुक्षित जेणें, शमदम समाधि सादर हृदयीं भरिला. ॥ श्रीशुक० ॥ १०

कुशासनीं क्षेम समोद, भजनीं रस चढे उन्माद, न गणी कांहीं हर्ष विषाद, निर्गुणाशिं नित्य विवाद, भोगी अद्वय चिन्मय मुद्रा, सौख्यसमुद्रामध्यें विषय क्षुद्रासी त्या नातळोनियां, मन बुद्धीचे पैल तिरास, निरासतेची मूळ मिरास, तिजवरि गांठुनि शूकगिरास, भाग्याचा तो वैराग्याच्या दुर्गावरता, दुर्गाधिपभर्गसम साजे, स्वर्गावरूनि स्त्रीवर्गानीं शुकोपसर्गा मोहोस्वर्गातें घेउनि, त्यावरि विध्वंसाय ईर्ष्या पोटीं, अतिहर्षानें सुंदरशा त्या संगें घेउनि, बाळा प्रौढा मुग्धा नारी, सुरतीं निरता, चतुरी चौकसा, चौऱ्याशींचे आसनीं वसुनी, व्यसनीं शहाण्या, सुंदर पोहाण्या, कोणी लहान्या मोठ्या गोऱ्या गोमट्या त्या, खोट्या मनिंच्या, कामिष्टा त्या, नेमिष्टाचें चेष्टाया मन, अचाट दळ अबळांचें कैसें प्रबळ माजलें, मौंजपट्यानें मौंज बांधले, सैन्य साजलें, नितंबें

१. कमळ. २. तन्हेतऱ्हेचे. ३. एका प्रकारचें फूल. ४. भ्रमरसमूह. ५. सर्प. ६. शम म्ह० मनोजय आणि दम म्ह० बाह्येंद्रियजय. ७. किल्ल्यावर. ८. शिव. ९. 'बाला स्यात्षोडशाब्दा तदुपरि तरुणी त्रिंशतियांवदूर्ध्वं प्रौढा स्यात्पंचपंचाशदवधि परतो वृद्धतामेति नारी.' (रतिरहस्य). १०. 'अंकुरितयौवना मुग्धा.' ११. देखण्या, सुंदर. १२. कमरपटा. १३. कमर. १४. कुळें.

तेची मैतंग, त्यांवरि ध्वजा फरारी, तेवीं अंचळ वायूस्पर्शें हलती चंचळ, पाहुनि त्याचें धीरत्वहि तें चळचळ कांपे, झळफळ झळफळ भांग शिरींचा वदनद्युति सैंगचि हृदयत्वें दुभांग करिती, भांग जशी सर्वांग व्यापुनी गाढी, मूर्छा पाडी, भृकुटीचापें ताडी, नर मृगनयनबाण सैंत्राण विवेकें प्राण हरीती, वैराग्याच्या ठाण्यावरती, उठावणी हे कठिण कुचांची, अग्रें ज्यांचीं निग्रह भाले, तेंवि निघाले, कैंदन कराया मदन शुभांगी, भणंग शिवें तो अनंग केला, यदर्थि चरणावळी चालविती, कुंजवनीं स्मरसंजिवनी ते, मंजुळ मंजुळ ते जप जपती, पैंजण आंदू पैज बोलती, तुरें नींचि नूपुरें वाजती छननं छननं, अलाप रागें, तननं तननं, मृदंग झल्लरी झननं झननं, विमानघंटा घननं घननं, वाजति रागें रागोद्धारी, सारिगमपधनि हृदय विदारी, सुरासुरीं घेउनी बांसुरी, गात सुस्वरी, किंनर घे करिं, महाहुन्नरी चित्त हारिती, विरक्त योगी सक्त कराया, कामयुक्त हीं श्वेतरूप पक्ष्यांचीं युग्में वृक्षावरुनी पक्ष पसरुनी मन्मथक्रीडा करिती, त्यांतें वेडावुनि उन्मत्त स्त्रिया त्या करीं दावुनी खदखद हंसती, वसन आणि कुंचकसणी फेडुनि, आसन दाविती चौऱ्यांशीचें, ऐशी लीला सेउनि, दाविति नाना लीला, कामकळीला खुलवायासी, वपू हि उघड्या, कितीएक त्या फेडुनि लुगड्या घेती फुगड्या, धीट धांगड्या, धांगडधिंगा, अंग मोडुनी पिंगा देती, अनंगाचिया रंगा येउनि रंग पाहुनी ढंग मांडले, छंद तालस्वर थै थै थै थै, मंद मंद हें नृत्य करीती, गंधफुलांचे गेंद घेउनी भारमदें वहु मार करीती वारंवार, तरवारीचे वार परांचें हृदय विंधिती, बुद्धि जाउनी शुद्धि हरीती, युद्धीं ज्यापरि शूरचि जैसा, शूकहि तैसा, धीर वीर तो धीमेहीचा अधीन, स्वामी नव्हे पराधीन, अधिष्टानीं, निचेष्टित मनीं ब्रह्मनिष्ठ शिष्टवाक्यें योगवासिष्ठग्रंथाचीया, अर्थग्रंथिची जैंडी छेदुनी, अखंड निर्गुण समाधि साधी, अबाधीत सुख रमाधिशाच्या, अनुग्रहें विप्रहेंचि अंतरिं, आवरिलें त्या मन्मथअरिला. ॥ श्रीशुक० ॥ ११

त्यांत मुख्य ते रंभा रमणी, खंजननेत्री, कुंजरगमनी, पुढें पातली मन्मथरमणी, चंचळाक्षि ते अंचळांतुनि, कंदुकाकृति, बंधुकाननी, नेमसंदुके लक्ष लावुनी, निकट जाउनी, स्नेह दावुनी, तपोधनाच्या अपोशनातें वश्य कराया,

---

१. हत्ती. २. एक प्रकारचें शस्त्र. ३. एक मादक पदार्थ. ४. जोर. ५. युद्ध. ६. भिकारी. ७. विडी. ८. वाद्यें. (सं०तूर्य). ९. पैंजण. १०. अलगुजें. ११. चोळी. १२. ध्यान. १३. मूळ. १४. एका प्रकारचा पक्षी. १५. चेंडू. १६. बंधुकमुखी. (बंधूक=एका प्रकारचें फूल.) १७. पेटी.

हास्य करुनि मग विकसितवदना, मदन इष्टवी, मिष्टमिष्टशा गोष्टि वदे परि, दुष्ट अंतरीं जशी कातरी. एकांतीं कांता ते बोले, 'कांता एथें न दिसे तुमची, कांति अशी कां अकांतवीली? न बोलाचि कां अबोला हा, आम्हांसि धरिला! असे कसे तुम्हि तपप्रमत्तें! कठोर चित्तें तुम्हां जनांचीं, तापसांचीं कापसासम मृदू असावीं, ह्रदयिं॰ निरंतर शुष्क वचनें, मिथ्या आतिथ्याची रीती, स्नेहभरित सामोरे जाउनि उठा बसा हें कांहिंच नाहीं.' 'परस्त्रिये! त्वां दूर असावें.' 'व्रतीं अपपर तुम्हां नसावें.' 'ईश्वरआज्ञा तीस पुसावें.' 'करणी वाणी कसे उगें असावें?' 'भजनद्वारीं नित्य धसावें.' 'समर्थ तप हें किमर्थ करितां?' 'उलंघितों भव अनर्थसरिता.' 'व्यर्थ देह कां दंडुनि मरतां?' 'काय न लाभे स्त्रिया भोगितां.' 'या या, मार्गें मार्गें सरतां?' 'छी छी मूर्खे! गच्छ गच्छ तूं. गच्छ गच्छ तृणतुच्छ अम्हांतें, निरी वरी बरि धरिसि परी हे निरीच्छ माझी स्वच्छ वासना, हरिचें देणें अद्भुत केणें[1].' 'खरें ऐक मुनि! वीरि पीडनि, जिवासि हा कां त्रास देसी? तनुक्षेत्राशीं यासि त्रासिसी? काय इच्छि मन अशा तपानें! शांतपणें हें अपूर्व दिसतें पूर्ववयीं, हें जेविल्याविणें अंचवणें, हें सेविल्याविणें स्वाद सांगणें, श्लेष्मास्त्रवही उपद्रव मानुनी घ्राण छेदणें, हर्षें हर्षें उपजल्याविणें बारसें करणें, करितां आर्ष म्हणावा जैसा, तैसा तुमचा पृथक् छंद हा, प्रथमवयीं वैराग्यपिसें[3] हें दिसों लागलें, योगमिसें ह्रद्रोग असे हा; विश्वासें मी पथा सांगतें, सांगुं तुम्हां तें ऐकॉ खरें हें श्रीशुकराया! शोक हराया, लोक तराया, कोकपुस्तका घोक घोक तूं, आशय तेथिंचा विषय इंद्रिया, जोड घालुनि कोडकौतुकें, गोड गोड रतिमुखासि सांडुनि, वोढ तपाची द्वाड खोड हे, सोड सोड निग्रहो मनाचा, मद्गमनाचा मार्ग धरावा.' स्वर्गअर्गळा बार्गळ चित्तें, बाष्कळ बाष्कळ वदतां वक्त्रें, नव्हेचि तो शुक कामातुरिला.॥ श्रीशुक॰ ॥ १२

'तरी च एथें जन्मा यावें, तरुणीकुचद्वय पेटे घ्यावे, मन्मथसरिता तरूनि जावें, तरुणीसंगें निसंग व्हावें, व्यर्थचि कां तारुण्य हरावें? तृणासनाला काय करावें? सुखमंचकीं मंदिरीं भरावें, गाढालिंगनि शयन करावें, मुखामृताचे स्वादहि घ्यावे; येथें दंडुनि किती झडावें? शीत वातें हुडहुडावें, खुडखुड वाजति दंत स्वभावें, इंद्रियानें किती रडावें? म्हणाल कां हो! अम्हां छडावें, हितोप-

१. माल, जिन्नस. २. पाणी. ३. वेड. ४. रतिरहस्यनामक कामशास्त्रग्रंथ. हा ग्रंथ कुक्कोककवीनें केल्यामुळें त्या ग्रंथास 'कोकशास्त्र' नांव पडलें. 'कुक्कोकनाम्ना कविना कृतोऽयं श्रीवैन्यदत्तस्य कुतूहलेन । विलोक्यतां कामकलासुधीरैः प्रदीपकल्पो वचसां विगुंफः' ॥.

देशीं नाचि चिडावें, भोगसुखाला ऐक्य व्हावें, गृहाश्रमानें श्रमा हरावें, ज्याप्रीत्यर्थ तप आचरावें, षड्रस सेउनि तृप्त असावें, जीवात्म्यातें तोषवावें, न कळे तरि कौशिका पुसावें, अहा कपाळा ! किती हंसावें, गोंवळवचनें व्यर्थ फसावें, श्रीगुरु तुमचा कृष्णहि भोळा, सोळा सहस्र केल्या गोळा, अणिखी त्या गौळणिंचा मेळा, भंवल्या अबळा सुंदर सबळा, तितक्या भोगुनि ब्रह्मचारी, झकविलें तुज बरें विचारीं; वितरागी केला संसारी, अंकीं बैसवि गौरि बिचारी, उगाचि वदनीं नामोच्चारी, स्वामी ! तुम्ही साळेभोळे, डोळे लावुनी, अज्ञानाचे खोळे दडतां, सांवळी मी षोडशवर्षा, कंवळी तनु हे, उतावळी मनिं अतां वाटते, ऐशा रानीं, माझि शिराणी, आलिंगिन मी उभय करांनीं, तुमची राणी मुख्य घराणी, विकल्प न धरावाचि वरांनीं, नेमनिष्ठ मी अनुच्छिष्ट, हें शिष्ट वराया कोरें पात्र, नाहीं स्पार्शिलें तिळमात्र, पवित्र पीयूषाचें हें गात्र, सेवीं सखया ! उशीर न करीं अधरचुंबनीं, उद्धरिं मातें करीं धरुनियां, करसी अंगीकार तरी मी तरुणांगाची सूख शेगडी देउनि तूझी शीतळ हुडहुडी; शांतवूनियां वेडी बागडी, भक्ती माझी शक्त्यनुसार, ते उपचार, अर्पुनि फुकट निकट वनीं मी वसेन एकट, ऐसा दास्यविभाग माझे मनें दृढ धरिला.'॥ श्रीशुक०॥१३

बोले ब्रह्मराज तो प्रचंड, 'निश्चळ मळमूत्राचा पिंड, संचय होउनियां उदंड, मातलें हें स्त्रियांचें बंड, भुलले कविजन अशांसि लंड मोहमंदिरेनें भंड उभंड, बडबडोनि श्रमविति तुंड, निःशंक मुखासि शशांक म्हणती, मृगांक तुळिती, नेत्रनासिका छिद्रें असती, मेकुड शेंबुड थेंबुड नाहीं, बिडबिड लाळ थुंका पाहीं, मांस गोठलें ते स्तन उठले, कविसि वाटले हेमकुंभ हे, ऐसे वेडे मदांध रेडे, मन्मथचाडे, भिडेभिडेनें गाढवाचे घोडे म्हणती, कुडकुड हाडें, प्रत्यक्ष किडे, क्षतें पडतांचि चिडे तेधवां आंतड्यावरि कातड्यानें दुर्गंधिस्तव पड वेष्टुनि टाकियले, मग कुडें मडें हें अमेध्याचे सडेचि स्रवती, मूढ मोहारूढ होउनि, कुडीवासना, उडी घालिती, पूयगर्ती दडी च देती, गडी तयांचे नहोंच आम्ही, पडी घेउनी सुखी राहिलों, रंभे ! आली वाट धरावी, चाट बोलसी, अचाट भलतें, नष्टे विषयभ्रष्ट वासना, निष्ठा कळली, चेष्टा करिसी, वि-

१. गोड, खारट, कडु, तुरट, आंबट, तिखट. 'रसो बहुविधः प्रोक्त ऋषिभिः प्रथितात्मभिः । मधुरो लवणस्तिक्तः कषायोऽम्लः कटुस्तथा ॥' (महाभारत, शांतिपर्व, अ० १८४ श्लो० ३१.) २. विश्वामित्र. ३. गवळी. (कृष्ण.) ४. सांवळी षोडशवर्षा, म्ह० 'श्यामा षोडशवार्षिकी.' ५. आवड. ६. मद्य. ७. सुवर्णकलश. ८. रक्त.

ष्ठेचीच प्रतिष्ठा वदविसि, विटाळाचा जमला गाळ, अधोऊर्ध्वद्वारा लाळ, द्रवती तेथें मूत्र खळाळ, अशुद्ध भळभळ, जंतू वळवळ, तंतु सूक्ष्म मग गुंतुनि पडती, दुष्ट कोणी कुष्ट वाणी पुष्टहि अपानमार्गी पचती, जैसीं मुतती कुत्रें त्यांचीं छत्रें उठती, तशा तूझिया विषयापासुनि विषवल्लरी ग्रामथिल्लरी, उदकानें टवटवीत तेजें, शृंगारुनियां नर्कमंदिरीं गर्क जाहलां, मूर्ख अशा तुम्हि तर्क कराया, यौवन जाइल, मग जरा करील जर्जराचि यातें, उंच कूच हे दुष्ट मदानें उंचावले, नर लांचावले कां चर्ममयी त्या चर्मपिशव्या, घर्मजन्य शिरिं केशिं उवा, वदन बोंथरें, नेत्रिं पू भरे, शरीर अत्रवें थरथर कांपे, सर सर परती दूर हो मागें, वरि वरि आंगें वृंदावनशीं, गोड बोलशि तुं, खोड स्त्रियांची गोड बोलणें, मग सद्वृत्तिला पुढें लावणें, कर्मकोथळी, धर्म तूमचा, वर्म निष्ठुर.' ऐसें रंभा परिसुनि चित्तीं, शब्दें खोंचुनि लज्जा वेंचुनि, जघनेमुक्त केलें निरिला, निर्दोष हृत्कोश चिरोनि शुकापुढें दाखविला. ॥ श्रीशुक० ॥

रंभा भरली क्रोधभरानें, भ्रमा पावली गर्वमदानें, वस्त्र फेडिलें दुराग्रहानें, करद्वयाच्या नखाग्रानें शुक्तिपुटें सम उदर गोमटें, अधर चाउनि विदारुनियां पदर त्वचेचा, उघडुनि लावण्याची पेटी, पोटीं त्या तेजाची कोटी, चंद्र कोटी अर्कांचा ही, अर्क संग्रहें, सकर्पूरमृगमदासहित तो, सुंदर उदरीं गंध सेवितां, प्रकाशल्याची दीप्ति दाटली, तृप्ति वाटली, मधुकरास तो, वसंताचिये, संपत्तिस तो मत्रासें येउनि, प्रवाह होउनि निवास केला अक्षय तेथें नंदनवनिंचा, चंदन अत्तर इतर द्रव्यें केशर मृगमद अणि मैलागर, कृष्णागरादि सर्वहि कांहीं दर्प दाटले, सर्व पातले, कर्पूराचा तर्पूर गंध रंभागर्भीहुनि संभवला, प्रत्यक्षापरि प्रमाण वाटतो, ऐसें ऐकुनि नेत्रीं पाहुनि, शुकही तुष्टला, 'धिग् धिग्' म्हणे 'मज जन्म जाहला, बारा वर्षे नर्क भोगिला, नव्हतें ठावें, खेद वाटला, कळतें येतों या उदराला.' ऐसा तो मुनिराज बोलिला, विगतगर्व ते रंभा होउनि, तपोवरिष्ठा ब्रह्मनिष्ठा साष्टांगें प्रणिपात घालुनि बोले, 'मी पातकी घातकी दुर्गुणी तुज निर्गुणातें छलुनि पाहिलें, क्षमाक्षितीशा! बहुत साहिलें, मुनिचिद्रूपा! कृपा असों दे, त्रपा लयातें गेली, अपुले सुरालयातें, जातें घेउनि शोक भयातें, येथें येउनि अपजयातें, नेहुनि देतों बाण जयाचें, पौंदंती तो त्याची खंती, येउनि वदनीं त्याची पंथीं, आत्मारामा देखुनि व-

१. रक्त. २. कडु वृंदावननामक फळ. ३. मोत्यांच्या शिपीनें पुट. ४. कस्तूरी. ५. ढुढाक, चोर. ६. काम. ७. ऐरावत.

दर्नी, ओष्ठ चाउनी कष्टी होइल. असो आतां तें.' ऐसें बोलुनि विमान सज्जुनि अपमानानें जर्जरभूता निर्जरि त्या त्वरें पावल्या हो निर्जरपुरिला. ॥ श्रीशुक० ॥ १९

निकट जाउनी श्रुतिरंध्रातें, भृत्य सांगती देवेंद्रातें लज्जा लांछन मुखचंद्रातें काळिमा लाउनि येइल एथें, रंभादिक त्या स्वर्गनायिका, शक्रसायका, पुण्यदायका त्याचें हृदय भग्न कराया नग्न तनूंतें शुकसंलग्नीं, नृत्य करित, परि वृत्ति तयाची ब्रह्मीं जडली, अरुणाचळसा अचळ आसनीं अचळमतीनें, विवेकशस्त्रें कामास्त्रातें छेदुनि विजयी वस्त्रें त्याला, पातें उघडुनि विनय तपातें, देखुनि तीच्या अवयवातें, लेखुनि मातेसमान नातें, भावें खेवों उदित मुनी तो, निष्कामत्वें शुद्ध सत्वरत, तत्ववेत्ता जोडुनि हस्ता, सत्वर बोले प्रशस्त चित्तें, 'माते! माझी जननावस्था, अळुमाळ कळतें, जरि हें मजला, बाळक होउनि तुझिये पोटीं काळ कंठितों. माते! सांगूं काय? अंगीं घाय भेदिले, पूर्वकर्मकृत धर्मयोगें, स्त्रष्टयानें अदृष्टिं लिहिलें, कष्टें विष्ठेमध्यें मुष्टि, शुष्कओष्ठिं शोषुनि, खितपत पूयें जठरीं, ऐक तप मी तपलों. आप्त हरिविणें न दिसे कोणी, हर! हर! तें दुःखचि आठवतें. एकेक घटिका युगसम अटका, न घडे तिटकाऱ्यानें चुटका, सोऽहंभजनीं लटका तेथें नव्हेचि उदरीं कदापि सुटका, रस कटु माता तीक्ष्ण भक्षुनि, क्षणक्षणां वांग्यासम आंगीं होरपळे मांसाचा गोळा, काळ कावळा तधींपासुनी टपला तेव्हां त्यातें त्रासुनि उदास झालों, दास हरीचा, आतां माते! पुत्रस्नेहें रक्षीं मातें कृपाकटाक्षें लक्षीं;' म्हणतां रंभा चित्तीं करी अचंबा अंबा सांबाहूनि आगळी, पाहुनि रंभा दंभातीत सुनितंबिनि मनीं आपुल्या दंग होउनि, सत्संगाचें वारें आंगीं, सद्गद आंगीं गद्गद कांपे, स्वेदकंपरोमांच थरारा, नेत्रीं धारा, 'अधर स्फुरती, रुदन दाटलें वदनविकारें स्तवन मांडिलें. जळीं लवणसें विषम सांडिलें, प्रांजळ मग गंगाजळ होउनि, अंजळि जोडुनि मंजुळ बोले, 'हे सुज्ञा! तुज अज्ञानें मीं अशुद्ध वचनें निषिद्ध केलें.' नमन करुनियां योगींद्रातें गुप्त पातली, गृहीं सुमली. ऐसें ऐकुनि इंद्रदुतांतें प्रेरुनि अणितां पंकजनयनी, संकोचानें विर्बूचसदनीं धीटपणाचा लोलो म्हणतां, 'स्वस्थ गच्छलों, अलाद ठकलों, वचना तुमच्या चुकलों नसतां त्याचा नेम हराया जपलों, संनिध जाउनि कामहुकी न मुकलों बहूत बकलों,' 'शेखीं उकलुनि काय दाउनि थकलों, अपुले प्रति-

१. उदयपर्वत. २. आलिंगन. ३. क्षणमात्र. ४. बारा वर्षें. ५. सुंदरी. ६. वांकडें, द्वेष. ७. निजली. ८. स्वर्ग. ९. अगदीं. १०. बडबडलों. ११. शेवटीं, अखेरीस.

झेला मुकलों. षदनीं छकलों, असतां सुकलों, तेथुनि झुकलों, एथें यावया पाय पाहवया, कारण ऐसा, योगी रोगी भोगीं विटला, वासनेचा आंगीं तुटला, स्वयें चिकित्सा त्याची केली, भोगाची निरीच्छता झाली, समूळ इच्छा शक्ती येथें यावयासी शक्ति खुंटली, भक्तिमुक्तिचीं पथ्यें सेविलीं, तथ्य भावना सत्य वळखली, औषधीविणें व्याधि पळाली, सुखीं असा निजपदीं बसा, न रुसा आम्हांसि.' ऐसी रंभा विनोद करितां, मोदेंभरानें पुष्पसंभारें, भरित पुष्पवटितें मुनिवरा करावयातें, सकळ बरोबर, सुरवर किंनर घेउनी, जयजयकारें. झोंका रे! झोंका रे म्हणवुनि दुंदुंभिवरि रोष काढुनी, घोष मांडिला, दोषरहितमुनियशासि वर्णिति, आदित्य कदाचित् टळेल नेमा, सिंधु कदाचित् सांडिल सीमा, चळेल यद्यपि शेषनामा पाताळींचा, उत्तमोत्तमा तुझी ऊपमा, तूज विराजे, साम्राज्य सुख शांति सुखासनिं, भाळिं शुकाच्या अक्षता लावुनि, गेला तेथुनि सुराध्यक्ष तो. अंबरांतुनि पितांबराचे, रुमाल उडविति, धुमाळ वाद्यें, मोरपिच्छ करि स्वच्छ चामरी, अमरेंद्रावरि वारिति अमरी, अमरावतिला त्वरित पातला. चरित असें शुक विराग ज्ञानें, पराग सेवन करितां करितां, पावन होतो श्रोता वक्ता, उपजेना तों अभय हरीचें, पुष्कळ पैका, प्राप्त गायका, भव्य भूषणें, दिव्य बायका, ऐसा याचा छंद जयातें, घरीं पायका, ऋद्धी सिद्धी रमानायका, इंदिरावर प्रिय होउनियां, इंदिरेसंभ मंदिर, सुंदर, मंदरधर हरि, स्वकंधरींची प्रसादमाळा कंठीं घालुनि, यम हात संसारापासुनि गौरवानें रौरव चुकउनि अतिउत्कीर्ती, भवखुंटीतें, सोडुनि हरि वैकुंठीं नेइल हें, सत्य वचन अमृतराय भक्तांसि वदला. ॥ श्रीशुक० ॥ १६

सुदामचरित्र.

श्रीकृष्णें सुदामजीला सोन्याची नगरी दिधली । स्वानुभूतिहृदयामधिली. ॥ ध्रुवपद. ॥

ब्राह्मण ब्रह्मनिष्ठ बहु मोठा, त्याचा प्रपंच हीन करंटा, मुलें भुकेनें करिती तंटा, घरांत वाजे नकारघंटा, स्त्री वरवंटा, धैर्याचा वरवंटा, मनांत परवंटानें, पोट बळें वेंटाळुनि, बाहू कवटाळुनि, कधिं कंटाळेना, पुरुषवचन तें टाळुन चित्त विटाळूं नेणे; नसतां मूठपसाभर दाणे, पतिव्रता तीव्रता न जाणे, कांता ते एकांतीं नेउनि, म्लान वदन मउ बोल बोलली केविलवाणें, 'जी जी स्वामी!

---

१. आनंद. २. नगारे. ३. आकाश. ४. चाकर. ५. लक्ष्मी. ६. कंठ.

द्वारकेंत श्रीकृष्ण विष्णु गोपाळ तूमचा बाळमित्र चिरकाळ नांदतो, ऐसें ऐकियलें हो ! कानें, त्याचें तुमचें दर्शन होतां, अपार धन देइल सन्मानें, समर्थ श्रीहरि सखा सुखानें, तुम्हांसि अर्पिल सोनें नाणें, प्रेमें आलिंगिल जीवानें, तुम्ही कुटुंबी सदा हिनवाणे, कांपतसां दारिद्र्यहिंवानें, हरी भेटतो आर्जवानें, उचित दिसे जी तेथें जाणें.' यापरि ब्राह्मण दुबळा, त्याची अबळा, ते बुबुळातें फिरवुनि बळानुजप्रभुयदुपतीभेटीसाठीं मधुर मृदु बहु प्रकार प्रियकर वाक्यें वदली. ॥ श्रीकृष्णें० ॥ १

सुदाम बोले साधु स्वभावें, 'कांते ! द्वारकेसि जरि जावें, हरिच्या भेटीस काय न्यावें ? लाजिरवाणें काय म्हणावें, निष्कामत्वें त्यासि पहावें, परम लाभ तो पुण्यश्लोका अवलोकावें,' तें ऐकुनियां क्षमाशील क्षुत्क्षामा रामा, श्यामांगी चौठायीं याचुनि, चारी मुठी पोह्यांचें चूर्ण जीर्ण चैलखंड चिंध्या जोडुनियां, चौपट पदरीं लहानशी गांठुडि बांधुनियां, चारुमतीनें, चतुरगतीनें, चित्तहरण चैतन्यवृत्तीनें, अहंब्रह्मसिद्धांतरितीनें, पतीपुढें ठेवियली तीनें, गळतिल कण म्हणउनियां तेणें कक्षापुटीं रक्षियली. ॥ श्रीकृष्णें० ॥ २

झाल्या प्रातःकाळीं स्नानसंध्योपासन, दर्भासन तें गुंडाळुनियां, कृशांग तो द्विज, कुशांगुळीये कुशस्थळीच्या शुभप्रयाणीं, पाणि पियासि पाणी जोडुनि, अंजलिपात्रमात्र सहाय यात्रेकरू तो यथापथातें विराग माने मनोरथाचा साज, बांधिला माज, आज यदुराज हरीचा मुलाज मतिचा विलाज कैसा सलाज चित्तीं शंकित जातां, अवाज न होतां गरिब नवाज माधवजीची दुरूनि द्वारवती देखियली. ॥ श्रीकृष्णें० ॥ ३

चरती कामधेनुखिल्लारें, सुवर्णरत्नखचित धवलारें, फुललीं कांचनमय कल्हारें, कौतुक रचिलें हरिमल्हारें, समुद्रवलयित मलयमेरुसम निलय हरीचें, प्रलय संपल्या कुवलय उगवे, करुणालयआलवाल, यादवप्रवालवल्ली, भली उगवली, कृष्ण घन कल्पद्रुम फळली, कोमलतासत्वें पल्लवली, मुक्ताफळें चहुंदेशीं स्रवलीं, अमृतफळें नम्रत्वें लवलीं, सोमवंशतेजें टवटवलीं, स्थैर्यमंडपावरी सांठवलीं, संतवसंता भेटतां शांती लवली, धवळी भूतप्रभा उद्भवली.॥श्रीकृष्णें०॥४

जाहले हात पाय त्या नळ्या, नाडी दिसती वरी वेगळ्या, सुकलें मांस पडल्या वळ्या, नखीं वेष्टियल्या आंगोळ्या, उपोषणें चिरकालें झालीं, सरकाळें अंगाचीं वाळुनि, देह तपें जाहलासे जर्जर, उभा अस्थिचा केवळ पंजर, तो

भूनिर्जर, निगमगर्भ कृश दुर्भर, बोटीं दर्भ पवित्र, सदा मुखीं स्तव, ब्रह्मसूत्र सित गळां, परि निबर दोडका, तेंवि रोडका, धर्म जोडका, अडका जवळी नाहिं तथापि, अडकाठीही कोणि न करितां, तीन देवड्या ओलांडुनियां, चौथें मुक्तद्वार हरीचें, वेंघतांचि देखिलें हरीनें, लगबग लगबग, अंकीं रुक्मिणी बसली ते पर्यंकीं लोटुनि, उडी घालुनी, धांवत धांवत स्वयें येउनी, ब्राह्मणचरणीं मस्तक टेवुनी, दंडवतानें मिठी घालुनी, उठीं उठीं म्हणतांचि सुदामा, चहूं भुजीं कडकडुनि आलिंगुनि; प्रेमबाष्प वारि तें लोचनीं, स्फुंदत स्फुंदत कडे घेउनी नाचत नाचत, पूर्ति नव्हे प्रियमूर्ति द्विजाची, निजासनीं बैसविली. ॥ श्रीकृष्णें० ॥ ५

ब्राह्मण बैसविला पर्यंकीं, त्याचे चरण मळले पंकीं, ते टेवुनियां आपुले अंकीं, शंकितमति नाहीं द्विजरंकीं, जिंकित केवळ, अंकितसा अवलोकित पंकज, अंकुरहस्तें शंकरसमान शंकर सुदामभूदेवाचे पाय चूरिले, जानु जंघा गुल्फ पद कठोर भिंगुळीका, आर्ती अंगुळिका, नखमातीसहीत ते सांवरिले, हळू हळू पदतळ कुरवाळुनियां कंटक हरिले, सुगंध शीतळ निर्मळ जळ रखुमाई ओती कांचनपात्रीं, प्रक्षाळुनियां अंचळवस्त्रें पुसोनि निर्मळ हृदयीं धरिले, नेत्रीं लावुनि, मुकुट काढुनी, मस्तकिं वरिले, चंदनचौकीवरि विस्तरिले, क्षणक्षणां अवलोकुनि प्रेमें बहु आदरिले, स्वागत सुखशब्दांहीं भरिले, धन्योऽहं कृतकृत्य मतीनें मस्तकिं धरिले, चरणोदक सहकुटुंब सेवुनि, दांडे वांसे स्तंभ शिंपिले, नवकेशरघनसारमलयपाटीरघनरसें भाळ चर्चिलें, सुखकारकशशिकिरणकरें उद्वर्तुनियां सर्वांग अर्चिलें, ब्राह्मणचरणीं तनु मन धन सर्वस्व अर्पिलें, दशांग-गुग्गुळ, धूप कूपभर तूप, यूपसम तूळवर्तिका, सूपसविस्तर दीपमाळिका कूप, लाविले अमूप, मध्यें भूप विप्रवर रूप, भव्य भरपूर आणि कर्पूर दिवे बहु परिमळ वाहे घव घव घव घव, ते तूपसाखर अमूप, वक्र करंज्या, शुभ्र फेणिया, पंचखाद्य नैवेद्य हृद्य मृदु दुग्धदधि, वाद्यपुरःसर गद्य पद्य, अनवद्य सद्य सुख विद्यमान, शुभ नद्यजलाशय, मध्य मध्य पानियासहित श्रीआद्य हरीनें नैवेद्य, समर्पुनि वेदवेद्य, ब्राह्मणापुढें त्या भरुनि पराता त्वरा करुनि पृथु पात्रें निवेदिलीं. ॥ श्रीकृष्णें० ॥ ६

सत्यभामा छत्र धरी, सत्या शैव्या चामर वारी, जांबुवंती व्यजन सांवरी भद्रा मयूरपिच्छ उभारी, सूक्ष्मदृष्टिनें पक्ष्म न लावुनि लक्षुनियां पैं उभी लक्ष्मणा,

मित्रविंदा छत्र आतपत्र, कालिंदी इंदीवरसमान हस्ता जोडुनि संदी, तो द्विज वंदी, आनंदित बहु अष्ट नायका, द्वयष्टसहस्र शिष्ट बायका, कृष्ण जिष्णुपदनिष्ठ तिष्ठती, इष्ट हरीसी अभीष्ट जाणुनि, मिष्ट मिष्ट रस प्रविष्ट करिती, मीठ मोहऱ्या मुष्टि भरुनियां, दृष्टि उतरती, ऊर्जित अदृष्टें कष्टरहित तो, हृष्ट पुष्ट संतुष्ट, मिष्ट मृदु विष्टरवासी, वसिष्ठ तैसा हृष्ट हृष्ट, उत्कृष्ट त्रिविष्टपश्रेष्ठ देव श्रीपुष्पवृष्टिनें स्पष्ट भाळ अवशिष्ट शिखा, अस्पष्ट अशी त्या ज्येष्ठ हरीनें कनिष्ठ होउनी, एकनिष्ठ ते ब्राह्मणकाया, दैवी संपत्ति, बरवी पूजियली. ॥ श्रीकृष्णें० ॥ ७

सुंदर हंसतूळिकास्वपिती, वरुता ब्राह्मण जैसा नृपती, सेवेलागुनी स्त्रिया जपती, संनिध बैसला तिमया त्रिपती, नम्र हस्तकें विप्रहस्त हस्तातें घेउनि, प्रशस्त चित्तें, कुशल प्रश्नें, वर्तमान मागील पुसे जो सुदामजीतें, 'तुम्ही आम्ही बाळपणीं, उज्जयिनीमाजी, घरीं गुरुजिच्या पढत असों तें आठवतें कीं, सांदीपिनिसद्गुरुची भार्या, आर्या जननी, इंधनार्थ रानांत पाठवी, वनांत आपण सर्पण वेचूं, काष्टें संचूं, फिरतां फिरतां अकस्मात अकाळीं, प्रपंच काम दुरासद वायु झडझडी, क्रोध बोधरिपु वीज कडकडी, लोभ क्षोभकर मेघ घडघडी, आत्ममोहजळ लोट भडभडी, मद मीपण कटु झाड कडकडी, मत्सररूप येत हुडहुडी, परमार्थाचा मार्ग चुकलों, गुरुपद..................ग्राम मूकलों, असत्प्रलापें बहुत कष्टलों, आत्मसुखांतुनि वृथा भ्रष्टलों, अंधकार अज्ञानरात्रीं, घन तो गुरुसेवन साधन योगें, भाग्योदया कृतप्रातःकाळीं, गुरूमाउली, आत्मपावलीं, धांउनि आली, त्वरित पावली, मधुर बोलणें करीत साउली, 'कृष्ण! कृष्ण! सुदामा! सुदामा! विवेकविपाक हाक मारितां, आपआपणां सांपडलों, पायां पडलों, गुरुमाउलिच्या पोटीं दडलों, गुरु दैवत, गुरु माय बाप, गुरु दीनबंधु, गुरु कृपासिंधु, गुरु बंधहरण, गुरु आद्यदीप, गुरु दुःख देखतां प्रसन्न जाहला, गुरुभक्तीनें गुरु मानवला, आत्मलाभ कृतकृत्यपणाचीं उपनिषदांतिल शिरोवाक्यें वरदानें ओपियलीं. ॥ श्रीकृष्णें० ॥ ८

'तुमचें दैव तें आहे तमाम, आत्मसुखीं हो अंतर्याम, सफलित झाला प्राणायाम, प्राप्त होइल धनसुतधाम, या वरदानें मी बळराम, प्रथुनि रथ पृथु मथुरे आलों, मथुनि दैत्यखळ, जथुनि यादवदळ, तेथुनि निघुनियां, आतां येथेंचि राहिलों, तुम्ही निरंतर गुरुकुळवासी, गुरुआज्ञेनें समावर्तनें विवाह शुभ केला कीं नाहीं, प्रापंचिक बोला जी! कांहीं, चित्त अनूकुळ नवरी मिळाली कीं सांगा,

काय? किती घरीं मुलें लेंकरें? योगक्षेम कसकसा चालतो, पहिल्यापासुनि तुमची वृत्ति उदास सदा, सदसदास ब्रह्मविदास, जगत्सुहृदास, सदास ते रतली उपनिषदास, न पावुनि विषयमदास, त्रासली मानसप्रिय वैराग्यभाग्य, समभोग्य योग्य, आरोग्य तुम्ही छांदोग्य, मृग्य अवधूत पूत हरिदूत मान्य पुरुहूतवंद्य' हें स्तवन करुनियां, अवघा घरिंचा समाचार बहु पुसुनि, आपुलें महत्त्व गाळुनि, विप्रवराची क्षिप्र प्रसन्न मनोवृत्ति आनंदा पावविली. ॥ श्रीकृष्णें० ॥ ९

'तुमची भार्या तूर्याग्रहणी, शांती दया तियेला विहिणी, रुक्मिण्यादि जियेला वहिणी, आमुची वडील मान्य वहीनी, काय तियेनें पाठविलें? तें आठविलें, मज भक्तिभातुकें, कोडकौतुकें, थोडें ही बहु गोड मोडकें पान भाजिचें, मोड फुलाचा, दोड फळाचा, रोड बदरीची फोड, जोडतां वोढवितों मुख थोड, खाजवनें खोड आमुची पतितपावन, होड नावरे, सोड सख्या! तूं सोड गांठुडी,' म्हणउनि लज्जित, सुदामकरींचे पोहे हसडुनि, आवडिनें हरि सांवडितां, बचकें विचकुनि, मुख आ पसरुनि, पृथुमुष्टि मुखें सेवियली, दुसरी मुष्टि धरी रखुमाई, मायिक चिद्ग्रंथि विभेदुनि, पृथुकतंदुळात्मककणभर्जित, बीजविवर्जित, केवळ विचारदृकूल जीर्ण श्लथ श्रीभगवंतीं अर्पितांचि सुटली, चतुष्टय महावाक्यमय विरागभक्ति, ज्ञानानुभवें पटाश्रितातें, तद्गत तत्पद आपुलें आपेंसें घे, त्वंपद तें तूं ब्रह्म असप्ति हें, असिपद घेतां, श्रीरुक्मिणीनें धरिला कर, निकरें निर्विकार, ताळित व्हावया संप्रज्ञात, समाधिजनित, स्मृतिवृत्ति जननीनें हरिली. ॥ श्रीकृष्णें० ॥ १०

पोहे सत्कृत पोहे, चिद्रहस्य पोहे, सेविल जो हे, तो भव पोहे, दरिद्र नोहे, सुवर्ण लाहे, लाहे कामधेनुची वोहे, घरिंचे दोहे, सदनी मोहे, तो साम्राज्यपदीं आरोहे, तो हेमांबर नेसुनि सोहे, निजसुखमाहेरांतचि राहे, आत्मा आहे, हें मी बाहे, उचलुनि साहे, तयास बाहे वाहे, नयनीं पाहे, तो मज आहे, तुच्छवत् तद्गत भेद न साहे, त्याचे चरणरजीं अवगाहे, निगमप्रवाहें वाहे, त्याप्रति खादी वाहे, आहे संसाराची न लाहे, असें म्हणुनि श्रुति श्रवण मनन आणि निदिध्यास साक्षात्कारादिक मुटी ती शेवटील प्रियतर देवें चाखियली. ॥ श्रीकृष्णें० ॥ ११

(श्लोक.)

सुदामाचे पोहे धरुनि वदनीं देत मिटक्या
अशी गोडी कैंची अमृतघुटक्यामाजि लटक्या ।

न सीमा भामाद्यादिकअधरपानांत विटक्या

असें श्रीभिक्षेचा विटति कुटक्यांमाजि तुटक्या. ॥ १२

(कटाव.)

कृष्णें वृत्ति करुनि पांगोळी, आपुली वागवूनि आंगोळी, घालुनि मोतियांचि रांगोळी, करवी ब्राह्मणासि आंघोळी, चौकन्हाण विहिणीचें, तैसें ब्रह्मश्रीबहिणीचें, हिरवे नवे केळीचे, खांब कोंवळे लांब लांब सह इक्षुदंड, वरि मंडप साखरनिंबोळ्यांचे घोंस पोसले, लाल दुरंग्या नारंग्या सारंग्या लटकति, द्राक्षांचे घड पिकले, रसाळ मधुप झोंबती, मुक्त लोंबती, वारिजात नयन फुल पारिजात शुभ्र चांदवे तयांत खुलले, कमळ फुलारे फुलले, विठाबाइनें ठाणें सोडुनि, ठाणवया लखलखीत ठेवल्या, रांवे हंस ज्यांस लाविले, नवरत्नांच्या चौरंगावरि, श्रीरंगानें झुलत सुखप्रद विप्र बसविला, पीतांबर पडदणीस देउनि, खंबाइती भरजरी नेसवुनि, दीनबंधुनें सुगंधराय, चमेली वरचांपेल बुक्याचा लेप देउनी, बेल फुलेल बुक्याचें उटणें, कृष्णहस्तिचें उष्ण उष्ण जळ, घंम घंम कर्पूरवर्तिका, वाजंत्र्यांचे बाजे वाजति, त्या फुलबाज्या, नळे हवाया चंद्रज्योति बहूत सूटती, मखरीं लोंबती घागरमाळा, घंटा घणघण, भंवत्या भंवत्या फिरति बायका, अष्टनायका, द्वारावतिचे कृष्णरावजी, त्यांचे बंधू वडील भाउजी, महा साउजी, जडावाचिया खडावांत हळु पाय देउनी, क्षीरोदक परिधान करवुनी, उंच दुशाल खुशाल समोर मशाल अति विशाल, त्यांतुनि सुदाममूर्ति भोजनार्थ माजघरीं चालविली. ॥ श्रीकृष्णें० ॥ १३

मांडुनि स्वस्तिक सुवर्णपाट, अडणीवरि सोन्याचें ताट, भंवता फलशाखांचा थाट, कांठीं वरण पिंवळें दाट, मीठ मिरें, वरि अलें लिंबु तूतिया खोबरें, किसून कोशिंबीर सुंदर, अम्ल रायतें, रुचिर आयतें कोमळ आंगीं, सगळीं वांगीं, शुभ्र कारलीं, मेथी पोथी, बोथीं केळें, कोथिंबिर हाळदीसह, काथी ताथी साथी चरुसह चाकवत चुका, चवळी विवळी, कवळ्या शेंगा, चिमकुरादळ चिरुनि, चांगली चमचमित फोडणी देउनि चरारीत, चारोळीसांभारें, मड चिमणीं बोंडें, चिंचपान चिंचोळी तोंडें, कोहळा कांशीफळें, कांकडी कुहिरिया, कमळकंद कोंवळि काचरी, दूधभोंपळे, दिव्य दोडके, दाळ दिंड शेवाळ वाळकें, शेंगा सुरण अरुवार परवरें, पडवळी तोंडलीं, कोंडली कंद मूळ फळ फूल पत्र तरु

१. रुक्मिणी, जांबवंती, भामा, सत्या, भद्रा, लक्ष्मणा, कालिंदी आणि मित्रविंदा. २. पांढरें पातळ.

वेलमात्र घृतपाचित शाका, वडे नसति वावडे, सार आवडे, तिखट तिळवडे, सारविजवडे, सहित पापडे कथिक वडे, आणिक कोरवडे, शिऱ्या सगट गट पुऱ्या, बऱ्या गुरवऱ्या, काचोऱ्या सांजोऱ्या, मालत्या बोटवे, शुभ्र देटवे, सायसहित शेवाया, शर्करा पायस लुचया, मांडे पांडुरवर्ण पूर्ण पोळिया, घृतें घोळिल्या द्विजें गीळिल्या, दुरडी भरुनी घिरडीं, भाजुक साजुक, नाजुक राजसवाणे कानवल्यासी मानवले, साखरफेण्या घिवर घारगे, मोतीचूर जिलेबी दळिया, वारिक ओदन, दे अनुमोदन, घमघमाट तो आमोद न राहे, भात केशरी परम कूसरी, दहीं दूध घृत मधु साखर, निंबू घन राब जांबभर, पन्हें फुटाचें, मठ्ठा मिठ्ठा, मटमटा बहु, मधुर लापसी, लोणकडें थिजलें गाईचें तूप, मधुर सुवासिक महा चंगाळ, थोर गंगाळ, वाटीभर एक एक घरींचें, सोळा हजार पदार्थ आले निजभाग्यें भोजनीं अन्न ब्रह्मरसानुभवानें विप्र जेविला, उरलें भानें, सादर नम्र समारंभानें, करिती प्रीतिनें पंचारति, सहस्र नव गंगेरी पानें, विडा अर्पिला अतिसन्मानें, कात रुक्म रंगेरी पानें, चिकणी सुपारी सोनेरी कोने, लवंग सोनेरी सवंग केले वेळा जायफळ सौवर्णिपर्ण चूर्णकृत मौक्तिक भाजुनि चुना अर्कनिभ वर्ख शर्करा संक्षाळित..........हस्तें सेवितांचि कर्क गुरु सम गर्क सुदामा, तर्करहित नृप अलर्क तैसा समाधिशयनीं शयन करुनि इंद्रभुवनपद सुवर्णपट्टण आत्मलक्ष दक्षणा लक्षशत मूर्तिमंत अगोदर देवें त्यासी न कळतां हुंडी करोनि गांवाची गांवा पाठविली. ॥ श्रीकृष्णें० ॥ १४

कदापि धन हरिलागिं न याची, वृत्ति अयाचित सत्य तयाची, निस्पृहता मोहरा रुपयांची, कळली हरीस मुख्य तयाची, एक रात्रि हरिसंगें कंठुनि, कल्पसमय विकल्परहित श्रीकृष्ण चतुर्भुज सगुण ब्रह्म विलोकुनि, चिंतुनि स्नानसंध्या सूत्रमात्र चिन्मात्रपणें करि नित्यतृप्त आश्रित हरीचा, महानिराश्रय श्रुत्यंतैकश्रवणपरायण तो विगतश्रम स्वाश्रमासि चालिला, सुदामा औदासिन्यें स्थिति उदामा देखुनि, मानवला हरिनामा बोळवीत आला द्विजसंगें, कांहीं हरीस कधीं न मागे, हरि धांवे त्या मागें मागें, रमागेह सेवित पद मागें, सर्वांगेंशीं पुढें पुढें हरि वेडा होउनि विप्र गड्याला पायघड्या, उघड्या बहु घाली, चहूं भुजानें लुगड्यानें वरि करित साउली, निभड्या मतिनें विड्या देत, सुख दुःख आपुलें जाहिर करुनियां, बाहिर निघुनि मग आहेरसहित, निज माहेरघरींहुनि लेंकी विहिणी बहिणी बोळवीत पुढील मजलेची करुनि निश्चिंती, ब्रह्ममूर्ति गौरविली. ॥ श्रीकृष्णें० ॥ १५

मार्गीं ब्राह्मण तो अविकार, जाणे विवेक मुख्य प्रकार, जवळी नाहीं एक-पकार, आठवि श्रीहरिचे उपकार, अधन मित्र जरि सधन होइल तरि साधन-रहित मदबंधन पावल, आडवाटेनें धांवल, द्विज मज विसरल, अघ कसें हें सरल, भव कधीं हो तरल, निज हित अंतरल, अतितरल मानस, काम तरळ भरल, अहिगरळ करळ भर कशि उतरल, मन विषयिं चरल, भेदमति संचरल, अनुचित अचरल, ज्ञान कोठुनि जिरल, आयुष्य किति हो पुरल, देह तारुण्य झुरल, बळ समूळ सरल, तैं झुरळ तसा प्राणि जन्मातें फिरल, तेथें अज्ञान शिरल, पुण्य कांहीं न उरल, किमपि न अवरल, मन विषयीं स्थिरल, लोभ अति पसरल, स्थितीहुनि घसरल, उपरम निसरल, अशि हरिला बहु माझी आली करुणा नव नव करुणाघन मोह धरणा हरि आपुलें म्हणवी, त्यासि धन नाहिं देत कांहीं, असेल हित रितें हि हिरोनि नि.................. ले कदा न हरिलें, हरिस्वरूप...................रावया हरि जवळि फिरत जरि असो म्हणों तरि नाहिं दुसरा, आजि सण दसरा, जग हरिमय निखिल सकळ अविकळ हे उपकृति हरिची सादर आठविली. ॥ श्रीकृष्णें० ॥ १६

चाले आत्मसावधानी, मानस हरिच्या अनुसंधानीं, येतां आश्रमसंनिधानीं, देखे सुवर्णराजधानी, गरुडटके नेटके पताका, सोनटके मोटके चित्रिले, चहुं-कडे लखलखाट, कांचन घाट, नद्यांचे पाट वाट, तरि चिंतामणिचे थाट, दाटकला द्रुम, सोपानवापिका, वनें उपवनें, स्वच्छ जीवनें, कल्पलता सफलिता घरोघर दांडे वांसे किलच्या सोनें, खांब उथाळीं मोहट्या सोनें, भिंती आंत बाहेरही सोनें, पाट सज्जा चौकटीस सोनें, बृहत्कपाटामध्यें सोनें, आंगण जोत्यालागुनि सोनें, दिवाणखाना पाहतां सोनें, गजरथहयपडशाळा सोनें, भा-णवसा सोन्याची चूल, उतरंडी मडकीं पाहतां सोनें, हंडे गंगाळेंही सोनें, शौच कराया माती हातीं घेतां सोनें, थवे बटकींचे देवांगना, अंगणांत बाहिरही सोनें, चुंबळ घागर तेंही सोनें, सुवर्णमय दशदिशा पूर्ण आपणासहित जी सिद्धिऋद्धियुत आर्तस्वर हरि अलापित, अजि कार्तस्वररमणीय घरें रत्नांचीं देउनि, स्वस्ति श्रीद्वारकाधीश अमृतेश्वरसंतें श्रीभगवंतें ब्राह्मणास ब्रह्मानंदमय संपत्ति संतति शाश्वत अर्पियली. ॥ श्रीकृष्णें० ॥ १७

---

१. विरक्ति. २. सोनें.

नारदी.

भवभ्रम हा नारदाचा श्रीकृष्णें सर्वहि हरिला. ॥ ध्रुवपद. ॥

ब्रह्मसूत अवधूत पूत जो सूत हरीचा प्रियकर नंदन ब्रह्मसनातन नंदनवनिचा आनंद भोगी वृंदसमाजीं, मुकुंदस्मरणें सदा विचरणें, भवभयवार्ता कधींहि नेणे, समुद्रउदरीं मत्स्य कच्छ ते रमतां देखुनि हृदयसंपुटीं कष्टि जाहला, 'प्रपंच आम्हीं नाहिं पाहिला, जन्मभार हा व्यर्थ वाहिला, द्वारकेंत श्रीकृष्ण विष्णु गोपाल बाल तो कृपाल आहे, सुढाळ मौक्तिकमाळ घाली, शील माल वनमाल शोभती, मयूर पिच्छ ते मुकुटावरती, सहस्र सोळा नूतन नायका अष्ट नायका यदुकुळटिळका कटकाचा पति अटकावचि त्या, काळिसांवळी असो बावळी शक्ति नसो अशक्त असो वा मागुनि हरिसी विषयसुखासी भोगुनि देऊं त्याची त्याला.' ॥ भवभ्रम० ॥ १

म्लानवदन अति अस्वस्थ होवुनि सलज्जमतिनें जवळ जाउनी, 'गृहांत आमच्या नसे कामिनी, चैन पडेना दिवसयामिनी, अग्निहोत्र मज अवश्य घेणें, अनुभवोनियां पुनरपि देणें, अभिलाषाची वृत्ति नेणें,' रमाकांत एकांत पाहुनी, 'कांता तुमच्या समीचीन घरिं कमीचि नसतां' शुद्ध बुद्ध तो मुनिवर वदला विषयसर्प कंदर्प झोंबला, भ्रमला जाणुनि अबला मागे कमलापतिचे करकमलानें कमलोद्भवसुत धरि करकमला कमलनाभ तो प्रसन्न वदला, 'जयीं स्थळीं मी नसेन स्वामी ! तया स्त्रियेशीं निजमुखधामीं हेतू पुरवा, नुरवा कांहीं, बरवा प्रपंच नीट करावा, वाहवा तुमची जनांत होइल मनांत कांहीं विकल्प न धरा, अधरामृत तें पान करावें, अविलंबानें शीघ्र उठावें,' ऐसें पाहुनि त्वरित निघाला, पाहत चालला त्या श्रीहरिला, भामेमंदिरीं कृष्ण निजेला, कालिंदीला घेत कडेला, लक्ष्मणेचा निजकर धरला, जांबुवंतीनें विडा अर्पिला, मयूरभद्रा चुरि चरणाला, मूळ धाडितो त्वरित सुनेला, स्वयें घेउनी कडे मुलांला, मंडप बांधी व्रतबंधाला, ऐसा झाला भरोनि उरला ठायीं ठायीं सर्व व्यापिला. ॥ भवभ्रम० २

लज्जित मुनिवर बहुत होउनी अर्जित हरितें, 'ऊर्जित आमुचें कधीं न करिशी, तुझीच मर्जी, तसें अचरसी,' म्हणउनि मुनि तो करि स्नानासी दिव्यरूप ते रंभा नटली, चीर कंचुकी अंगीं तटली, नाकीं सुपाणी प्रभा फांकली, पुष्ट कुचद्वय उदर त्रिवळी, प्रथम वुडीशीं सगर्भ झाली, साठ पुत्र एकदां प्रसवली, प्रभव विभव पुढें शुक्ल प्रमोदित, ऐसे साठी विऊनि पोटीं धीट नीट

उभि कपिला षष्ठी, या विषयाची न तुळे केवढि गोष्टी कटिं लंगोटी, कठिण काळ मज प्राप्त जाहला, कपटी हरिनें अपटी दिधली, ईश्वरमाया पूर्ण पटली, तुटली ममता छेदि अहंता, अमृतेश्वर दास म्हणोनि पाळि आपुला. ॥ भवभ्रम०

(हिंदुस्थानी कटाव.)

कृष्णलीला.

श्रीबृंदाबनमो यदुराज बिराजत है. ॥ ध्रुवपद. ॥

गीतनृत्यगति, हावभाव किति, धिमिकिधिमिकिधिमि, मृदंग नवघन, घोर गर्ज पखवाज राज सीताज ताजकी, अवाज गहरे, परन होत यत, झननं झननं, झनन झांजरी, इतन मोलकी, ढोलकी गत, घुम घुम घुम घुम, नाद जम रह्यो, तांमो मुरली, तननं तननं, उपज अलोटी, कोयल कंठी, कृष्णकंठसो, लपटलपटके, तानलपटके, निपटमुलायम, तीन ग्राम यकवीस मूर्छना, यकसो येक, अलाफ सवाई, सुखी होत बृखभानजवाई, उप्पर थाट, विमान सुरनर, गुमान अमृतरायनें, अधरांगुलि दे दे थक्कित रहै. ॥ श्रीबृंदाबनमो० ॥ १

द्रौपदीवस्त्रहरण.

महाराज द्रौपदिके काज गरुडारूढ दुडदुड दौरे. ॥ ध्रुवपद० ॥

कपटी काहा करे दै मारे, कपट कर कर फांसे डारे, कपटी कौरव दुर्जन हारे, कपटें पांडव जीते सारे, निपट कपट कर लपट रहत रिपु, अपट अपट रहे चपट न काजे, खटपट निपट करे तन दुर्जन बिपन करत मोहे सिताब भैया दौर करो तो रहत शरम प्रभु बेग पवन रथ तेंजी जोरके पांउपेयोद नही तो आपने दौरे. ॥ महाराज० ॥ १

भैया भगतराज प्रभु प्यारे, भैया बळिभद्रसों प्यारे, भैया शूर बीर हत यारे, ऐसे नर कौरव संहारे, कवन काजपर विलंब कीनी? कबलों अपनो प्राण धरूं मै, मान जाय अपमान आवे गो, लाज गई नाहीं रही सरम कछु, जस जाय अपेस आवें गो देस देस अकीर्ति होयगी, इस कारण प्रभु सीस नमाऊं, राख लाज मै शरण आयकी, सिताब भैया साहेब मेरे भक्तकाजपर बहोरे. ॥ महाराज० ॥ २

पटपट्टन काशीते ल्यावे, पैठण ज्याहलनीं मंगवावे, कौरव छीनत हारी

---

१. त्यांत. २. कोकिळ. ३. वृषभानूचा जामाता. ४. धांवे. ५. घोडा. ६. मस्तक.

आवे, प्रभुजी आपने बेहेनको पेहरावे, जर्द लाल सो सफेद कारे, नील गुलाबी गुलाल चीरे पीतांबर रंग केसरी, जरीकुसंबी गुलेअनारी रंग करारी, नरम रेशमी, बोहोत रभासा, मोल हजारा, अमोल सारी, जडे जोहरे, अंचल सारे सरस किनारे, जैसे तारे, अजब प्यारे, न्यारे न्यारे तापरवारे, लटकत मोती छुटकत पल्लवं झटकत कौरव कलाबतूके, चिकन कसीदा, तार मुनेरी झुने रंगके, अवहि दुशाला दिल्ली लाहुरी, करनाटकके बंदरमछरी तैलंगनके चंदिचंदावर, जुन्नरके कलसपाक, कल्याण कनोरी, ताडपत्र सातारा पुना उज्जन सारी, खंदार दक्खन गौडबंगाला सबमुल्ताना, गांव उदेसी वराड बावन रूप कोंकणी, विलायतसे पटभर ल्याये, उचित नावसे हलक पदरपर खलक जनावर मुलुक मुलुकके, हंस मोर और चकोर तोते, सिंह चित्ते, हरना भैसा, बाघ रीछ और हाती घोरे, गऊ बैल रथ चंद्र सुरज और चित्र बिराजत जगत निरंजन अमृतराव प्रभु देत बेहेनको अपने करसो जोरे. ॥ महाराज० ॥ २

रामचंद्रवर्णन.

राजाधिराज रामचंद्र गावा हो. ॥ ध्रुवपद. ॥

असितसजलघनघटा तशी तनु, पोटावरि त्रिवळि, कटावरुनि पितपटासि लपटुनि कटार खोंचि, करपुटांत शरधनु, बोटांत मुदि, मनगटांत पहुंची, फेटा शिरीं जरिबुटा, अजब बाप भेटावयासि बाह्या कौटाळुनि धरितां, वाटे तयासि राम जवळि असावा, अंकीं सतत बसावा, नित्य नयनि दिसावा, कोठें किमपि न जावा हो. ॥ राजाधिराज० ॥ १

कृष्णवर्णन.

कोन पावे ज्याको पार, सब घट पूरन अपरंपार, निर्गुन निजानंद निःसार, धरि हय निजलीलाअवतार, जब कांसनका कारागार, तब त्रिभुवनसुंदर मोहनमाधव घनश्याम पीतांबरधर, कर शंख चक्र, शिर मुकुट, खचित श्रीवत्स हृदय, गले वैजयंती माल लटकाधर, कौस्तुभविराजित नलिनकंठ, भुज भ्रुकुटि

---

१. काळे. २. हा व याचे पुढील सर्व कटाव अमृतरायकविकृत म्हणून आमचेकडे आले आहेत. परंतु ते त्रुटित असल्यामुळें कविनामविरहित आहेत, तेव्हां ते याच कवीचे किंवा दुसऱ्या कोणाचे हें खात्रीनें कळत नाहीं.

घ्राण हनु, बाल बाल तनु, कानन कुंडल, मंडितमुख श्रीखंडतिलक लघु, अलक कुटिल मृदु, कमलवदन हरि मंद हसित, अतिललित अधर, है मधुर वचन, शशिबदन रदनछब, रदनतनक, हरि मदनजनक, शिवसनकवरद, काटैं कनक बसन, करिं कटक प्रमुख सब अलंकार सह, निरहंकार ओंकार, सुरत साकार सुरत. ॥ १

राधावर्णन.

चक्रपाणि करिं फणी घेउनी, फणीश्वरासम वेणी घाली, भांग दुभांगी, नाग मागतें चंद्रकोर, त्यासमोर केवडा, जडावाच्या हिरेजडित कडीमधें मुरती मोतीं, नसती वांकडी, दिव्य राखडी, तीहि फांकडी, सरळ आंकडी, सनग सनग मग, वरती फुलें सवती, मध्यें मुक्ताग्रथित मूद ती, जाणों करती, मुख धारा प्रति धरा सह या बिंदिबिजवरा, घोंस बाळिका, तोषदायका, कार्मीमानसा, रगडी बुगडी, छाप दरिकव, तापहरण ते काप शोभती, सरळनासिकेमधिं नथ हालती, वरी चौकडी, खालिं झिरमुळीं, मधीं हलकडी, तीच्र लालडी, धौत इंदुची जोत पोत ते, ग्रथित सद्गुणी, आणि तन्मणी, वज्रपाणि वज्रटीक आणि शाखा, गुजराथीच्या ठुशा, क्षुद्र घंटा, कंठामध्यें मोत्यांचा बहु मोठा कंठा. ॥ १

कृष्णध्यान.

स्वस्ति श्रीकमलोद्भवदेव देवेन्द्रादिदेवसमस्तदेव देवोत्तमाखण्डानन्दपरिपूर्णसच्चिदानन्दविग्रह वेदान्तवेद्याद्वय श्रीवैकुण्ठनिवासामृताब्धिशयन सकलदेवमुनिजनप्रार्थनया परिगृहीतश्रीगोपालवेष देवकीतनय वसुदेवकुलतिलक नन्दगोपप्रिय यशोदानन्दन नारदयक्षसनकसनन्दनसनत्कुमारगरुडगन्धर्वसिद्धविद्याधरगानमनोहर गोकुलवासाङ्कुशध्वजवज्रपङ्कजरेखाराञ्जित कुञ्चितपादारविन्द चन्द्रहंसकुमुदखण्डवद्भ्राजमान नखराजित शोभितकाञ्चनमणियुक्तनूपुराङ्कित श्रीमल्लक्ष्मीकरकमलदलमर्दित सुपर्णभुजभूप जालपरिणद्ध कटिसूत्रपरिमण्डितकटितटीसुकोमलवटपत्रतुल्योदर स्तनविदूधर कर्पूरकुङ्कुममिश्रितचन्दनोक्षितश्रीवत्सलाञ्छनमरकतपुष्पपरागेन्दुविभूपितालिकुलास्वादित स्निग्धानुमन्दारकरकरवीरमल्लिकाचम्पकश्रीतुलसीहारभूषण प्रवालयुक्तकौस्तुभकेयूरश्रीधरहात्कक् यज्ञोपवीतोन्नतांस मग्नाभिनवमणिकटकदोर्दण्डभृतप्रवाल हस्तप्रशस्तशुद्धधवलशङ्खचक्रधर सुन्दरमणिमय-

स्तकिं अनघाळे, खोविले कंज काळे, स्तंभन परिमळे, वसंत वरि लोळे, रेखिले रम्य टिळे, कुंडलमणिकिळे, जुळिता काय कुळे, शशांक सूर्य किळे, पाहतां मुख कळे, कामाचें मन भाळे, ते मूर्ति वेळोवेळां स्मरतां पाप जळे, मनाचे मळ क्षाळे, वेदाचें भान गळे, संसारभ्रम टळे, पाहतां भुक [1]बोळे, यापरि कृष्णलिळेसारखें सुख मिळे, केशवां प्राण पळे, हृदय कळवळे, पडति पोटिं पिळे जयासि त्यासि कळे, यापरि आन बाळे, यशोदामाय लोळे, दाटलें प्रेम गळे, भंवते बंधुमेळे, देखुनि बोले, 'आणा आणा वेगिं तान्हा कान्हा पाहिना राहिना राधेसदनीं. ॥ हरिविण० ॥ १

वरीं, न राहे क्षणभरी, धुंडाळि व्रजपोरी, [2]निशिचे अवसरीं, कवाड टणत्कारी, गोपाळ बरोबरी, नेवुनि दधि चोरी, पात्रांत पाणी भरी, निजल्या गोपिनारी, मुखासि लोणि सारी, बिडाळ घालि वरी, टेकण लावि द्वारीं, देहाचा परवारी, वांसरें सोडी सारीं, एकिचे आळंकारी, भांडण परस्परीं, लावुनि पळे दुरी, ऐशिच घरोघरीं, क्रिडला नानापरी. एकदां इंद्र वैरी वर्षति शिळधारी, धरिला बोटिं गिरी. सर्वेचि अघा मारी, मुष्टिक बळा वैरी, केशिया तृणा मारी, नाचला सर्पाशिरीं, धाडिला दिगंतरीं, गोधनें पायिं चारी, विचित्रवेषधारी, मुरली मनोहारी, अवहित अविकारी, तो बाळब्रह्मचारी, म्हणवि व्यभिचारी, जो मुरां माहाकारी, होवुनि अवतारी, चरित्र विश्वा तारी, तो बाई! माझा सांवळा गोवळा, प्राणविसांवा असावा, त्याचा वियोग नसावा दिनरजनी. ॥ हरिविण०॥ २

द्वारीं, वैसुनि खडे मारी, मांगति मज पोरी, घागर शिरिं भारी, त्यावरि जळ भारी, टेवुनि झणत्कारी, त्या गौळणिच्या हारीं, चालति मागुरी, मागुनि पाय धरी, चिमटि चहुं करीं, कंचुकि मुक्तहारी, एकिची काढी शिरी, एकिचि फेडि निरी, न टेवि कांहिं उरीं, दुजिया डोईवरी, मथुरे जातां नारी, वाटेंत पूतनारी, आडवि नानापरी, म्हणे, 'मी अधिकारी, नंदाचें नाव करी, झोंबुनि बलात्कारी, दान दानवारी, दांडुगा मुरामुरी, आणिक बाइ! थोरी, त्याचि तुं अवधारीं, गाईले मुनीश्वरीं, अखंड वेरझारी, नारद नमस्कारी, वाणिति शिवगौरी, राधेसि म्हणे नवरी, राजेश्वराचे गौरी, सांवळा माझा हरी, शोभत सरोवरीं, त्या यमुनेच्या पारीं, हिंडतां पादचारी, घोंगाट परिचारी, विराजे वेणुधारी, कोठें तो सुखकारी, गेला वो! मज सोडोनियां वैरी, मायबहिण मोहनी, काय सांगुं मी आझुनी, सखे साजणी. ॥ हरिविण० ॥ ३

१. भिंव. २. रात्रीचे. ३. मांजर. ४. पाणी. ५. गोवर्धन पर्वत. ६. कालियसर्पाकी. ७. पंक्ति.

मोठा, खणीक दधिघटा, प्राशित घटघटा, म्हणोनि नारिहटा, उलांगतरि हटासि, पेटे गृहवाटा, रोधोनि करिं चाटाइ बहुतचि घोटा, चरोणि मनगटा, नाथ बोले गटाच रम्य देवखटा, धरिले देवगाटा, गिळित गटगटा, हांसोनि जगपोटा, जाणोनि काळभटाच्या मार्गे लावि पाटा, दिकाहि काळरिठा, असुरबळ कटातमारि बळकटा, सतत करि अवघटा, माज कटकटा, सांगति उरगटा गौळणि दुरगटा, बोलति सटसटा, रुरुया दोरकटा, सिलावि वोथिटा, अंगोळ्या दोन्हि गाठा, लाविति चारि बोटांच्या माजित ने फांटा, पडिला मग ईटाइ त्यासी भेटावयासि पूर्ण सांठा पाहिजे पर लाधला साधला हरि हातीं सोडिला, मथुरेसि म्यां धाडिला नये फिरोनी. ॥ हरिविण० ॥ ४

पोटीं, दाविल्या विश्वकोटी, शकट पायिं लोटी, पूतनाप्राण [१]घोटी, द्वारिंचे द्रुम लोटी, काउळा करपुटी, चिरीला नदितटीं, वणवा मुखिं चाटी, धेनुक निजजेठी, मारिला उठाउठी, दुधाची प्रीत मोठी, भरोनि मागे वाटी, बोबड्या बोले गोष्टी, चांगली हनुवटी, मोहनमाळ कंठीं, बांधिली त्रिगुंठी, मिरवे मनगटीं, सुगंध गंधउटी, घेतली बरवंटी, कासिला पितपटी, अगाध बहुवंटी, कनक मनगटी, मुद्रिका व्योमबटी, मोहरि वाहे होटीं, ऐकतां पडे मिठी, तयाची हातवटी, कोणासि नये घाटी, सुवर्ण सूत्र काठी, सुनिळ समघोटी, विराजे करकटी, चालतां पायिं पाटी, सांगाते गोपदाटी, आरत्या रत्नताटीं घेवुनि वधु थाटी, धांवति पाठोपाठीं, कालिंदीवाळवंटीं, होईल कोणा भेटी, सुनिळतनु गोजरी गोमटी, अतिसाजरी धाकुटी, आणा आणा गे! निकटी, बोटिं धरुनी. ॥ हरिविण० ॥ ५

मेला, अक्रुर गोडबोला, कोठुनि येथें आला? नांवाचा घास केला, भोळव अवगळा, साष्टांग सकळांला वंदुनि दिसे भला, ऐकुनि त्याच्या बोला, नंदही वेडावला, उद्धव कवणाला, न कळे सखियाला, नाहिं गे! चोजविला, सजोनि छंदेनाला, 'द्वारांत उभा ठेला, कांहीं उऊलिला, रथांत बसविला, सारथि स्वयें झाला, क्षणांत मथुरे गेला, देखतां कृष्ण नेला, गोविंद गुणाथिला, पुसुनि मज गेला, ते वेळे स्तन प्याला, सप्रेमें आलिंगिला, हृदयिं रेखियला, विसरूं केंवि त्याला, दैवासि लाधियला, कृष्ण दधिकाला, प्रसंगें आठविला, स्वहस्तें जेवविला; वांटिता वोदनाला, दुर्लभ विबुध्याला; स्वानंद प्रगटला, देखुनि दिव्य लिला, न साहे ब्रह्मयाला, घालुनि तेणें घाला, ने वत्स वत्सपाळा,

---

१. प्राशन करी.

कृष्ण जिंकवला, तितुका स्वयें झाला, ब्रह्माहि लाजविला, वेणुहि वाजविला, त्रिभंगि ठाण देहुडा पाउलीं, कान्हु कानडा, वाटेसि पात्रा रोकडा, दाम ठेवूनी. ॥ हरिविण० ॥ ६

पाणी, दावुनि मागे पाणी धरूनि स्वयें फणी, नाचत त्याच लोणी, मेखळा रुणझुणी, चिमणा चक्रपाणी, साजती वाळ्लेणीं, लाजवि दिनमणी, सुंदरिशिरोमणी, सधैर्य रत्नखाणी, पाहतां सुखनी, तयासि दृष्टि कोणी, लाविल बाइ ! झणीं, या लागि तेचिक्षणीं, उतरि निंबलोणी, वोवाळी चक्रपाणी, घरांत वेगीं आणी, गोवळा गोपांगणी, खेळत गुणागुणी, मंजुळ गाय गाणीं, बोबडी बोले वाणी, सांवळा स्वयें गुणी, घेवुनि लघुफणी, राधेची घाली वेणी, वृषभ धनुवानी, दोहिला बाळपणीं, भरली सांजवणी, विस्मित गवळणी, त्याहुनि शतगुणी, कौतुक सांगातिनी, पाहिले निजांगणीं, तो देव चूडामणी, दाखवा अज कोणी, करित विनवणी, सेवित पाय दोन्ही, यापरि नंदराणी, चिन्मय गुणागुणी, तो बाई ! माझा सांवळा गोवळा प्राणविसांवा असावा, त्याचा वियोग नसावा दिनरजनीं. ॥ हरिविण० ॥ ७

चंद्रावळी.

चंद्रावळिनिमित्त हरिनें रुप धरिलें त्या राईचें. ॥ ध्रुवपद. ॥

चारुदंत मृगनयन अप्सरा, सभोवतां सखियांचा घेरा, हे खुण कळली कृष्णप्रभूला, वृंदावनिं मग खेळ मांडिला, मुरलीरव मंजूळ उठविला, गाई गोप किति तांडव लीला करुनि विसरती देहभानाला, चकित गोपि पुसे चंद्रावळिला, 'दान घेतसे हरी वाटतें, सांभाळुनि तुम्हि सकळिक चाला,' तो पैंध्यानें तुंग पाहिला, चंद्रावळिचा थवा देखिला, पाहुनि तीच्या स्वरुपा भुलला, सांगतसे हारिलागुनियां तो, म्हणे, 'मार्गि चंद्रावळि येते, तुम्ही बहुदिन श्रमची करितां, परी नये कामिनि हे हाता, सहज निघाली मथुरागानीं, दधीदुग्ध विकायालागुनी,' बोले तेव्हां सारंगपाणी, 'तुम्हि रोधावा मार्ग जावुनी, दान मागणें सीम

---

१. कटिभूषण. २. लहान. ३. दृष्टीचा अथवा पिशाचबाधेचा विकार न व्हावा म्हणून मीठ मोहऱ्या व निंबाचीं पानें हीं लहान मुलावरून ओवाळून टाकणें यास 'निंबलोण उतरणें' असें म्हणतात. हा एकप्रकारचा तोडगा आहे. ४. राधेचा वहाण. ५. मथुरेच्या उत्तरेस सहा मैलांवर यमुनेच्या तीरीं वृंदावन म्हणून गांव आहे. हें पूर्वी वन होतें असें वर्णन भागवत स्कंध १० अध्याय १२ यांत आहे.

करोनी, मीही येतों मग त्या स्थानीं,' ऐकुनी बोधा, धांवुनि मार्ग करीतसे पंथा, म्हणे, 'न जावें सकळा प्रमदा, दान देवुनी स्वकार्य साधा.' सख्या बोलती, 'मार्गी कां हे, येकट आम्ही, दान देवुं तुजला गृहिं आणुनी.' हेहि न माने तयाचे वचनीं, पदरीं धरिल्या सकळ गौळणी, तंव माधव प्रगटे त्या स्थानीं, अंगसंग इच्छिती साजनी, या कुच मर्दित पंकजपानी, परि त्यातें चंद्रावळि न मनी, अधोमुखि पतिव्रता लाजुनी, दूर राहिली उभी जावुनी, हरि करिं धरि परि तीहि न मानी, दधिघट फुटला पृथ्वी पडुनी, तेव्हां काय बोलत वदनीं, कर्म करी चोरीचें. ॥ चंद्रावळि० ॥ १

द्रौपदीवस्त्रहरण.

या पांडवांचा श्रीकृष्ण दास जाहला. ॥ ध्रुवपद. ॥

स्त्रियामंडळीं मग पांचाळी, 'त्राहे त्राहे गा! वनमाळी! काय विधात्या! लिहिलें निढळीं, दुःशासन हा कली मातला, पाहुन मजला केश आकळी, बळी हे पांडव झाले निर्बळी, सुकेश कुरली ज्यानुक बाळी, वोढुनि पाडी, धरि करकमळीं, गलित झालें मी ये काळीं, शेळी पाहुनि व्याघ्र रौंदळी, बैस्तरुपें ही सर्व मंडळी, मुखकमळींचा शब्द निघेना, कृष्ण विष्णु गोपालजीवना, गोपीवल्लभ गरुडवहना, भक्तकाज प्रल्हादरक्षका, सुदाममित्रा परमपवित्रा, सूत्राधारी, जगचालका, नंदबाळका कालियमर्दन, कालिंदीतटीं विहारकरणा, गुंजाभरणा, कमलाक्षा कमलोद्भवपीता, कमलाकांता, किल्मिषहरणा, राधावल्लभ भक्तवत्सला, कूळदीप तूं यदुवंशाला, मत्स्य कच्छ वाराहावेषा, नरहरि वामन फरशधरा तूं, राम कृष्ण तूं बौद्ध कलंकी, अनंतरूपा, अनंतशायी अनंतगुणी ब्रह्मांडनायका, कपटरूपें पूतनाशोषका, पयदधिनवनितकवळभक्षका, कागरुपें चांडाळखळानें, कुशब्दबाणें करितो जाचनी, जननि ग! माझी कृष्ण माउली, या समयासी दूर राहिली, असुति तरी मज करिति साउली, धांव धांव हरि! लाज चालिली.' वचन ऐकुनी लगबग उठला, ताट झुगारुनि ग्रास टाकिला, सत्वर भगिनीपाठिं राहिला. ॥ या पांडवांचा० ॥ १

दुःशासन निरि वढी तांतडी, चिरडी तांबडी आणि चौकडी, घडी पाहतां घडी रुंदली, चंद्रकळा मग सुसिला अंकीं, राधावळना, मावळ पोकळ, रंग

१. रक्षण कर. २. माजला. ३. रंवदळी, चवताळून हातपाय हापटीत येई. ४. बकरा. ५. पाप.

मुरंगी दुरंग दिसती, मग नारायणपेठ निघाली, सफेद बारिक उंच गुलाली, मुगे हिरवे, वरुनि जांभळी, गुलमट कलसे, घटमुठ दिसती, हुमनाबादी, निपटनिरुंदी, कलबुर्गा, हलबुर्ग लुगडे, सोळा हाती, रुंद धडोती, तऱ्हेतऱ्हेचे, नवलपरीचे, जरिकांठाचे, नवखंडाचे, जरीवादली बूटछिटाचे, किती नांव हे घेऊं पटाचे, पैठण शेजे उंच किमतिचे, पुणे देशी, अंजिरीतऱ्हेचे, तऱ्हा फुटानें, उडीद दाणे, खमखमित कपिला, अक्कलकोट सोलापुर उदगिर बारिकायेली त्या घनवेली, तुळजापुर वैराग बारसी बनारसीचे भडक झळकले, जालनापुर वैजापुर यवले लखलखीत हे दिंड निघाले, महेश्वर धनवाड, आणिक गज रायचूर हे, मोतिचूरचे, नागपटीचे, धटी गहनगोमटी निघाली, माव अष्टिचे कटी वेष्टिले, मुठित माय भरजरी मिलारी, जरीकिनारी, भरतारी मग, शालु पाहुनि, अरी म्हणतसे वरींच टेवा, मवाज करणे, करनाटक बुंदेलखंड हा गौडबंगाला, वसन फेडितां हस्त गळाला, चंदाचंदी ओर कलंदर, बंदर सुटले, मुंदर हस्तें चित्रविचित्रें, सुवर्णवर्णी, केतकपर्णी, पीतपट्टकुळ काशीचा, रंग पाहातां अस्मानीचा, मुगा तपमिला, सर्वे सोडिला, श्रीनगरचे, नगरसगरचे, नागपूर भरपूर धडीचे, ताडपत्रि मग विणून सूत्री, पाहुनि नेत्रीं, म्हणती वक्त्री, साधु वणिती माय सुपुत्री, पुतनारीनें फार वेष्टिलें, फरमासीनें वकिल धाडिला, ऐकुनि साहती त्या भगिनीला, पीतांबर खंबाइत जैसा अंबा नेशी सांबाजवळी, बिंबाधरि जगदंब शोभली, शेट होवुनी पेठ आणिली, द्रुपदसुतेची लाज रक्षिली, पतीव्रता ही मनीं क्षोभली, भीष्म बोलिला तंव अंधासी, 'तूं श्रमलासी, तुझिया पुत्रें वंश खंडिला.' ॥ या पांडवांचा० ॥२

दुर्वासयात्रा.

श्रीकृष्ण कृष्णेलागीं अतिसंकटसमयीं पावे. ॥ ध्रुवपद. ॥

दुर्योधन दुर्वासऋषीला, प्रार्थुनि म्हणतो, 'जाय निशीला, अन्नें नेदी द्रौपदि शीला, तुम्हीं पाहिजे धर्म दूपिला,' ऐसें उत्तर ऐकुनि कानीं, ऋषी सर्वही सर्वे घेवुनी, आला पांडववस्तीस्थानीं, दीर्घस्वरानें हाक मारुनी, तंव ते धर्मभीमार्जुन येवुनी, माद्रितनयसह पाय नमोनी, स्तविते झाले ते मृदुवचनीं, 'धन्य धन्य हे आजीच रजनी.' म्हणे तयांतें दुर्वासमुनी, 'पूजन स्तवन नको मजलागुनि, इच्छा एकचि भोजनपानीं.' ऐकुनि उत्तर, द्रौपदिमुख पाहात युधिष्ठिर,

हरि करुणाकर असतां श्रीवर अंतर्यामीं, 'स्नानें स्वामी! करोनि यावें' बोले 'धामीं.' तंव ते सर्व ऋषीश्वर गेले, पांडव ते स्थळिं स्तब्धचि ठेले, धर्मराज बंधुप्रति बोले, 'कैसें संकट आजि उदेलें?' तंव ते द्रौपदि वृंदावनीं[1] जावुनि वृंदापति[2] वृंदारकजनवृंदवंद्य[3] जो वृंदानायक[4], वृंदावनीं ज्या वास निरंतर, प्रार्थिति सुंदर, दनुजभयंकर[5], रूप मनोहर, नामचि मुरहर, तेंचि ब्रह्म निर्गुण निरामय, निर्विकल्प निःसंग निरन्वय, निर्भय चिन्मय, व्यक्ताव्यक्तचि येवुनि राहे, त्याप्रति वाहे, 'धांव धांव बा! तूं श्रीरंगा! अद्वयरंगा! भवभयभंगा! तुं निःसंगा! तव पदिं गंगा[6] उद्भवली तापत्रयभंगा[7], पवित्र चांगा, धांव उणिव जों नपवे आंगा, ऋषी सर्वही करिती दंगा, ये अव्यंगा! श्रीकर तूं, मुनिमानसभृंगा! तुज न म्हणों लघु अथवा तुंगा[8], संगातीत तुं अनंगताता! लाभसि संता, हरिसि अहंता, योगी सेविति तुज एकांता, योगी तन्मय सांडुनि कांता, स्वरूप शांता, दाता त्रिभुवनीं लक्ष्मिकांता! युगायुगीं अवतारचरित्रें, परमपवित्रें, चालुनि ऐशीं लीलामात्रें, मत्स्य, कूर्म, वाराह, नृसिंहा! वामन, भार्गवरामा! धैर्या, कैटभकदना! तूं रघुवर्या! षड्रिपुनाशन महाशौर्या! उत्पत्तिस्थितिसंहारकार्या! साक्षी तूं, या पर्यायें पाहतां निजनिपुणा, एकवेळ दावि तूं आपणा, करिं कीं करुणा, कैवारी तूं पांडवप्राणा.' ऐशी स्तुति ऐकुनि श्रीहरी, भोजन सांडुनि लवलाहेशीं, खग[9] पाचारी, नयेचि सत्वर, तांतड झाली लगबग मोठी, तो जगजेठी[10], आला धांवुनि द्रौपदिसाठीं. कृष्णा पाहुनि आनंद पोटीं, तें मुख सहसा न वदे होटीं, जिवाशिवाशीं पडली गांठी. बाहुनि बोलत, 'कां हो भगिनी! धांवा केला, सांगा [11]वहिला?' द्रौपदि म्हणे, 'ऋषि स्नाना गेला, साठीसहस्र खंड्या त्याला अन्न पाहिजे त्या अशनाला, याविरहीत समग्रऋषींला, यास्तव तुज मी प्रार्थि अजाला. धर्मराज तो विस्मित झाला, कांहीं विवेक न सुचे त्याला.' वचन ऐकुनी श्रीहरि बोले, 'माझे आधीं प्राण भुकेले; कृष्णे! जेऊं घालीं वहिलें.' तंव ते बोले, 'सत्व घेतलें, सर्वसाक्षि असतां कां छळसी? थाळि[12] पालथी घातलि पाहीं, अन्नचि नाहीं, मागसि काई?' कृष्ण म्हणे, 'तूं पहाहो बाई!' तंव ते पाहे स्थालीमाजी

---

१. यमुनातटस्थ वृंदेचें विहारवन. २. शिवाच्या कोपाग्नीनें समुद्रांत उत्पन्न झालेल्या जालंधराची स्त्री वृंदा. तिच्याशीं विष्णूनें जालंधररूपानें गमन केलें म्हणून त्याला 'वृंदापति' म्हटलें आहे. ३. देवसमुदायपूज्य. ४. वृंदावनाचा स्वामी. ५. दैत्यभयप्रद. ६. विष्णुपदी. ७. आधिभौतिक, आधिदैविक, आणि आध्यात्मिक अशा तीन तापांचा नाश करणारी. ८. उंच, मोठा. ९. गरुड. १०. जगांत बळानें मोठा. (कृष्ण.) ११. सत्वर. १२. सूर्यानें दिलेली स्थाली (पात्र).

स्वल्पचि भाजी. कृष्ण म्हणे, 'मी बहुतचि राजी.' करीं घेवुनी मुखीं घालितां, त्रिभुवन धालें, भावभक्तिसंतुष्ट अंतरीं, मम भजकाला हें पावें. ॥ श्रीकृष्ण० ॥ १

ऋषिराजे कोटिकोटि बहु भोजन करिती, सुवर्णताटीं अन्न मागतां, अमृतासाठीं न देऊं म्हणती, अन्न पालटी सर्वत्रांला वांटीं. ॥ श्रीकृष्ण० ॥ २

पारिजातकाख्यान.

भगवंत भक्तजनाचें निजनामें संकट निरसी. ॥ ध्रुवपद. ॥

श्रीपति असतां द्वारकेसी, नारदमुनि गमला अनयासि, पारिजातक सुमनासी, नेवुनि दिधलें भीमकीसी, स्वर्गकुसुम ते कोमलकांती, येकांनीं ते हातीं देतां, सावकास मग वास घेतसे, सुवास नगरी गर्क होत जन, तर्क करिति मनिं अर्थ निरखुनि, ऐसें सत्य ते भामेसी, कळतां विलाप करि ती कैसी, 'मातें देईल तो काशासी ?' तडतड तोडित मनगट मनगट, हार गळ्यांतिल ख्याल करित, महि भाळ अदोळित, गाल धरुनि करि लाल, कपट हरिनाल तोचि जाण गोपाळ गुराखी, ढाळ मारितो सुमनें देवुनि भोगित हय सुखरासी. ॥ भगवंत० ॥ १

मंज्जन करितां अंबिर अगंजा, स्नेह सुगंधित जिवन आणुनी, यथाविधीनें नाहणायिनी निम, केस कुरळ ते विंचरवित हरि, पांडुरंग भवभंग करितसे, अंग पुष्पित जन दंग होतसे, हेमवसन करि परिधानासी, मुक्तजडित ते कांचोळीसी, अंजन रेखी द्वयनयनासी, तेव्हां भामा फार मानसीं, जाहली असें भ्रांती हर्षी, 'फूल काय तें वृक्षराज तुज, देइन निश्चय,' आण वाहत मग, ऐसे बोलत मग केशिकेशी. ॥ भगवंत० ॥ २

पत्र केतकी राखडि मुद अगि, नागबंद मिन कांसव कुहरे मोर बोर सुक ताइत भोकर, रायआवळें बदाम बारव, पंचविडी आणि नंदी तो घड करवंदांचे बाळ्या घालित आरळाच्या, कासव मासे वेलाच्या, फुगे निळ नवरत्नाच्या, नागोत्तरदेंदाण्य कुंडलें, काप सांखळी टीक गळसरी, बाव्याहत सर जवें कंकणें अंगमुद्रिका जोडव्यादि नग स्थानोस्थानीं लेववोनि मग केशरहळदी, गुलाल अगजा नानापरिमळद्रव्यें सुगंधी, थाट करूनियां सभेमधीं बैसविती तेव्हां वृंद सुरांचे जाणविती दुत,'भौमासुर बहु त्रास देतसे,' ऐसें ऐकुनियां जगदीशें, भामेसह

---

१. पुष्प. २. भीमकाची कन्या रुक्मिणी. ३. स्नान. ४. सुवर्णवस्त्र. ५. कृष्ण.

हरि जावुनि झडकरि, वधुनि असुर द्रुम यादव गिरिधर आणुनि लावित भामेच्या सदनासी. ॥ भगवंत० ॥ ३

जीवदशावर्णन.

सज्जन हो! निजगुज आपुलें उमजाना । हरिलागिं भजाना. ॥ ध्रुवपद. ॥

नऊ मास गर्भात सांपडे, मूत्रमलादिक फार सांकडें, तनूसि तोडिति जंतूकीडे, बहुश्रमानें बाहेर पडे, स्मरण मुळींचें सर्व विसरला, कोऽहं कोऽहं रडूं लागला, दिवसांमासां वृद्धि पावला, क्षणक्षणा अपघात चूकला, धनमदगर्वें फार दाटला, अहंपणाचा पूर लोटला, पांचांविषयांमाजि बाटला, पापाचरणें मनीं काटला, भला थाटला, संसार अपार, थोर करितो कारभार, महाल मुलुख जहागीर इजारा, कमाविसदारी, भारि पसारा, सावकारी, हत्तीघोडे, सैन्यशीबिका, बा पोषाख कानिं चौकडा, सुंदर वनिता प्रिया नवोढा, शहाणपणाचा गर्व गाढा, मनसोब्याचा करी निवाडा, वाडा रंगित, रंगमहाल, सोनेरी बैठका जरीभर्जरी, तमाम ऐने, काममुलायम, फिरंगाणी, व्हिलोरी फानसें, मिनेगारि किनखापी पडदे, खणोखणीं रेशमी गालिचे, बागबगीचे, रागरंगामधिं गुंग बेटा, निसंग मोठा, अभिमानाचा चढला ताठा, जार चोरटा, उन्मत्त खोटा, धर्माविषयीं फार करंटा, त्याच्या बंधुंनिं धरल्या वाटा, अग्नी तस्कर करिति चपेटा, आटापीटा, राजदंड ऊदंड उदेलें, भंड निघाले, लंडपणें प्रपंच भोगिलें, परोपरीची, छीथू अवघी, मारामारी, जेरबंद कडाकड सोटे मारी, कमचा पाठीं उडती भारी, याया परिचे जाच शरीरीं, हृदयिं मस्तकीं शिळा भारी, वोढवितां जड खोडाबेडी, पायिं रोकडी, प्राप्त देहुडी, तरी येइना-कबूल कवडी, अधिकारी घरदार सांवडी, सर्वहि नेलीं घोडीं पीडीं, उरली नाहीं एकहि कवडी, पहिली होती विनी वांकडी, शालजोडिला शेला जोडी, देव द्विज गुरु तडीतापडी, त्यांसि क्रोधें फार झडाडी, ईश्वर त्याची मस्ती मोडी, आतां कैंची उप्परमाडी? देशधडीवर गुढी लागली, दुष्कर्माचीं अभ्रें दाटलीं, पहा पहा रे! डोळे उघडुनि, पुढें यातना यमलोकींच्या, नानापरिच्या, जाणुनि येथेंचि कां सावध व्हाना? ॥ हरिलागिं० ॥ १

---

१. वृक्ष. (पारिजातक.) २. संकट. ३. मी कोण?. ४. नूतन विवाह झालेली.

उपदेश.

नरतनु हे दुर्लभ वेड्या ! कां करिसी हिताला वाणी ? ॥ ध्रुवपद. ॥

जरा, न भवभय जरा धरिसि करिं भरा धृष्ट मनिं चिरायु मति तरतरावया हरिहरापरिस पामरा! अधिक तूं न राम भजसिल, जिरावया न च विराम किति तरी घरामधिच बावरा मिरविसिल चिरा, शिरावर तुरा, अंगठिवर हिरा, चौकडा सिरा, पदक मनिं उरासि चंदनचुरा अगरुच्या धुरा घेसि, कापुरासहित भव बरा म्हणसि, साजिरा दिससि, निजपराक्रमें मंदिरासि बांधी धरातळावर सुरारिपतिसम तुरा, होवुनि अपपरा न जाणसि, परा धनिक वयभरांत डोलसि खरा, स्तवन मज बरा म्हणसि, वधुवरापरिस परि खरात्र देसिल, खरा शब्द मनिं धरा सुयमकिंकरा म्हणसि, काय धिरा कुटुन मग थिराविशिल ? वागुरा पसरल्या फिराविल न कुणि, जरापन्न पिंजरा हाडांचा हरावया मनमुराद धन खरुखरा उतरतिल जरा वज्रारा चुरा न परि तुज उरावयाचा बुरा लोक वाजिरा लबाडी, दुराविशिल रघुविरासि भवभयहरासी, मग तूं अडसि दडसि बहु रडसि पडसि. मग कोण तुला निर्वाणीं ? ॥ नरतनु० ॥ १

हरिनामवर्णन.

हीं नामें हरिचीं जपतां, भवसागर प्राणी तरती. ॥ ध्रुवपद. ॥

श्रीधर सच्चिद्घन सुखकारी, यादव यमुनातीरविहारी, गोकुळपती गोवर्धनधारी, माधव मथुरानाथ मुरारी, पांडुरंग जगदंतरंग नवमेघरंग सारंगनयन[1] श्रीरंग नित्यनिःसंग संग अभंग सकल गुरुलिंग संगहर शांत दांत श्रीकांत वरद वेदांतमार्गसिद्धांत प्रांतद्वैतांतकर्ण सर्वांतरगत निभ्रांत सुमन एकांत संतहृद्यंत सूर्य सुरवर्य ऐश्वर्यवंत गांभीर्य सगुणआचार्यधैर्यगुणशौर्यसिंधु शुभवीर्य सुभग भगवंत, मनन श्रीमंत अखिल आद्यंतरहित स्वानंदनंद आनंदकंद गोविंद दीनजनबंधु वंद्य स्वच्छंद नंदसुत इंदिरेश निर्द्वंद्व सुजनहृदयारविंदनिजामिलिंद माधव सुंदरहास्य नवकुंदरदन गुणवृंदवृंद अज मंदराद्रिधर इंद्रचंद्रनत सत्यसंध भवबंधमुक्त मुचकुंदस्तुत सच्चिदानंद मुनिमुकुंद केशवबंदावंद्य भवचैद्यवैद्य अनवद्यसिद्धपती विष्णुजिष्णु भ्राजिष्णुवर महाजिष्णु समरसहिष्णु विठ्ठल पुंडलीकवरदायी. ॥ हीं नामें० ॥ १

---

१. मृगलोचन.

चिद्धन चिदानंद चिन्मूर्ती, चिन्मय चिदाभास चिद्वृत्ति, चित्सुख चिद्विलास चिज्ज्योति, चित्पद चित्समुद्र चिद्व्यक्ति, पूर्णानंद परात्परपावन पद्मावरपर पांडवपालन, पापविनाशन, परमानंद पवित्र परावर, पद्मतनय परि चित्तपरिक्षक, पतगीश्वरपति पक्षीशब्दज पशुपांगज पयपानपरायण, पार्थीयाशन पावकप्राशन, पुरुषोत्तम पटसिंधुनिकेतन, पतितोद्धर, प्रऱ्हादवरप्रद, प्रणतपाल गोपाल पीतपट, पद्मनाभ पद्माभ परमपद, परंज्योति प्रणतार्तिप्रणाशन, पद्मगर्भपद्मेश कृपाघन, परमहस्त प्रख्यात प्रतिष्ठित, पुण्यकीर्ति, पुरुहूतप्रभंजन, प्राज्ञपूज्य परमार्थप्रबोधक, पार्वतीशप्राणमित्र परदैवत, पक्वपुरेश, पुरंदरपर्वतारिपदपूजित पन्नगपीठशयन, प्रणवार्थ पार्थसख परंधाम पाथोधिमथन, प्रद्युम्न पुराणप्रसिद्ध, प्रबुद्ध प्रगल्भ प्रजेश, प्रजापतिपूर्वज, प्रेमसाध्य, प्रभुपाद्य, प्रडुडप्रभु परब्रह्म, परमात्मा. ॥ हीं नामें० ॥ २

युद्धवर्णन.

उभयदळींचे वीर मिळाले, हीरखचितकोटीरशीर, यत्तीर झळझळित्ती-रदार जंजीरपाणि गंभीर कितिक हंबीर जातिचे, शीरपाणिसम धीरपराक्रम, परस्परातें नीरधरावरि समीर जैसे, भीरहीत, ज्या स्वप्राणांची फिकीर हि नसे, युद्धश्रवणें परमोत्साहें टिरी बडवुनी उशिर न करिती, कंठीरव[1] ते घोर गर्जती, सिंग तुतारे महा नगारे धिम् धिम् धिम् धिम्, साहेबनौबत तुडुम् तुडुम् तुम् तुडुम् झडे, आणि घडिये बाजी तासे मर्फे कर्णे हलग्या घोर घोर रणढोलरवें ब्रह्मांडभांड हें गाजविलें, बहु वाद्य वाजवुनि चंगसदृश नवभृंगसंगसंगीतदंग मातंग[3] धावती, अंगरंगदुग्धांबुराशि जे संगरांत चतुरंगतुरंगम पारदचल संचार कनक शिंगार भर्जरी च्यार जमेवरि शिलेदार किति बारगीर ते स्वार महा झुंजार थोर सरदार बिरुद संभार वाहती, धारराव स्वागारदार संसारमोह सांडुनी फार निर्धार करुनि जे स्वप्राणावरि उदार झाले, भालेवाले तीक्ष्णधार तलवार चमकवुनि मार मारती, वार करुनि अरपार शत्रुला ठार मारिती, फार गारदी वार धडकती, अर्भकसे भट गर्भगलित व्हावे तर्बेजही अर्भ असे संदर्भ शुद्ध सरबत्ति करिति, किति चक्रविक्रमण विक्रमशाली शक्रसमक्रम तक्र जसें तैलंग विप्र पिति मद्य पिटनियां धुंदीमध्यें कादिति कुंदी, युद्धीं परम महोत्सव सिंदी, तुंदिल हे श्रीब्रह्मवृंद बुंदीवरि जैसें विधुस्वच्छता तुच्छ कर्णता पुच्छगुच्छसम पुच्छ विराजित अच्छच्छवि अच्छिद्र विविध रुक्छत्रच्छा-

---

१. मेष. २. सिंह. ३. हत्ती.

दित मोरपिच्छ पिच्छलप्रांत आणि मच्छ कच्छ मकरादी लांछन ध्वजे शोभती, निपुण सारथी रथी रथीश्वर हाण हाण हण म्हणुनि मारिती, सणणणणणणण बाण त्यांपुढें कोण जाणती धैर्य धराया, गरडमल्ल शरवीरनल्लज प्राणवल्लभा हल्ल पावल्या फुल्ल गल्ल गत पल्लवरचना भृंगपुरःसर हाहाकारें ऊर बडविनां हार-हि तुटले नेत्रगलित जीवाच्या जाणों साक्षात् नीरधी वाहे. तें युद्ध वर्णावया वाग्देवी स्वस्थ राहे, तेथें मग इतर कवीची प्रतिभा ती काय आहे ? ॥ १

अलंकारवर्णन.

मग ते सुंदरि नेसुनि भरजरि साडि अंजिरी, चोळीवरता शेला घेवुनि, दर्पण पाहुनि युग्मलोचनीं अंजन भरुनी, इंदुमुखी मग कुंकुम रेखी, मृगमद[1] माखी, बिं-द्या बिजवर घालि मस्तकीं, चंद्रकोर वरि, राखडि सुंदर मूद बोरही केतक ना-गर अहिपरि वेणी बरव्या श्रेणी घालि नगांच्या, कर्णि मिन्याच्या बाळ्या साच्या माणीकांच्या बहु घोंसाच्या ताटंकें वरि काप शोभती, कंठीं सिरवे मुक्तमाळ ती, पेट्या पाटी नाना जाती माळा विलसति सुमनाच्या करिं सुद्या हिऱ्यांच्या कंगण्या पोंच्या. ॥ १

१. कस्तुरी.

अमृतरायकृत कटावांचें परिशिष्ट.[1]

(पृष्ठ २ ओळ ८)

अहो अहो सुजन हो! विहित स्वहित कांहिं कराल, किति तरि हमाल परि घरिं श्रमाल, विषयीं रमाल, आळसें गमाल, एकवेळ हिमालयाचि लेक उमा लखलखित कुमार गणपति कुमार जननी नमाल, तरि हरितमालघनतनु रमालसितपद क्रमाल, चिन्मययमालयरहित ममाहमिति किति दमाल मत्सर वमाल, अंतीं शमाल, स्वसुखक्षमा लहुनि वरि अमानित्व गुण न मानुनी जगिं समानतेनें असाल, बरवे दिसाल, ब्रह्मीं वसाल, चिद्रस ग्रसाल, लोकीं सदयहृदय सुखि उदय उदय जै जै जगदंब सांब, अद्वैतअमृतरसवृष्टि पुष्टि ते पुराणमुनि श्रीव्यासभारतीग्रथितउपनिषद्ग्रथितरणपथी विजयनररथी कृष्णसारथी, प्रथितभगवती कथित अर्जुनाप्रति भगवद्गिता, तेचि रामाची सीता. ॥ जगदंबा० ॥ १

जननी खेळविताहे मुलास, वेंचुनि देते फुलास, पोंवळियाच्या वेलास, पाहुनि करि विलास, शिवलिंगीं वाहे बेलास, कुरवाळि नंदिबैलास, शोभविताहे कैलास, चामिकरचैलास, खांदि बाहे बाहे, पसरुनि पाहे, साहे, भक्तालागिं मंगळ माहेश्वरि आहे, चिंत्ति राहे त्यासि लाहे, ध्यान कोमलकमल, दिव्यमाणिकाचि किळ, तेवि सुविमळपदतळ, सितळ उतळ देवि पातळ, नेसुनि व्योम कुंतळ, मंडित सह भुतळ, रचुनि त्यासि नातळत, ज्योतिरूप सत्य नित्य शुद्ध बुद्ध जेथें ते वेद गाति गाणिं, ब्रह्मदेवाचि ब्रह्माणि, कोठें इंद्राचि इंद्राणि, कोठें रुद्राचि रुद्राणि, कोठे शर्वाचि शर्वाणि, कोठें लक्ष्मी नारायणी, कलिमलगलितशमलभयविदलित, अचलित अतुलित, लवली धवली अमृतफळफळित, परशिव कवळित, सुललित देवि ललिता जगदंबा० ॥ २

भ्रुगुटिं लोपति रविकोटि—वेणिकाजुटिल—नितिलसिलपरी—तिलकसितचंद्र देखत तळवटीं—शोभत मणगटीं, केसरिवरि उटी भक्तमन लुटी, प्रगटि ज्ञान लुटी जियेचि हातवटी, ते हिमगिरिवेटी—शंभुसह नुवटी बसले—घंटि विमानदाटी—वरदकरकुटी, वदोनि भातरोटी सुवर्णाच्या[2] ताटीं, जेववि शशिवोटी आत्मरुप पाटी—॥ जगदंबा० ॥ ३

अखंड परशिवनिडांत—॥ जगदंबा० ॥ ४

---

१. या परिशिष्टांत पूर्वी छापून गेलेल्या शिवाय मागाहून मिळालेले कटिबंध येतील. आणखी पूर्वी छापलेल्यांचीही जास्ती मिळालेलीं कडवीं व शोध येतील. २. सुवर्णपर्वतास (मेरुपर्वताला.)

सहज रजतनग नभीं—अंतरिं आत्मलोभी—काष्ठ जेंवि स्तंभीं—गणांत दुंदुभी, लादिलिं वस्त्रें, सजविले करभकरभी, शिकारखाना वाद्य चित्य शरभशरभी—अंबेनें बळें रणांत—कुंभी, वरि तयांत गंभीरमाय सर्वारंभी—कोतवालनंदीवर बसते आनंदी, तेथें शूळपाणी आसन मांडी, तळितलाये स्वामिकार्तिकाच्या झुंडीसहित चाले चंडी, हाटक हस्तिदंडी—उच्चारिति तुंडीं, मिरवलि काशिखंडी, लिलावृत्तखंडी, उघड ज्ञानदृष्टिनें, वारे तमयोगयुक्तिनें ति मुष्टिनें वाटित खंडि खंडी, ऐसी अंबा जीवन्मुक्त अन्नपूर्णा, जेववि सर्वा वर्णा, शैर्माविते अपर्णा, भर्गाचें भाग्य वर्णा, अक्षय क्षेम कल्याण पांघरवितें उर्णा, कर्णद्वारिं नौबद वाजते आकर्णा, अमरगण—॥ जगदंबा० ॥ ९

(पृष्ठ २९ ओळ २१)

कृष्णवर्णन.

गोविंद गाणें गाईच्या गोठणीं गातो. ॥ ध्रुवपद. ॥

रेखकुलिशअंकुशासहित, यवनिशाण चरणीं, कुशांत फिरतो, विशाळनयनी, निशारमणसम खुशाल वदनीं, दशा तरुण वय, वशांत पिकरव, दिशा उजळती, तशाच व्रजवधु, सर्वे बहुतशा, पिशा गळितशा, सकाम विवशा, तशांत हरि, आरशांत प्रतिसम, वसोनि विशोकविग्रह अशोकतरुतळिं, किशोरयशोमती, आशाहि मतिमुततो. ॥ गोविंद० ॥ १

नंद पशुपति वंश, गोपिरददंश, अधरिधृतवंश, नाळलसदंश, हंसगत हंसवाह अवतंस, कंसविध्वंस धेनुपदपांसुसहित तनु हंस पुरवितो, ध्वंस भवाचे लीकरिं परि हरि तो. ॥ गोविंद० ॥ २

मोरमुगुटवनमाला वस्त्रें ल्याला, निजव्रजबाळावेष्टितगोपाळासह करि दधिकाला, निर्विकल्प परम देत मुखाला, शिवसनकाला लाभतांचि मनिं उत्सव झाला, सुरादिकांला हर्ष मनाला, पाहतां श्रीनंदनंदनाला, आत्मसुखाचा पूरचि आला, पूर्णब्रह्म निरंतर अवतरला जो, मुरहरकुहरगत, तमोहर व्रजजनिं विहरत तो. ॥ गोविंद० ॥ ३

चामर वारिति, वलयसहितकरिं, कुवलयनयना, धवल धाम, शिवनवलनवल, नवनीतकवळसह, कवळिति गवळणी, जवळ बसुनि सुख, निवळ निवळ

---

१. हत्तीचे छावे आणि हत्तिणी. २. सुख देते. ३. पार्वती. ४. शंकराचें. ५. चंद्र. ६. कोकिलस्वर. ७. गौळणी. ८. कमलनेत्रा.

घेति, पोवळे देंट सम, कोंवळे ओट वटपत्रपोट मृदु, कंबुकंठ वैकुंठनाथ अति. उत्कंठितरव त्या कंठीं धरुनी, अकुंठित काळ कंठीतो. ॥ गोविंद० ॥ ४

ग्रह वाल्मिकांत तेजे प्रेम विभागीं निरागिणी, समजनि लागुनि परमविरागी निरागिणि, प्रिया गोप ऐकूनी मुरली, नाग सरसा न सांडुनि, अवसर साधिति, हस्ति हस्त सर मोत्याचे सर, वासरमणिसम वेसर नाकीं, केशरनिटळीं, ईश रमविती, रासमंडळीं कान धरुनिया, तान अलापिती, कान देति, बहु मोल दानमान, देहेभान रहित, रसपान करुनि, थै थै थै थै पैंगत पैंगत पैंजण, रुणझुण वेणु, मिलित डफ ढोल नाद, ब्रह्ममुसावत, मृदंग अद्भुत रंग तरंगी दंग होती, सुरअनंग भुजंग, विहंग अचलित, समाधिसौख्य उपेक्षुनि, मुनिजन, अंतरिक्षगति रक्षि क्षितिवरि, अमृतप्रभु वरदायक श्रीहरि तो. ॥ गोविंद० ॥ ५

गोचरण.

गोविंद गाई चारितो कालिंदीतटीं. ॥ ध्रुवपद. ॥

यमुनातटगत चिमणासा हरि, तमनाशक शिरिं सुमनावतंस, गमनागमनी, श्रवणी सृत जो, शमनादिक भय, शमनाकृति अहिदमनाप्रति सुर नमना करिती, सुमनातरि वरि क्रमणा करितो, वनांत विचरुनि, गुरें निबिडतर सरस सहित तृण चरति चरति, पृथु उदर धरुनि शिरि फिरता शिणति, जठरपुटी वेणु खोऊनी, धेनुच्या पाठी थापटी. ॥ गोविंद० ॥ १

बाळकृष्ण, गोपाळबाळ बहु, कपाळ विस्तृत भाळीं नूतन केशर सुतिलक वामगळां वनमाळ कमळसम, विशाल डोळे, शैवाळ मनिंचा, मृणालभुज करि, वेणुनाळ, सुप्रवाळ अधरीं, राग आळवित, रसाळ, चाळक, तालयुक्त भूपाळ कथित, गंधर्वसाळ तो, व्याळमथन अघजाळ गिळित, अहिकाळकाळ कळिकाळ रहित, भवगाळ वाळवुनि, ताळमाळ, मृदु वाळवंट, अंतराळगति सन्मराळ मतिनें, दयाळ श्रीहरिकर्णि कुंडलें, ढाळ दूध दहि वढाळ भवत्या, दुधाळ गाई, पाळिताति पशुपाळ पाळिनें, पाळ करुनि कनवाळ गाउनी, टाळ वाजविति, काहळणें खळाळ वाहे, माळोमाळ तवरी धुमाळ, घालुनि स्तविती, तेजगात्रकुलाल हरी वरि, आलापुनि घे, खेळताती, चवताळ ताळती, पारंबी पात उल्लाळ घेवुनी झोंबी घेती तरुभांडीरवटीं. ॥ गोविंद० ॥ २

सुवर्ण शृंग उजाळे, खुरावरि वाळे चित्रिति बिंदु निराळे, कनकचवाळे, त्याच्या ढाळे, ढाळे चालति कासपयाचे आळे, पदरज लागतांचि अघ क्षाळे, साक्षी

---

१. सूर्य. २. पुष्पाचें भूषण. ३. मृदु, मऊ.

त्या नंदिनि ऐशा, त्यांत कोणी काळ्या कोणी निळ्या ढवळ्या, गवळ्या घरिच्या सावळ्या हरिनें, चुचकारुनि बावळ्याच केल्या, उतावळ्याशा धांवुनि येती, हिरव्या गवती, कवळ मुखांतचि, टवकारुनिया, तिला सेवावें, खाजवावें, गळा पडावें, कुरवाळावें, पोटाखालुनि यावें जावें, थान चोखुनि दुग्धचि प्यावें, प्रदक्षणुनिया नमन करावें, कृपाकटाक्षें वरवें पाहावें, नाम घेवुनी पाचारावें, 'माय यशोदे!' म्हणुनि वाहावें, 'कौसल्ये! ये, रेणूके! ये, आदित्ये! ये, अनुसूये! ये, अर्जूने! ये, अक्रूरे! ये, नारदे! ये, बिभीषणे! ये, बळिवंते! ये, गंगे! ये, नर्मदे! ये कृष्णे! ये, शुकेनिके! सनके! पुंडलिके! निरे! भिवरे! चंद्रभागे! ये,' इत्यादी अभिधानें आपुल्या आवडिनें माधव कुंजवनीं, विहरतां सुखानें वेणुनाद, गोपभ्र पाउलीं मधें उमटली, श्रीपांडुरंग प्रत्यक्ष पाहातो, विठ्ठल निकटी.॥ गोविंद०॥ ३

ब्रह्मरुद्रइंद्रें प्रार्थियला, वसुदेवें पूर्वी अर्जविला, देवकीचे उदरीं जन्मला, यशोमतीचे गृहा आणिला, पूतनेचा प्राण घेतला, निजल्या निजल्या पदें ताडिला, लत्ता हाणुनि शकट मोडिला, करुनि मृषा मिस घे मातेला, गृहीं रांगतां धरि भितीला, द्वार वेंघता सुख बहुतांला, उचलोनिया अंकिं बसविला, आलिंगुनि हृदयीं मेळविला, 'अचडु बचडु' नामें आळविला, चुंबन देउनियां चाळविला, धरुनि फेंगडा मग चालविला, गाउनि गीत सुखें हालविला, लघु परकोर जरी नेसविला, उगाचि मांडीवरि बसवीला, जांभाइत नवलाव देखिला, स्वर्ग मृत्यु पाताळ पाहिला, हाचि ब्रह्म निश्चयें रेखिला, मायेचा सुत भाव पोखिला, क्षीरसिंधु स्तनीं चोखिला, गोपमुलाला प्रियकर लीला, टपुनि बसुन गल्लीगल्लीला, त्याही भवधंदा मोकळिला, दध्योदन कृष्णासि अर्पिला, निपटुनि साईसिगट वर्पिला, सेंधिधार घालुनि तर्पिला, उष्ण भात पात्रांत काढिला, सावकाश तोही सोंवडिला, भानवशांत बरा तावडिला, वडिल वडिलाला बहु आवडिला, लोण्याचा पृथु गोळ भक्षिला, कुमारिकांचा हेत रक्षिला, हात पुसूनी टिरि कक्षेला, आत्मगृहाचा मार्ग लक्षिला, क्रीडत क्रीडत हळूचि आला, जननि घुसळता धरी रवीला, विश्वरूप प्रगटे मातेला, दुग्धपान मागे रवीला, तिणें दुधाचा ऊत जिरविला, भग्न करी हा दधिचरवीला, मर्कटमेळा बहु मेळविला, व्रजवधूसदनीं संचरला, शिंके पाहूनि माच बांधिला, पोरांचा समुदाय बोधिला, गोरसडेरा पूर्ण शोधिला, खांदी वेंघुनि तळीं वेधिला, धार पितां संवगडी वे-

---

१. हीं गाईंचीं नांवें आहेत. २. नांवें. ३. गुणाची धार. ४. गोळा केला. ५. मोठा. ६. ताक करण्याच्या कावीच्या, मंथनाच्या. ७. दुधाचें पात्र. ८. माळा, अंतराळीं केलेला रचना, उंचवटा.

ष्टिला, परमात्मा प्रत्यक्ष पाहिला, कृष्ण हस्तगत कवळ लाधला, 'मज दे मज दे' असा याचिला, दधिकाला सर्वस्व वेंचिला, शेषप्रद लउनि वेंचिला, ब्रह्मानंदें ग्रास मांडिला, नवनीतें मुखइंदु माखिला, भक्तरहस्यें स्वाद चोखिला, मित्राचा सन्मान रक्षिला, ढेकर दे संतृप्त चांगला, संचळ न कळत पळोनि गेला, गान्हाण्याचा शब्द ऐकिला, मातृकोप जाणुनि झटकला, प्रेमरज्जु बंधनीं अटकला, नेत्रीं उदकपूर लोटला, ताडनभयें घाम पाझरला, न करि म्हणउनि हात पसरिला, आपुल्या थोरपणा वीसरला, उखळिं बांधितां नतानुसरला, दोर मात्र दाव्याचा सरला, कडदोरा माजिचा घसरला, उखळसहित हातिचा निसरला, रांगत रांगत तरुतळिं गेला, यमलार्जुन[1] जोडा उन्मळिला[2], वणवा गिळिला, केशीं पिळीला, कलि आकळिला, कंस श्रमीं महा मिसळला, वत्से वत्सप आपण झाला, मायावैभव दावि अजाला, अमानुष्य कर्मे आचरला, यमुनेचे डोहीं संचरला, नागकालिया खळ तारिला, पोरीचा पटभार[3] चोरिला, लज्जासंशय सकळ वारिला, तोहि संगास्तव विनवीला, विनोद शिकवी नवीनवीला, वनामधें दधिचरु मेळविला, ऋषिपत्न्यांचें अन्न जेविला, यज्ञपुरुष ब्रह्मणीं भाविला, तृणावर्त[4] तो नभीं मारिला, अगबगकेशी उभा चीरिला, नग उद्धरिला, सात दिवस बोटावरि धरिला, अहंभाव[6] इंद्राचा हरिला, ब्रजजन समस्तही वांचविला, गोवर्धना[5] तळीं नाचविला, वज्रधरें[7] वर्णोनि वंदिला, सुरभीनें[8] उपकार मानिला, श्रीगोविंदराज वाखाणिला, अमृताभिषेकें करुनि सिंचिला, नारदादिकीं नमुनि गाइला, पुष्पवृष्टिनें सुरीं वाहिला, जयजयकारें स्वस्थ राहिला, गोपाळे भेटोनि पाहिला, प्राकृत क्रीडेलागिं वाहिला, पाठीं हलधर[9] वाहि वाहिला, पशु अहंकृत शब्द साहिला, अनन्य भक्तीनें मोहियला, वरुणगृहींहुन नंद आणिला, नंदें साक्षात विष्णु मानिला, वरुणें स्तविला, हरि गौरविला, रात्रींमधुन वेणु वाजविला, गायक स्वर्ग लोक लाजविला, काम पुरविला, मदमत्त हस्ती तो आवरिला, कुंजवनीं एकांत फावला, रासरंग सर्वांसि दाविला, शंखचूड खळ धरा सीधला, अहिविद्याधर करीं स्पर्शिला, दिव्यदेह तेणें पाठविला, प्रलंबधेनुक तो झोडियला, अष्ट वृषभासूर राहिला, कुपथ मोडिला, नित्यसुखोत्सव करी उर्वीला[10], स्वधर्मपर त्याना मीर-

१. हे वृक्ष होत. नारदाच्या शापानें कुबेराचे पुत्र स्थावर योनि पावले होते ते हेच. २. उपटून टाकिला. ३. वस्त्रराशि. ४. हा कंसाचा सेवक. यानें गोकुळांत येऊन कृष्णास प्रचंड चक्रवातरूपानें आकाशांत उडवून नेलें. तेव्हां कृष्णानें याच्या कंठास मिठी मारून यास ठार मारिलें. ५. गोवर्धन पर्वत. ६. गर्व. ७. इंद्रानें. ८. कामधेनूनें. ९. बळराम. १०. पृथ्वीला.

विला, साधुमनोरथहि पुरवीला, पद्महस्त मस्तकीं फिरविला, एवं अनंतगुण-गणनिधान, दैवतप्रधान, अमृतवरदकर, वरधरसुंदर, विगतशोक, वैकुंठलोक गोकुळांत असल्या बसल्या असें दाखवुनि, दुष्ट दैत्य निर्दाळुनि, हीन दीन दुर्बळा पाहुनि, रक्षी संकटीं. ॥ गोविंद० ॥ ४

स्थालीपाक.

श्रीकृष्णा! सख्या! यावें। संकट पडलें भारी. ॥ ध्रुवपद. ॥

आला तपोनिधी दुर्वास, मध्यरात्रीचे समयास, मागे भोजन ऋषिसमुहास, गेला गंगेच्या तीरास, स्नानसंध्या सारायास, निकट बहुतचि समय जाणुनि, प्रार्थितसे, 'जी त्वरित श्रीहरि! येउनिया दिनबंधु दयानिधि, लाज राखि तूं, आन तुजवांचुनि कोण दुजा कीं, शरण जाउं त्या रक्षि रक्षि बा, क्षुधित बहु अन्न याचिती, तुष्ट पुष्ट संतुष्ट अंतरीं, नाहीं तरी तो समर्थ तापसी, शापुनिया हा भस्म करिल मग, हांसें होइल दुष्ट दुर्मती दुर्योधन दुःशासन शकुनी, यांहीं प्रेरिला बहु अर्जविला, संधी पाहुनियां पाठविला, सकळश्रुत सर्वांतर्गत हरि सर्वसाक्ष जगदीश दयांबुधि! धांव पाव बा! त्वरित येवुनी, विश्वव्यापका! लोकपाळका! विश्वेश्वर हरि विश्वप्राणप्रभु! तात मात भगवंत दयाघन! पाहे पाहे मी दीन विनविते सदय हृदय मग पाहे अंतरीं. ॥ श्रीकृष्णा० ॥ १

ऐकुनि द्रौपदिची ते हाक, श्रीहरिहृदयीं भरला धाक, कोणें सतीस छळलें नाहक, सिद्ध होवुनियां स्वयंपाक, भोजन करितां तो यदुनायक, निकट भीमकी ग्रास हातींचा, परता सारुनि, चमत्कारुनि पुसे लक्ष्मी, 'त्वरा, काय जी! संकट कैसें? कवणें गांजिलें? करे निवारी भारी भारी समय वर्तला,' ऐसें वदतां गरुड सिद्ध पुढें हात जोडुनि, त्यागुनियां त्या अतित्वरेनें, लगबग लगबग कटीं पीतांबर, पदर सूटला, करें वेष्टिला, क्षण न लागतां हरि पातला, वृंदावनि सखि हात जोडुनी, ध्यान करित तो हरि निरखिला, अष्टभाव बाष्पप्रेमें सद्गदितकंठ हरि आळविला, वृत्त कथितसे, 'अजि महाराज! अजि महाराज! ऐशा समयीं तीव्रतापसी, अन्न मागतो, भुके पीडिलों, भोजन दे दे वदत सरीतटीं, स्नाना गेला, वर्तमान हे कळो तुम्हाला, दीनदयाळा!' ऐकुनियां मग वदे सतीसी, 'मीही क्षुधित असें, ताट सांडुनि त्वरें पातलों, ऊठ लवकरिं कांहीं तरी दे, दे दे' म्हणतां स्तब्ध सती मग वदे, 'सख्या रे! शापिल ऋषि म्हणवोनि तुम्हाला प्रार्थियलें जी! आतां तुजलागीं मी कवणा आळऊं?' महाराज

---

१. आटोपायास.

बोलिला, 'भा....तेंवरि पात्र पाहू दे किंचित् कांहीं,' शाकपत्र अणुमात्र निरखुनि, श्रीहरि स्वकरें स्विकारूनि मुखी, ढेंकर देवुनि परम प्रीतिनें, धांउनिया म्हणे, 'तृप्त झालों मी, आतां वदें पुढें काय कृत्य तें.' तों ऋषिमंडळ स्नान करुनि अघमर्षण कौतुक, धर्म भीम सहदेव द्रौपदी, प्रार्थुनिया अति दिव्यमंडपी, चतुष्कोण किनखाप कनाता, जरीबुटी लखलखित चांदवे, पाट रुप्याचे हेम ताट वरी, रत्नवाटिका दधी दुग्ध घृत पैंड्स अन्नें भक्ष भोज्य अति दिव्य मनोहर चहुंकोणी घृत पूरित समया, रत्नखचित प्रतिपात्रीं ऋषीच्या, एक एक सति वाढितसे, परिपूर्ण पूर्णते, संतोषानें ईश्वरी. ॥ श्रीकृष्णा० ॥ २

अन्नें वाढितसे ते अंबा, नेसुनि पाटाउ जगदंबा, शंकापद कौसल्या रंभा, अद्भुत ऐश्वर्य अवलंबा, विस्मय अवलोकुनि विधिसांबा, लवण मिरकुटें, लवणशाखि त्या, आलें लिंबु आंबे नेपति, कोवळवेले, आले आंवळे, लालफळें, करवंद भोकरे, मऊ मिरचिया, घोंस मिऱ्यांचे वंश कोंवळे, कारले शेंगा, कमल काकडी, कुहिरी आवई खडसमुळी, चारे बोरे, द्राक्षाचे घड बहु, कोशिंबिरी, मेथी पोथी चुका चाकवत, चवळी कवळी चरुचमकुरा, रायबोळते मउ तांदुळजा, भाजि चण्याची सरस आंबाडा कण्या घोटुनि जिरें मिरें बहु, हिंग मिसळुनि, चरारीत चमचमित फोडणी वांगीं लसलसित दिव्यकोवळीं, तोडवळे परवरे मऊ दोडके, दुग्धभोपळे, गंगाफळ अतिसरस कारलीं, मेकी भेकी बहुतचि शाखा, श्रीहरि अर्पित विप्र भक्षिती, 'भला भला रे ! पांडव कुळिंचा वंश शिखामणि, धन्य द्रौपदी, पतिव्रता सती, स्वस्थ तुझाला सदा असो कीं, कदापि ते तुज, आपदा, ना वरी.' ॥ श्रीकृष्णा० ॥ ३

स्वस्थपणें बैसोनी ब्राह्मण, प्रशस्त करिताति भोजन, धर्मरायाघरिचें अन्न, आदिमाया हे निर्गुण, स्वकरें अर्पितसे परिपूर्ण, दळेमुगदळे गूळपापडी, शंकरपाळे, घारगी घिरडी, चोटीचुरमा, मालपुवे अति, साजुक नाजुक अपूप बरफी, सवेचिरोंजि, लोणकढें घृत, सद्यस्तप्त वरि साय दुधाची, सुस्वाद मनोहर, मिटक्या देवुनि, गद्यपद्य बहु हरिगुण आळवित, वसन ढिलावित, सरळकंठ आकंठ भरित, पाणि पियास वेळा कर्पूर, थंडगार पय प्राशित अंतरिं, स्थान नसे अणुमात्र उदरीं, धापे देत उताणे पडले, नागकेल गंगेरी पानें, पूगीफळ कंकोळ लवंगा, जायफळें ते वेळापत्रि, कातगोळिया, गंध केसरी हार गळां तुळसीच्या माळा, कमालखानी व्याहि सोयरी, यापरि हरिनें सत्कारुनि तोषविले

---

१. भाजीचें पान; २. सुवर्ण. ३. मधुर आम्ल इत्यादि. ४. हें हारांचें नांव आहे.

द्विज धन्य भूप यश कीर्ति वर्णिती, 'स्वस्तिश्री कल्याण असो कीं, श्रीहरिचरिता गात असो कीं, पूर्णब्रह्म चिद्रूपचिदात्मा, निराकार साकार अमृतेश्वर दासा पावे लौकरी.' ॥ श्रीकृष्णा० ॥ ४

द्रौपदीवस्त्रहरण.

पुढें तरि कृष्णा! बहिण तुझी मी, साची जन्मली, देवकिउदरीं, स्नेह सुभद्रेच्या परिवारीं, लोभ न सांडी सख्या मुरारी! हे पुतनारी! अगबग मारी लिलाविहारी, कुंजविहारी, कठोर होसी तूं म्हणि अंतरीं, नको नको रे हरी! नको रे! उगाचि पाहसि कां निर्धारिं! असलि अमसि ऋणि हरिभक्ताचा, पिता जसा धरि स्नेह सुताचा, त्याहुनि त्याचा अधिक कृपेचा, किति म्हुनयाचा वदु रे! मि वाचा, वदली वदली, परि हे चुकली खरि दास तुझे पांडव लौकिकी, सत्य ब्रीद हें साच करी वा! येसमयीं जसि मोकलसि, मज कोण सोडविल तुजवांचोनी दीनदयाळा पतितपावना, येऊं दे करुणा, नंदनंदना! काय करूं परि हरि! दूर पडला तुझा गांव. ॥ ३

द्रुपदतनयेचा मुखशर सुटला, श्रवणीं हरिचा, रुचि कड तरला, तेणें झडकरि वेध लाविला, सुख निद्रेचा विधु डोहळिला, पदें झिडकाउनिया भीमकीला, सर्वेचि उठला, चक्र धरुनि उभा ठाकला, धांवतसे गजबज सैरा, पीतपटाच्या खोवित पदरा, क्षीरोदक रुळत फरारा, उडत सांवरी केशरीभारा, किरिट मस्तकीं दडपित स्वकरा, वैजयंति कंठांत चमकति, वनमाळा रुळताति प्रभेति, पायिं नूपुरें रुणझुणताती, त्यजुनि वहन मन पवन त्याहुनि, अति वेग करुनि मग धांवत आले, वस्त्र पुरविले, अहंभाव दुष्टाचे हरले, धर्मादिक प्रेमें तोषविले, द्रौपदीचें बहु चित्त रक्षिलें, असेंच करित हरि, त्वरित त्वरित मग, अमृत वदे हरिभजनीं आवडि लाव. ॥ ४

सुदामचरित्र.

ब्राह्मण ब्रह्मनिष्ठ बहु मोठा—ते वुचुळाम न फिरवुनि—मृदु मृदु वाक्यें वदली. ॥ श्रीकृष्णें० ॥ १

कांता धरुनी मनि उल्हास, वंदी पतिच्या पादाब्जास, आहे विज्ञप्ति पायांस, ते परिसावी सावकास, बोलतसे निजभार्या. 'हे द्विजवर्या! करण्या कार्या, त्या

१. या कटिबंधाचीं ४ कडवीं आहेत. पैकीं आम्हास शेवटचीं दोनच उपलब्ध झालीं. २. भीमकीला. ३. पुष्पमाळा.

श्रीवर्यालागी ठेवुनि, हे दरिद्रचर्या, भोगितसां त्या वैकुंठपिशालागीं जावुनि भेटा. तो द्विजवर्य कसा गृहिणीप्रति बोलतसे, 'आइके वो रमणी! बाळपणीं यदुवंशकुळीचा मित्र जिवाचा, सखा निजाचा नांदतसे धनसंपत्तिसह परिवारें करुनि त्याचे स्मरणीं अखंड सदृढ भावें. करुनि वर्तत असतां विष्णु भक्ता काया आह्मां अघ, दरिद्रचिंता दर्शन दुरिताची वार्ता, नासुनियां निजमुक्ति पतितालागुनि देतो त्या श्रीकांता.' अभेदशब्दें गौरविली. ॥ श्रीकृष्णें० ॥ २

सुदाम बोले साधु स्वभावें—पुण्यश्लोक विलोकन मानुनि—श्यामांगीनें चौठार्यां याचना करुनियां, चार मुष्टि पोह्यांचें चूर्ण—॥ श्रीकृष्णें० ॥ ३

झाल्यावरि प्रातःस्नान—अंजलिपुट तें पात्र मात्र—सलज्ज ऐसा संचित झाला, वाज न होतां—॥ श्रीकृष्णें० ॥ ४

होतीं शुभशकुन ते चांग, द्विजवर वंदी त्या साष्टांग, तें परिसणें यथा जी! सांग, मुख्यशकुन हरिस्मरण करुनि, दृढ चरण धरुनि, निजहृदय कवळि द्विज नमुनि श्रिपद, मग निघत त्वरित; तंव प्रथम शकुन शुभ, शुद्ध जेठि देखिला द्विजानें, सुहास्यवदनें तयापुढें अतिपराक्रमानें, मार्ग क्रमिता द्विजोत्तमानें, विप्र उभयतां, देखतांचि केवळ सत्पात्रें, त्या हरिमित्रें नमन करुनि मग सह अष्टांगें, तो द्विज वर निजसुखें ओपिती, हे श्रीहरि प्रियकर सुखमूर्ति, प्रसन्नता पाहुनि सत्कीर्ति, लाधसील तूं तो द्विजवर बहु त्वरा करुनि निघे, हरावया श्रीमदनांतक प्रियकर भेटीतो, सप्त काग ते सव्यही जाती, त्यापुढें पुढें सुंदर द्विजवनिता वज्रचूडेमंडिता उदारा, अब्जलोचना, सुहास्यवदना, भरुनि पूर्णजळकुंभ श्री निजबाळ कडेवरि, त्याहि पुढें गोधनें नवें श्रीकामधेनुचे शोभलाति सह वत्सा त्या श्रीपुच्छालागी उभारोनि स्वेच्छा चरती फिरती आनंदें वनीं, अवनिधेनुच्या, सव्यभागीं कुरंगिनीपाडस, सहवर्तमान सह तास वासते, वाम भागसम भाग मिरवती, ऐशा प्रश्नीं, सप्तहि सफळित, सप्रेमें सुखसरिसा सिंधु भेटी येतां तैसा द्विजवर, मुरहरभेटीलागी जातां, निजस्वहितार्था, तो कमळोद्भवतात सूचक, विप्रवरा सामोरा, शुभशकुनावलि पाठविली. ॥ श्रीकृष्णें० ॥ ५

चरती कामधेनुखिल्लारें—कृष्ण गगनकल्पद्रुम कळली—धैर्य मंडपावरी—धवळी भूतप्रभावळी उद्भवली. ॥ श्रीकृष्णें० ॥ ६

जाहल्या हातपायांच्या नळ्या—ब्रह्मसूत्र सिखि सूत्र गळां परि—उडी टाकुनी—॥ श्रीकृष्णें० ॥ ७

ब्राह्मण बैसविला पर्यंकीं—अंकितसा आकळील पंकज—जानूजंघा गुल्फ-प्रदेश अतिकठोर भिंगिली अंगुळींका—धन्योऽहं धन्योऽहं धन्या कृतकृत्वा-मतिनें मनीं धरियले—दीपभर तूपसूपरसादी अमूप वक्र करंज्या स्वच्छ फेणिया—॥ श्रीकृष्णें० ॥ ८

सत्यभामा छत्र धरी, यज्ञजीती चामर वारी—सूक्ष्मदृष्टिनें कालिंदी, मंद्रावती पथि उभी लक्ष्मणा, मित्रवृंदा छत्र अपत्रप ताका, आतपत्र आलिंगी, इंदीवरसम हस्तें सांदिपिनी तैसा वंदी—धृष्ट पुष्ट संतुष्ट मुष्ट दुर्दुष्टस्वामी प्रमिष्ट तैसा हृदयिं दुष्ट उत्कृष्ट त्रिविष्टक देवश्रेष्ट—॥ श्रीकृष्णें० ॥ ९

सुंदर हंसतूळिकासुपती—संनिध बैसलासे श्रीपति—आठवतें कीं नाठवतें, संधी पाहुनि सद्गुरु भार्या—अकस्मात आभाळ पर्जन्य काम दुराशा वायु झडाडी—मंद मिपण कडु झाड झडाडी—गुरुपदवीचा ग्राम चूकलों—धन्य तो गुरुसेवनयोग भाग्योदयकृत प्रातःकाळीं—मधुर भाषणें करित सांवली—विवेकबीजें हाका मारितां—मग जाउनियां पायां पडलों, आत्मत्वें गुरुला आवडलों—शिष्टवाक्यें वरदानें ओपिलीं. ॥ श्रीकृष्णें० ॥ १०

तुमचें वेदयात नाम—चित्तानुकूळ नवरी बरी मिळाली किं न मिळाली सांगा—॥ श्रीकृष्णें० ॥ ११

तुमची भार्या आर्या गृहिणी—आवडी हरि सोडी, बचक भरोनी, मुख विचकूनी—निर्विकारिता गलित व्हावया—॥ श्रीकृष्णें० ॥ १२

पोहे मुक्त पोहे—॥ श्रीकृष्णें० ॥ १३

कृष्णें वृत्ति करुनि पांगोळी—हातनळे चंद्रज्योति सुटती—क्षीरोदकपरिधान सुधाकर—॥ श्रीकृष्णें० ॥ १४

मांडुनि स्वम्तिक सुवर्णपाट—फोडणी चरारीतमी, चारोळ्यांचें सांभारें—चार पान चिंचोळीं तोंडें—मालत्या देटवे, शुभ्र बोटवे—कानवले देखुन मानवले—पंचारति करिती प्रीतीनें—सौवर्णीकृत मोती भाजुनि—संक्षाळित हस्तें—॥ श्रीकृष्णें० ॥ १५

कदापि धन हरिलागिं न याची—कल्पसमय वैकल्यरहित तो—॥ श्रीकृष्णें० ॥ १६

मार्गीं ब्राह्मणार्सी अविकार—हिरोनी नेत परी हरिपण दिधलें कदा न हारी हरि हरिस्वरूपें हरिता स्थिरता स्थिरावया—जग हरिस्मरणीं रवळ सकळ अविकळ होउनि—॥ श्रीकृष्णें० ॥ १७

चाले आत्मसावधानी—पाट वाट तरि चिमणीचे घाट दृष्टि कल्पद्रुम सोपानें—गृहकपाटामध्यें सोनें—थवे नवे बटकीचे जैसे देवांगना आंगणांत फिरती त्यावरि सोनें, डोईवर चुंभळ—हरि आळवितां—॥ श्रीकृष्णें० ॥ १८

(पृष्ठ ३८ ओळ ५)

रामजन्म.

त्रेताजुग, तारण संवत्सर, तामो चैत्र मास ऋतु सुंदर, नवमी शुक्ल पक्ष रविवासर, अभिजित् लग्न पुनर्वसुभीतर पाये राम जन्म रविकुलमो, लीला नटकर बानधनुख पटपीत सुभितकट, दिव्यमुगुट शिर, कानन कुंडल, हारजडित मणि पदकखचित शुभवदन रदन, अतिनलिन नयन, जुगसवन अधर, भ्रूचापसदृश शुकनाससरल हनु गाल भालपर तिलक, ललित मृदु कुरळ सुनिळ, तनुविमल हृदय, समसदय उदर, जगनिलयचरणद्वय, कदलिगर्भ, सकुमार, मारसम, अलंकार साकार अभयकर परमधाम परमेश परमनृपकामिनिसन्मुख ठाड रहे, जगदीश जान कर, चरन धरे, अतिचकित थकित मृदु बात करत, 'प्रभुजी! इह तुमबिध रूप धरे तब कौसल्यासुत कौन कहे?' यहि मातनकी बिनती सुनके तबही करुनाघन बाल भये, जननी जगदीश उठाय लिये, जगजीवन स्तनपान दिये, मलबस्तरमो प्रभु सोय रहे, हर यहबिध प्रेमल कूंबसहय सहसुमित्राभरतरिपुघ्न अये, नरनाथकु सुखसिंधु भये, बिधिपूर्वक जातकर्म किये, निजपुत्रबदन अवलोकत, यह दिवि दुंदुभिनाद विनोद प्रमोद महासुरवृंद सुमनवृष्टि करत है. । रामजन्म अमृतराय कहत है. ॥ ० १

लंकावर्णन.

देखोरे देखो आया लंकका राजा. ॥ ध्रुवपद. ॥

कांचनकी लंका, तीन कोन, सब काम सुनेरी रंगमहाल, सब जगा जगा चौगिर्द बनी है, लाख माडिया, बड्या उंच खुब खड्या हवेल्या, मढ्या लालसे, जड्या जुहरसे, झगमग तारे, लाल अगारे, सफेद सारे कोंदन हीरे, जरी फारे, उपरसवारे, चंद्र हजारे, सबसे न्यारे, चंद्रसुरज दोनोपर वारे, ढाल ढोल डफ मेघगर्जना, कडकड बिजली, घडघड बादल, भंभेरीया चराचर, करन ताल रणसिंग ढोल पखवाज बजंतर, थैय्य थैय्यकै लाख लठिया, अश्वसूत्र और तिडिमिडि तिडिमिडि, धौस धडाधड नोबद बाजा ॥ देखोरे० ॥ १

रणखांब गदा अस्मानबराबर, ध्वजा उंच नव लाख देखते, लोक-खलक सब, मुलुखमुलुखके, करोर हाती, घोरे तेजी, ऊट पालखी, रथ गाडीया, करोर लष्कर, ताहामें खूबखूब बिलंदी, दसाननघन, सुभान अल्ला, ओमतवाला, खूब बना दौलतका प्याला, दादा आदमकी अजब लीला, कांचनका तो कोट बना है, चौफेर जिन खंदक क्यारी, भरे जोर दर्याव दर्द कर, कहा करे भाई वो राम लछिमन भरत सत्रुघन वाली सुग्रिव बंदर लंगुर, वैनवैनको धुमा चौकडे, खानेवाले देखो यारो, थरथरथरथर दसाननके कंपत भये बीस भुजा. ॥ देखोरे० ॥ २

एतनमो श्रीरामचंद्रकी चढी फौज ज्या पडी लंकपर, अढी आढाकार सिडी आनपर, भिडी बांधकर, खडी बाहपर, बडी लढाई, चढी लंकपर, चंद्र सुरज दो डाउडाउकर, नडा छूटकर खडा मेघ गडगडा गुमानिल लडा ऊठकर खडा लढा लढु सनननननननन, बान छुटे छच्छनननननननन, खर्ग बाजे खक्खनननननननन, तोफ बाजे दद्दनननननननन, गगनबीच घंघनननननननन, मेघनाद कंकडडडडडडडड, पटे बाजे बब्भरररररररर, बाके तीर सस्सरररररररर, उडे फूल जब मुले हाती, गिरे सिपाई फते रामकी, खुले लाल गुलालसिंधुकर, रावन मारा, राकेस घेरा, तमाम सारा, भागे लोक कुल लंक लुटाई, निशाण चढाया दुराई फिरे रामराजा. ॥ देखोरे० ॥ ३

लुटी लंक जब खटपट कठोर चटपट चटणी लटपट लटणी निकट भुवनघट खटाटोप पट द्रमकुटद्रिकिट दधधीमपधीमप अनुहत बाजे तनित परम पटे हर राम.राम घनश्याम सुंदर नर नाम जपजे काम पूरणधाम त्रिकुट दे धाम बिभीषण ठाव अचळ दे सीता सकळ निळ महानीळ येर सबळ सेतुबळ अंगद मैतरु सुक सुक्षणघन जांबुवंत हनुमान गनत दुर्वास ब्रह्मचारी वसिष्ठ विश्वामित्र प्रती वाम पौलस्त्य भार्गव भारद्वाज अंगिर मार्कंडेय गुरु पैगंबर पूजत राम राम सुखधाम सकळ सब काम पूर्ण परब्रह्म सनातन कविजन पुष्पवृष्टि करत जयजयकार करत, कहे अमृतराय सब लंगरऊपर ज्या बैठे सब, देव बजावत, अनुहात बाजे बाजा. ॥ देखोरे० ॥ ४

कृष्णनृत्य.

इह लीला छंद रचाया । पलमें त्रैलोक्य नचाया. ॥ ध्रुवपद. ॥

उठके प्रात जसोदामय्या, दे नवनीत पुत्र समुझ्याया, नाच कन्हया शब्द

उठाया, अजब तमासा उने दिखाया, ग्वालनके सुसमाज आज ब्रिजराज, पकर बलभद्र अंगुरिया, नचत राग च्छहु गाय रागनी, उमटत पायल, उठत नादजी, हटत देवगंधर्व रटत, मृदु तान तुटत, आकास फटत, धुन छुम छुम घुंगरु, गर्जहि, तत्काल मोहबस, नंद जसोमति, गोप महर्णी, तत्थै तत्थै नृत्य करत, इकनीर भरत, कोई देख सुरत, घट सिर न धरत, दधिमथन करत, मनसुमन हरत, तन मन बिसरत, सुखसदन फिरत, कर रदन धिरत, नगवदन धरत, देहमदन झरत, इह प्रकार नरनारी गोकुलके सब ब्रिजबासी लोक चबासी, मगन सघन हो कर, मुरलीके धुनसे नाच मचाया. ॥ इह लीला०॥ १

मथुरा कंसनचे अभिमानी, प्रलंब अग बग मुष्टिक सानी, लंक बिभीखन नचत सुग्यानी, जरासंध शिशुपाल गुमानी, तुर्त निशाचर खबर हिरानी, एकहि वेर किलोल भयो, धरणीधर कंपत, लिये हस्तमे, अर्गखर्गबेसर्ग करत, उड्डान मार्गको नजर न लावे, दुर्ग दुर्ग दौडत है जिनको, दर्प बडो, तनसर्प लिये, मन गर्क भये, नहि तर्क चले, रजअर्क निकारत, अर्क पकरबे, झपट झपट, नभ लपट लपट कर भूमि गिरे पुन, ऐसे सब घनघोर हटे ते, अबनि मज्यावत, असुर तिहुं अहिफेनको नचत नचाय्या. ॥ इह लीला० ॥ २

धर्म भीम अर्जुन अधिकारी, नचत नकुल सहदेव सुनारी, कौरव भीखम गुरू अचारी, अंध वृद्ध कुंती गांधारी, महातपि सुर ऋषि जटाधारी, कंदमूल फल पवन आहारी, देसदेसके अजब गजब सब, भूप सहरके, पातशाह उमराव शिपाई, सुभामृते सरदार सवाई, मुजुमदार फडणीस लिखाई, दरखदार चिटणीस उपाई, फौजदार मिल करत हवाई, ठौर ठौर दरबार कचेरी, बडे मुत्सदी, हटघट बाजार, बाजारबीच, अत सुकत पुखत, तज जडक, तरुखत नही सराफखाना, सेटशियाना, सौदागिर करलेत मुलताना, खैच कमाना, करत तनाना, मन हु न भावे, आप बिराना, तेली बनिया, बरई रिनिया, सावलुहार, जुहार, कामगर कारिगिरि बादीगिर, बढई, भाट, कुंभार, सुनार, छीपी, रजपुत नीच ऊच मिल नाचत अठरा जात नसे सुक हंस कोक बक पच्छिनसे, अहि पिप्पलिका लघुकीटनसे, बन पर्वत दढ जड वृच्छनसे, अवसानन भान कच्छुमनसे, धुन बासुरिकी, सुन गान करत पुन, जितक महीमे, जीव जंत्र, थावर जंगम तिनहू, न चवे न बचाया. ॥ इह लीला० ॥ ३

नचत बलि वामन सुबिलासी, नारायणमुख सहसबिलासी, जलजा बरुन

अप्सरादासी, सब पाताल लोकपुरवासी, स्वर्ग नचत सुर इंद्र चंद्र रव बुध कुज कव गुरु केत राह सनि विष्णु गजानन चतुरानन, पंचानन बर-आनन, जमनिधपति, नारद भैरव अष्ट गरूर गोपति गिरिजा, सचि सावित्री, सरसति रंभादिक अष्टनायिका, बसिष्ठ व्यास पारासर गौतम भरद्वाज दुर्वासदेव, अंव गाधिंज कश्यप सुक मैत्र अत्रि जमदग्नी अगस्ति बकदालभ्य मृकुंड कपिलमुनि जाज्ञवल्क्य दत्तात्रय यते वाहन सहउपदेवदेव तेतीसकोटी ऋषिसहस्र अठ्ठासी मिल सब, ध्रुव पहेलाद बिजय जय सनक सनंदन, भक्त नचत गंधर्व जक्षगन, लच्छलच्छ, पृथमी जल अंबर तेज पवन सह पंचतत्व गुन सिंधु सप्त येविधसे सब नचवायो, त्रिभुवन नाटक यों प्रियलीलाधारी, सुरअवतारी, ख्याल ग्वाल बिच अद्भुत पगते नचत नचत अमृत बकको, अपराधपुंज प्रभुने निज उदर पचाया. ॥ इह लीला० ॥ ४

कृष्णलीला.

श्रीवृंदावनमो अजपत ब्रिजराज विराजत है. ॥ ध्रुवपद. ॥

घनतरवरसुरतरुकी छाया, कमल कर तक्त बिच्छाया, तापर सजल जलद-समकाया, मोरमुगटसिरपेच बनाया, संगराधिकासह ब्रिजजाया, परब्रह्महर तिनको पाया, नैनमो भरपूर समाया, मायामे नटभे कछु पाया, बाकाबनवारी मन भाया, महलसराय मोहबादरी, हरसखि नादर, दामिनि सुंदर, बनिअनि-आदर, कोदरवारन आदरबासुरको प्रबला, असुरखल प्रतापकार प्रभाकर प्रस्तुती, प्रभुप्रसादकार प्रमदानी, कमलनि प्रयानिका गतिप्रफुल्लित मतिसो, प्रबुध प्रबीन, प्रगट प्रेम ते परमपुरुख संनिध सेवा कर है ब्रिजजनहरिसेवा कर रहे. ॥ श्रीवृंदावनमो० ॥ १

बेठे शाम महामरकततनु, तापे मोरको चामर बीजित, कामरसिक सर्वाकार, लिये, धामरहित भई शामनयनकु, नाम शरनमो, पामरसमकर, रगरिठारी, त्यजी अटारी, बिपुरपुरकवती, अलकसवारत, ललितसुललना, नहि कच्छु तुलना, काननिकट अति, मानवती मृदुपान खवावत जांबुनदछवि तांबूल लिये, कंबुकंठगति अंबुज करसो, अंबुपान करवावत दूती, श्रवणमकर मनु सुखि अधर अनुग्रह, प्रहसी ज्याके, सन्मुखदगते पाच्छे सरकत मनु उन्मन मोहे. ॥ श्रीवृंदावनमो० ॥ २

श्रीपति कुंजनिबासि सहसआया, अबिनास निजरासमंडलमो असपाया,

सहभास सकलकु, एकएक गोपी एक नंदलाला, भुजपर भूज भुजंग विशाला, करमहेकर कुकुट रसाला, मालाकार भई व्रिजबाला, मरकत मजनिभ श्रीगोपाला, सुवर्ण नमनी त्रय अधर प्रवाला, मर्द गर्द जामनि ज्रुथज्रुथमो, नवघनमो डारी, जुंगल जुंगल राकेंद्र उजारो, कवन ग्यान उपमान सवारो, गुन गाय भवबंध न करे, जमुनाजलकल्लोल, लोललोलका रज, कुंजके कुंज फुले अलिपुंज लुंजहि गुंज तनहि मोहे गुंजरमतहे बैठे नांद सुश्वद, लेत अनुवाद, बिना उन्माद मगनधुनि अपनि कच्छुना कहे. ॥ श्रीबृंदावनमो० ॥ ३

गीतनृत्यगति हावभाव इति धिमकिति धिमकिति, धिमि धिमि धिमि धिमि— घोर गर्जत पखवाज साजकी, आवाज गहेरी, परन होत सनननननननन सननं सननं, झ्यांझरि इतनमोलक, ढोलकी गत, घुंघुंघुंघुं मोरचंग, तार गुंगार उठतु है एक सखि मुख ते तत्थैया तात्थैया कबितकार कहत इत पायल, नरतन चाल चलत घुंगरु छुम छुम छुम छुम नादजम रहो, तामो मुरलिया तननं तननं सारिगमपधनिसा, सानिधपमनंग स्वसुरावर्तनि उपज अनोटी, कोयलकंठी, कृष्णकंठसे लपट, कपटकी तानलपटकी तिक पट भुमयन तिनग्राम और एकहि जो गगनहवाई, खुसी होत वृखभानजवाई, कपित सुरसुरि रागरागिनी, कबित, धृपद त्रिवट पंचदर पंचगीत और प्रबंध सुनि सुनि, ठौर ठौर गंधर्व गर्वहत, उपर थाट बिमानी सुरमुनि गलित गुमान, अमृतराय प्रभुलीला देखे, अधर अंगुरिया देह थकित रहे सुरनर किंनर, थकित रहे नारद तुंबर थकित रहे. ॥ श्रीवृंदाबनमो० ॥ ४

(पृष्ठ ३९ ओळ १४)

रामचंद्रवर्णन.

राजाधिराज रामचंद्र गावा हो. ॥ ध्रुवपद. ॥

असितसजलवनघटा—॥ राजाधिराज० ॥ १

राम वैराग्यशीळ बहु मोठा, राज्यभार मोटा, त्यजि कै कै हटासि, मानि भोग विटाळ, सांडि दोष होटासि, नानि ज्ञान वाटा येवुनि चित्रकूटासि, गौतमितटासि, कांहिंवाहि वटातळिच एकवटा बांधोनि, तृण चटावरी काळविटाचें चर्म बाहु बाटा, वोपित शिरिं जटा, ज्वळित मुमुगुटा परि, विभुति पटा कपाळी, पर्णकुटांत, लक्ष्मण भटासहित, द्विज मठांत बसुनियां, वेदांत वि-

चारित, चरित हरित मन दुरित शांत प्रेमभरित सुर, त्वरित म्हणे, रघुविर सुखकर त्वकरि याहो. ॥ राजाधिराज० ॥ २

श्रीराम सितेसि पाहता चारिवाटा, अटव्य नृप भटासमान अकपटा, मतिनें खग जटायु, तारि वन अटांत कंदमुळ कुटात सेवि आम्रपुटासि हिंगनबेटाचि फळें स्वयें खाये शबरिचीं बोरें गुटगुटा, सौमित्र धाकुटा वायुच मुटमुटा पिवुनि मिथुलाटांत, शैल मात्र गोटांत, फेकित जानु विटांत रति जेंवि लाटा जोडुनि मन विटा वाटेंत मर्कटांची फौज तटतटा, वेष्टुनि लंकबेटांत, पेटुनियां कोटांत दशमुख धिटासि, दटावुनि किटासम रगडिति, चित्रकुटाचळिचे राज्यपटा, बिभिषण सोडवि जानकी संकटामधुनि चोखटा, अयोध्यापुरपटांगणांत, देव लोटांगण घालिति, पायां पडति पटपटा, श्रीरामराज अविकार, तिहिंलोकीं जयजयकार, साकार सुखाचे वरदेकार, वाटित ठाणठकार, मारुति भुभुःकार, करि नामाचा झुंकार, अमृतासि चमत्कार, देति सगुण, साक्षात्कार उद्दाम भजावा हो. ॥ राजाधिराज० ॥ ३

(पृष्ठ ३९ ओळ २१)

कृष्णवर्णन.

गोकुलकी क्या कहूं बऱ्हाई ? । ज्याहा खेळत फणपतसाई. ॥ ध्रुवपद. ॥

कोई न पावे ज्याको पार—निर्गुण निजानंद निजसार, इह जगदंबरको करतार, धरिये निजलीलाअवतार—जलदश्याम—कौस्तुभमणिराजित, जलजकंठ—कानमे कुंडल, मंडितशुभ—मंदहसितमुख मधुर बचन नवकमलनयन सुखसदन सगुण शशिवदन, रदनछब, रतनतनक—निरंकारसाकार सुरत बसुदेव जानकर चकित थकित स्तुति करत पुनितपद जुगुल उपरकृत नमस्कार बहु पुनित पुकारत देवकि उठाय जयजयकार किन्हो संस्कार परमकर जोरजोर निजवृत्त कहत कर लेत चलत भगवंत बचनसों बंद तूट गये कबार खुले रछक भूले सोय रहे सब घोर भई निशि बादल आये मलय पवनघन गरजगरज बिज दामिनिदमकें अंबर चमकें रुमुकझुमुक जलतुसार लाग्यो बुंद परे हरिभिगत जान फन सेस धरे तनछत्र करे अहिरूप भयंकर बिशाल देखे कंपन लागे करपंकजपर पंकजलोचनधर संकटमो करारसे जमुनातट पायो तब जमुना भरपूर भरी तटउमंड चली जल प्रबाहदुस्तर तरल लोल कल्लोल भवतबिच

अवर्त अगनित न्यहारके मन उतारको कछु पार न पायो मुरारके पदप्रतापसे नदि झरारके द्वयभाग भई पदबाट दई बृजसुमारसेगोकुलमो आये जोगम यावह जनी जसोदा भूल रहे सब कौउ न पूछे इतनेमो हर पलंगपर पोहोचाय कुमर लिये तव जागृत बालक देखतही अल्हाद भये है तब सब बृजजनमंगल गाये भेरि बजाये हरख बढाये बिप्र बुलाये मंगलजल पशुपाल कन्हाये देवदुंदुभी नादामोद प्रमोदकर भइ सुखकर दाई माई ॥ गोकुलकी० ॥ १

(पृष्ठ ५३ ओळ १)

संसारदुःखवर्णन.

आहारे मूर्खा! जन्मुनी काय केलेंरे? ॥ ध्रुवपद. ॥

विचार पाहतां बाळपणींचा, जन्म भासतो अज्ञानाचा, विटू दांडू लगोऱ्या चेंडू चक्र भोंवरे खेळाचे मांडूं, डाव देइना त्यासचि भांडूं, तरुण अवस्था अंगीं येतां दिवसां दिवसां वाढूं लागला, जननीपासुनि दूर राहिला, पुरोहितानें वधू पाहिली, चिरंजिवाचें लग्न करावें, जाती पत्नी निटस ठेंगणी विशाळनयनी गोजिरवाणी, लग्न जाहलें, दहा वीस हजार रुपये खर्च जाहले, ऋतुदर्शनीं फळशोभन केलें, अलंकार म्हणे स्त्रीला देणें, बाळी बुगडी चिता कासरी माळ जवाची एक दाण्याची, प्रभा फांकली कर्णफुलांची, ध्वनी उठली पैंजणांची, मातोश्रीचें फार लाडकें, तीर्थरुपांचें फार जोडकें, या पंतांचा दिवाणखाना रंगमहालीं नरम बिच्छाना, किनखापाचे पडदे आणि तिळभर वायू उष्ण साहिना, रावजी नाजूक मर्जी ऊर्जित जाहले फर्जित अर्जि करितो, अटुनि वेटुनि शिरकंदि दुपेटा टिळेदारि हे आंगांत डगलें उंच मुसे जरि तऱ्हेतऱ्हेचे रंग नित्य करि, पितांबराचा पदर भर्जरी, या पंतांची केवडी भर्जरि, रात्र अंधारी, चोर तस्कर लपूनि तैसा मार्ग लक्षितो, मध्यस्थावरि भरला ताठा, धर्माविषयीं फार कंटा, ऐसा गाढव कलिचा फांटा मायाजाळीं गुंतला. ॥ आहारे० ॥ १

वृद्धपणींची थोर अवस्था, वडील असतां म्हणति नेणता, नेत्रस्थानीं आली अंधता, दंत भग्न मग झाला, बोचरा चचला, नाहीं म्हणती म्हातारा, सुना असोनि निष्ठुर वचनीं, सूत पुसेना पित्यालागुनी, शरीरमदानें कोण गुमानी? बाळ खेळवा, पालक हलवा, रडूं लागलें, बाहिर न्यावा, अंगडें कुंचडें अचडे बचडे, कडिवर घ्याना माझें छकडें, नका नेऊं त्याला उघडें. किती बडबड कराल

तुम्ही ? वृद्ध रागीट अंतर्यामीं, हातीं काठी घेउनि चपाटी, मुलालेंकरा लागे पाठी, वसवसोनि उगाच उठी, उबाळे येउनी कंठ दाटला, माजकनाटा वाळुनि गेला, सर्वांगामी कंप सूटला, रूप मर्कटा दशा पातली. नेत्रस्थानीं दशा वाळली, अपानखिडकी तीहि उघडली. तीन अवस्था पाहुनि नयनीं, अमृतेश्वर म्हणे कृष्ण माउली, कर जोडुनि सद्गुरुचरणीं रंगला. ॥ आहारे० ॥ २

आहारे रांडलेका ! जन्मोनी काय केलें. ॥ ध्रुवपद. ॥

प्राण्या ! कष्ट नको करुं कांहीं, निष्ठा धरि परमेष्टीपायीं, गुरुमंत्रातें धरुनी हृदयीं, ध्याई गाई पंढरपुरची विठाबाई, नतांस त्राही, ह्या भवडोहीं. बुडशिल पाहीं, कैंची आई ताई माई, व्याहि जांवई फुई मावशी, थोरपणाला भाऊबहिणी, वहिनी म्हणती सखा दीर हा, भ्रतार भावा प्रार्थित देवा, असा असावा, एकापेक्षां एक वोलती, पैका पाहुनि हाका मारिती, आवा बाबा म्हणुनि धांवती, काका भेटुनि म्हणती आज्ञा, उंचस्थानीं नेउन बसविती, नरम बिछाना, गरम गरम लोडावरती मशाल खुशाल मामा, म्हणवी शहाणा, गोत्र कुटुंबी करिति दणाणा, संपत्ति पाहुनि जपत लपत एक नजर काढिती, बहु सुंदरा आहेर मांडिला ऐका. ॥ आहारे० ॥ १

पैसा पाहुनि म्हणती, 'या जी ! रौप्य पाट मांडिला बसा जी !' वाजीवर गोमाशी ताजी, तैसे गुलाम करिती हांजी, अर्जी विनविति फर्जी, जैसा गुर्जर श्वानापरी धांवती, या या म्हणती, अडणीवरती सुवर्णताटीं रत्नखचित वाट्या मांडुनि, पाट रुप्याचे, बुटुनि चण्याचे सोले ओले, मिरेंधण्याची दालचिनीची चमचमीत फोडणी हिंगाची, भुकटी घालुनि तीक्ष्ण आमटी, दाटी जाहली पदार्थांची. पात्रीं शाखा चोखा, आंबे साखरलिंबें, दाळिंबाचे दाणे काढुनि, नीतळ शीतळ. पन्हें फुटाचें, तिखटमिठाचें, थालिपिठाचें, मिष्ट बहु तें पिष्ट, बदामी वाटुनि डाळी, भजीं निराळीं, घोंसदोडके, वांगीं सगळीं, चवळी विचळी, आणि पडवळी, मेथी पोथी, केळें, रायआंवळे, भात शुभ्र तो जिरेसाळिचा, खाजी करंजी, घ्याजी दाजी, आग्रह करिती, साखरमांडा, उंडा भरपुरणाचा धोंडा, तोंडापुरता बोलिति गोंडा हांडाभर द्रव्याला पाहुनि नाचति देखा.॥ आहारे०॥ २

आंगीं भरद्रव्याचा ताठा, मर्कटचेष्टा, कंठी पेटी निर्ळिच आंगठी, रेशिमकांठी धोतरजोडा, कानीं चौकडा, बसायाला खासा घोडा, पैजारी मखमाली जोडा, पहा बरोबर स्वार धांवती, नगारखाना तोफा सुटती, एक कडाका

मोठा धडाका, गुलामाचा सलामाचा, थाट ऐका, पहा पुढें भाट गर्जती, बडे-पणें लोकांस छळती, वळती करून संपत्ति आणिती, ऐसे गुलाम पाजी लुटती, झडेझपाटा बांधुनि नेती, त्याशीं नाना प्रकारें छळिती, घरीं कांतेशीं मिळे न माती, अंतकाळीं प्राण जातो, यम शेंडी धरितो देखा. ॥ आहारे० ॥ ३

अंतकाळीं कोणी धांवेना, मामा बाबा आबा अण्णा, फुई मुई चुलती कुलती, वहिनी बहिणी नाहण्या आया, अवध्या तोंडापुरत्या बातखवाल्या, कोणी नाहीं अंतिं धांवल्या, शेवटीं गुलाम फुका मेला, कोणी नाहीं आडवा आला, यम म्हणे विड चापाला, खुर्दा उठाव मुर्दा, अमृतराव शाहाणा पा-हाणा, सध्या गुण हरिचे गाउनि ध्याउनी वरी जमविली नौका. ॥ आहारे० ॥ ४

अमृतरायकृत आख्यानें.

पूतनावधाख्यान.

(दोहावृत्त.)

हार हार हार हरको नाम । मंगलकारक मंगलधाम ॥
श्रीमद्भागवती हरिलीला । शुकमुनि गावत फिरे अकेला ॥ १
रायपरिक्षितको भयो शाप । अटत अटत तांहा आये आप ॥
आदर कर नृपति पद गय्ये । तब हरिचरित शुकमुनि कहे ॥ २
ब्रिजमो निजरिपु जन्मो कहान । इह धुनि कौंस सुनी जब कान ॥
अंतरगत अतिचिंता भई । ताहामो आई पूतनाबाई ॥ ३
आज्ञा ले गोकुलमो चली । ब्रिखलतिका नृप सुखते खुली ॥
जिसको हय लरकोका आहार । सोती गृहमो करे बिचार ॥ ४
डायल चुडेल बालककी खुनि । उलट भेख सुरललना वनी ॥
गृहमो आय अचानक बैठी । नंदभुवन आसन जा बैठी ॥ ५
वहांको रूप देख ब्रिजनारी । चकित थकित भये सकल बिचारी ॥
कोइ कहे दिव्य इंद्रकी शचि । बोलत आपने आपने रुचि ॥ ६
कोइ कहे लछिमी, कोइ गौरी । कपट भेक देख भई बावरी ॥
हो तुम कोन कहांसे आये । पुछके नहिं अचरजु पाये ॥ ७
कामरूपधर सुंदर नार । मुखमो रदन खुले जो अनार ॥
चंद्रआननी पंकजनयनी । अधरप्रवाळ लाल कुच वैनी ॥ ८

कोमलअंग भुजंगम वेनी । गलितकुसुम चलि ब्रिजदुखदायिनी ॥
गृहमों आय करे संचार । हरिमारनको करत विचार ॥ ९
कृष्णका यह करत कयास । रोय उठे हरि बालबिलास ॥
लघुमंचक कंचनके डौरे । जननि झुलावत प्रभुविन डौरे ॥ १०
बालघातिनी आई पास । नयनन मोद रहे जगनिवास ॥
पोहोची निकट निपट अनिवार । जैसी म्यानमोकि तरवार ॥ ११
खलदुर्जनको अंतरभाव । अंतरजामी जानत डाव ॥
कालभुजंगम ज्यानक सोयो । रजोबूथसें धरकर लीयो ॥ १२
कृष्ण उठाय हिरदेसे लीयो । विखमर्दित कुच मुखमो दीयो ॥
कृष्णसाप जो तनसों लागो । प्रानपान करवे कुच त्यागो ॥ १३
मेरो नंद लाल बहुरंगी । रुधिरहारनकी लागि सुरंगी ॥
ले जसोमति! ले अपने पूत । इह पूतनको लागे भूत ॥ १४
रंग करि अइ चलबिसवासरि । विकल भई रजनीचरनारी ॥
ले ले कहत जसोमति! दौर । आनंदभरन भयो कछु और ॥ १५
छोड छोड कहे रे! लघु बाल । छुटत नही असुरनको काल ॥
मेरो छमा करो अपराध । .... ॥ १६
अरे महाराज! मुगुत मै पाऊ । गई फेरमै अज नई आऊ ॥
चंड भयंकर बडी अकास । आय सके नहि ब्रिजजन पास ॥ १७
आन बनी मोतनकी वेर । काहाको कहा कहे भई जेर ॥
निकटसमय मरनेकी बिरिया । छी छी करत व्याधकर चिरिया ॥ १८
आपुन कियसो आये आगे । प्रानपयान पंथनसो लागे ॥
अग बग भगिनीकु लाभकी । प्रान गये धरनीपर झोकी ॥ १९
झुकत झुकत जो मारी हाक । तीन भुवनमो उपजो धाक ॥
सर्गपातालके लोक भयाभित । जल स्थल सकल विकल बिपरीत ॥ २०
जगत चौगडी गुंग हो गई । प्रेत पूतना जिन भई ॥
बकी कुटिलको सई दाई । छ कोश धरनीपर तब सोई ॥ २१
हात पाव लंबे अतिभारी । अलख झाडकी धजा उभारी ॥
प्रानदूतने किलो चलाव । अग बग दैत्यननकु बुलाव ॥ २२
पर्वतसे कुच मर्म्मकि ठाडी । जुवा चरनेकु वकरी छांडी ॥
बडे नाशीकपाहाडकी दरी । अतिदुर्गंधि नरकी झरी ॥ २३

नयन भये दो अंधे कूप । पाव गिरे जडफत्तररूप ॥
हालसमान उचे है दात । अजगरलंब पसारे हात ॥ २४
कालस्वरुपा अतिविक्राळ । उप्पर खेले श्रीगोपाळ ॥
कहा बकीको भाग बखानूं । हृदई मलवटपुत्र हिमानु ॥ २५
ताहामो श्रीमत बालमुकुंद । .... ॥
आज मुकुंद गयो सो पायो । पटपल्लवते लपट छुपायो ॥ २६
रछ्या कर गोपुच्छ फिरावे । मंगलनाम हरको गावें ॥
गृहगृह उदित भयो आनंद । ब्रिजजन देखन अये गोविंद ॥ २७
संकट हारसुख ब्रिद बधाई । सब मिले ग्वालनीबाई ॥
मथुरा कौंसको दरबार । नंद गयो देने करभार ॥ २८
आनकदुंदुभीकु मिल चले । आये निकट ब्रिजमारग भुले ॥
गौरी पूतना जो व्यवस्था । बूज गयो बाछाईरस्ता ॥ २९
खबर कहे सब मिलके अहिर । चकित नंद कछु नर हयो धीर ॥
देखत हरि आलिंगन देत । प्रेमभावको अंतरहेत ॥ ३०
खडखड कर देहे जरायो । चिताधूमको सुवास आयो ॥
फैल गयो नभमो कछु धूम । खुब बाईकी आई धूम ॥ ३१
अगर चंदनसे उत्तमसे सुवास । ब्रिजजन मगन आवे पास ॥
पापबुद्धिसे पापिन आई । वैकुंठ चली पूतनाबाई ॥ ३२
यह देहकूं परि सुखनाम । भई पूतना आत्माराम ॥
ग्वालग्वालनि करे आनंद । अमृतरायकूं परमानंद. ॥ ३३

सुदामचरित्र.

अजब है गुरूजी वोही कारसाल । खलकबीच म्याने वोहीका रसाल ॥
वोही है करंबक्ष साहेब धनी । उसीकू कहे कूल आलंगनी ॥ १
उसीने बनाया जमी आसमान । पवन आब आतस बनाया मकान ॥
सरग मृत्यु पाताल येभी तिन्हो । हरी हर जो ब्रह्मा कल्हावे तिन्हो ॥ २
बनाया जो बंदा सबब बंदगी । नही जान तावों पडा गंदगी ॥
जबरदस्त माया लगाई पिछे । भवर जाल करकर भुलाया उसे ॥ ३
हमेशा फिकिर पेटकी है लगी । जिकिर याद मौला नही बंदगी ॥
गुन्हेगार बंदा फिरे दरबदर । गिरफ्तार होकर हुवा बेखबर ॥ ४

किधर दीन दुनिया किधर है खुदा । सबब पेटकी मांगता है गदा ॥
अगर उस खुदाकी करे बंदगी । मिले रोज न्यामत कटे गंदगी ॥ ५
इसीका ज्यो तपसील बोला जिकर । करो माफ तकसीर साहेब मेहेर ॥
भगत एक औ जब सुदामा हता । सुनो कूल आलम उसीकी कथा ॥ ६
तुटे झोपर्डीमो रहे तीन बांस । उपर ना मिले एक तिनखा जो घास ॥
पवन छाव गर्मी बदनपर सहे । करे बंदगी वो किसे ना कहे ॥ ७
रहे लालमो मस्त कर्ना जिकर । करे रोज फीकर कबीला पिसर ॥
उघाडे बदन एक कपडा नही । नही ख्वापमो एक लोटा कही ॥ ८
हमेशा करे वो किसनकी जिकर । कहे बीच घरमो करो मत फिकर ॥
मुरब्बी हमारा किसन है बडा । रहे द्वारकाबीच राजा खडा ॥ ९
खजीना ज्यो मामूल दौलत धनी । रहे लच्छमी आप पूरन बनी ॥
मेहेरबानगी है उसीकी कमाल । करो याद उसकी ज्यौ साहेब जमाल १०
नही दर्स उसका तभी लग गमी । मिले बाद उसके हमे क्या कमी ॥
करो ईसकी सूमरो तुम जिकर । फजरकी ज्यो है तुम मत करो फिकर॥ ११
कबीला कहे वो किसन कौन है । नही जाय मिलते सबब कौन है ॥
अप्सरोज उसकी बडाई करो । किसी कामकीभी अनामत धरो ॥ १२
सुदामा कहे मै सिधारू फजर । पडा दस्त खाली धरू क्या नजर ॥
कबीला गयी एक हमसा हके । मुठी तीन चुडवे दिये लायके ॥ १३
चलो अब सिधारो सिताबी करो । मिलो उस किसनके कदम ज्या धरो ॥
हकीकत कहो कूल दर्मादगी । करेगा ज्यो तुमपर मेहरबानगी ॥ १४
फटा एक कपडा बदनपर हता । कहू देखनेकूभी शाबुत नथा ॥
उसीबीच चुडवे लिये बांधकर । चला याद करता किसनका जिकर॥ १५
निकल कर गया बीच जंगल उदास । मिले आप पूरन बडे दखरास ॥
कुरंगन मिली तास दहेने गये । औरभी सकुन खूब उसकू भये ॥ १६
बजाया सुकर वे खुशाली भई । फिकरकी जिकर कूल उसकी गई ॥
चला जाय आगे शहर द्वारका । ज्याहां है परब्रह्म साहेब निका ॥ १७
शहरबीच बैठा सुदामा बम्हन । किसनके चरनसे लगी है लगन ॥
जगी जोत कंचन महाल है खडे । जडे बीच कंकर उजाला पडे ॥ १८
शहरमो बसे कूल आलम सुखी । नही ख्वाबमो एक कुत्ता दुखी ।
खुली बागशाई घरोघर चमन । पढे वेद चारो मगन है बम्हन ॥ १९

---

१. 'हुनर' असाही पाठ आहे. २. 'आजन' असाही पाठ आहे.

शहर देखकर कर अचंबा हुवा । फिरे ज्या बजाज्यो दिवाना हुवा ॥
काहां है किसन ये शहरका धनी । करामात उसकी अजब है बनी २०
जुबानी ज्यो आलमकु पुच्छता चला । कहे लोक ये है किसनका कबीला ॥
किलेपास ज्या कर ज्यो थाडा रहे । पुकारे ज्यो दर्वान तू कौन है ॥ २१
बिरादर हमारा किसन है जिगर । सिताबी करो तुम उसीकू खबर ॥
इसम है सुदामा कहो जायकर । वोही ज्यानता है करो मत फिकर ॥ २२
कहत है दिलोमे ये कंगाल है । किसनका बिरादर अजब बात है ॥
सचा या झुटा बीच ज्याकर कहो । कहो सामने ज्याय थाडा रहो ॥ २३
गया बीच अंदर ज्याहां तक्त है । किसन आन बैठा वोही वक्त है ॥
खडा सामने ज्याय कीया सलाम । किसनसो कहे मै तुम्हारा गुलाम २४
करूं अर्ज साहेब कहो मै खबर । सुदामा खडा है तुम्हारा जिगर ॥
एही बात सुनकर किसनजी चले । खडाथा सुदामा वहां ज्या मिले ॥२५
अगर उस घडीकी खुशाली कहूं । नही हो ज्यो कहता ज्यो चुप क्या रहूं॥
लगाया गले प्रेमआसू चले । मिले वो किसनके गले सो गले ॥ २६
पकड दस्त उसका महलमो चले । औरभी बिरादर गलेसो मिले ॥
बिठाया उसे ल्यायके तक्तपर । बजाये नगारे उसी वक्तपर ॥ २७
मिठाई मंगाई ज्यो सिरनी शकर । गुनीजन लगाई खुशाली जिकर ॥
मिले भाट कीये पवाडे शुरू । उसी वक्त नौबद कियीथी शुरू ॥ २८
महलबीच रानी ज्यो रुक्मिन परी । औरभी सहेल्या मिशालेपरी ॥
सरंज्याम वो आरतीके तबाक । सभी ले चली ज्यो खुली आबताब ॥ २९
सीताबी चली तक्तके सामने । कियी आरती वो खडी सामने ।
तमासेके खातर ज्यो आलं मिला । नही ठौर किसका भरा है किला ॥३०
चरण धोवनेकू बुलाया ज्यो आब । खडे किसनजी सामने बा अदाब ॥
चरन धोयकर कर ज्यो तीरथ लिया । निडलबीच केसरतिलकभी किया ३१
दियीथी रजा कूल आलम चला । पलख बीच खाली हुवाथा किला ।
बुलाया ज्यो वस्ता हजामत किई । अतर सो बदनकी ज्यो मर्दन भई ॥ ३२
गरम आब कर कर न्हलाया उसे । पिन्हाया पितांबर सुदामाजिसे ।
गई मांदगी वो हुवाथा खुशाल । चिरावो मुकेसी उढाई दुशाल ॥ ३३
इसी बाद अंदर रसोई भई । कनकथाल म्याने परोसी गई ॥
पकाये ज्यो पकवान पोल्या पुरन । बनाये वडे भात केसर बरन ॥ ३४

शकरबीच डाली पकाई ज्यो खीर । कनकके कटोरे परोसी ज्यो खीर ॥
बनाये ज्यो पापड वडी मुंगकी । दहीका ज्यो चक्का कढी छाचकी ॥ ३५
बनाये ज्यो तर्कारिया भात भात । निमकभी परोसा उसीके ज्यो सात ।
निंबु आंबके परोसे अचार । और जिन्नसोका नहीं है सुमार ॥ ३६
बुलाये ज्यो बह्मन रुषेसर मुनी । बुलाये सन्यासी ज्यो पंडित गुनी ॥
बुलाये शहरके बडे साहुकार । बिरादर संगोका नहीं है सुमार ॥ ३७
सभी न्हायकर कर ज्यो अंदर गये । कनकथाल उनको सबको दिये ॥
सभी मिल एकट्टे आपोसन किये । भजन कर किसनका निवाला लिये ३८
परोसे ज्यो रुक्मिन सहेली और । ज्यो ही मांगता है धरे उस ठौर ॥
मिलायें ज्यो खुषबोय पानी पिये । सभी आफ कर कर ज्यो ढेकर दिये ३९
सहेली ज्यो पंखा करे बीचमो । मखी ना फिरे ज्यो उसी चौकमो ॥
कहे हात जोडे सभीको किसन । सभोने कहे हम हुये है मगन ॥ ४०
उठे हात धोकर ज्यो संसारकु । नहीं आवना बीच संसारकु ॥
बिछोने कियेथे उसी तक्तपास । सभी आन बैठे उसी तक्तपास ॥ ४१
पके पान लवंगा सुपारी चिकन । सभी चावकर कर हुवे है मगन ॥
रजा मांगकर कर सदनकु गये । किसनजी सुदामा येही दो रहे ॥ ४२
किसनजी पुच्छे तुम सुदामा कहो । तुम्हारी खबरजी काहां तुम रहो ॥
बहोत दीन पीच्छे आज मिलना हुवा । खुदाके दरगाहमे ज्यो मांगी दुवा ॥
सुखी है कबीला तुम्हारा पिसर । कहो कूल आपनी हकीकत जिकर ॥
शहर उज्जनी बीच रहे खुर्दसाल । पढाई ज्यो बिद्या गुरुने कमाल ॥ ४४
गुरुके हुकुंमसे ज्यो जंगल गये । बंधी कावडीबीच लकडी लिये ॥
बरस्ता ज्यो मेहू मुसलके मिसाल । चमकती ज्यो बिजली अगनके मिसाल ॥
दरखथा ज्यो बडका वाहां ज्या खडे । पवन ज्यो झकारे लगेथे बडे ॥
उसी वक्त तुमने ज्यो धोती लियी । सिरोपर हमारे ज्यो छाया कियी ॥४६
वाहांसे ज्यो आये नदीपूरपास । हमारीभी कावड लगाई ज्यो पास ॥
तिराया जो हमकू नदीपार है । कियी तुमने सेवा मुजे याद है ॥ ४७
लगी भूक हमकू ज्यो व्याकुल भये । हमारीभी कावड तुमने लिये ॥
दिखाई नहीं है दुजाई कभू । वाहांसे ज्यो मिलना हुवा है अभू ॥ ४८
सुदामा कहे तुम किसनजी सुनो । हकीकत ज्यो मेरी कहू तुम सुनो ॥
दलिद्दर हमारे लगा है पिछे । नही कुच कपडा कबीला उसे ॥ ४९

तुम्हारी ज्यो बाता मिठी मै सुनी । दिलो बीच मेरे रही है बनी ।
बडा राज तुमकू काहांसे मिला । दलिद्दर हमकू काहांसे चला ॥ ९०
सुनो जी सुदामा किसनजी कहे । पुरबकी ज्यो कमाई गाडी रहे ।
उसीसे मिले राज संपत धनी । करममो लिखी सो रही है बनी ॥ ९१
सखावत तुम्होने कछू ना कियी । नही दच्छना तो ब्रह्मनकू दियी ।
खिलायेना ब्रह्मन सुखी ना किये । कभू ना बनारस तिरथमो गये ॥ ९२
पढे बेदका पुन्न येही हुवा । उसीसे ज्यो मिलना हमारा हुवा ।
तुम्हारे कबीलाने भेजी नजर । करो तुम सिताबी हमारी नजर ॥ ९३
बचन सुन सुदामा ज्यो चुपका रहे । शरमके ज्यो मारे कच्छू ना कहे ।
फटाथा ज्यो कपडा वोही खोलकर । मुठी तीन चुडवे वोही खोलकर॥ ९४
बुलाई ज्यो रुक्मिन दिये मातमो । मिलाई ज्यो शक्कर उसी सातमो ।
मुठी दोये आप खाकर गये । रहे एक मुठी सो रुक्मिन लिये ॥ ९५
कहे किसनजी बिश्वकर्मा काहां । उसी वक्तपर आन ठाडा रहा ॥
कहे कानमो तब उसीका जिकर । सिताबी बनावो सुदामानगर ॥ ९६
बनावो शहर द्वारकाके मिसाल । महल कंचनोके हमारे मिसाल ।
किसी बानकी तुम करो मत कमी । न खाली रहे एक अंगुल जमी ॥ ९७
उसी वक्तपर बिश्वकर्मा चला । पलखमो बनाया सुनेका किला ।
सरमज्याम दौलत तयारी किई । खबर आनकर किसनजीकु दिई ॥ ९८
सुदामा ज्यो करता है घरकी फिकर । उधर क्या हुवा है नही है खबर ।
किसनजी दिलावे सो आपनी खुसी । वोही है जो तबरुख उसीकी खुसी ॥
सुदामा जो उठ कर थाडा रहे । रजा मांगताहूं किसनकु कहे ।
भला तुम सिधारो कहे कृष्ण राम । कबीलेकु आपने कहो ज्या सलाम ॥
किसनजी कहे तुम सुनो एक बात । पितांबर चिरा शाल लेवो न सात ।
रहाबीच काबे बडे चोर है । मिलेगे ज्यो तुमकू बडा घोर है ॥ ६१
बचन सुन सुदामो चुपका रहा । शरमके ज्यो मारे कच्छू ना कहा ।
फिकिर बंद होके रहासे चला । दिलोमे कहे चोर येही मिला ॥ ६२
याहांसे ज्यो खाली मै घरकू गया । भरम था किसनका वो सब उड गया ।
वाहां जायकर मैं करूं क्या जिकर । पुछेगी कबीला धरूं क्या नजर ॥ ६३
किसनकी बडाई वहां मैं किई । याहां आनकर कर सबी वह गई ।
अगर ज्यानता मै वाहाईसे किसन । तो हरगीज न धरता रहापर कदम

अजब किसनजी ये ठकाई शिका । लिये छीन कपडे चलाया रुखा ।
मुजे इस किसनका भरोसा बडा । नहीं एक दीया नदीका खडा ॥ ६५
नन्होपन दधी दूध चोरी किई । वोही खोय इसकी अभी ना गई ।
हमेशा ज्यो गोरू चराया किया । काहासे बडा ये किसन वो भया ॥ ६६
हमेशा परद्वार करता फिरे । पराये कबीले घरोमें धरे ।
अवल ज्याय मिलते ज्यो आदर किया । चलते वक्त आखर फजीता किया॥
अजब अकल उसकी करो क्या जिकर । कछू भी ना कीई हमारी फिकर ।
किसनके घरोमे कमी कुच नही । करमहीन अपने येही है सही ॥ ६८
चरनकू झुटा बिरद बांधा फिरे । कहत है भगतकी मदत वो करे ।
जगतकु उधारे येही झूट है । भगतकी जो बाता चहू खुट है ॥ ६९
न्हनेका बडा मैं जो देखा इसे । नवाजस इसने कियाथा किसे ।
पितांबर चिरा शाल मुजकू दिई । मकर आप कर कर वोही फिर लिई ॥
कछू भी ना कहे येही बातसार । इसी किसनका न मिले अंतपार ।
रहे आप न्यारा करावे ज्यो ख्याल । उसीका मुतर है तमासे मिसाल॥७१
येही फिकिर करता रहासे चला । उपर देखता काग सीधा चला ।
कहे आवते प्रश्न अच्छे हुये । किसनके मिले सभी फल गये ॥ ७२
चलाथा जो आगे शहर देखता । कलस है सुनेके शहर देखता ।
कहे मै भुला फेर आया पिछे । चरावे ज्यो गोरू उसीकू पुछे ॥ ७३
शहर द्वारका एक पीछे रही । नजर आवता नाम इसका सही ।
गुराखी कहे क्या तुम्हारा इसम । तुम्हारा ज्यो ज्यानो नगरका इसम ॥७४
सुदामा कहे ये मजा खा करे । सितावी कदमकु ज्यो आंगे धरे ।
और एक गौली चरावे ज्यो ढोर । उसीकु पुछे कोनसा ये शहर ॥ ७५
इसे वो कहे है सुदामानगर । नया अब सुनेका वसाया फजर ।
सुदामा ज्यो ताजुब दिलोमे करे । अजब ये गुराखी ज्यो बाता करे ॥ ७६
वाहासे सितावी ज्यो आगू चला । और एक गौली रहासे मिला ।
उसेभी पुछे ये शहर कोनसा । उसीने कहा ये नया है वसा ॥ ७७
चली खबर उसकी गई तक्तमो । बजाये नगारे उसी वक्तमो ।
सरमजाम दौलत तयारी किई । चले साथ वो पालखी ज्यो लिई ॥ ७८
दखडते बी आये सितावी चले । ज्याहा आन कर कर सुदामा मिले ।
छुटा तोफखाना हुवाथा गजर । रुपय्ये आश्रफीकी हुईथी नजर ॥ ७९

सुदामा चढे पालखी बीचमो । चले बाजते सब नगर बीचमो ।
हुईथी ज्यो चौरी लगे मोरचल । लिये हातसे फुकारे जसवल ॥ ८०
दुतर्फा फौजकोर बंदी चले । निशान बी माहीमरातब खुले ।
चले आस्वको तल कियेथे तयार । ज्योई बीच पैठे उसे मार मार ॥ ८१
चढे ज्यात परधान बहलो उपर । लदे ज्यात तंबू कनाता शुतर ।
मगनमस्त हाती चले ज्यात है । कलावत गुनीजन चले गात है ॥ ८२
चले भाट ललकारते बीचमो । पवाडे लगाये फौज बीचमो ।
शहर कुल्ल आलम तमासे चला । इस किसम आंगे सुदामा चला ॥ ८३
सिताबी चलेथे घडीबीचमो । हुये ज्याय दाखल शहरबीचमो ।
किले बीच पैठे वोही शुभ घडी । सखावत शुरू वो किईथी बडी ॥ ८४
सुदामा ज्यो ज्याकर वोही वक्तपर । चला जाय बैठा उसी तक्तपर ।
किया फर्श वो तक्तके सामने । रहा कुल्ल आलम खडा सामने ॥ ८५
बठाया सबोकू कीई दिल भरी । मंगाई ज्यो सिरनी शकर मीसरी ।
बुलाई मिठाई भरे कनकथाल । चले बाटते कुल्ल आलम खुशाल ॥ ८६
मंगाये पके पान सबोको दिये । रजा मांग कर कर सदनकु गये ।
महलमो कबीला बनाया सिनगार । पुरे बाल मोती नही है सुमार ॥ ८७
सुनेके अलंकार कंकर जडे । जगा ज्योत उसका उजाला पडे ।
सरमजाम वो आरती वो चली । मिसाले वो बिजली चमकते चली ॥ ८८
किई आरती वो खडीबा आदाब । उजाला पडावो खुली आफताब ।
सुदामा ज्यो देखकर हुवा सुध भुला । पडीथी आंधारी सुजेना भला ॥ ८९
कहे मै खडी वो तुम्हारी ज्यो दास । नही ज्यानते केंव हुये वो उदास ।
खडे है ज्यो लडके तुम्हारे पिसर । नही ज्यानते केंव गये हो बिसर॥ ९०
कहां झोपडी है हमारी मकान । कबीला कहे ये तुम्हारा मकान ।
बिरादर तुम्हारा किसन सावला । बनाया महेल ये सुनेका किला ॥ ९१
अजब किसनजी ये तुम्हारी लिला । पलखमो बनाया सुनेका किला ।
मुठी तीन चुडवे वोही खायकर । किई उस किसनने हमारी फिकर ॥ ९२
किसनजी तुम्हारी मै बंदी किई । दिलेबीच तुमने कछू ना लिई ।
करो माफ तकसीर साहेबकिसन । हमेशा करो मै तुम्हारा भजन ॥ ९३
महलमो कहत है सुदामा बहन । किसनके चरनसो लगावो लगन ।
नमस्कार बोले तुम्हे कृष्णजी । संदेशेकु रखना नही बीचजी ॥ ९४

दिलाई ज्यो दंवडी शहर बीचमो । पुकारे घरोघर नगर बीचमो ।
किसनके भजनबीन ज्यो कोऊ रहे । सजावर उमीको फुकारे कहे ॥ ९५
सुदामा भजनमे हमेशा मगन । किसनके चरनसो लगाई लगन ।
भजनबीच सारी गई जिंदगी । मिले रोज न्यामत कटे गंदगी ॥ ९६
चरीतर सुदामाका ज्यो कोउ पढे । चला जाय वैकुंठ उपर चढे ।
हमेशा किसनके चरनसो जडे । जनमके भरोभर कभू ना पडे ॥ ९७
बनाया चरीतर किसनका ज्यो नाम । किसनके कृपेसे हुवा ये तमाम ।
उसे किस्नका सिमसारा बनाम । कहे राव अमृत वहीका लियो नाम ॥ ९८

दामाजीचरित्र.

वारी संकट हरि दामाजीचें, । कौतुक देवाचें. ॥ ध्रुवपद. ॥
यवन बेदरिंचा तो अधिकारी, । त्याचे दरबारीं ।
दामाजीपंत कारभारी, । बहु खबरदारी ।
जाणुनि मंगळवेढियाचें । ठाणें दिधलें पूर्ण कृपेनें. ॥ वारी० ॥ १ ॥
पडला दुष्काळ पृथ्वीवरता । ही विठ्ठलसत्ता, ।
विप्र पंढरिचे म्हणती, 'ताता ! । दामाजीपंता ! ।
धान्य देउनी तारीं आतां । जिववीं जीवन ब्राह्मणांचें.' ॥ वारी० ॥ २ ॥
धेनूकांसेप्रति दुग्ध नाहीं । वत्सासीं पाहीं, ।
हें तों समुळची न कळे कांहीं । सत्याची आई, ।
हुमण्या मारितसे लवलाहीं । ऐसे स्वभाव बाळकाचे. ॥ वारी० ॥ ३ ॥
जैसे दुर्वास आले छळणा । ऋषिसहित जाणा, ।
अर्धरात्रीं पांडवसदना । मागति ते अन्ना, ।
इच्छाभोजन आमुचे वदना । सत्वर द्यावें साजुक साचें. ॥ वारी० ॥ ४ ॥
भगवद्भक्ताचा निश्चय ऐसा । न ढळे तो सहसा, ।
सत्व रक्षावें, प्राण जैसा, । न धरावी आशा, ।
श्रीहरिचरणांचा भरंवसा । जाणुनि घ्यावें बाण मतीचें. ॥ वारी० ॥ ५ ॥

---

१. ज्या दुष्काळांत दामाजीपंतानें सरकारी धान्य गरीब लोकांकडून लुटविलें तो इ० स० १४६० म्हणजे शा० श० १३८२ साली पडला होता. त्या वेळीं बेदर येथें हुमायून नांवाचा अत्यगाम ब्राह्मणी वंशीय म्हणविणारा यवन राजा होता. तो इ० स० १४५० पासून इ० स० १४६१ पर्यंत गादीवर होता. या वंशाचे एकंदर १८ राजे होते. इ० स० १३४७ पासून इ० स० १५२६ पर्यंत यांनी राज्य केलें. प्रथमतः या वंशाच्या राजांची राजधानी गुलबर्ग्यांत होती. पुढें इ० स० १४२६ त बेदर राजधानी झाली.

ह्मणि या सत्वाची होइल हानी । पुण्याची काहणी, ।
हरिश्चंद्र होता तारा राणी, । डोंबाघरीं पाणी ।
वाहुनि सार्थक केलें त्यांनीं । आपुलिया जन्माचें. ॥ वारी० ॥ ६ ॥
ऐसें ध्यानासी आणुनि पंत । राहीले स्वस्थ; ।
भावें जोडुनियां दोन्ही हस्त । केला प्रणिपात, ।
पेवें दाउनियां मग त्वरित । स्मरलें दैवत भीमातीरींचें. ॥ वारी० ॥ ७ ॥
स्नेहें ते ब्राह्मण मिळोनि सकळ । बोलती लडिवाळ, ।
म्हणती, 'दामाजी पूर्ण दयाळ । हृदयीं कनवाळ.' ।
'जयजय विठ्ठल' म्हणोनि लुटिती । असंख्य धान्य भांडारींचें. ॥ वारी०
गोण्या बैलावर डोई मोटा । संतोष मोठा ।
करिती द्विजकुळ बहुताचा सांठा । वर्षाचा वांटा ।
पुरवी सर्वेश्वर नव्हे तोटा । अवघ्यांच्या पोटा ।
'राजद्वारीं विजयी व्हावें' । ऐसे आशीर्वाद गर्जति वाचे. ॥ वारी० ॥ ९ ॥
'तुझिया पुण्यासी पार नाहीं. । वर्णावें काई ? ।
यासी श्रीविठ्ठल असे ग्वाही, । निश्चयता पाहीं, ।
अन्नदाता श्रीभगवंत । करि संरक्षण या जन्माचें.' ॥ वारी० ॥ १० ॥
विप्र धान्य घेउनियां गेले. । मग काय झालें ? ।
होते दुर्जन ते अवघे पळाले, । दरबारा गेले, ।
बहुत प्रकारें जाउनि भकले; । दुर्जनपंक्तिस सज्जन कैंचे ?॥ वारी०॥ ११
मुजुमदारानें लिहिली बखर, । ही अवघी खबर; ।
'साहेब ! दामाजी हरामखोर, । फोडुनि कोठार ।
पंढरपुरचे ब्राह्मण लुटिती । खोटें कर्म सरदाराचें.' ॥ वारी०॥ १२ ॥
कावळ्याजवळी तो राजहंस, । कैंचें सुख त्यास ? ।
पतिचे ठायीं जारिणीस । नाहीं विश्वास, ।
दुग्ध पाजिलें सर्पास । परी गरळ येती विषाचे. ॥ वारी० ॥ १३ ॥
जैसा गज गाढव न पवे सर, । कांदा कापूर, ।
धर्मदुर्योधना जैसें वैर, । सोमल साकर, ।
दुर्जन सज्जनासि छळिती, । जैसें मसणीं कर्म भूतांचें. ॥ वारी०॥ १४ ॥
पाहतो पारधी मारितो हरण, । कुसरी वध करुन, ।
येतां दुष्टांसी बहुतचि शरण, । परि चिंती मरण, ।
दुर्जनहृदयीं करुणा नाहीं, । मानव देखुनि मन व्याघ्राचें. ॥वारी०॥१५

पत्र पावलिया बेदरासी, । कळलें यवनासी, ।
भोजन करितां हो! जैशी मासी । सर्वचि तें नाशी ।
ग्रहणीं राहु गिळी चंद्रासी । तसें मानस झालें त्याचें.॥वारी० ॥१६॥

केली यवनानें तैं इतराजी, । झाली बेमर्जी, ।
तेथें कोणाचीं न चले अर्जी, । कोण जाउन वर्जी ? ।
फर्जी जैसा गर्जुनि बोले । स्वरूप बुडविलें अमलाचें. ॥ वारी० ॥ १७॥

'बह्मन वैष्णवकी जात खंदी । बडि हरामजादी, ।
ल्या बे! दवडो पकडो तुम जल्दी.' । बहु क्रोधें निंदी, ।
'किया मसाला बडा कसाला.' । न मानी वचन त्या वजिराचें.॥वारी०॥

तल्बदार पाठविले हुजरे, । ते करिती मुजरे, ।
'नाहीं दामाजी! तूझी गुज रे! । अम्हि नेऊं तुज रे! ।
चल बे! बह्मन काफर गिद्दी.'। ऐसें कठोर बोलती वाचे. ॥वारी०॥१९

सभेसी द्रौपदी आणायाला । दुःशासन गेला, ।
वेणी धरुनी तो घेउनि आला । दुर्योधन त्याला, ।
आज्ञा करितो बहु प्रतापें । 'सत्वर फेडीं वस्त्र सतीचें.'॥ वारी०॥ २०

मरणाचे समयीं दूत येती, । तैसे ते दिसती, ।
पडिला दामाजी चिंतावर्ती । म्हणे, 'विठ्ठलमूर्ती.' ।
शंभर वर्षें भरलीं पुरतीं, । आतां सार्थक काय जिवाचें?॥ वारी०॥२१॥

माझे मनिं आहे एक हेत, । जावें पंढरींत, ।
एकदां करुनियां स्वस्थ चित्त । पाहिन भगवंत, ।
धरुनि नेती घेउनि जाती। बंदिं घालिती मज यवनाचे.'॥वारी०॥२२॥

पत्नी पंताची पतिव्रता । म्हणे, 'पंढरिनाथा.' ।
पडिलें संकट हें वारीं आतां, । महाराज समर्था ! ।
दीनदयाळा! हरि! कनवाळा! । वांचवि आतां प्राण आमुचे. ॥ वारी०॥

बाळही वाहिन तुझे पायीं, । हा निश्चय पाहीं, ।
आम्ही यवनाचे कारागृहीं । तुज टेवूं हृदयीं, ।
आतां पुनरपि येणें नाहीं, । तुझिया चरणीं दर्शन कैंचें?॥वारी०॥२४॥

म्हणती हुजऱ्यांसी, 'स्थीर स्थीर,' । बोलुनियां मधुर ।
होते अंगावरि अलंकार । देउनि सत्वर, ।
भोजन घालुनि सुंदर बोले, । 'बाप भाई हो! तुम्ही आमुचे.'॥वारी०॥

पतिच्या दुःखाची देखुन लहरी । सावित्री नारी, ।
गेली वनवासा जनककुमारी । श्रीराम शरीरीं, ।
नळ दमयंती पडे आकांतीं, । तैसें करि ती स्तवन पतीचें. ॥ वारी०॥
हृदयीं गुज कळलें श्रीरंगाला, । सांगे रुक्मिणिला, ।
'धरुनी नेती गे! दामाजीला, । ही लज्जा मजला;' ।
हिशेब घेउनि जातों वहिला,। नग हे द्यावे सत्वर तुमचे.'॥ वारी०॥२७॥
जैसा वनवासा गेला राम, । दशरथासि श्रम, ।
पांडूरंगासि तैसें प्रेम । भक्तांचें परम, ।
धन्य धन्य हा पुरुषोत्तम । कोमळ हृदय बहू तयाचें.॥ वारी०॥२८॥
पांडूरंगानें नवल केलें, । पोतें भरियेलें, ।
धान्यविकरीधन जमेसी केलें, । ठिक अवघें लिहिलें, ।
पाहुनि झडती न पडे अडती, । जाउनि दर्शन घे यवनाचें.॥ वारी०॥
प्रथम यवनासि करुनि जोहार । म्हणे, 'मी विठ्या महार, ।
मंगळवेढियाचा बडिवार, । ऐकावी खबर, ।
पोतें घेउनि मायबापें । उत्तर द्यावें लाखोट्याचें.' ॥ वारी० ॥ ३० ॥
यवनें महार तो पाहुनि नयनीं । म्हणे अंतःकरणीं, ।
'याचे स्वरुपासी पाहतां तुळणी । मज न दिसे कोणी.' ।
क्षणक्षणा अवलोकुनि पाहे । अद्भुत सुंदर रूप तयाचें. ॥ वारी०॥३१॥
जैसें नीर क्षीर एके ठायीं । असतां हो! पाहीं, ।
राजहंसासी अवघड नाहीं । निवडी लवलाहीं, ।
परीक्षवंत बुद्धिवंत । पाहुनि मोल करी रत्नाचें. ॥ वारी० ॥ ३२ ॥
राजा कृत्रिमें झाला कोळी । डोईवर मोळी, ।
चतुर देखुनी चिन्ह न्याहाळी, । तैसा वनमाळी, ।
पांडव जातां विराटनगरीं । राजा नेणें लक्षण त्यांचें.॥ वारी०॥३३॥
तैसें महाराचें देखुनि रूप । भुलला तो भूप, ।
विश्वजनकाचा म्हणवी बाप । यादवकुळदीप, ।
सकळ सभा ते झाली वेडी । टकमक पहाती रूप हरीचें. ॥वारी०३४
अनंत ब्रह्मांडें ज्याचे पोटीं । सांवळा जगजेठी, ।
काळी घोंगडी, काळी काठी, । काळा दोरा कंठीं, ।
बोली महाराची थेट मराठी, । गांडिस लंगोटी, ।
पायिं वाहणा, मोठा शाहणा,। पतीतपावन नाम जयाचें.॥वारी०॥३५॥

कमळदळशोभा नेत्रकमळा, । पाहतां मुखकमळा, ।
मिरवी हृदयीं द्विजचरणकमळा, । विधि नाभीकमळा, ।
कमळा सेवी चरणकमळा, । श्रीहरि निधान क्षिरसागरींचें.॥वारी०॥३६
बोले, 'धन्याजी! उमरद राज! । ऐका महाराज! ।
आम्ही देसाई गरीब नवाज, । साहेब सिरताज, ।
अर्जी करितां झाली मर्जी, । कागद जाब द्यावे सनदेचे.' ॥ वारी० ॥३७॥
म्हणे, 'मी पंताचा बहु कामाचा, । विश्वासू घरचा, ।
बंदा शरमिंदा आहें त्याचा, । जन्मोजन्मींचा, ।
नाजूक जरूर अडलें भिडलें । तेथें काम मज नफराचें. ॥ वारी०॥३८॥
मुजुमदारानें लबाडी केली । खोटी खबर लिहिली, ।
नाहीं तुम्हासी करुणा आली, । तलब पाठविली, ।
लोकांमध्यें अबरू गेली, । कष्टी मन झालें पंताचें. ॥ वारी० ॥ ३९ ॥
मोठा चांडाळ निमकहरामी, । यासी काढा तुम्हीं, ।
आणिली पंतावरती बदलामी, । बेढंग गुलामी, ।
तस्कर बहुत करी तस्करी, । ईश्वर कुशळ न करी त्याचें. ॥ वारी०॥४०॥
नोहे दासीस घरचाकर, । जाणा साचार, ।
आणा ध्यानासि तुम्ही विचार, । कुळवंती नार, ।
कन्या पुत्र बहु विस्तार । तेणें पावे सुख स्वर्गीचें. ॥ वारी० ॥ ४१ ॥
जैसीं खडकावर नोहे शेतें, । पान्याचीं मोत्यें, ।
केलें गणिकेशी बहुतचि नातें, । जन निंदा करितें, ।
कीर्तन हरिचें नाहीं प्रीतीचें । तरी तें सोंग दिसे मैंदाचें. ॥ वारी० ॥ ४२ ॥
नाहीं शूद्राशी वेदसंबंध, । त्यां नकळे भेद, ।
मूर्ख शाहण्याशीं घाली वाद, । मग पावे खेद, ।
लीलानाटकी तो गोविंद । अंतरिं असतां बळ भक्तीचें. ॥ वारी० ॥ ४३ ॥
जैसा वनसिंह ग्रामसिंह, । पहा एकचि नांव, ।
चतुर जाणती त्याचा भाव, । हा श्वानस्वभाव, ।
कुथळ निश्चळ बहु प्रीतीनें । अखंड हाड चघळी ढोराचें. ॥ वारी० ॥ ४४॥
तुम्ही रत्नाची केली गार, । हें अंतर फार, ।
तैसा कानडा मुजुमदार । बहु फजीतखोर, ।
पंतीं सांगितलें साचार । म्हणोनि बोलें धीटपणाचें. ॥ वारी० ॥ ४५ ॥

पायिंचा वाहाण पायिंच बरी, । मज कैंचा थोरी ? ।
सलगी चरणींची केलीच खरी, । माझी वैखरी, ।
हीन दीन मी नीच जातिचा । शरीर तुमचिया अन्नाचें. ॥वारी०॥४६
त्याला हरिवांचुनी नाहीं कोणी, । परदेशी प्राणी, ।
त्याचें मन आहे विठ्ठलचरणीं, । म्हणे चक्रपाणी, ।
श्रीहरि त्याचें करि संरक्षण । जाणुनि लक्षण बहुत गुणांचें. ॥ वारी०॥४७॥
साहेब ! दामाजी बहु कामाचा, । विश्वासू साचा, ।
वदनीं छंद तो हरिनामाचा, । बहु हेत तयाचा, ।
पंढरपुर हरिमंदिर सुंदर । तेथें मन रमलें तयाचें.' ॥ वारी० ॥ ४८ ॥
तसलीम करुनियां जाता झाला, । नवल यवनाला, ।
पोटीं मोठासा विस्मय झाला, । 'बोलावा त्याला.' ।
तंव तो न दिसे म्हणूनि हांसे, । ध्यानीं वाहे रूप तयाचें. ॥ वारी०॥४९॥
'बोली महाराची बहु चतुराई, । ऐका गुरुभाई ! ।
महार नोहे तो शेषशायी, । मज वाटे हृदयीं, ।
धन्य सुकृत दामाजीचें । सार्थक माझिया जन्माचें. ॥ वारी० ॥ ५० ॥
देव तांतडिनें चाले पंथ, । दामाजीपंत, ।
भक्त गांजिला असेल बहुत, । म्हणवोनि त्वरित, ।
जाब ठेउनियां पोथींत, । गीतापुस्तक जें पठणाचें. ॥ वारी० ॥ ५१ ॥
मार्गी दामाजी करुनि स्नान, । करि गीतापठण, ।
यवनलाखोटा अवलोकून, । म्हणे, 'नवल कोण ?' ।
कागद वाचितांची पूर्ण । कळलें तेव्हां कार्य हरीचें. ॥ वारी० ॥ ५२ ॥
जैसें दुष्काळिं मिळे मिष्टान्न, । दुर्बळासि धन, ।
वळला अवर्षणिं अद्भुत घन, । आंधळ्यासि नयन, ।
तैसें विस्मित झालें मन । पाहुनि यवनपत्र सुखाचें. ॥ वारी० ॥ ५३ ॥
पत्रीं बहुत गौरव सन्मान, । 'धान्याचें धन ।
दिधलें परिपूर्ण विठ्या महारानें, । जावें परतून. ।
मुजूमदारी आणि सरदारी । कार्य करावें तुम्हीं तुमचें.' ॥ वारी०॥५४॥
वाचुनी पत्रासि म्हणे, 'अदृष्ट ! । सद्गदीत कंठ, ।
'काय देवानें केलें कष्ट ? । मी तों पापिष्ट; ।
काय ऐसें सुकृत पदरीं । होतें माझें जन्मांतरिंचें ?' ॥ वारी० ॥ ५५ ॥

नेत्रीं जळ वाहे जैशी गंगा, । 'श्रीपांडुरंगा ! ।
राहीरुक्मिणिच्या अंतरंगा ! । शंकरजिवलगा ! ।
परम अमंगळ लाजिरवाणें । किमर्थ करणें कर्म हिनाचें ? ॥वारी०॥५६॥
यवन जरि माझा प्राण घेता, । गर्दन मारीता, ।
बरवें होतें तरि काय चिंता ? । हें काय अनंता ! ? ।
अनुचित करणी चक्रपाणी ! । काय प्रयोजन या कर्माचें ? ॥वारी०॥५७॥
जननीजठरीं जो आला प्राणी, । तो जाइल मरुनी, ।
ऐसा निश्चय हा वेदपुराणीं, । ऐका हो कानीं, ।
सत्त्वशिरोमणि राजा कर्ण । कवच काढुनी दे शरिराचें.॥ वारी०॥५८॥
राजा मयुरध्वज पुण्यवंत, । मोठा विख्यात, ।
शरिरीं घालुनियां करवंत, । सत्त्वाची मात, ।
धर्मपरायण ज्याचें चित्त, । केलें स्वहित बहु जन्माचें. ॥ वारी० ॥५९॥
दैत्यवंशांत बळिची ख्याती, । वर्णावी कीती, ।
आत्मनिवेदन कमळापती, । केली बहु प्रीती, ।
द्वारपाळ तो श्रीहरि झाला. । ऐसे प्रताप ते मौजेचे. ॥ वारी० ॥ ६० ॥
तैसा जरि माझा जाता प्राण, । तरि नवल कोण ? ।
धर्मकार्यार्थी यावें मरण, । हा हेतु प्रमाण, ।
श्रीहरिचरणांची मज आण, । याविण सार्थक काय जिण्याचें ? ॥वारी०॥
कैसें यवनासि दिलें दर्शन, । नीच योनि धरुन ? ।
आतां त्यागिन मी आपुला प्राण, । मज सांग प्रमाण, ।
मजला दर्शन किमर्थ नाहीं ? । धन्य भाग्य त्या यवनाचें. ॥ वारी०॥६२
जरि हें पोतें यवना न जातें, । तरि कैसें होतें ? ।
मजला उद्धरिलें श्रीभगवंतें, । भक्तीचें नातें, ।
नातें नसतें तरि कोण पुसतें ? । नुसतें भगली वैराग्याचें.'॥वारी०॥६३॥
यवनें सोडुनियां पादशाही, । 'दामा ! गुरुभाई !' ।
म्हणउनी यवन लागे पायीं । 'तुझि पूर्ण कमाई, ।
विठ्या महार तो मजला दावीं, । एक वेळ पाहिन रूप तयाचें.' ॥ वारी०॥
म्हणे दामाजी, 'कैंचा तो महार ? । तो रुक्मिणीवर. ।
त्याचा अवघा हा कारभार, । महा पंढरपूर, ।
म्हणउनियां आधीं झडकर । येउनि स्नान करीं भिवरेचें. ॥वारी०॥ ६५

चंद्रभागेसी करुनी नमन, । सांगातें यवन, ।
तेथूनि तांतडिनें केलें गमन, । धीर न धरवे जाण, ।
हृदयीं गहिंवरला परिपूर्ण । जैसें भरतें त्या उदधीचें. ॥ वारी० ॥६६॥
देव गुज सांगे रुक्मिणीला, । 'दामाजी आला, ।
मोठा आनंद वाटे मजला, । दिन सुदिन झाला, ।
भक्तशिरोमणि भेटे आपुला । म्हणोनि विठ्ठल हर्षे नाचे. ॥वारी०॥६७॥
वत्सें देखुनियां जैशी गाय । धांउनियां जाय, ।
जैशी बाळकासि कवळी माय, । वर्णू मी काय? ।
न धरे स्फुंदन अश्रु जीवन । श्रीहरि नेत्र पुसी भक्ताचे. ॥ वारी० ॥६८॥
हरिनें दामाजी हृदयीं धरिला, । समजावी त्याला, ।
'बारे ! श्रम बहुत झाले तुजला, । श्रुत नाहीं मजला, ।
अघटित करणी करून लपवी, । ऐसें लाघव राघवमनींचें. ॥वारी०॥६९
यवन पंताचे योगें तरला, । तो मुक्तिस गेला, ।
होता जन्मांतरिं दोरा पहिला, । यास्तव उद्धरिला, ।
यापरि चरित्र दामाजीचें । श्रवण करितां भवभय कैंचें? ॥वारी०॥७०॥
त्याच्या धान्याचा धर्म झाला, । दुष्काळ निघाला, ।
आनंद पंढरीच्या ब्राह्मणांला, । उत्साह झाला, ।
करुणाकर हरि रक्षित दासा । ऐसें बळ तें सबळ धर्माचें. ॥वारी०॥७१
दऊत लेखणी ठेउन चरणीं, । जोडुनियां पाणी, ।
सोडी संकल्प घेउनि पाणी, । म्हणे, 'चक्रपाणी ! ।
माझे वंशीं जन्मेल कोणी । त्यानें नाम घ्यावें हरीचें ! ' ॥वारी०॥७२॥
हास्य करुनीयां राधारमण । म्हणे, 'दिधलें जाण.' ।
म्हणतां ते इच्छा झाली पूर्ण, । गोवर्धनधरण, ।
ज्याचे वदनीं श्रीहरिस्मरण । भूषण सुंदर तें वंशाचें. ॥वारी०॥ ७३ ॥
नलगे जप तप तीर्थाटन यज्ञ, । बहु ब्रह्मज्ञान, ।
त्याहुनी हें निर्मळ हरिचें भजन, । जाणा परिपूर्ण, ।
धातूंमध्यें श्रेष्ठ सुवर्ण । जाणति बहुजन गूण तयाचे. ॥वारी०॥ ७४ ॥
म्हणत दामाजी, 'विठ्ठलराया ! । करुणाकर ! सखया ! ।
तुझि हे श्रुतिशास्त्रा न कळे माया, । लागेन मी पायां.' ।
तन्मय झाले श्रीहरिचरणीं । हेंचि नवल पंढरपुरचें. ॥ वारी० ॥७५॥

परम प्रीति धरुनि अंतःकरणीं । हें गाइल कोणी, ।
तेथें येउन ऐकावें श्रवणीं, । तरि चक्रपाणी ।
कृपा करुनी निश्चयें देईल । अक्षय सुख तें मोक्षपदाचें. ॥ वारी० ॥ ७६ ॥
येउनि नरदेहीं हरिगुण गाय, । तो मुक्तिस जाय, ।
धन्य श्रीगुरु अमृतराय, । वंदावे पाय, ।
ब्रह्मगिरीहरिचरणीं तत्पर । जैसें पाडस त्या हरणीचें. ॥ वारी० ॥७७॥

महादेवप्रयाणवर्णन.

चली संकरकी असवारी । त्रिभुवनमो बात फुकारी. ॥ ध्रुवपद. ॥

धवला बैल सजो है नंदी, तापर बैठे संकर छंदी, किल्कारते जिल्त्रिमो बंदी, लेवे साथ सुखी आनंदी, निकसो सुरवरथाट, संतसाधोका मेला वाट, सप्तकोटि गण निकसे दाट, साथ बेताल भूतगन खूब बजावत, सिंग तुरैया, करने बाके, ढोल नगारे, धिमि धिमि धिमि धिमि, नौबद झरकत, झल्लर झल्लर तथीं तथीं कडां कडां पखवाज बाजते, खुनु खुनु खुनु जब ताल बोलते, तनं तनं तंबुरे गर्जते, भुं भुं भुं भुं शंख बाजते, चुट चुट चुट चुट ताल चमकते, चवर चीर मोरपिच्छ उरते, लगी निशाण जरबोब फरकते, खूब चऱ्हाई भंग तारसे नाथ भये खुष रंग, मुगुटसे झुर झुर बहती गंग चले, सुखकारी. ॥ त्रिभुवनमों० ॥ १

रासक्रीडा.

श्रीकृष्णें यमुनातीरीं । गोपिन सह रह सर चोरी. ॥ ध्रुवपद. ॥

गोप गोपिका त्या व्रजजाया, ध्याती भवनाशक यदुराया, हो पतिया अभिलाषें माया, लाउनि ध्याउनि लागति गाया, बाका बन वारी मन भाया, आखनमें भरपूर समाया, चाहतहे दिनरात मिलाया, तामन मकसद प्रभुने पाया, तोषुनि अंतरिं जगन्नाथ जगदीश जनार्दन, भक्तकामकल्पद्रुम वामन, मनी विचारी करी तयारी, कामर कारी, गुंजमाल बनमाल पीतपट बांध कमर झट

---

१. वरील सर्व छापून झाल्यावर हा व पुढचा हे दोन कटिबंध या कवीचे म्हणून आम्हांकडे आले. त्यांत अशुद्धे फार आहेत तरी प्रत्यंतराच्या अभावामुळें ते आले तसे छापावे लागले.

खटाटोप, ठर मुकट बिकट लट, अलक झलक बर चिलक बनी अति, मिलक तिलककी, हात लकुटिया, और मुरलिया, रूप रंग सारंग सामले, पायीं वाळे, मौक्तिकमाळेसहित झराळे, वतंसभाळे, ठुमकत चाले, शुभ्रवर्ण मेघाचे झाले, गगनापासुनियां वोसरले, गोपदार तत्समयीं स्मरले, शरदांतरगत पौर्णमासिला, यमुनाकूला, जाय मुरारी, गिरिवरधारी, कुंजविहारी, जमुना कारी, जेसी सारी, चंद्रकलारी, जरीकिनारी, सोहत भारी, मट्टी व्हारी, सुत्रो पीरी, तीरसंवारी, मनोबिच्छी सीता जलऊपर, दोनो तटभर, फूले फूल बिचित्र मनोहर, पद्म नलिन अरविंद महोत्पल सहस्रपत्र शतपत्र कुशेशय पंकेरुह आणि तामरसासह पुंडरीक पुष्कर अंभोरुह सितांभोज नीलोत्पल सुंदर, कंचन कमल, कमोद कोकनद नारि निवारी, ओर सिंघारी, ताल बुखारी, पोलाभारी, स्वच्छ गोंदरा, नागरमोथा, नेगड झांऊ जटामासी, अर गुंजी पठायउ, जलनी बीफिर, शैवल नीली पुष्प जाति बहु, त्रात सुचित्रित, गुंजन मधुकर, कूजत कोक चकोर आडि बक सारस हंस सुबंसहु चातक जलमुरगी अर बदक फदकसी, कुर्क्ष्पन बडी ओर किलकी लावे, सिठी ठई जल, मुर्राईसो, रसराईके, लमचाइता, जल अंदर मगर, कच्छबर मीनगुच्छ, जिहिक कहत, निवारो झिंगा, कटुवा बिल्ला, सोरपतोला, रोहला, मरो खडीया, ओरसिनीया, झंजरा अंजरा, गुनगुच गुरदा, ज्योन गेगरा, गोंदल बाम बनीया बोधा, सींग पंडीन, मोरया खरोकर्राकबर कुरस करया, बटचहल सिलंदमासे, रगोहरिया, मीनहरो रसु, ससरारी मकर तुमरया, अस तिमिंगल, राघव करकट, जलबिच्छु, जलझिंगुर मान सयेसे यादस समूह राजत, जमुनालहर, गर्जना गाजत, तास ररेनका, अति च्छब च्छाजत, चमचमचमचम बारू चमकत, सोने सळपातळ ते मिरवत, शंख वराटा, कबुटहि शोभत, शंबुका शिंपा बहु आहेत, मौक्तिकमणि त्या स्थानीं लोळत पाच वज्रसह पुष्कराजयुत गोमेदादी माणिकही आणि कनक रत्नाचे गुच्छ विखरिले, जसे खणोखणीं रंगचि भरिले, भले शोभले, विष्णुदर्शनालागीं आले, इहिबिध सोभा कूल कलारी, निरखी नेनन अनुपम भारी ता सुखमा पर वारी वारी वारी.
॥ श्रीकृष्णें० ॥ १

माधव मधुसूदन वनमाली, उदय पावतां जोत्स्नामाली, अरुणतरुणवरदीप्ति निराळी, शरदोत्फुल्ल मल्लिका झाली, सोबिलोकमन कीनो ख्याली, जमुनाधार लखीजिमव्याली, श्रितमाया वह जगका वाली, मदनबिजेकी बांधी पाली, सच्चिदानंद

श्रित मुकुंद सोज्वळ, योगारूढ, काम आकर्षक कात्यायनीवर, सत्य कराया, व्रजजनमनवांछित पुरवाया, मुरलीद्विजकाम्येशि वराया, करीं घेउनी, कुरवाळुनि बहु चुंबन देउनि दूती सजली, रागरागिणी गीतमंडळी, तिचे मुखांतुनि प्रगट मुवदशी, भेरो भैरवि, बंगाली वैराग सिंधवी, मधू माधवी, विरहननारी, मालकंस अर ठोडी गोरी, गुनकाली खंबाय च्हुजारि, ककुव हिंडोल रामकलि प्यारी, पटमंजरि देवसाखनी यारि, ललित सुहास विलावल, पासहु दीपक, देसी ओर कान्हरो नट कम्मोद साथ केदारो राग सिरि, सह धनासिरी मारू असावरि, बसंत हुमाल सिरिअर मेघगुर्जरी, देसकार मल्हार मुंटकी, फिरभूपाली, सारंगसिंधु, संभोगिन सावत, सूरती सूहा सोरट, सारंग गोडसरंग बिंद्रावन सुघराई, अर संकराभरन साहाई, नट कम्मोद हमीर मुद्धनट, नाद्य हमीर हमीरहु केवल, धवल श्रीगांधार शक्तिवल, गंधार खर्जवडहंस अहीरी, मंगल अष्टप्रधान अडानो, ईमन भूपालीमु विहंगम, खंम परज कल्याण देवगिरि, तिलककुमारी, लंकढेन अर नटनारायण, जेतंसीरी, जेजेवंती, विहाग काफी, अनुपम रूप त्तिछनराग, माधवी भूप, बहुलिरागनट, दस्तअनूपसहित पूरवी, ओर पूरिया, अनेकनायक ओर भारजा, जास नाम मेक हनन पाया, उरविस्तारसम झबरकाया, तासअलाप किये मुमुरलिया, प्रगटति मूर्त्ती रागाच्या या, भूषणवसनसहित त्या आर्या, रंगी शोभति त्या गुणवर्या, त्या गाणे सारंग मोहिले, नीरस तरु ते पल्लव आले, अकस्मात बहुदीपक उजळिले, पाषाणहि पण विघरुनि गेले, जळसीकरमेघचि प्रगटले, अनंगवर्धन गान ऐकता, कृष्णगृहीत मानसा होता, अन्योन्याते किमपि न कळता, अलक्षिता त्या निघति वनाला, जेथे मूर्त्ती चलत्कुंडला, दोहन टाकुनि जाय मुबाला, कोणि दोहिता चाले अबला, अनुदास्य दुग्धाला धन्या, पयपात्रासह धावे अन्या, एक स्त्री पाजियता पुत्रा, दुजि वर्जित करिता पित्रा, अन्या जाते विह्वलितगात्रा, कोणि चालली सेवित भर्त्ता, आणिका जाती वर्जित भर्त्ता, कोऊ लीपत, कोऊ पोतत, कोऊ लोचन कज्जल आंजत, कोऊ कुंकुम तिलक सुरेखत, कोऊ दौरी आंगनछिरकत, फरकत बाहु घुचूरी चुरकत, बिंदियनछोर कपोलन लरकत, जेहर निकसत अंगिया मसकत मनमे समकत, जूरो खरकत, घरसे सटकत, तनमे भटकत, सगुन मनावत हियमे भावत कुंजविहारी. ॥ श्रीकृष्णं० ॥ २

तुमचें स्वागत कुशल व्रजाचे, आहे कीं कां येणें तुमचें, करूं काय हित सांगा मनाचे, घोर रजनि भय घोर जनाचे, पति पति भ्रांत ढूंड हे साचे, नवकुमुमित शरदिंदुसलोचे, कुलत्रिय छांडपत हिनहिराचे, जाव घरे रहबन जाचे. ॥ ॥ ध्रुवपद. ॥

(दोहा.)

कठर कठिण बचन कहत प्रभभीत रघनो मिठास ।
अंग कांढे लागे लखत कर नामय परिहास ॥

अह अप्रिय सुन **गो**विंद भाकित, मनगुन चाखित, शक्तिहि टाकित, विषण्ण होउनि, चित्तोद्विग्नसुचित्तमग्नसु, आशाभग्नत इनंत बदनू, ओठदावरदन्, भई सोकसदन, बहे ऊर्ध्वपवन, नखनमूलिखन, लगिआसुगिरन, लगे मसबरन, कुंकुमकुच अरन्, चकित चार घरिन्, गद्गद भई गिरन, बोलत गहिचरन, आई तुव सरन, देऊ नको मरण, केले मनहरण, आधि काय कारण, यास्तव करि भरण, आमाञ्शिआतापरण, मुक्ति दे हरि करुण, सोडुन धाम शरण, आलों हेंचि कारण, साधारणगुणधारण जगाचे प्रियइष्ट, साक्षि परपुष्ट, जगी इष्टानिष्ट, आत्मा देहिशिष्ट, सर्वांतरनिष्ठ, असुनि जनइष्ट, पतिच अतिशिष्ट, कथिसि वरिष्ठ, न करि आशाभंग, सोडिला ज्याचा संग, तया न दाऊ अंग, ऐकुनि गानरंग, होउनि मनि दंग, होम अरधंग, आये व्रज चंद, वोंठ न सुधारंग, पिलावो बनइंद, चरणमकरंद, काजभयअंध, तुलसी सह **र**मा सेवित पद, **भा**मा तयासी आतिप्रजम होउन, याचू कामा, त्वरितहृद्रामा, प्रसीद आतां आम्हां,सदयसुखधामा, शिरिं कुंची, करा ठेवि व्रजवरा, देवाली जसा पाळी, **वि**ष्णु **व**नमाळी, तसा तू **व्र**जबाळि, पाळि कृपाजाळी, सदय हरी'तो, अदय कसा कीं, भूपाताळवंद्य जो नाकीं, भक्तसुधाकर प्रभुविभु तो कीं, कनवाळू हरि असुन विलोकी, करुणारस प्रासितया गोपी, मृता मारिता नव्हे प्रापी, ऐकुनि गोपी वाक्या हासे, रमे तयासी लाउनि कासे, आनंदाश्रु परिप्लुतवासे, मुखगोपींचे दंत हिरेसे, दुःख तयाचें सर्वहि नासे, उडुगणचंद्रावेष्टित जैसे, उद्गियमानद्रायनसनहुवध्ववृंदसह **कृ**ष्णचंद्रपद मंद मंद ठेवि, **नं**दनंदआनंदकंद, गळिं वैजयंति मणि, राजपंक्तिभृत सहयुवति, **य**मुनापुलिनी, वाळवंटी भुज पसरुनि भेटति, कुचनख दर्पित, आणि मुख चुंबित, नर्मयुक्त बहुवक्रविलोकन, कामोद्दीपन सहित सुक्रीडन, लख प्रभु आदर, बढी जान कदर, मानिनि मानसादर, उठ्यो गर्व वादर, छायो दिलअंदर, लाख्यो **र**मामंदिर, प्रशमगुणगंभिर, मानी

इछी अंबीर, झाला शुभ सुंदर, तदा गोपि कातर होउनि विरहपर व्याकुळ तनु-नादर, धुंडाया झाले सादर, व्यापित काम जहर, उठि मोह लहर, भयो बडो कहर, तदा भुईवर लोळु लागल्या, धुंडित गेल्या, आणि गहिंवरल्या, स्मरति प्रभूच्या गति अनुरागास्मित विभ्रमयुत वीक्षणआंगा चतुरालाप, अमानुषरागा चिंताकर्षित, तेंचि स्मरती, तसेचि करिती, वृक्षसमूहा पुसती हसती, तद्गुण गाती, उलुखलबंधन, डोळे झांकुन म्हणति नगालागुनि, देखिला कृष्ण साव-ळा, जरि तुम्हि डोळां तरी दाखवा, वट वोदुंबरबोधीलागी, कुरुबक नागपुन्नागा मार्गी, गोविंदप्रिय तुळशीला ही, प्रियाल चूता कोविदारा, परसा जंबू, अर्कविल्वा, परार्थ जे की यमुनाकूला, पुसति तयाला, अनुपम वाला, चित्तचोर जगसाक्षी वहिला, सांगा शामल तुम्ही पाहिला, पडुन भुईवर म्हणति तियेला, वराह वामन कृष्णपदाला, मच्छ कच्छ नरहरि रामाला, सेउनिया तू सुखि अनुभविला, पुरती वोळख असेल तुजला, एण पत्नी दग उत्प्रेक्षेला, घेउनि म्हणती कुंद सृजाला, आणि वल्लीला, रचिती लीला बहुत विशाला, एक पूतना जाली बालादूर्ती कृष्ण करि पयपाना, असुर होतसे एक अंगना, अन्या करिते विष्णुभावना, कोणी राम मनोहर वाणा, कोणी वत्स जाहल्या जाणा, धोउनि एकिस मारिति अन्या, जाली होती जी बक धन्या, कोणी करि मुखिं मुरली मान्या, एक वदे जल वाता न भिया, गिरिधरवदया, कोणि म्हणे मी प्राशिन वणवा, शंखचूडडी वधीन कळवा, नाना लीला वर्णन करिती, हरिपद अंकित भूमि पाहाती, अकस्मात विस्मित बहु होती, ध्वजवज्रांकुश सुचिन्ह पंक्ती, शंखचक्र यवमीन देखती, कमल कलश धनु बिंदु उमटति, गोष्पदजंबू शशि-लेखा ती, पियते अमृतनिधि स्वस्तिक सवती वसु त्रिकोण पट कोणहि दिसती, रेखा ऊर्ध्वपदांतरवर्ती, सज्जनरक्षक एकविंशती, चरणरजांनी ठसे शोभती, अनुपद सर्वा मग अनुसरती, मिश्रित स्त्री चरणांकित माती, पुढें पाहाता दुःखित होती, अनया राधित तनून कर्षा ती, राधायित कृष्णे राधा ती, धन्य धन्य सर्वांहून जगती, एका पीता धरा भगवती, तिचीं पदें तो पुन्हा न दिसती, तृणपिहिता भू नाहिच नुमती, विभुकणडि येकी बसली ती सति, दांपित भारें चरण उमटती, उभी करुनि ती, सपुष्प वेची, येथें रास लाविली त्याची, फूलन माग गुही प्रभु साचि, रमेता, ससंग आत्माराम निरंजन, नि-श्चल एक अखंडत अष्टभाव युत, मगमे निरखत, मनसे तरकत, पगसे सरकत, फिरफिर सुरकत, छतिया तरकत, उनवा हरखत, तनुदुत मकरत, प्रभुकर

लरकत, दूजी कोउ मम समानाही, सबें त्याग हर हमको सेईं, हमहि से सो-
हत, या जोडी थाकी, भार भयो तन सांडीच सनको, गर्वित कहे ठाडी जो
मन चलबे कोहे आंगे तोले चलहु आपबल सांगे प्रभ, कहे चढव हमारे, कांधे
चाहा चढण, तवेहर, सरके, गुपत भये मुग्धा कहि, .हरखे तब गोपीने नन
जलबरसे, हा नाथ प्रिय, इष्ट सखे बरवेन कढत, अतावलाप माखे वाके कहे
कथारस चाखे आदर, मदहु कहे अपमाना बिस्मय, कीन सव, नजवजाना सब
मिल कूलकलिंदी आई, निजध्याससमय भई, सुहाई जयती श्रीमधिकहा, वृज म्हणती,
होता जन्मइंदिरा, सवती शाश्वत राहे, व्रजी, भगवती दे दर्शन, दैता उपपति, पति-
सा प्रादयिता, यातुनि धुंडिती, शरदविकासित कमल, श्रीहरि विलुलितनयन, सुं-
दरश्रीधरप्रेमशिलाशित, प्रखरमहाशरक्रयिता असुनी तुं आका वधिशी, येथें हा वध न-
सेल म्हणशी, तरि मग पूर्वी का रक्षियशी, विषजलपाना ध्याल राक्षसा, द्वैद्युतजनला,
द्वर्षमारुता, द्वषव्योमसुरा त्वां, अतावधिसिका न खलु गोपिका, नंदन तू हरि!
जो जगदांतरि, व्याप सुर नरि, विश्वसाक्षि जो, आत्मदृश्यही तो आत्मज वाक्ये,
विश्वपालनास्तव अवतरसी, सत्वतवंशीं, रवी उगवसी, ज्या करकंजी, निजभ-
क्तांची, जननमरणभी मोचन करसी, पद्माकर कमळाला वरसी, कामदकांत
करानः शिरसी, विधेहि व्रजजन आर्तिस हरिसी, वीर सुविस्मित स्मय हर स्व-
स्तिक, निजजनकिं करि, शपदि सुंदरी, वरुनि वरिष्ठा, वधुजन शंकरि, सुख-
कमळाला दावि मुरारी, सरनागत अघहर तुम भारी, जन मन मलिनसु जमु-
नाकारीं, तासु चतुष्टयदह उरोज फनउदय, कनकगिर कालिय पद जसमथ
गिरिधारी, अरके धर वकरकरव सुखारी, कंठ मधुर मुख, बचन, चतुर बहु, बि-
कट बिलोकन, कमलनयन प्रभु, अधर सुधाको, पान करावो, क्यंभग तनको बि-
रका त्यावो, कथाज्यो ग्यानिन अमित बतायो, सोहम जानो ब्रिखमय ठायो, दे
दरसन प्रभो मोछन भायो, हंसन चलन बिहरन कर भायो, कुच पर कपटी हमे
न भूला, छुभितह्रद फिरे डोलाडोला, पसुपंछि यात कांठकहुढेला, लगहे समुझ
जमा उर झोला, दिन निरखत नितसांझ समे बहु, चित्त रमे दिलसे नभगे,
बल्लुलन संगमे, मृतधूरंगमे, तन घन रंगमे, कुटिल अलक, गला मालाकी
बनखदिखे, पायन छनक, गेरंभवर भनक, वनमालाकी रमक, झाकी मारकी
झलक, दिल किया है हलाक, नहिं यार, दगाकार, ज्यो तो यार, करो पार,
प्रणत नामदार पदि कुचासि तार, सेविता सुसार, अधररस फार गुणे सरदारचि
सुरती रमवी, शोका पळवी, त्वरित रागयुत मुरली चुंबित, करुणाकर ते प्रा-

शन करवी, तव विरह त्रुटी युगसम भिरवी, पति सुत भ्राते कुलज महाकवि, पथ लंघुनि आलों अच्युत रवि, होता च्युत नलिनीलांछन भुवि, गोपीहरणी गीतगतिज्ञा, मोहुन रात्री आल्या सुज्ञा, तुजविण धूर्ता कोण अवज्ञा, करिल त्यजी सखी कामयाना, विरहजनित तव हृद्रुज नाना, तव दर्शना सुधामृतपाना, इच्छिती शंकुनी वनि पद अटना, कठक उपल घास भू कठिना, कुचि दुखवति म्हणुनि सुजाणा, पद अरविंद धरत सकुचाना, जनमन भलिनतद पहूसांई, तुहिन देख चित्त अति अकुलाई, सकयनथ तोर गुण गाई, तुम दयाल सुमनसजग साई, तदपकृपाह पनहि दरसाई, श्रवण करत कीर्तन परवारी, भई स्मरन सेवन अधिकारी, अरचन बदन दास्य दुयारी, आत्मनिवेदन देह सुधारी, नवविधभक्ति रूप भई सारी, खेद कंप रोमांच उठेरी, गल गद्गद तन सिथिल परेरी, विबरनआंसू प्रलय कियारी, अष्टाविर्भाव नसे पूरी, तन्मय आनंद भई व्रजनारी, तुरत उते प्रगटे गिरिधारी, सुहासमुख पीतांबरधारी, रूपचकित स्मरनी हारी, सब सखी हरत नहेरी, सुनहु चतुर जगभवभयहारी, सह व्रजनारी, रमे मुरारी, व्रजवनिता तारी तारी. ॥ श्रीकृष्णें० ॥ ३

श्लोक.

माझे ती लुगडीं, सकाप बुगडी, आठां दिसां बांगडी,
घालीते फुगडी, कधीं न रगडी, फाडीतसे आंगडी, ।
खैराची सगडी तशी धडधडी, तोंडाळ मोठी खुडी,
सोन्याच्या लगडीस देखुनि गडी, ऐशी महा धांगडी. ॥ १
दारीं देत कडी, सदां कडकडी, बोले महा वांकडी,
दाणे चोरुनि फांकडी न कळतां घेते सुळे कांकडी, ।
खाते ती जसि माकडी, वसवसी दांतीं दिसे खेंकडी,
या योगें अमृतेश्वरासि रुचली गंगातिरीं झोंपडी. ॥ २
बोले मातंग बोली, 'मम गति हरिली, कामिनी मस्त झाली,
शुंडा मांडीस तोली, दिदिस मिरवली, कीर्ति माझी बुडाली. ।
माझ्याची वस्तु नेली, कुचयुगिं धरिली, जाचणी थोर केली,
दे राया ! दाद हल्लीं' म्हणउनि गज तो मस्तकीं धूळि घाली. ॥ ३

पदसंग्रह.

भक्तिपर पदें.

पद १ लें.

तो कृपाकटाक्षें लक्षो । नागानन तुम्हांसि रक्षो. ॥ ध्रुवपद. ॥
त्रिपुरासुरासि मर्दू जातां । शंकर चिंती एकदंता ।
पावुनि सुमुख प्रसादता । शंकर जाले जयवंत. ॥ तो० ॥ १ ॥
बळीप्रति याचकनातें । धरूं जातां वामनातें ।
आधीं चिंतुनि गजाननातें । झाला नारायण विजयी. ॥ तो० ॥ २ ॥
रचितां विधि चौदा मंदिरां । आधीं पूजुनि लंबोदरा ।
तेव्हां सृष्टि परम सुंदरा । वरप्रसादें उद्भवली. ॥ तो० ॥ ३ ॥
शेषें मस्तकिं धरितां धरा । ध्यानीं आणुनि विघ्नेश्वरा ।
सर्षपप्राय चराचरा । मानुनि स्वस्थ बैसला. ॥ तो० ॥ ४ ॥
महिषासुरमथनाचा उपाय । न सुचे तेव्हां अंबा माय ।
चिंतुनि गजाननाचे पाय । जगांत झाली जयवंती. ॥ तो० ॥ ५ ॥
सांडुनि संसारातें योगी । सिद्ध साधक मुनि वितरागी ।
चिंतुनि गजाननातें वेगीं । ध्यानीं निमग्न बैसले. ॥ तो० ॥ ६ ॥
स्वस्ति श्रीविद्या गणपति । ब्राह्मण जपती ब्रह्ममूर्ति ।
त्यांतें संतति दे संपत्ति । अमृतेश्वर चिंतितसे. ॥ तो० ॥ ७ ॥

पद २ रें.

येईं रे! गंगाधर संगा । संग असोनि निसंगा! ॥ ध्रुवपद. ॥
धृतचंद्राचें वाहन जाणुनि । करि धरितोसि कुरंगा[१]. ॥ येईं रे० ॥ १ ॥
त्रिपुरसुंदरी चिन्मयगौरी- । स्मितमुखपंकजभृंगा[२][३]! ॥ येईं रे० ॥ २ ॥
गजचर्मांबर खपर मिरविशी । भूषणभूतिभुजंगा! ॥ येईं रे० ॥ ३ ॥
अति प्रतिकूल समाधिसि देखुनि । करिसी दाह अनंगा. ॥ येईं रे० ॥४॥
मृड हर हर हें कीर्तन करितों । घेउनि टाळमृदंगा. ॥ येईं रे० ॥ ५ ॥
आत्मतरंगाकार असो मति । ब्रह्माकार अभंगा. ॥ येईं रे० ॥ ६ ॥
शंकर सांब कुटुंबासह ये । प्रेरुनि नंदितुरंगा. ॥ येईं रे० ॥ ७ ॥
अमृतेश्वर कविकल्पतरूवरि । अद्वयपक्षिविहंगा! ॥ येईं रे० ॥ ८ ॥

---

१. हरिण. २. गालांत हंसणें. ३. कमल.

पद ३ रें.

वैराग्यपीठा रे! । नीळकंठा रे! ॥ ध्रुवपद. ॥

विश्वंभर हर, विश्वेश्वर मृड, विश्वविलोकन, विश्वहुताशन, विश्वसुखामुख, विश्वदुरितहर, विश्ववितरणा रे! ॥ नीळकंठा० ॥ १ ॥

मंडितमुगुटा खंडजटाजुट, चंडकीर्णसम, गंडलभामुख, गंडसरळ भुजदंड, डमरु गजखंडणकरणा रे! ॥ नीळकंठा० ॥ २ ॥

सर्पविभूषण दर्पसुतीक्षण, कर्पुरगौर महर्धुशशंकर, शूर्पनखाग्रजशत्रुदर्पण, अर्पण मम मन खर्पर धरणा रे! ॥ नीळकंठा० ॥ ३ ॥

शंबर रिपूत अंबर लघुकृत, तुंबर स्तविति, दिगंबर अंबर, डुंबर कटि नागांबर तोषण, औदुंबरनित्यविहरणा रे! ॥ नीळकंठा० ॥ ४ ॥

सकळदुरितकुळ, अखिलविषयमळ, जळती पळती, जवळि न उरती, पर्वत गज चर, सर्वजनक मदगर्वनिहंता, अमृतेश्वर म्हणे कर्वती न तव पदीं शीर पार्वतीरमणा रे! ॥ नीळकंठा० ॥ ५ ॥

पद ४ थें.

शंभो! शंकरा! । तूं जय जय गिरिजावरा! ॥ ध्रुवपद. ॥

चंद्रशेखरा हरा! । भुजगविभूतिधरा! । पंचवदन दशकरा रे! ॥ शंभो० ॥ १ ॥

अमृतेश्वरा सुरा! । सुरनतबंधहरा! । शिव मृड परात्परा रे! ॥ शंभो० ॥ २ ॥

पद ५ वें.

जय महादेव जय महादेव जय महादेव बोला ।
सीताविमल सजल जलमंडित जटाजूट बोला. ॥ ध्रुवपद. ॥
मधुर मधुर जो अविट चिद्रस तें श्रीशिवनाम ।
मदनकदनकर चरित्र उत्तम उदार उद्दाम ।
मनकर्णिकापुलिनप्रिय चित्तीं हरि मेघश्याम ।
मल्हारीचें रूप धरी म्हाळसेसि विश्राम. ॥ जय० ॥ १ ॥
हार्देकाशे स्वानुभवस्थिती नित्य अपरोक्ष हा ।
हास्ययुक्त पंचास्यलास्यरत परमउपास्य पहा ।
हाटकमय देवी अर्धांगीं दिव्य सुगंध वहा ।
हायन षोडश वस्त्रवणी अष्ट भुज भुजगेंद्र दाहा. ॥ जय० ॥ २ ॥
देशिकरूपें प्रणवोपदेश काशिदेशगत दे ।
देह भव्य घनसार शैल नभ ईभचर्म मोदे ।

देवल असित प्रमुख धरामर तनु विश्व नांदे ।
देहलीदीप प्रकाश जसा बाह्यांतरि दासा दे. ॥ जय० ॥ ३ ॥
वसुधादिक अष्टमूर्ती सत्व तत्व शर्व ।
वहन रजतपर्वतातुल्य नंदिकेश शैव ।
वसनरहित वर मुळी बुळी सन्मुद्रा भरिव ।
अमृतेश्वर सुरवरवर्णनि ये डमरूनाद पूर्व. ॥ जय० ॥ ४ ॥

पद ६ वें.

उमाकांत कई दाखवील चरण मला रे ! ॥ ध्रुवपद. ॥
दशभुज कर्पूरगौर गौरी अर्धांग सांग गंग शिरीं आर्द्र जटा तळिं शरच्चंद्रकला रे ! ॥ उमाकांत० ॥ १ ॥
ब्रह्मविद्वर्यवर सरिसृपोत्तरीया शिव तुरीय गिरिंदरि गरि असित विष्णु मानवला रे ! ॥ उमाकांत० ॥ २ ॥
निटिलानन कुटिलभ्रूवल्लीमुलि पटविरहित कटि अजीन कुटी चका रामसमस्फटिकशिला रे ! ॥ उमाकांत० ॥ ३ ॥
इंदीवेर करिं धरोनि उंदिरावरि बसोनि तिंदी विघ्नासि करी कुंदी तो सुत गमला रे ! ॥ उमाकांत० ॥ ४ ॥
नंदिवरि आनंदि आनंदिसहित देव बंदिजन वंदिति संस्तविती सुरशिवा अमला रे ! ॥ उमाकांत० ॥ ५ ॥
अमृतकलशपाणि सांब मृत्युंजय नृत्यप्रिय श्रुत्यर्थाकार तो कृतकृत्य भृत्यपाल भला रे ! ॥ उमाकांत० ॥ ६ ॥

पद ७ वें.

दयाघना ! तुज कां नये करुणा ? । शुकसनकादिक वंदिति चरणां. ॥ध्रुवपद.॥
मृडानीपति असें नाम विराजे । ब्रह्मा विष्णु तुज येती शरणा. ॥ दयाघना० ॥ १ ॥
मी भवसागरीं बुडतों पाहीं । तारीं आतां मजला दीना. ॥ दयाघना० ॥ २ ॥
उत्कंठा मनीं पाय पहाया । लागलि निशिदिनिं जगदाभरणा. ॥ दयाघना० ॥३॥
अमृतेश्वर तुज करितो विनती । दाखवि आतां लवकरी चरणा. ॥ दयाघना० ॥४॥

---

१. भागिरथीचें पाणी. २. साप. ३. कपाळ. ४. कमल. ५. अमृताचा घट आहे हातीं ज्याच्या. ६. अंबेसहवर्तमान.

पद ८ वें.

जय जय मल्लारी मल्लारी । तूं आमुचा कैवारी. ॥ ध्रुवपद. ॥
विधि हर सुर नर तुजला ध्याती । आदिकरुनि शैलारी.[1] ॥ जय जय० ॥ १ ॥
चंपाषष्ठी कुळधर्मी जन । अर्चिताति कल्हारीं.[2] ॥ जय जय० ॥ २ ॥
देव्हाऱ्यावरि बसवुनि पूजितो । नंदाचा खिल्लारी.[3] ॥ जय जय० ॥ ३ ॥
अमृतेश्वर निज दरिद्र शत्रु । टोकितसे कैलारी. ॥ जय जय० ॥ ४ ॥

पद ९ वें.

निजपद पावूं । जगदंबा वदनीं गाऊं. ॥ ध्रुवपद. ॥
पदतळ भाळीं कुंकुम लाऊं । नेसवुं जरितारी पाटाऊं ।
मूर्ति चतुर्भुज हृदयीं ध्याऊं ॥
जे जे स्त्रीमात्र ते ते जननी जाणुनि ब्रह्मभावना भाऊं. ॥ निजपद० ॥ १ ॥
दैवें मिळेल तेंची खाऊं । लटिका संसार वहकाऊं ।
नामस्मरणें मन समजावूं ॥
सर्वहि आत्मा मानुनि कोठें येउं न कोठें जाऊं. ॥ निजपद० ॥ २ ॥
धूप दीप नैवेद्य दाऊं । सच्चित्सुखरूपीं लय लावूं ।
आई बाई हें बोलाऊं ॥
पदिच्या प्रेमजळानें नैनतनू वोलाऊं. ॥ निजपद० ॥ ३ ॥
गुणदोषांच्या मागें न जाऊं । लोकीं समतेनेंचि समजाऊं ।
भवभयगांठी समूळहि डाऊं ॥
शीतळ अमृतचरणतरुछायेमाजी बसुनि विसावूं. ॥ निजपद० ॥ ४ ॥

पद १० वें.

ते माय माझी । आवडे सांबा. ॥ ध्रुवपद ॥
चित्सौंदर्या चंद्रा नयनीं चुंबाया हस्तंबा वरिल्या बिंबा पृथुलनितंबावरि पट खं-
ड्याइत नेसली जगदंबा. ॥ ते माय० ॥ १ ॥
महिषासुरखळशुंभालागुनि विषयकुसुंबा पाजुनि निवटी आपण जरी कुसुंबा
चोळा नेसुनि कडिये घे हेरंबा. ॥ ते माय० ॥ २ ॥
अमृतमनोरथ फळला अंबा फळला निंबाहुनि कडु भवतरु कळला या हो सकळ
विलंबा सांडुनि दैवत हें अवलंबा. ॥ ते माय० ॥ ३ ॥

---

१. इंद्र. २. कमळ. ३. गुराखी, गोवारी.

पद ११ वें.

निजसुखकारी । जगदंबा हृदयविहारी. ॥ ध्रुवपद. ॥
सिंहारूढ मणिमय अंबारी । नेसलि खंबाइत जरतारी ।
ऋद्धि सिद्धि चामर वारी ॥
मानमरातब निशाण अबदागिरि मोठी सरदारी. ॥ निज० ॥ १ ॥
काळभैरव नति नुपकारी । नव कोटी चामुंडा वारी ।
मार्कंडपुराण अवधारी ॥
ब्रह्माविष्णुमहेश मुजरे करिती ज्या देखारी. ॥ निज० ॥ २ ॥
निजभक्तांला पार उतारी । पामर कवी अमरावतारीं ।
अमृतकवीची हे कैवारी ॥
जाला प्रसिद्ध सकलहि लोकांमध्यें या संसारीं. ॥ निज० ॥ ३ ॥

पद १२ वें.

नरहरि ! नरसोबा ! नरसोबा ! । स्मरतां अघ निरसो बा ! ॥ ध्रुवपद. ॥
श्रीप्रल्हादवरद लक्ष्मीपति । कदापि तो नरसोबा. ॥ नरहरि० ॥ १ ॥
हितगुज अमुचें अपुले कानीं । मन घालुनि परिसो बा ! ॥ नरहरि० ॥ २ ॥
भुक्तिमुक्तिसह कृपादृष्टिनें । अमृतकवी वरसो बा ! ॥ नरहरि० ॥ ३ ॥

पद १३ वें.

जय जय श्रीरामा ! श्रीरामा ! । दूरि करीं भवकामा. ॥ ध्रुवपद. ॥
तुझी दया तयावरी जेणें । धरिलें मनोलगामा ॥ जय जय० ॥ १ ॥
भरतखंड नरतनु शेताच्या । साधिन मी हंगामा. ॥ जय जय० ॥ २ ॥
व्याही जांवाई सुत कांता । न रुचे हा हंगामा. ॥ जय जय० ॥ ३ ॥
अमृत हरीभजनास्तव धंदा । सोडुनि फिरत रिकामा. ॥ जय जय० ॥ ४ ॥

पद १४ वें.

दाशरथे रामा ! । येईं हो ! ॥ ध्रुवपद. ॥
सुगम सुधेसम नामरसायण । दूर करीं भवपामा. ॥ येइं हो० ॥ १ ॥
कृष्णार्पण अहंकार दुराशा । निवटुनि कंस कुमामा. ॥ येइं हो० ॥ २ ॥
अमृतप्रभु निर्दोष यशाचा । गर्जत निगम दमामा. ॥ येइं हो० ॥ ३ ॥

पद १५ वें.

राम गावा हो ! । सच्चित्सुख आत्मा. ॥ ध्रुवपद. ॥

अमल कमलसम येमलचरणिं मन रमल तरिच भव शमल हो ! ॥ राम० ॥१॥

विदुंषमान्य शरधनुष्यधरण कलिकेलुषहरण एक निमिषभर गा हो ! ॥ राम० ॥२॥

कुवलयनयनिं मितें पिवळें दिसतें घनसांवळें म्हणुनी मनिं कवळुनि ध्या हो!॥राम०॥

गीता उपदेशित भयभीता पीतांबरधर सीतानाहो. ॥ राम० ॥ ४ ॥

लक्ष्मणसहित सुलक्षण क्षणभरि अमृतमधुरगुणगण ऐका हो ! ॥ राम० ॥ ५ ॥

पद १६ वें.

बसुनि सुखें चिंतित जा रघुवीर. ॥ ध्रुवपद. ॥

अल्प सुखास्तव व्यर्थ विकुं नका । क्षणिक अमूल्य शरीर. ॥ बसुनि० ॥१॥

चित्रगुप्त बरदास्त लिहितसे । विषयाची तकरीर. ॥ बसुनि० ॥ २ ॥

हरिभजनें कामादिक पळती । मोटे संबळशरीर. ॥ बसुनि० ॥ ३ ॥

गुणलेखक मोहरीर अमृत घरिं । बसल्या घेत हरीर. ॥ बसुनि० ॥ ४ ॥

पद १७ वें.

मन रामीं रंगलें । अरुणतरेणिनिभ किरण चरणतळ मम हृदया लागलें. ॥ ध्रुवपद. ॥

सगुण दिसे परि निर्गुण निष्फळ निजानंदमय परब्रह्म तें जिह्मरहित सुब्राम्हण जाणती स्वसंवेद्य उगलें. ॥ मन० ॥ १ ॥

सत्वलभ्य अमृतत्व तत्वगत शांति परमळीं श्रांति पावुनी सकलावस्थातीत वीतभय अनवरत जागलें. ॥ मन० ॥ २ ॥

पद १८ वें.

आवडे श्रीरामाचें ध्यान. ॥ ध्रुवपद. ॥

मेघश्याम द्विभुजसानुज । करीं कार्मुक बाण. ॥ आवडे० ॥ १ ॥

नाम मंगळकारक हेंची । सर्वांचें कल्याण. ॥ आवडे० ॥ २ ॥

रामनाम लिहितां सागरजळीं । तरले जड पाषाण. ॥ आवडे० ॥ ३ ॥

भारतभागवतादिक महिमा । वर्णिति विष्णुपुराण. ॥ आवडे० ॥ ४ ॥

अमृतेश्वर रामायण वाची । समजुनि अधिष्ठान. ॥ आवडे० ॥ ५ ॥

---

१. स्वच्छ. २. दुर्बे. (रामलक्ष्मण.) ३. विद्वान्. ४. पाप. ५. अत्यल्प काळ. ६. कमळ. ७. पांढरें. ८. नवरा. (नाथ.) ९. खोटा आरोप. १०. बळकट आहे शरीर ज्यांचें असे (कामादिक). ११. देशपांड्याचा गुमास्ता. १२. सूर्य. १३. कपट, वांकडें. १४. समजण्यासारखें. १५. गत. १६. निरंतर.

पद १९ वें.

भजावा अंजनीसुत बलभीम. ॥ ध्रुवपद. ॥
सर्षपसम भूगोल मानुनी । तोलित गणकु मुकीम. ॥ भजावा० ॥ १ ॥
बळ अद्भुत पावुनि रत चरणीं । कुंतीचा सुत भीम. ॥ भजावा० ॥ २ ॥
यवनोत्कर्ष न साहे म्हणुनी । बाटवि फार गनीम. ॥ भजावा० ॥ ३ ॥
श्रीहनुमंत अखंड जपावा । करुणाकर निःसीम. ॥ भजावा० ॥ ४ ॥
अमृत म्हणे निशिदिनिं तो गावा । अक्षय हाचि उदीम. ॥ भजावा० ॥ ५ ॥

पद २० वें.

जय जय श्रीकृष्णा ! श्रीकृष्णा ! । दूरी करिं भवतृष्णा. ॥ ध्रुवपद. ॥
तुझी कथा सत्संगति गंगा । यमुना वेण्या कृष्णा. ॥ जय जय० ॥ १ ॥
शरयू तापी भीमा गोदा । रेवा दिव्य पयोष्णा. ॥ जय जय० ॥ २ ॥
परम संकटीं वस्त्रें पुरवुनि । बहिण रक्षिली कृष्णा. ॥ जय जय० ॥ ३ ॥
अमृत तिघां कृष्णांतें वंदित । व्यास कृष्ण नर कृष्णा. ॥ जय जय० ॥४॥

पद २१ वें.

हृदयीं आला । मनमोहन मुरलीवाला. ॥ ध्रुवपद. ॥
घनतनुजिता अतसिकुसुमाला । मिरवी पीतांबर वनमाला ।
मुगुटीं धरित मयुरपिच्छाला ॥
त्याहुनि वर कलगींत बरा गुलाल खुलाला. ॥ मन० ॥ १ ॥
रुचली उंच घोंगडी त्याला । प्रिय कोमळ तुळशीचा पाला ।
चारित वृंदावनिं वत्सांला ॥
वाटे प्राणसखा हरि चिमण्या गोपमुलांला. ॥ मन० ॥ २ ॥
देखुनि उत्सव व्रजवनितांला । करतळिं ठेवी नवनीताला ।
अंगुलिकांवरि शाकफळाला ॥
कांसे खोंवुनि वेताटी अधरपुटीं वंशाला. ॥ मन० ॥ ३ ॥
गोरस गोपवधूंचे प्याला । ढेंकर देउनि हृदयीं धाला ।
चिन्हें शुभ्र दिसति अधराला ॥
ऐकुनि गाऱ्हाणें जननीला बहुतचि भ्याला. ॥ मन० ॥ ४ ॥

---

१. मोहरी. २. शत्रु. ३. संसाराची आसक्ति. ४. नर्मदा. ५. द्रौपदी. ६. जवस, अळशी. ७. स्त्रिया. ८. मुरली. ९. खालचा ओंठ.

वाचुनि श्रीमद्भागवताला । आशय पुसुनि वरा संतांला ।
भूतमात्रीं भगवंताला ॥
पाहतां पाहतां अमृतेश्वर हरि अवघा चिन्मय जाला. ॥ मन० ॥ ९ ॥

पद २२ वें.

हरि! तूं येइं रे! । दासाला दर्शन देइं रे! ॥ ध्रुवपद. ॥
हें वय व्यर्थचि गेलें पाहिं रे! । या संसारीं सार्थक नाहिं रे! ।
संचित मजला न दिसे कांहिं रे! ॥
आस तुझी धरिं कास निरंतर निशिदिनिं संनिध राहिं रे! ॥ हरि०॥ १ ॥
नंदयशोदेची पूर्ण कमाइ रे! । त्यांचे कडेवर बसलास पाहिं रे! ।
गोपाळांसंगें राखिल्यास गाइ रे! ॥
गोपिगृहींचें दहिंदुध भक्षुनि म्हणतोसि नाहिं रे! नाहिं रे! ॥ हरि० ॥ २ ॥
सजणा जातीचा कसाइ रे! । सेना सद्वंशींचा नाहिं रे! ।
तेथें तुवां विचारिलें न कांहिं रे! ॥
वेषानिं पुरस्कर होउनि नृपतिची डोई केलिस कीं नाहिं रे! ॥ हरि० ॥ ३ ॥
शबरी किरात कोण बढाइ रे! । हरि! तिसि तुसीं संघटण नाहिं रे! ।
तिचीं वनांत वनफळें खाइ रे! ॥
अघमर्पणाच्या मिसें कुणबटें शेतांत बांधिलास किं नाहिं रे! ॥ हरि० ॥४॥
नामा सुजात शिंपी भाइ रे! । नेणों त्याची किती कमाइ रे! ।
कैसा जालासी सुखदायि रे! ॥
त्याचे संगतीं बसून देवा! दुधभात जेवलास किं नाहिं रे! ॥ हरि० ॥५॥
हरि! तुझी काय वर्णुं चतुराइ रे! । तुजला उत्तम मध्यम नाहिं रे! ।
आपुले चित्तीं विचारुनि पाहिं रे! ॥
अमृतरायावरि कृपाळु जाल्यास तरि गांठुडि तुझी गेलि नाहिं रे! ॥ हरि०॥६

पद २३ वें.

श्रीहरि पूर्णव्यापक जगीं. ॥ ध्रुवपद. ॥
अंतर्बाह्य अभिन्नपणें तो । दोर जसा भुजगीं. ॥ श्रीहरि० ॥ १ ॥
आटुनि पीटितां समरस लेशें । जेंवि सुवर्ण नगीं. ॥ श्रीहरि० ॥ २ ॥
अमृतपणें गोटुनि शंशि जाला । अमृतेश्वर कलगी. ॥ श्रीहरि० ॥३॥

१. हमामत. २. पापनाश. ३. साप. ४. दागिना. ५. चंद.

पद २४ वें.

श्रीहरिचे उपकार । आठउं किति ? ॥ ध्रुवपद. ॥
भक्तमनोरथ पूर्ण कराया । रूप धरी साकार. ॥ आठउं० ॥ १ ॥
अघटित घटउनी आत्मत्वाचा । देत असे आकार. ॥ आठउं० ॥ २ ॥
अमृत म्हणे ध्या नाम तयाचें । होइल जयजयकार. ॥ आठउं० ॥ ३ ॥

पद २५ वें.

याचे गुण किति वर्दनि वदावे ? । आगम निगम या अगमाचे. ॥ ध्रुवपद. ॥
सहस्रमुखातें पार कळेना । होतिल इतरां सुगम कसे ? ॥ याचे० ॥ १ ॥
वेदादिक हे श्रमले तो हा । गोपिमनोरथ पुरवितसे. ॥ याचे० ॥ २ ॥
जोडुनियां कर त्यासि निरंतर । अमृत सदोदित चिंतितसे. ॥ याचे० ॥ ३ ॥

पद २६ वें.

श्रीरंगा ! । येईं हो ! ॥ ध्रुवपद. ॥
ध्यान धरुनि तुझें गायन करितों । मानगुमानविभंगा ! ॥ श्रीरंगा० ॥ १ ॥
शांतिसि जरि विश्रांति होउनी । आठवि हृदयपलंगा. ॥ श्रीरंगा० ॥ २ ॥
अमृत म्हणे मज तत्पद दाखविं । ज्या पदिं जन्मलि गंगा. ॥ श्रीरंगा० ॥ ३ ॥

पद २७ वें.

हरिभजनाविण गोड आणिक नाहीं. ॥ ध्रुवपद. ॥
पयघृत आळे, त्यांत रसाळे, सोलिव केळें । कालविलें वरि साखर मेळे. ॥ १ ॥
मुठमुठ पेढे, भक्षिती वेडे, पशुजन थोडे । रामभजनाविषयीं अवघेचि रेडे.॥२॥
द्राक्षें जंबू, सीतळ अंबू, क्षण न विसंबू । शाखेवरते पिळिलें निंबू. ॥ ३ ॥
आत्मप्रभाकर, भज तूं लौकर, ध्यायिं निरंतर । अमृतेश्वर साखर खेडुलेकर.॥४

पद २८ वें.

मन त्या चरणीं रतो रे ! रतो । या भविंहुनि परतो. ॥ ध्रुवपद. ॥
बाळा त्यांतिल बाळबकीचे प्राण बळें हरितो, ।
जो अकुतोभय पय गोपींचें पावन परम पितो. ॥ मन त्या० ॥ १ ॥
जे रणसंकटिं श्रमले जाणुनि स्वकरें अश्व धुतो, ।
याचे गुणगण गातां ऐकतां सहजचि नर तरतो. ॥ मन त्या० ॥ २ ॥
पार्था पाठिसि घालुनि आपण हयदोरे धरितो, ।
म्हणत कदापी या वाजीतें कंटकही न रुतो. ॥ मन त्या० ॥ ३ ॥

हें जग अवघें जाय निदानीं अमृतप्रभु तरतो, ।
भक्तासि संकट पडतां भारीं निजतनु वोढवितो. ॥ मन त्या० ॥ ४ ॥

पद २९ वें.

येईना रे ! । करुणा तुज काय? ॥ ध्रुवपद. ॥
मूढ मति माझी म्हणुनि मन राजी । न ये ती हरिकाजी. ॥करुणा०॥ १ ॥
ये जगदीशा ! परमपुरुषा ! । धरिली तुझी आशा. ॥ करुणा० ॥ २ ॥
ये भवबंदीं पडलों दीन बंदीं । सेविला कृपानिधि. ॥ करुणा० ॥ ३ ॥
पतितपावना ! द्वैतनाशना ! । अमृतेश्वरचरणा. ॥ करुणा० ॥ ४ ॥

पद ३० वें.

देव तो रे तो रे तो रे ! । पाहुनि मानस परतो रे ! ॥ ध्रुवपद. ॥
पार्थाचे अश्वाचे हातीं धरोनियां दोरे, ।
चंचल म्हणुनी त्यांतें म्हणतो हो रे हो रे हो रे ! ॥ देव० ॥ १ ॥
शिष्टाईस्तव घरासि येतां त्यासि न येति सामोरे, ।
मरण पावले कौरवांचे पोरे पोरे पोरे. ॥ देव० ॥ २ ॥
चरण सेवितां श्रीलक्ष्मीचे हात झाले गोरे, ।
तितें लेववी सोनियाचे दोरे दोरे दोरे. ॥ देव० ॥ ३ ॥
गुणगण लिहितां अमृतकवीचे केश झाले भोरे, ।
बुद्धी न चले म्हणुनीं कागद कोरे कोरे कोरे. ॥ देव० ॥ ४ ॥

पद ३१ वें.

श्रीहरिविण काळ गमेना. ॥ ध्रुवपद. ॥
दिवस युगापरि प्रतिदिनिं होतो । वियोगयोगपथ क्रमेना. ॥ श्रीहरि० ॥ १ ॥
कामीं मन रत किमपि बसेना । दृढतर अंतरीं थिर धरवेना. ॥ श्रीहरि० ॥ २ ॥
विषयजितजीवीं अन्न पचेना । अमृतप्रभुविण वय वेंचेना. ॥ श्रीहरि० ॥ ३ ॥

पद ३२ वें.

वाजवि करताळी करताळी । गाउनि मृदंगताळी. ॥ ध्रुवपद. ॥
इहलोकीं सुख पावुनि । जाउनि श्रीहरिपद कोटाळीं. ॥ वाजवि० ॥ १ ॥
श्रीहरिचे गुण गातां । पळती दुःखाचीं पेटाळीं. ॥ वाजवि० ॥ २ ॥
लाउनि बसणें टाळी । परि मन जयासि जन हो ! टाळी. ॥ वाजवि० ॥३॥

निद्रा आळस जरि टाळी । उमजे भवभुजंग वेंटाळी. ॥ वाजविं० ॥ ४ ॥
अमृत कीर्तनीं संसा-। राची फार करी हेटाळी. ॥ वाजविं० ॥ ५ ॥

पद ३३ वें.

ब्रह्मसुखें सुखरूप । असावें. ॥ ध्रुवपद. ॥
श्रीसद्गुरुवरदान कृपेचें । बळ हृदयांत अमूप. ॥ असावें० ॥ १ ॥
गुणदोषास्तव अधरकपाटीं । दृढतर मौन कुलूप. ॥ असावें० ॥ २ ॥
हरिगुरुकथन किली गुरुआज्ञा । अमृत धरी अपरूप. ॥ असावें० ॥ ३ ॥

पद ३४ वें.

संतपदांची जोड । दे रे हरी! ॥ ध्रुवपद. ॥
संतसमागमें आत्मत्वाचा । सुंदर उगवे मोड. ॥ दे रे० ॥ १ ॥
सुफलित करुनी पूर्ण मनोरथ । पुरविशि जिविंचें कोड. ॥ दे रे० ॥ २ ॥
अमृत म्हणे रे हरि! भक्तांचा । शेवट करिसी गोड. ॥ दे रे० ॥ ३ ॥

पद ३५ वें.

ते हे माय माझी पंढरिसी पाहिली. ॥ ध्रुवपद. ॥
जो जो येइल तया भेटावयासी। कटीं कर ठेवोनियां राहिली.॥ ते हे०॥१॥
भीष्मप्रतिज्ञा सत्य कराया। सव्यसाचीपाशीं आण वाहिली.॥ ते हे ०॥२॥
दैत्यसुतासी अवघड पडतां । स्तंभांतुनि हांक फोडिली. ॥ ते हे० ॥ ३ ॥
रणीं रुक्मभयें भ्यालिसे रुक्मिणी। अमृतवचनें कुरवाळिली.॥ ते हे० ॥४॥

पद ३६ वें.

दासांचा हा ऋणी । विठोबा. ॥ ध्रुवपद. ॥
धर्ममखीं जो काढी उष्टीं । निर्जरचूडामणी. ॥ विठोबा० ॥ १ ॥
पार्थरथीं जो सारथि होउनि । धूत हयांतें रणीं. ॥ विठोबा० ॥ २ ॥
नंदवधूकरीं बंधन दांवें । सोसितसे शिशुपणीं. ॥ विठोबा० ॥ ३ ॥
गोपव्रजीं चारुनि गोधनें । बांधितसे गोठणीं. ॥ विठोबा० ॥ ४ ॥
दामाजीस्तवनींच वेष धरि । द्रव्य देत पुरवुनी. ॥ विठोबा० ॥ ५ ॥
अमृतरायकवि जीवित निर्मळ । दीनजना रक्षणीं. ॥ विठोबा० ॥ ६ ॥

पद ३७ वें.

पांडुरंग मनुवर्ण पांच हे अनुदिनिं उच्चारा ।
श्रीगुरुवचनें आश्रय जाणुनि करुनी सुविचारा. ॥ ध्रुवपद. ॥

श्रीमिश्रित तनु आश्रितजनप्रतिपालक राजश्री ।
श्रीवत्सल श्रीपाद विवरती वेदांती मिश्री ।
श्रीकंठासी विष श्रम देतां रामनाम आश्री ।
श्रीहरिनामें अमृत फिकें मग कोण पुसे मिश्री? ॥ पांडुरंग० ॥ १ ॥
पांडित्यासी बरें निरउनी पांगुळ मन होपा ।
पांसु पाईचे पांघुरतो शिव गिरिकंदर सोपा ।
पांथमुक्त मार्गिंचे विसावत पदपंकजखोपा ।
पांडत्रयत्री जगचि पुरें करि कृपापांग सोपा. ॥ पांडुरंग० ॥ २ ॥
डुबकी मारुनि कूर्मपणें धरि मंदर हरि कंडू ।
डुकर मीन तव गोकुळिं खेळे चेंडु विटीदांडू ।
डुमडुम डमरू शिव नमी आंगें उद्धरिला पंडू ।
'डुकृञ् करणे' सांडुनि हृदयीं पांडुरंग मांडूं. ॥ पांडुरंग० ॥ ३ ॥
रंगनाथ रंगतलं चिंतय नवनीतापरं ।
रंगनील वदे यशोमतिसुत विशोक मुकिशोरं ।
रंभादिक नाचतां लाजती तं जगदाधारं ।
रंग कंसकृत भंगकारक भज वारंवारं. ॥ पांडुरंग० ॥ ४ ॥
गयागदाधर गयारिगयपद सारिगमपधनि सरागं ।
गगनीं सुरवर गर्जति समपद विठ्ठल श्रीरंगं ।
गजनागयुगादि दारक उद्धरत नगपन्नग सांगं ।
गजेंद्रतात गिरी शेष करी धरी पदमिश्रितगांगं. ॥ पांडुरंग० ॥ ५ ॥
विठ्ठल म्हणतां विज्ञानुभवें निजजन बहु निववी ।
ठकार ठाण कटिकर शून्य अज्ञाना तुरवी ।
ल्य दाउनि लक्ष्मीसह भेटुनि देत आत्मपदवी ।
अमृतेश्वर कटिबंध जनाच्या रसनेनें वदवी. ॥ पांडुरंग० ॥ ६ ॥

पद ३८ वें.

पतीतपावन दीनोद्धारण मूर्ति दिसे गोजरी । विटेवर उभा तो श्रीहरी. ॥ध्रुवपद.
उपमन्या क्षिरसिंधु देउनि तयाची केली शृती । तुझि बा! नवनिधी संपती, ॥
अजामेळ वाल्मिक नारद उद्धरिले सहज स्थिती । तुझि बा! उपमा सांगूं किती ?॥
प्रल्हादभक्तासाठीं धरुनि अवतार खांबाप्रती । हिरण्यकश्यपा दिधली गती, ॥
पुंडलिकाचे भक्तिस्तव तो आला गा पंढरी । विटेवर० ॥ १ ॥

रामावतारीं युद्ध केलें अचाट महादारुण । मारिला कुंभकर्ण रावण, ॥
तेहतिस कोटी देव सोडविले बंदीशाळेंतुन । लंका बिभीषणा कारण, ॥
वामन होउनी मागाया आला दिल्हें बळिनें दान । घातलें पाताळीं नेउन, ॥
सा चौ नकळे अठरा पुराणां शेषाची वैखरी । विटेवर० ॥ २ ॥
दुर्योधनानें कपट करुनी लाक्षाजोहार केलें । तेथें पांडवांसि रक्षिलें, ॥
अंबऋषीचे साठीं देवें दहा अवतार धरियले, । अहिल्याशिळेसि उद्धरिलें, ॥
गजेंद्रासी नक्रें धरिलें तेव्हां सोडविलें, । ध्रुवासी अढळ पद दीधलें, ॥
सुदामजीचे पोहे भक्षुनि दिधली कांचनपुरी । विटेवर० ॥ ३ ॥
वसुदेव देवकीचे वचनीं देवें धरिला अवतार, । मारिला मामा कंसासुर, ॥
अघासूर बघासूर आले तुझ्या प्राणावर, । मारुनि केला त्यांचा संहार, ॥
मामळभट पूतना मावसी आले तुझे प्राणावर । मारुनी केला त्यांचा उद्धार, ॥
नंद यशोदा कुळदैवत नवनीत भक्षण करी । विटेवर० ॥ ४ ॥

पद ३९ वें.

धांव पाव सद्गुरुराया! । गुणियाच्या गुणिया! सखया! ॥ ध्रुवपद. ॥
अज्ञानाचें जें वारुळ । त्यांत दोरीचें मेहांडुळ ।
डसलें नसतां ही समूळ । उगेंच मन हें भय पावे. ॥ धांव० ॥ १ ॥
नव छिद्रांची फुटकी नाव । तींत येकाचाचि टिकाव ।
मृगजळडोहीं गेला आव । नकळे माव हे याची. ॥ धांव० ॥ २ ॥
शुक्तिरुप्याचे[3] रुपये केले । त्याजवर स्थाणु चोर आले ।
अमृतसमान मूर्ख चेले । यास्तव तुजला श्रमविती. ॥ धांव० ॥ ३ ॥

उपदेशपर पदें.

पद ४० वें.

अरे अरे! कांहिं तरी सोय धरीं रे! ।
परम वरदकर सुरुचिरतर नरनारायणपर धरुनि धरणिधर अनुदिनिं मनिं जप करीं रे! ॥ ध्रुवपद. ॥
नंदनंदन गोविंद दीनजनबंधु भवसिंधु उतरीं रे! ।
करुणार्वे[4]रुणालयशरणागतपरिपालनपद वरीं रे! ॥ अरे० ॥ १ ॥

---

१. शेवटीं कविनाम नसल्यामुळें हें पद अमृतरायाचेंच कीं काय याविषयीं संशय आहे.
२. एक प्रकारचा साप. ३. जींत मोत्यें असतात अशी शिंप. ४. समुद्र.

पशुसम होउनि विषयीं न रत तूं परत परत अंतरीं रे! ।
भरीं भरुनि तूं घरीं रमसि परि भ्रमसि गहन भवपुरी रे! ॥ अरे० ॥ २ ॥
अमृतराय तव पाय धरुनियां विनवी बहु बहु परी रे! ।
दुर्लभ दुर्लभ नरतनु सखया! वद वद वद **न**रहरी रे! ॥ अरे० ॥ ३ ॥

पद ४१ वें.

हे दारा । मांडी घरीं विदारा। रे रे! विषय उदारा। या स्त्रैण कुजन सरदारा।
या शरीरमळकेदारा । करीं **मुकुं**दाराधन भज भज **कृ**ष्णा प्रणतमंदारा. ॥ १ ॥
हे कांता । इच्छी मनिं एकांता । नातरि करि आकांता ।
तपते सम रविकांता । गृहकांतारीं कांतारीं हे आठवि तूं **श्री**कांता. ॥ २ ॥
हे जाया । इच्छी बाहिर जाया । वसे स्वहित वर्जाया ।
प्रीति न हरिसि भजाया । जायाची तनु रक्षित बाहिर जाऊं नेदि निजाया. ॥ ३ ॥
या मारा। वश्य तुं कीं सुकुमारा। विसरुनि काळकुमारा। खेळवितोसि कुमारा।
नेणसि भवशुशुमारा । स्वःसुभारा **चित्र**गुप्त तो लिहितो दुरित तुमारा. ॥ ४ ॥
हे नारी । विषयबंध नेणारी । मागे कांचन भारी ।
कीं लुगडें जरीकिनारी । नारीकेळतरुच्छाया त्यज भज **अ**मृतेश्वरनारी. ॥ ५ ॥

पद ४२ वें.

हा देह जाईल रे! । पुण्य कामा येईल. ॥ ध्रुवपद. ॥
मोहित होउनियां विषयीं । किति करसिल बाइल रे! ॥ हा देह० ॥ १ ॥
जोंवरि आंगीं शक्ति जवळि धन । तोंवरि ते गीत गाईल रे! ॥ हा देह०॥२॥
अमृत म्हणे हें सर्व त्यागुनि। हरि हरि म्हणतांचि सार्थक होईल रे!॥हा देह०॥३॥

पद ४३ वें.

सखे हो! ब्रह्म सदोदित एक. ॥ ध्रुवपद. ॥
वेदांतश्रवण जइ कीजे । आत्मानात्मविवेक. ॥ सखे हो० ॥ १ ॥
जरी गुरुराज करी करपात्रें । अमृताचा अभिषेक. ॥ सखे हो० ॥ २ ॥

पद ४४ वें.

हें फार खोटें रे! । हीन केलें पोटें. ॥ ध्रुवपद. ॥
साराचेंहि सार आयुष्य मोठें । तें चाटलें हातबोटें. ॥ हें फार० ॥ १ ॥

---

१. लीलंपट. २. शेत. ३. कल्पवृक्ष. ४. अरण्य. ५. मदन. ६. वाईट मारणार. ७. मुलगा. ८. पाणबुडा. ९. नारीकांठी.

रामनाम मुखीं न आलिया । काळ घोटिल एक्याचि घोटें. ॥ हें फार० ॥२॥
सर्वांभूतीं राम नेणुनि । कैसा वाहावसि पाहें लोटें. ॥ हें फार० ॥ ३ ॥
रामनाम जप सांडुनि । व्यर्थ वाग्जल्प कीजे होटें. ॥ हें फार० ॥ ४ ॥
अमृत म्हणे राम चिंतुनि । राहीं संतसमागम जोटे. ॥ हें फार० ॥५ ॥

पद ४५ वें.

काय केलें रे ! । गुरुचरणीं लागुनी. ॥ ध्रुवपद. ॥
वेद पढुनि निज खेद न जाउनि । भेदनवतीला जरि न शमविलें. ॥ काय० ॥१॥
श्रीमद्भागवताशय ऐकुनि । आग्रहबुद्धिस जरि न दवडिलें. ॥ काय० ॥ २ ॥
सर्वांभूतीं वासुदेव हें नेणुनि । हरिचें चित्त दुखविलें. ॥ काय० ॥ ३ ॥
अमृत म्हणे सम सकळहि लोकीं । भला भला जरि वाक्य न म्हणविलें.॥काय०॥४॥

पद ४६ वें.

काय केलें रे ! । या नरदेहीं. ॥ ध्रुवपद. ॥
बये बये म्हणउनि पिउनि पय भययुत हरि सयेविण क्षय शिशुवय करविलें. ॥१॥
तरुणसमय तइं हृदय विषयमय थै थै थै सह गायन ऐकिलें. ॥ २ ॥
भय नय रय गत मनहय फिरवुनि अविनय तनय तनय आट हे चेवले. ॥३॥
अव्यय विसरुनि नरतनु व्यय कृत अमृत म्हणे जय जय हरि हरविलें. ॥ ४ ॥

पद ४७ वें.

म्हणउनी हरि भजिजे हरि भजिजे । पदोपदीं संस्मरिजे. ॥ ध्रुवपद. ॥
उंदिर देखुनि वचके । तैसा काळालागिं न दचके. ॥ म्हणउनि० ॥ १ ॥
दाटति कंठ कफानें । नाना देहीं उठति तुफानें. ॥ म्हणउनि० ॥ २ ॥
अंगडी पगडी शाल दुशाला । अंतीं लेता होय कशाला. ॥ म्हणउनि० ॥३॥
वरडुनि घाबरे करिती । असली बुद्धि तेही हरिती. ॥ म्हणउनि० ॥ ४ ॥
समयीं म्हणती पैका वेंचू । अंतरीं सहस्र तिडका विंचू. ॥ म्हणउनि ॥ ५ ॥
लागली देखुन उचकी । स्त्री सुत बंधु पैका उचकी. ॥ म्हणउनि० ॥ ६ ॥
कंठीं कुडक्या मुद्या । अवघी संपत जाईल उद्यां. ॥ म्हणउनि० ॥ ७ ॥
अमृतेंविण मति बरळा । अंतरीं सावध तो एक विरळा. ॥ म्हणउनि० ॥ ८ ॥

---

१. न्याय. २. वेग. ३. घोडा. ४. ज्याचा नाश होत नाहीं असा.

पद ४८ वें.

वैराग्यभाग्यासारिखें आणिक भाग्य नाहीं. ॥ ध्रुवपद. ॥
परि तो विवेक मुख्य असावा । साधनमात्रालागिं विसांवा ।
संतसमागम हा गंवसावा । संशय सकळ पुसावा ।
किमपि नसावा कांहीं. ॥ वैराग्य० ॥ १ ॥
डोइस टोपी कीं चिंधोटी । गडवा पुरे एक लंगोटी ।
समयीं भाकरतुकडा रोटी । वस्ती पर्णकुटीं ।
हरी हरी जपूनी राहीं. ॥ वैराग्य० ॥ २ ॥
जुन्या चिरगुटांची भरती । कंथा असो पाठीवरती ।
वितभर भुई आंगापुरती । देह ममता सांडुनि परती ।
सच्चिदानंद पाहीं. ॥ वैराग्य० ॥ ३ ॥
हत्ती घोडे पालख्या उंटें । त्याचे मागें उदंड झटें ।
कारभाराचें व्यसन खोटें । जैसे फुटके पेटे ।
बुडविती मध्यप्रवाहीं. ॥ वैराग्य० ॥ ४ ॥
सेवक अमृतराय संतांचा । हाचि पूर्ण मनोरथ त्याचा ।
अर्पित काया मन वाचा । अंतर्बाह्य व्यापक साचा ।
यासी विठ्ठल रुक्मिणी मायी. ॥ वैराग्य० ॥ ५ ॥

पद ४९ वें.

होतां सद्गुरुवरदान । प्राप्त झालें ब्रह्मज्ञान ।
तेथें संसाराचें भान । आहे आहे नाहीं नाहीं. ॥ १ ॥
सेवितां श्रीगुरुकुळ । ब्रह्म त्रैलोक्य गोकुळ ।
दारापुत्र अनुकूळ । आहे आहे नाहीं नाहीं. ॥ २ ॥
तुटली संसाराची झेल । भक्तीं वाळलाचि बेल ।
सांजोळे दिव्यासी तेल । आहे आहे नाहीं नाहीं. ॥ ३ ॥
पुरे घोंगडेंसें छीट । भिकेचें चिमूट पीठ ।
तेथें भाकरीसी मीठ । आहे आहे नाहीं नाहीं. ॥ ४ ॥
पोट मात्र भरायास । न करी कोठेंही सायास ।
तुटकें खेटर पायांस । आहे आहे नाहीं नाहीं. ॥ ५ ॥
पोटिं लागतांचि भूक । न म्हणें शिळें ना साजूक ।
पोळी पातळ नाजूक । आहे आहे नाहीं नाहीं. ॥ ६ ॥

होतां अंतरीं निष्काम । मुखीं आलें रामनाम ।
तेथें मृदंगाचें काम । आहे आहे नाहीं नाहीं. ॥ ७ ॥
साचा अमृत परमार्थ । न करी कोणासीं वादार्थ ।
घरिं लागला पदार्थ । आहे आहे नाहीं नाहीं. ॥ ८ ॥

पद ५० वें.

अरे ! तूं भुळूं नको नटूं नको । स्वहिता अंतरसील. ॥ ध्रुवपद. ॥
हा देह पांचांचा पांचांचा । पांचजण नेतील ।
जीव हा अज्ञानी न्यायाला । धर्मदूत येतील ।
हिशेब पापाचा पुण्याचा । चित्रगुप्त घेतील ।
केल्या कर्माचें फळ बापा ! । अवश्य ते देतील. ॥ अरे० ॥ १ ॥
वेदशास्त्रांच्या उपदेशें । निरभिमानी होय ।
राहें लीनपणें सर्वांशीं । जैसें पातळ तोय ।
क्षमा आत्मत्वें धरावी । अबोलणीं जणु भूय ।
आत्मविचारें पुसावी । संतजनांतें सोय. ॥ अरे० ॥ २ ॥
वैभव जायाचें जायाचें । पापबळें जाईल ।
सत्ता श्रीहरिची श्रीहरिची । हरि हिरून नेईल ।
होई सावध रे ! सावध रे ! । तरिच बरें होईल ।
क्षेम कल्याणीं कल्याणीं । अमृतेश्वर देईल. ॥ अरे० ॥ ३ ॥

पद ५१ वें.

या रे ! । सज्जन जन होया रे ! । मनीं धरुनि विभया रे ! ।
होतो नाश वया रे ! । यमास नाहीं दया रे ! ।
हरिगुणकीर्तन श्रवण मनन करूं काशी हेचि गया रे ! ॥ १ ॥
जा रे ! । श्रीगुरुलागिं भजा रे ! ।
श्रीहरिलागिं वजा रे ! । निज गुज पर उमजा रे ! ।
अंतर्मुख सुखवृत्ति करुनियां विषयस्मरण वर्जा रे ! ॥ २ ॥
कां रे । जोडुनि बहुत टका रे ! ।
संसारीं अटका रे ! । घडे केंवि सुटका रे ! ।
लोकप्रतिष्ठेसाठीं देशोदेशीं किति भटका रे ! ॥ ३ ॥

सारे । चिन्मयरूपिं असा रे ! ।
हें गुरुलागिं पुसा रे ! । महातत्व गंवसा रे ! ।
प्रत्यय किमपि न ये तरि क्षणभरि इच्छारहित बसा रे ! ॥ ४ ॥
थारे । लोभ मनांत वृथा रे ! ।
ऐका ईशकथा रे ! । लागा संतपथा रे ! ।
अमृत म्हणे हरिभजनें चुकती जन्ममरणचळथा रे ! ॥ ५ ॥

पद ५२ वें.

होउनि गोसांवी गोसांवी । हरिकथाचि परिसावी. ॥ ध्रुवपद. ॥
गमन नसे ज्या गांवीं । तेथिल वाट कंशास पुसावी. ॥ होउनि० ॥ १ ॥
भिक्षा मागुनि निस्पृहतेनें । संगतिचीं पोसावीं. ॥ होउनि० ॥ २ ॥
मिळोत कां खंबाळें । अथवा भगवींही नेसावीं. ॥ होउनि० ॥ ३ ॥
दुर्वाक्यें सोसावीं । आपण अमृतवृष्टि वर्षावी. ॥ होउनि० ॥ ४ ॥

पद ५३ वें.

कोठें नवजावें नवजावें । श्रीहरिलागिं भजावें. ॥ ध्रुवपद. ॥
दोचौदिवसां घाटा भरडुनि । उदक करुनियां प्यावें. ॥ कोठें० ॥ १ ॥
समयीं आल्या अतीताशी । यथाशक्ति भोजन द्यावें. ॥ कोठें० ॥ २ ॥
स्त्रीपुत्रादिक छळिती । त्यांचें वचन उगीच सोसावें. ॥ कोठें० ॥ ३ ॥
श्रीमद्भागवतालागिं वाचुनि । आपण आपणा उमजावें. ॥ कोठें० ॥ ४ ॥
स्वच्छंदें उठतां बसतां । नामीं अमृतेश्वरासी गावें. ॥ कोठें० ॥ ५ ॥

पद ५४ वें.

ऐशा योगें भगवंत कैसा भेटे । विषय सेवितां आयुष्य सर्वहि आटे. ॥ ध्रुवपद. ॥
मोहित होउनि फिरती अज्ञानाच्या राती । ज्याला त्याला आवडे पिंवळी माती ।
नगवज घालुनियां त्रैलोक्यांत न माती । वितभर पोटासाठीं देशोदेश जाती. ॥ १ ॥
रात्रिदिवस अवघा काळ लोटे । रुपये ढवळिती माती त्याचें भूषण मोठें ।
जोडुनि आणिती हिरवे पिंवळे गोटे । रचिती उराशिरावरि लोक मोटे. ॥ २ ॥
बिंदुगोळक शुक्तिकेंत पडतां स्वाती । त्याला भोळे लोक नेणुनि म्हणती मोती ।
पाणीयाची किंमत करिती लक्षुनि ज्योती । हरिगुणश्रवणावांचुनि कंठीं श्रवणीं धरिती
कीटक मारुनि देशीं आळविताती जंतु । शालारिविरमेहेनव(?)कांतण्याचे तंतू ।
भूषण मानूनि गौरविताति नातू पंतू । तपायोगें म्हणविताति पंडित किंवा पंतू. ॥

---

१. हौस.

करिति अलंकार गौरीवरि कापसाचे । आपण कानीं घालिति काप साचे ।
सेवुनि आशीर्वाद न घेती तापसांचे । तेणें योगें पावती ताप साचे. ॥ ५ ॥
आत्मज्ञाना विरहित देहीं ममता गाढी । पाहुनि आरशांत सरसी करिति दाढी ।
घेवुनि चिमटा पांढरे केंस काढी । आपण सदन्न भक्षुन इतरा कदन्न वाढी. ॥६॥
नश्वर देहासाठीं अक्षय करितो वाडे । गुंतुनि ममता ते कामिनीचे चाडे ।
पुराण ऐकुनि देखत देखत शाहणा नाडे । तो हा अमृत इच्छितो संसाराचे सांडे.॥

पद ५५ वें.

उगाचि मी कोणा काय म्हणूं? ॥ ध्रुवपद. ॥
ब्रह्मविलोकनिं सोसेल कैसें । जगदाभास कणूं. ॥ उगाचि० ॥ १ ॥
सच्चित्सुखमय एकचि असतां । कैंचा भेद गणूं? ॥ उगाचि० ॥ २ ॥
अमृतसमुद्रीं बा! द्वैताचा । कोठें कूप खणूं? ॥ उगाचि० ॥ ३ ॥

पद ५६ वें.

जय हरि! जय जय हरि! । जय परब्रह्म श्रीहरि! ॥ ध्रुवपद. ॥
स्वदार सुत गृहिं सदा । रतत मन सदाचरण मग कदा ।
हरि हरि वदा हो! हरि वदा. ॥ १ ॥
नवा दिवस परि जुना । देह हा क्षणांत होइल चुना ।
हरि हरि म्हणा हो! हरि म्हणा. ॥ २ ॥
रक्तमांस गोठुनि कुच गाल । बगाल किति हा दगा ।
हरिपदिं लागा हो! तुम्हि लागा. ॥ ३ ॥
अमृत अधररस नव्हे । नव्हे हा परस्त्रियेचा थुका ।
हरिपदिं चुकाल हो! झणि मुकाल. ॥ ४ ॥

पद ५७ वें.

हा देह जायाचा उद्यां जायाचा । कदापि नाहीं राहायाचा. ॥ ध्रुवपद. ॥
कारभार हर्ष दासी सेजा । तो हर्ष बुडायाचा. ॥ हा देह० ॥ १ ॥
जाणुनि बुजुनि आळस करिसी । श्रीकृष्ण पुजायाचा. ॥ हा देह० ॥ २ ॥
अमृत म्हणे कधि छंद हा जाइल । रुपये मोजायाचा. ॥ हा देह० ॥ ३ ॥

---

१. समाप्ति.

पद ५८ वें.

अखंड हरि हरि वदा रे बापानो ! । किती सेवाल धनदुर्मदा ? ॥ ध्रुवपद.॥
काय रानांत आटल्या नद्या । काय तरु म्हणती फळ न द्या ।
किती कांडोकांड, मिरवाल मुद्या ।
वाचा एकोबाचा भागवत अध्यारे बापानो ! ॥ अखंड० ॥ १ ॥
काय वाटेसि न मिळती चिंध्या । काय न मिळे भोंपळा दुध्या ।
ह्या तर गोष्टी सुखाच्या सुध्या ।
गेलि घडी आजची नये उद्या रे बापानो ! ॥ अखंड० ॥ २ ॥
काय सांडोनि गोष्टी खऱ्या । काय दुकाळ पडला कऱ्या ।
काय महर्घ तृणाच्या बोऱ्या[1] ।
ह्या तो शुकाच्या गोष्टी बऱ्या रे बापानो ! ॥ अखंड० ॥ ३ ॥
काय लोकीं दारवंट रोधले । काय न घालिति चार जोंधळे ।
हें काय नेणति दुर्मद आंधळे ।
व्यर्थ अमोलिक आयुष्य उधळे रे बापानो ! ॥ अखंड० ॥ ४ ॥
बाहु असतां आपणापाशीं । मग कशासि पाहिजे उशी ।
काय अडचण महदाकाशीं ।
काय पृथ्वी ठाव नेदी कुशी रे बापानो ! ॥ अखंड० ॥ ५ ॥
कर जोडुनि अमृत विनवितो । बाहु उभारोनि गर्जतो ।
जो कां निश्चय धरुनि बैसतो ।
त्यासि हरि बसल्या ठायिं देतो रे बापानो ! ॥ अखंड० ॥ ६ ॥

पद ५९ वें.

हें तुज कसें कळतें कसें कळतें ? । हरिभजनीं मन चळतें. ॥ ध्रुवपद.॥
षड्रस अन्न करावें । यथासांग पोट भरावें. ॥ हें तुज० ॥ १ ॥
सुंदर वनिता व्हावी । वस्त्रें भूषणें बरवीं ल्यावीं. ॥ हें तुज० ॥ २ ॥
कन्या पुत्र व्हावे । बरवें जामातां मिरवावें. ॥ हें तुज० ॥ ३ ॥
घरीं असाव्या म्हैशी । धनधान्य संग्रहा दासी. ॥ हें तुज० ॥ ४ ॥
बहुत द्रव्य मिळवावें । उभ्या बाजारीं मिरवावें ॥ हें तुज० ॥ ५ ॥
अमृतद्वारीं लोळे । कीर्तनरंगीं जिव्हा खेळे. ॥ हें तुज० ॥ ६ ॥

---

१. जर्टई, हांतरी.

पद ६० वें.

जगव्यापका हरीला नाहीं कसें म्हणावें? ॥ ध्रुवपद. ॥
तंतू पटीं मिळाले भूमी नभापरी हो! ।
घट मृत्तिका निराळी ऐसें कसें म्हणावें? ॥ जग० ॥ १ ॥
मुक्ता सुतेज पाणी पुष्पीं सुगंध तो हा, ।
मैलागिरी सुवासा नाहीं कसें म्हणावें? ॥ जग० ॥ २ ॥
गोडी ति साखरेची पाखडीतां नये बा! ।
भिन्नत्व हेम वस्तू ऐसें कसें म्हणावें? ॥ जग० ॥ ३ ॥
मी मागतों तुम्हांला तुम्हि ध्या श्रीपांडुरंगा, ।
अमृतेश्वराचे भजनीं द्वैत कसें म्हणावें? ॥ जग० ॥ ४ ॥

पद ६१ वें.

बा! तुझा चालता काळ । खायाला मिळती सकळ. ॥ ध्रुवपद. ॥
हे कोण बायकोचे मामे । घरांत वागती रिकामे ।
सगरशेल्याचे रुजामे । भोजनभाऊ केवळ. ॥ बा तुझा० ॥ १ ॥
हे कोण बायकोचे साले । तुपावेगळा घांस न गिळे ।
तांदुळ रांधावे मोकळे । केलें बेंब्रीचें उखळ. ॥ बा तुझा० ॥ २ ॥
साल्या मेहुण्या घरास येती । फराळाच्या बसती पंक्ती ।
नातें उकरोनी काढिती । अवघा मायेचा गोंधळ. ॥ बा तुझा० ॥ ३ ॥
अमृतेश्वर म्हणे रे मूर्खा! । कां भुललासि मायेच्या सुखा? ।
अंतीं एकटा जाशिल नरका। भज भज श्रीगुरूदयाळ. ॥ बा तुझा० ॥४॥

पद ६२ वें.

त्याचा हरि विकला हरि विकला । प्रेमें हरिगुण शिकला. ॥ ध्रुवपद. ॥
दो चौं दिवसा वेंची । भाजी चुकाचाकवत सुकला. ॥ त्याचा० ॥ १ ॥
आत्मानात्म विचारी । संतति संपत्ति पूर्ण पिकला. ॥ त्याचा० ॥ २ ॥
सप्रेमें करताळी । देण्याघेण्यावांचुनि सुटला. ॥ त्याचा० ॥ ३ ॥
संतुष्ट यदृच्छालाभें । आनंद ज्याच्या हृदयीं पिकला. ॥ त्याचा० ॥ ४ ॥
अमृत म्हणे भव जिकला । जो नर धनकामिनिवर थुकला. ॥ त्याचा० ॥५॥

पद ६३ वें.

फिरसी कां पोरा! कां पोरा! । स्वरूपीं हो सामोरा. ॥ ध्रुवपद. ॥
आपणावांचुनि बाहेर पाहातां । जेथें तेथें भांगोरा. ॥ फिरसी० ॥ १ ॥

आत्मसुखप्राप्तीचें साधन । नरतनु उत्तम हेरा. ॥ फिरसी० ॥ २ ॥
अमृतराय म्हणे परत परत रे! । मूर्खा! कजातखोरा! ॥ फिरसी० ॥३॥

पद ६४ वें.

अशाश्वत संग्रह कोण करी? ॥ ध्रुवपद. ॥
कोण करी परि सोपे माझ्या । वस्ति बरी विवरीं? ॥ अशाश्वत० ॥ १ ॥
चिरगुट चिंध्या जोडुनि कंथा । गोधडि हेचि बरी. ॥ अशाश्वत० ॥ २ ॥
नित्य नवें जें देइल माधव । भक्षूं तेंचि घरीं. ॥ अशाश्वत० ॥ ३ ॥
आत्मस्त्रीसुत परकी होती । टेविती भूमीवरी. ॥ अशाश्वत० ॥ ४ ॥
नित्य मिळेल तें नित्यचि भक्षुनी । चिंतिन देव हरी. ॥ अशाश्वत० ॥ ५ ॥
सांडुनि सेवा कल्पतरूसम । भिक्षा हेचि बरी. ॥ अशाश्वत० ॥ ६ ॥
त्रिविधजना त्याजुनि उपार्जन । स्वस्थ बसेन घरीं. ॥ अशाश्वत० ॥ ७ ॥
अमृत म्हणे मज भिक्षेचे डोहळे । उठति आशालहरी. ॥ अशाश्वत० ॥ ८ ॥

पद ६५ वें.

या नरदेहीं स्वच्छंदें सत्संगें सार्थक करा रे! ।
फिरुनि नये हे वेळ भगवद्भजनीं भवजल तरा रे! ॥ ध्रुवपद. ॥
आला पाला वाटुनि गर्गट घेतां पोट भरे रे! ।
चिंध्या जोडुनि कंथा ते पांघुरतां शीत हरे रे! ।
स्वाधिन असतां आपुले उपास पडतिल तेही बरे रे! ।
भाग्य नये सांगातें अहंकारें हरि अंतरे रे! ॥ या नर० ॥ १ ॥
खग मृग कोल्हे व्याघ्र लांडगे भुजंगादिक जाती रे! ।
पराधीन भय मनुष्य देखुनि पळोनियां ते जाती रे! ।
त्यासि उपास न पडती काई पडती ते सोशिती रे! ॥ या नर० ॥२॥
या संसारा अनंत दुःखें पाहतसा चांगलीं रे! ।
अनुभविती अवघेजण परि ते नुमजे देखत भुली रे! ।
आडरानीं फिरतां फिरतां असोनि बुद्धी गेली रे! ।
अमृतेश्वरासि स्वकरें धरुनी हरिनें वाट दाविली रे! ॥ या नर० ॥३॥

पद ६६ वें.

तो नर नित्य सुखी नित्य मुखी । ब्रह्म निरंतर निरखी. ॥ ध्रुवपद. ॥
पांचा साहा दिवसीं । स्वगृहीं शाक सुधेसम लेखी. ॥ तो नर० ॥ १ ॥

कर्ज नसे कोणाचें । प्रवासवर्जित इंद्रिय गुरखी. ॥ तो नर० ॥ २ ॥
शांत दांत निरपेक्षी । करि हरिकीर्तन नामें हरिखी. ॥ तो नर० ॥ ३ ॥
तन धन तृणसम लेखी । जाणे अमृत आपपारखी. ॥ तो नर० ॥ ४ ॥

पद ६७ वें.

तरिच वांचो रे! वांचो हा देह. ॥ ध्रुवपद. ॥
अन्नशांति करुनि बरी । सकळजना तृप्ति करी. ॥ तरिच० ॥ १ ॥
पंढरीशीं जाइ जरी । हरिचे गुण गाय तरी. ॥ तरिच० ॥ २ ॥
अमृत म्हणे गोष्टि बरी । हेंचि ध्यान राहे जरी. ॥ तरिच० ॥ ३ ॥

पद ६८ वें.

हरिभजनावांचुनी काय केलें रे! ॥ ध्रुवपद. ॥
दुर्लभ नरतनु वेंचुनि । वाचुनि भागवतासि न वाचुनि उगलें.॥ हरि० ॥ १ ॥
श्रवण करुनि मनन न करितां । निजध्यासनीं अंतर पडलें. ॥ हरि० ॥ २ ॥
निजध्यासाविण साक्षात्कारण । जन्मांतर तें बिज उरविलें. ॥ हरि० ॥ ३ ॥
अमृतवचन हे बुझुनि अजुनि तरि । रिझुनि हरिशि भज सार्थक कथिलें. ॥ हरि० ॥

पद ६९ वें.

हें मुख किति पाहसिल दर्पणांत? ॥ ध्रुवपद. ॥
बाळपणीं केलें तें गेलें । आठवीं थोरपणांत. ॥ हें मुख० ॥ १ ॥
ध्यानायोग्य हें मन गेलें । तेलमिठासर्पणांत. ॥ हें मुख० ॥ २ ॥
मेले पूर्वज कैसे उमजती । आठवितां तर्पणांत. ॥ हें मुख० ॥ ३ ॥
अमृत म्हणे करणें तें केलें । श्रीहरिचे अर्पणांत. ॥ हें मुख० ॥ ४ ॥

पद ७० वें.

आग्रह जरि ऐसा । देव भेटेल कैसा? ॥ ध्रुवपद. ॥
मी एक पंडित मी एक वैदिक । मी एक ज्ञानी लैसा. ॥ देव० ॥ १ ॥
विद्यागर्वें उन्मत्त होउनी । आडवी जेंवी म्हैसा. ॥ देव० ॥ २ ॥
मर्द असे संसार कराया । मिळउनी बहु पैसा. ॥ देव० ॥ ३ ॥
आत्मचरित्रें लोकांमध्यें । व्हावी फार प्रशंसा. ॥ देव० ॥ ४ ॥
अमृत म्हणे तूं लीनपणानें । राहीं पाणी तैसा. ॥ देव० ॥ ५ ॥

पद ७१ वें.

तत्वंपद विचारूनि स्वयंब्रह्म होईं रे! ॥ ध्रुवपद. ॥
श्रवण मनन निजध्यास । दुष्कृताचा करुनि नाश ।

धरुनि श्रीगुरुचि कास । अमृतरस घेई रे! ॥ तत्वंपद० ॥ १ ॥
मायामोह दूर करुनि । देह अभिमान त्यंजुनि ।
मिठि घाली गुरुचरणीं । याच पथें जाई रे! ॥ तत्वंपद० ॥ २ ॥
जन्ममरण दूर होय । त्यासि असे हा उपाय ।
अमृत म्हणे झालि सोय । यांत भ्रांति नाहीं रे ! ॥ तत्वंपद० ॥ ३ ॥

पद ७२ वें.

प्राण्या! बोलावें बहु गोड. ॥ ध्रुवपद. ॥
दुष्टदुरुक्ती दुर्वचनाची । टाकुनि द्यावी खोड. ॥ प्राण्या० ॥ १ ॥
अंतर बाहिर नवादि साखर । सेवि सुखाची कोड. ॥ प्राण्या ०॥ २ ॥
अमृत म्हणे नरदेहा येउनि । संतसमागम जोड. ॥ प्राण्या० ॥ ३ ॥

पद ७३ वें.

बाई ! माझे नयनीं लागला तार. ॥ ध्रुवपद. ॥
तुर्या देखुनि योगीं रमलें । उन्मनि झालें पार. ॥ बाई० ॥ १ ॥
आहे तें सारुनि नाहीं तें देखिलें । तेथेंचि रमलें फार. ॥ बाई०॥२॥
गुरुकृपाअमृत अंजन घालुनि । विचारी सारासार. ॥ बाई० ॥ ३ ॥

पद ७४ वें.

माझी ज्ञानविसांवी । कधिं भेटेल गुरु आई ? ॥ ध्रुवपद. ॥
लक्षचौऱ्यांशी हिंडतां शिणलों । तूंच आहे सर्वांठायीं. ॥ माझी०॥१॥
मायामोहांत मी व्यापून गेलों । कोण सोडविल पाहीं? ॥ माझी०॥२॥
अमृत बोले सद्गुरुवचनीं । विश्वास टेउनि राहीं. ॥ माझी० ॥ ३ ॥

पद ७५ वें.

बाइल पैशाची पैशाची । कधीं नव्हे पुरुषाची. ॥ ध्रुवपद. ॥
जोंवरि धन सुत जोडी । तोंवरि लावी लाडीगोडी. ॥ बाइल० ॥ १ ॥
वेडा बहिरा पिसा । त्यासी देखुन करि कर्कशा. ॥ बाइल० ॥ २ ॥
अमृतराय तुज सांगे । मजला प्रतीति आली आंगें. ॥ बाइल० ॥ ३ ॥

पद ७६ वें.

श्रीरामाचे चाकर । आम्ही. ॥ ध्रुवपद. ॥
हरिकीर्तन हा आमुचा मुशारा । रामनाम तुप साखर. ॥ आम्ही० ॥ १ ॥

नाम ब्रह्म पै बिज मुक्तीचें । जामिन चंद्र दिवाकर. ॥ आम्ही० ॥ २ ॥
अमृतरूप घरिं बसल्या देतो । स्वात्मसुखाची भाकर. ॥ आम्ही० ॥ ३ ॥

पद ७७ वें.

अर्जि तुम्ही ऐका । सखि सहोदर म्हणती पैक्या. ॥ ध्रुवपद. ॥
पैक्यापासुनियां रथ गाडी । पैका बांधीत असे माडी ।
पैक्यापासुनि शालजोडी ॥
पैका उडवित असे घोडीं । लाउनि सडका. ॥ सखि० ॥ १ ॥
पैक्यापासुनि कन्यापुत्र । पैका मिळवी इष्ट मैत्र ।
पैका महारत्न विचित्र ॥
.... । संचित टका. ॥ सखि० ॥ २ ॥
पैका माजी एक निधी । जेथें पैका तेथें बुद्धि ।
.... ॥
ज्याला पैका न मिळे कधीं । तो नित्य फिका. ॥ सखि० ॥ ३ ॥
पैक्यापासुन कामकाज । पैका मिळवी बहुत व्याज ।
पैका मायेचें निज बीज ॥
पैका बहु रत्न महाराज । कागद रोखा. ॥ सखि० ॥ ४ ॥
पैक्यापासुन कारभार । पैका हिंडवी दारोदार ।
पैका दुःखाचा डोंगर ॥
पैका गर्वाचा सागर । बुडवी कटका. ॥ सखि० ॥ ५ ॥
पैक्यापासुन पुराण श्रवण । पैका करी वेद पठण ।
पैका करी नृत्यगायन ॥
पैका करी झुंज भांडण । .... ॥ सखि० ॥ ६ ॥
पैक्यापासुन व्याही जांवई । पैका देतो म्हैशी गाई ।
पैका दावी अनभ बढाई ॥
.... । मिळवी बाइका. ॥ सखि० ॥ ७ ॥
ऐसें पैक्याचें आख्यान । ऐका तुम्ही चित्त देऊन ।
पैका पाहून भुलले जन ॥
अमृतेश्वर निर्मळ वचन । लाधला टिका. ॥ सखि० ॥ ८ ॥

पद ७८ वें.

किति रे! नटसी? । काय यमासि उत्तर देसी? ॥ ध्रुवपद. ॥
संजाप सोडुनि पगडि बनावसी । छांदार छबिला गुल्जार दिससी ।
पानें खावुनि मुख रंगविसी ॥
दांत विचकुनि उगाचि खदखद हससी. ॥ काय० ॥ १ ॥
तन मन धन रांडेसि अर्पिसी । संतसाधूंची निंदा करिसी ।
पुराण कीर्तन कधिं न ऐकसी ॥
समज धरीं तूं व्यर्थ गाढवा! फिरसी. ॥ काय० ॥ २ ॥
भर गेल्या मग सहजचि फससी । आपजन परकी होतील तुजसी ।
दूत यमाचे देतिल फांसी ॥
अमृत म्हणे यमासमोर नेतिल तुजसी. ॥ काय० ॥ ३ ॥

पद ७९ वें.

त्याला कशाला दुशाला मशाला? ॥ ध्रुवपद. ॥
अवस्थात्रयी त्यागुनी दिननिशाला ।
आत्मसुखें विचरतसे पांघरी दिशाला. ॥ त्याला० ॥ १ ॥
याचना न करी कांहीं पसरि करपशाला ।
सहजस्थिति शयन करी ठेवि कर उशाला. ॥ त्याला० ॥ २ ॥
देह गेह विसर्जुनी सांडिलें आशाला ।
अमृतराय म्हणे काय करिल यम अशाला? ॥ त्याला० ॥ ३ ॥

पद ८० वें.

हरि मज कसा करिल भवपार? ॥ ध्रुवपद. ॥
तन मन धन विषयावरि वळतें । भजनीं आळस विकार. ॥ हरि० ॥ १ ॥
स्वात्मबुद्धी विचारुनि पाहीं । कोणि न केला उपकार. ॥ हरि० ॥ २ ॥
अमृत म्हणे तुम्ही भजा निरंतर । श्रीधरगुरुचे पाय. ॥ हरि० ॥ ३ ॥

प्रासंगिक पदें.

पद ८१ वें.

धन्य भगवंता! दैवीं काय आलें। बाळ माराया पतिनें सांगितलें. ॥ ध्रुवपद. ॥
पूर्वी देवाचें पुजन नाहीं केलें, । कोण्या मातेचें बाळ विघडविलें, ॥
किंवा कोणाचें अन्न उडविलें, । अथवा अंधारीं कूपिं लोटियेलें. ॥धन्य०॥१॥
नाहीं केला मी साधुसमागम, । नाहीं दिधलें मी ब्राह्मणासीं अन्न, ॥
किंवा कोणाची निंदा होती केली, । गाई ब्राह्मणा छाया नाहीं दिली. ॥धन्य०॥२॥
वाढल्या वृक्षाची वाढ खुंटविली, । किंवा कोणाची बाळहत्या केली, ॥
पूर्वी देवाची पूजा नाहीं केली, । मार्गी पांथस्था वाट खुंटविली. ॥ धन्य० ॥३॥
किंवा खीरीमधिं लवण मीसळीलें, । विप्र जेवितां उपाशी उठविले, ॥
किंवा कोणाचें द्रव्य हरण केलें, । तें हें पातक भोगायास झालें. ॥ धन्य० ॥४॥
हिरण्यकशिपु पुसे कांतेपाशीं, । अजुनि विलंब कां गे! लाविलाशी? ॥
हातीं घेऊनी विषाचा पेला, । बाळ प्रल्हाद हृदयिं आलिंगीला. ॥ धन्य० ॥५॥
प्रथम त्याचा बा! कडेलोट केला, । दुसऱ्यानें अग्नींत ढकलीला, ॥
तिसऱ्यानें हत्तीचे पदीं दिला, । तेव्हां त्याचा हो! मृत्यु कुठें गेला. ॥ धन्य० ॥ ६ ॥
नारायणनामाचा प्रल्हाद घोष करी, । त्याचा कैवारी रक्षिता सखा हरी, ॥
धावें पावें येऊन गरुडावरी, । अशीं बहू विघ्नें टाळि परोपरी. ॥ धन्य० ॥ ७ ॥
माता म्हणे मी बाळ मारूं कैसा? । धावें पावें गा! येउनि जगदीशा! ॥
धावें पावूनी येऊनी गरुडावरी। अशीं बहु विघ्नें टाळि परोपरी. ॥ धन्य० ॥ ८ ॥
माता म्हणे बाळ धरिलें उदराशीं । तरी तें दुःख सांगुं कोणापाशीं? ॥
बाळ प्रल्हाद वाढतो दिसामाशीं। आतां मला टाकुनी कुठें जाशी?॥ धन्य० ॥ ९ ॥
हिरण्यकशिपू पुसे कांतेपाशीं, । अजुनी विलंब कां गे! लाविलांशी? ॥
भाषण ऐकतां कष्टि झाली चित्तीं । विषाचा पेला घेतला हो! हातीं. ॥धन्य०॥१०॥
हातीं घेऊनियां विषाची वाटी । मग धरियेली त्याची हनुवटी, ॥
विष हो! तें मुखास लावियेलें। लावतां तें अमृत तोंडीं झालें. ॥ धन्य० ॥११॥

पद ८२ वें.

रामदर्शनासि चला । लाभ हा भला. ॥ ध्रुवपद. ॥
रामजन्म रामनवमि नक्षत्र पुनर्वसु ।
समय मध्यान्ह दिवा अवतार जाहला. ॥ राम० ॥ १ ॥

---

१. हिरण्यकशिपूची स्त्री कयाधू हिनें आपला पुत्र प्रल्हाद यास पतीचे आज्ञेवरून विष पाजिलें त्या प्रसंगाचें वर्णन. २. रामजन्माचा प्रसंग.

दशरथासि दाशरथी पुत्र जन्मला, ।
त्रिभुवनांत जयजयकार जाहला. ॥ राम० ॥ २ ॥
भजकाचे कोटि अन्याय हा क्षमा करी, ।
उद्धरितां महाराज नाहिं भागला. ॥ राम० ॥ ३ ॥
शबरिकबरिबदरिफळें पदरिं घेउनी ।
भावबळें भुलोनियां भक्षुं लागला. ॥ राम० ॥ ४ ॥
महाविष त्र्यंबकासि अमृत लाधला, ।
पार्वतीसि थोर आनंद जाहला. ॥ राम० ॥ ५ ॥

पद ८३ वें.

राम गोसावी कीं जाहला, । अवघे मिळोनि पाहूं चला. ॥ ध्रुवपद. ॥
काढुनि मोतीयांची आंगी । दिव्य विभूति लावी आंगीं ।
जैसा भव्य पुरातन जोगी । शरयूतीरीं बैसला. ॥ राम० ॥ १ ॥
फेंकुनि दिला बादली चिरा । वाटिला मोतियांचा तुरा ।
फेडुनि पिंवळ्या पीतांबरा । वनीं वल्कलें नेसला. ॥ राम० ॥ २ ॥
आतां होऊनि बेजार । काढी किनखापाची वीजार ।
जैसी जुनी तुटकी पैजार । तैसें राज्य झुगारिलें. ॥ राम० ॥ ३ ॥
धाडुनि लक्ष्मणा सुभटा । चीक आणिला प्रार्थुनि वटा ।
मऊ केशाच्या केल्या जटा । दिव्य तांबड्या धगधगीत. ॥ राम० ॥ ४ ॥
उदास होऊनी सुवर्णनगीं । संनिध सीता बैसली उगी ।
भेटीस नलगे परवानगी । उघडें दर्शन चांगलें. ॥ राम० ॥ ५ ॥
भरतें रामातें विनविलें, । त्यासी पादुका भाग्य दिल्हें, ।
चौदा वर्षे राज्य भलें । करितील आतां पादुका. ॥ राम० ॥ ६ ॥
मर्दुनि रावणा कंटका । स्वधर्म स्थापुनियां नेटका, ।
स्वार्जित राज्याच्या पादुका । पायीं घालिल दिसताहे. ॥ राम० ॥ ७ ॥
येथें बहुत फार कष्टलों । नाना दुःखांहीं वेष्टिलों ।
ब्रह्मानंदांतुनी भ्रष्टलों । होईल लाभ तेथें हो ! ॥ राम० ॥ ८ ॥
ब्राह्मण ब्रह्मनिष्ठ भंवताले । रामदर्शनातें आले ।
भगवच्चर्या करुनि जाले । ब्रह्मानंदीं निमग्न. ॥ राम० ॥ ९ ॥

---

१. कैकेयीच्या आग्रहावरून दशरथानें रामास वनास धाडिलें तो प्रसंग.

तेथें चांगला एकांत । निवळ होताहे वेदांत ।
क्षणभरी करूं चला विश्रांत । हा गृहधंदा सोडुनियां. ॥ राम० ॥ १० ॥
रामें सोडुनि दिधला कोप । जटा गुंडाळुनि केला टोप ।
केवळ वैराग्याचें रोप । अक्षय शरीर रामाचें. ॥ राम० ॥ ११ ॥
करुनि पर्णकुटीची मठी । भगवी ध्वजा उभवी गुढी ।
नाहीं चोपदार देवडी । दाही दिशा मोकळ्या. ॥ राम० ॥ १२ ॥
जवळी नाहीं मणि फुटका । तेथें कैंचा जरीपटका ।
हा तव परमार्थ नेटका । विवेकासी आणिला. ॥ राम० ॥ १३ ॥
सेवक अमृतराय भगवान । त्याला अखंड हेंची ध्यान ।
आपले जातीचें महिमान । ज्याला त्याला आवडे. ॥ राम० ॥ १४ ॥

पद ८४ वें.

राम[1] सखा मज भेटल कै कै । पाठवितों वना एकट पै पै. ॥ ध्रुवपद. ॥
अतिसकुमार कुमार वियोगें । लोटति पलयुग कोटित पै पै. ॥ राम० ॥ १ ॥
भक्तहितास्तव हिंडे वनांतरीं । शबरी अहल्या उद्धरी पै पै. ॥ राम० ॥ २ ॥
सद्गुरु बोले हरुषानंदे । अमृतकवी नाचतसे थै थै. ॥ राम० ॥ ३ ॥

पद ८५ वें.

केला[2] कीं उपकार । मारुते! ॥ ध्रुवपद. ॥
घेउनियां करीं आणियला गिरि । औषधिंचा संभार. ॥ मारुते० ॥ १ ॥
प्राणदाता तूं सौमित्राचा । मेळविलें यश फार. ॥ मारुते० ॥ २ ॥
राघव मी परि रविवंशाचा । वाढविला बडिवार. ॥ मारुते० ॥ ३ ॥
अमृतप्रभु स्तुति कपिरायाची । करितसे वारंवार. ॥ मारुते० ॥ ४ ॥

पद ८६ वें.

अतसि[3][4]कुसुमसम कांति हरीची. ॥ ध्रुवपद. ॥
सूक्ष्म तंतुचि उंच घोंगडी । पदरीं तगटे कोर जरीची. ॥ अतसि० ॥ १ ॥
आठवितां ममताचि गळाली । रु[5]क्मदोरी दोहिं करींची. ॥ अतसि० ॥ २ ॥
अमृत सदोदित चिंतितसे मानीं । मूर्ति यशोदेच्या उदरींची. ॥ अतसि० ॥३॥

---

१. रामवियोगामुळें दशरथानें केलेला शोक. २. रामानें मारुतीची केलेली स्तुति. ३. कृष्ण-वर्णन. ४. अवस. ५. सोनें.

पद ८७ वें.

पदरीं धरोनि हरि आणा गे बाई! ॥ ध्रुवपद. ॥
शिरीं बांधियेला चिरा। खोंवी मोतियांचा तुरा।
वरी झळकतो हिरा। अमोलिक दाणा गे! ॥ पदरीं० ॥ १ ॥
येउनीयां यमुने स्थळीं। खेळतसे चेंडूफळी।
तो हा हरी वनमाळी। चतुर शहाणा गे! ॥ पदरीं० ॥ २ ॥
काळिया मर्दिला ज्यानें। उचलिला गिरी त्यानें।
मुरलीचे नादानें। माझा मोहिला प्राण गे! ॥ पदरीं० ॥ ३ ॥
मत्स्य कूर्म नानापरी। दशविध रूपें धरी।
अमृताचा साह्यकारी। सांगतसे खुणा गे! ॥ पदरीं० ॥ ४ ॥

पद ८८ वें.

करितो रळी बहुत सये नंदन गे! तूझा. ॥ ध्रुवपद. ॥
आंवळोनियां कुच धरी। चुंबन मग देत हरी।
उभा रडे गळां पडे चेंडु दे म्हणे माझा. ॥ करितो० ॥ १ ॥
वळें घरा येत असे। दहींदूध भक्षितसे।
करी हांस बहु त्रास ठाव नसे दूजा. ॥ करितो० ॥ २ ॥
दीर भावे आणि पती। गांजितात सांगू किती।
सासु नळा पिळिति गळा जीव घेति माझा. ॥ करितो० ॥ ३ ॥
ऐसा असे दुष्ट बाई!। सोसवेना सांगों काई?।
अमृतराय सदा गाई भक्तजनकाजा. ॥ करितो० ॥ ४ ॥

पद ८९ वें.

वेडा तामसा जोगी। देखिला कि माय?। ॥ ध्रुवपद. ॥
आरक्त लोचन ज्याचे। पिंगट मिशा ॥
मुमिस लोळे दाढी। बावऱ्या जटा ॥
डोईस घालून राख। मोकळ्या जटा ॥
भिकेचे मागुन तुकडे। भोपळ्यांत खाय ॥ वेडा० ॥ १ ॥
खडखड काळे मणके। वोवोनि माळा ॥
येवढे थोरले पेंदे। वेडियाचे गळा ॥

१. कृष्णपराक्रमवर्णन. २. मर्दिल. ३. गोपीचें गाऱ्हाणें. ४. शंकर जोग्याचें रूप धरून गोकुळांत कृष्णदर्शनास आला असतां कृष्ण यशोदेजवळ त्याचें वर्णन करितो.

जन्मजूग हातांत । विभूतिचा गोळा ॥
अखंड वोढे भांग । गुंगींत राहे. ॥ वेडा० ॥ २ ॥
तिनशें साठ माशाची । गोदडी बरी ॥
वोऊनि शंभर दोरे । काढे कुसरी ॥
परिप्रकारचे बुरे । शोभति गळा ॥
वेड्यानें आणिले कोठून । चोरुन कीं काय? ॥ वेडा० ॥ ३ ॥
उठोनि धरि एक बैल । त्यावरी बसे ॥
वेडा तामसा जोगी । निरंजनीं वसे ॥
त्याच्या पाठी लागलें । सद्भावपिसें ॥
म्हणे मज अमृत दावा । वेडियाचे पाय. ॥ वेडा० ॥ ४ ॥

पद ९० वें.

अधरिं धरुनि कोणें वाजविला वेणु? ।
चला बाई! जवळी बहुधा चारि हरि नंद धेनु. ॥ ध्रुवपद. ॥
तो गमत पदि रमत कमजा अभिमत फलदा एक खलकदनु ।
विरति निरति आणि वरद वदती शुकसनकादिक पदतळरेणु. ॥ १ ॥
मधुर मधुर गुण आकर्णू यदुकुळहरणू पिशुनव चरणू ।
न गणुनी शेष ठकित आणि चकित मशक मग अमृत म्हणे मी काय वर्णू॥२॥

पद ९१ वें.

यशोदेबाई! ऐक पुत्राचीं लक्षणें. ॥ ध्रुवपद. ॥
व्रजांत कोणे एके दिशीं । आला गर्गाचार्य जोसी ।
त्याला दाखवितां कृष्णासी । चिन्हें बोलता झाला. ॥ १ ॥
मध्यें मुख्य यशोदा बाळा । संनिध रोहिणी वेल्हाळा ।
भवता गोपीकांचा पाळा । त्या गोपाळा दाखवी. ॥ २ ॥
याला पदोपदीं आदान । बरवें वाटित जावें दान ।
द्वारीं पुसतांचि नंदानें । त्याला तैसें सांगितलें. ॥ ३ ॥
उखळी दांव्यानेंच खिळावा । बगल्या सर्पानेंच गिळावा ।
किंवा वणव्यामाजि जळावा । ग्रासिल दावाग्नी सगळा. ॥ ४ ॥
ब्राह्मणलातेचें भूषण । हृदयीं श्रीवत्सलांच्छन ।
त्याला म्हणती ब्राह्मणजन । ऐका जनार्दनाचा. ॥ ५ ॥

---

१. कृष्णानें वनांत पांवा वाजविला तो प्रसंग. २. गर्गाचार्यांनीं कृष्णाविषयीं भविष्य सांगितलें तें.

पांडवराजियाचे मेळीं । कादिल उष्टया पत्रावळी ।
तुमच्या घरचे गुरें वळी । लाज नाहीं निलाजरा. ॥ ६ ॥
करिल दह्यादुधाची चोरी । भोगिल गवळीयांच्या पोरी ।
अवघ्या शिंदळांचा चौधरी । नवाजी आणिल बायका. ॥ ७ ॥
सेवक अमृतराय सर्वदा । ज्याचा शुद्धभाव हा सदा ।
जैशा पुरें भरल्या नद्या । तैसीं विघ्नें वारीती. ॥ ८ ॥

पद ९२ वें.

घोंगडीचा पांघरणारा रे! ॥ ध्रुवपद. ॥
हुतुतु होबळी चेंडु खेळत । पीतवसन वल्कट कसणारा रे! ॥ १ ॥
धरुनि राधिकापदर निजकरीं । घेउनि रतिसुख गत पुसणारा रे! ॥ २ ॥
घरोघरीं वेंचुनिया नवनीत । साय दधी दुध घृत खाणारा रे! ॥ ३ ॥
यशोदेपासी गाऱ्हाणें सांगसी । गाही पुरवितो अमृतेश्वरचरणा रे! ॥ ४ ॥

पद ९३ वें.

माझा निरोप यशोदेसीं । कोणी तरी सांगा हो! ॥ ध्रुवपद. ॥
कृष्ण तुझा नावडता बाळ । क्षुधित द्वारीं जो गोपाळ ।
त्यावरी होउन पूर्ण कृपाळ । आपुला बाळ म्हणसील कीं? ॥ माझा० ॥ १ ॥
नाहीं मागत तूप साखर । दे मज कोरडीच भाकर ।
तुझा म्हणवितों मी चाकर । कांहीं निकर दाखवूं नको. ॥ माझा० ॥ २ ॥
यशोदा नोहे तुझि तरी माय । शिवों नको म्हणतो बंधुराय ।
कोणी देइल दहिं दुध साय । त्यासीं उपाय काय करूं? ॥ माझा० ॥ ३ ॥
ऐकुनि हाक यशोदा माय । धांवत आली जैसी गाय ।
सखया! विपरीत वदसी काय? । रडती धाय मोकलोनी. ॥ माझा० ॥ ४ ॥
सखया! वाहल्ये तुझीच आण । तूं सुत माझा गुणनिधान ।
तुजवरी उतरुन सांडिन प्राण । अमृतसमान मज वाटे. ॥ माझा० ॥ ५ ॥

पद ९४ वें.

तुम्हि निशिदिनीं मनीं ध्या गे!। वन त्यजुनि सकळ सदना जा गे!॥ध्रुवपद.॥
पाहिलें रूप जसें गे! । तसें मनांत आणुनि मज ध्यां गे! ॥ वन० ॥ १ ॥
सोयरे आप्त सखे गे! । पतिसुतादि भरतिल रागें. ॥ वन० ॥ २ ॥
मत्प्रसाद तुम्हा गे! । ऋषी पुजिति स्तविति अनुरागें. ॥ वन० ॥ ३ ॥
अमृत म्हणे विनवा गे! । जसें लवण जीवनीं मिळवा गे! ॥ वन० ॥ ४ ॥

---

१. कृष्णलीलावर्णन.

पद ९५ वें.

बाई![1] कैसें वेड लावीलें । या हरिनें मन मोहीलें. ॥ ध्रुवपद. ॥
वाटे माझा मीच हरी । चतुर्भूज वेणूधारी ।
संसाराचें भान कांहीं नाहिं राहिलें. ॥ या हरिनें० ॥ १ ॥
मधुवनीं सुमनें । आणूं जातां पथानें ।
अनुरूप रूप म्यां पाहीलें. ॥ या हरिनें० ॥ २ ॥
अमृत म्हणे मी नीके । मानुनि सर्व फिके ।
पंचभूत देहा ज्याचे त्याला वाहीलें. ॥ या हरिनें० ॥ ३ ॥

पद ९६ वें.

तूं[1] चाल राधे! । झडकरि हरिसंनिध ये रतिसुखसुसमाधे! ॥ ध्रुवपद. ॥
तरुनि अब्ध गाधे । तव दर्शन जरि लाधे ।
नृत्य करिल धेनू मध्यें तद्धिधिकिटताधे. ॥ तूं चाल० ॥ १ ॥
वृषभानुकुलनिधे! । शृंगाररतसुधे! ।
तुजविण अति पीडित हे हरि विरह उपाधे. ॥ तूं चाल० ॥ २ ॥
हा योग साधे । तरि काम मन बाधे ।
अमृत शुद्धयोग करिल हरि बुध अनुराधे. ॥ तूं चाल० ॥ ३ ॥

पद ९७ वें.

नेऊं[2] नको यदुवीर । अक्रूरा! ॥ ध्रुवपद. ॥
नंद यशोमति भाकिति करुणा । बाल्यदशा नाहिं थोर. ॥ अक्रूरा० ॥ १ ॥
कंस दुरात्मा निशिदिनिं जपतो । घातकि कीं निष्ठूर. ॥ अक्रूरा० ॥ २ ॥
गोपी अवघ्या मिळुनी बोलति । करिं येवढा उपकार. ॥ अक्रूरा० ॥ ३ ॥
अक्रूर नाम तुझें जगीं बोलती । परि करणी दिसे क्रूर. ॥ अक्रूरा० ॥ ४ ॥
बैसविले रथीं श्याम मनोहर । तुजवरि मरतिल फार. ॥ अक्रूरा० ॥ ५ ॥
गोपी विरहें व्याकुळ होती । नयनीं झिरपिति नीर. ॥ अक्रूरा० ॥ ६ ॥
अमृतमतीनें पाहुनि अक्रूरा । सप्रेमें बैसे स्थीर. ॥ अक्रूरा० ॥ ७ ॥

पद ९८ वें.

येइं[3] हो! द्वारकेच्या राया! । माझें कल्याण कराया. ॥ ध्रुवपद. ॥
अवधी नसे कांहीं धांवत येईं । संकट सिंधु तराया. ॥ माझें० ॥ १ ॥

---

१. कृष्णलीलावर्णन. २. कंसाच्या आज्ञेनें कृष्णास मथुरेस नेण्याकरितां अक्रूर आला असतां गोकुळांतील गोपी त्यास म्हणतात. ३. वस्त्रहरणप्रसंगीं द्रौपदीनें केलेला कृष्णाचा धांवा.

कोठें गुंतलासी ? भीमकी भामा । त्रैमल्या चरण चुराया. ॥ माझें० ॥ २ ॥
कौरव दुर्जन गांजिति मजला । वहिण मी तुझी देवराया ! ॥ माझें० ॥ ३ ॥
अमृत म्हणे हा समय असे कीं । संकटसागरीं तराया. ॥ माझें० ॥ ४ ॥

पद ९९ वें.

श्रीकृष्ण पांडवांचे घरिं ऐशा परि साजे. ॥ ध्रुवपद. ॥
जो कां वैकुंठनिवास । प्रिय परम शिवास ।
सौख्यदायक जीवास । पूज्यमान जो देवास ।
तो हा धर्माचे सभेस ॥
जोडुन हात भीत भीत मर्जी पाहुनि अर्जी करी फर्जी जैसा गर्जे तो साजे. ॥ १ ॥
मूर्ति सोज्वळ सांवळी । कटितटिवेष्टित पींवळी ।
ओंचे खोवोनि आंवळी । तो हा उष्टया पत्रावळी ।
चोहों मुर्जि कवळी ॥
तनू सांवळी पिवळ्या कथिकांच्या ओघळी पांडवगृहीं विराजे तो साजे. ॥ २ ॥
रम्य नाभीसी कमळ । ब्रह्मा तयामध्यें बाळ ।
आपण चिन्मात्रें निर्मळ । अमृत नाम हें कोमळ ।
तो यदुरायाचा वंश मूळ ॥
पांडवसदनीं विदुरादिकां आर्या द्रोणाचार्या लागे सूर्यापरि साजे तो साजे. ॥३॥

पद १०० वें.

अरे ! मी भीष्म जरीच तरी, श्रीहरि ! । वरविन चक्र करीं, श्रीहरि ! ॥ध्रुवपद.॥
क्षत्रियकुळिंचा सुत शंतनुचा । जन्मलों शुभजठरीं ॥
हरिपदीं जन्मुनि शिवमौळीं वसे । त्या गंगेउदरीं. ॥ श्रीहरि० ॥ १ ॥
सायुध यादव, चक्ररहित तूं । निश्चय करिसि तरी ॥
सांप्रत मजला कळों येईल रे ! । ह्या अनुपम समरीं. ॥ श्रीहरि० ॥ २ ॥
पार्थ हें बचडें बाळक अर्जुनी । दुग्ध दिसे अधरीं ॥
वृजवर्णियास्तव पशुपक्षी भिती । निर्भयक्षेत्र करी. ॥ श्रीहरि० ॥ ३ ॥
ध्वजरूपी हरी, हय तेही हरी, । सारथी मुख्य हरी ॥
हरिमय रथ हा विजय श्रीहरी । मी यानें प्रहरीं. ॥ श्रीहरि० ॥ ४ ॥
पाहें मी शिष्य भार्गवरामाचा । कोपल्या न उरे टरीं ॥
अमृतवचनीं सत्यप्रतिज्ञा । ऐकिजे रणचतुरीं. ॥ श्रीहरि० ॥ ५ ॥

१. कृष्णवर्णन. २. भीष्मप्रतिज्ञेचें भाषण.

पद १०१ वें.[1]

अंबा या हिमालयाच्या बाला । हासति जगदंबेला. ॥ ध्रुवपद. ॥
वाटे बाईनें धुंडाळूनी । आणियले हे कोठूनी ।
याचें स्वरूप अवलोकुनि । गंहिवर येतो आम्हाला. ॥ अंबा० ॥ १ ॥
पांच तोंडें दिसती याला । व्याघ्रचर्म पांघुरला ।
दुर्गाबाईचे प्रारब्धाला । कोण मध्यस्थी झाला? ॥ अंबा० ॥ २ ॥
बाई आरुढे गजावरी । येथें बैलाची सवारी ।
आणिक दिसतसे भिकारी । काय तातें पाहिला? ॥ अंबा० ॥ ३ ॥
अंबा म्हणे वो! म्हणतां काय । वंदा मम सद्गुरूचे पाय ।
अमृत म्हणे वो! आदिमाय । समजावी त्या भगणीला. ॥ अंबा०॥ ४ ॥

पद १०२ रें.

[2]ब्रह्मरात मुनी सप्रेमें वंदावा हो! ॥ ध्रुवपद. ॥
अंशुकविरहित शुक विहरत जो । किंशुकवत फुलला हरिभजनीं. ॥ १ ॥
भक्ति विरक्ती पक्षद्वय राघव । उडत फिरत अनुभव चिद्गगनीं. ॥ २ ॥
देवरात शुकनलिके अटकुनि । ऊर्ध्व पंथ करि किरिकिरि वदनीं. ॥ ३ ॥
जनकप्रथित श्रुतिमथित भागवत। कथित मलिनमति उलथित भविंहुनि.॥ ४ ॥
पदवितत तनय अभिमन्युतनय । करि अतिविनय श्रवण समजुनी. ॥ ५ ॥
व्यास हृदयपंजर शुकमाशुक । आशु करित हरि हरि हरि अनुदिनीं.॥ ६ ॥
पद्मनाभविधिसांप्रदायमत । अमृतोद्गार वदत मृदुवचनीं. ॥ ७ ॥

हिंदुस्थानी पदें.

पद १०३ रें.

गनपत भावे । हरिकथारंगमो आवे. ॥ ध्रुवपद. ॥
पगसो नाचे मुखसो गावे । चारो करसो भाव बतावे ।
सुर साजिंदे संग बुलावे ॥
लपटा नागबंदसो दुलदुल दोंद हलावे. ॥ हरि० ॥ १ ॥
चुवेकू तुर्की गत सिखलावे । जादा नव दलमो पैठावे ।
अंकुश पाश फर्श चमकावे ॥
लढाई दुष्ट दैतनमो ज्या हर सीख लगावे ॥ हरि० ॥ २ ॥

---

१. निर्धन शिवाशीं लग्न केल्यावरून पार्वतीच्या सख्या तिची निर्भर्त्सना करितात. २. साधु-विशेषाचें वर्णन.

संकट दुख जंजाल जलावे । जगमें सत्कीरत उजलावे ।
ब्रह्मानंदी डुकी डुलावे ॥
अमृतरायके घर बैठेला संसार चलावे. ॥ हरि० ॥ ३ ॥

पद १०४ थें.

सबसो आदां । मोरेसर साहेब ज्यादा ॥ ध्रुवपद. ॥
जासें प्रकृतिपुरुष नरमादा । पैदा हुवे कहत तह दादा ।
तीनो लोक करे मर्जादा ॥
आगे दौरे देव तेतीस करोर प्यादा. ॥ मोरेसर० ॥ १ ॥
बिधिहरिहरका भजन बिरादा । उत्पत्ति स्थिति बोझ्या लादा ।
तामो सबसो आप अलादा ॥
यह गति जाने व्यास ध्रुव नारद प्रल्हादा. ॥ मोरेसर० ॥ २ ॥
चुवेपर जडावका है हौदा । चामर छत्र सुनेरी जर्दा ॥
वाचे अठरा पुरान कर्दा ॥
बाटे खैरात रुपये होन मोहरा खुर्दा. ॥ मोरेसर० ॥ ३ ॥
जाने पूरन बिदिया चौदा । देवे मोल लियेबिन सौदा ।
पूरन प्रसाद मुक्तवलीदा ॥
धर्मी हीन हयांत मुक्तवलीदा बाबा आदाम उमदा. ॥ मोरेसर० ॥ ४ ॥
चमके पेशानीपर चांदा । तक्त बनाया सिंदुर बरदा ।
जगमो देवे आशिर्वादा ॥
जावे अमृतराजसों मुफेत कलंदर सादा. ॥ मोरेसर० ॥ ५ ॥

पद १०५ वें.

सब दुनियापालनवाला । हजरत अल्ला. ॥ ध्रुवपद. ॥
शिरपर जटाजूटकी ढाला । उसमे छपी एक है बाला ।
अखियन चंद्रसूरज उजाला ॥
तिजा नयन अगनकी ज्वाला रखनेवाला. ॥ सब० ॥ १ ॥
विषसें कंठ भयो है काला । सोभत गले रुंडकी माला ।
हिर्दे गिरजाकूं संभाला ॥
गनेश नंदन जो गुलाला. ॥ सब० ॥ २ ॥
हातमें डमरू त्रिशूलभाला । मुद्रा अगाधपूर्णकृपाला ।
तात सब जगके प्रतिपाला ॥
अंतरध्यान धरत मनमोहन लछुमनवाला. ॥ सब० ॥ ३ ॥

आसन बनारसीमो डारा । चर्चित बभूत गले मृगछाला ।
बर देवेकूं बडे कृपाला ॥
अमृतरायका बारबार उपराला. ॥ सब० ॥ ४ ॥

पद १०६ वें.

जय शंकरजीकी लीला । पुनित सुशीला. ॥ ध्रुवपद. ॥
बुट्टेदार व्याघ्रांबर पीला । तापर गजचर्मांबर गीला ।
गरलसें गला भयो है नीला । मरकतशीला. ॥ जय० ॥ १ ॥
चुवे बाघ बैल तबेला । दुर्गा अपने साथ कबीला ।
गनेस बालक अजब छबीला । रंगी रंगेला. ॥ जय० ॥ २ ॥
भोलानाथ चित्तसें ढीला । सिसमो गंगा जोत असीला ।
अमृतरायको बडा बशीला । रसिक रसीला. ॥ जय० ॥ ३ ॥

पद १०७ वें.

शिव सब घटमो । नहि गुप्ता है परगटमो. ॥ ध्रुवपद. ॥
व्यापकज्योतिरूप नरनटमो । बिचरत भूतनके खटपटमो ।
तत्वंपद माहामायके तटमो ॥
महापर्वतके सासीबासी बिचरत तनके पटमो. ॥ नहि० ॥ १ ॥
साजत समय भुजंगके तटमो । अजमत जटाजूटके जटमो ।
मेखल लटकत शिवके कटमो ॥
महापर्वत कैलासबासी नृत्य करत लटपटमो. ॥ नहि० ॥ २ ॥
मनमो मस्त अमलके चटमो । बिराजत गले व्याघ्रांबर पटमो ।
डुलता श्रीगंगाके तटमो ॥
अमृतराय शिवशक्तिउपासक हरहरके खटपटमो. ॥ नहि० ॥ ३ ॥

पद १०८ वें.

अजब खिलोना । जगदंबा माताजीका. ॥ ध्रुवपद. ॥
दुटु दुटु दुटु दुटु । चाल चलनका चलना ।
मंगलमूरत सूरत खूब । सीस हरी गहरी है दूब ।
एकरदन गजबदन सदन सुख दौलत दे कर तुलना ॥ १ ॥
कानमें कुंडल मोतन हार । गले बिच माला चंद्रजोहार ।
नागबंध कंबरकूं सोभे । हातमें डमरु फरश बिराजे ।

पावमे घुंगरू रुमझुम बाजे आया रंगमो साना ॥ २ ॥
लंबा पेट बडा बा फराक । मिसरीके मोदकके खुराक ।
चुवा मुहावे चपल सवारी । जडावके जीननपर वारी ।
कोऊ पूछत तुम कहा जात हो हासत कहत है अमृतरायसे मिलना. ॥३॥

पद १०९ वें.

तासों भारी । लपटी है प्रीत हमारी. ॥ ध्रुवपद. ॥
साई सरजूतीरविहारी । मौज करे सरकार्मुकधारी ।
चरनधूलसे विधिजा तारी ॥
गनिका गजंद्र भवजल पार उतारी. ॥ लपटी० ॥ १ ॥
भई वेरसें भिल्लन प्यारी । वाकी बांदरपर असवारी ।
वनचर किल्कत फौज तयारी ॥
रावन राच्छस जमात सगरी मारी. ॥ लपटी० ॥ २ ॥
छुडवाई भूपाल दुल्हारी । जाय अजुध्या गुन अवतारी ।
सिंघासनपर चढे मुरारी ॥
श्रीगुरुमध्वनाथपर अमृतराय बल्हारी. ॥ लपटी० ॥ ३ ॥

पद ११० वें.

नंदा नंदा । मोहे प्यारा बालमुकुंदा. ॥ ध्रुवपद. ॥
मुरलीवाला वृजवासिंदा । राधाप्रीती वन दावछंदा ।
रास रचे वाला साजिंदा ॥
सबसो न्यारा देव बडा बाजिंदा. ॥ नंदा० ॥ १ ॥
मात जसोमति पूत मुकुंदा । भवसो पार किया मुचकुंदा ।
सो हरि मुनिजनका सुखकंदा ॥
दावें बांधे गोपी देव गोपिनसो शरमिंदा. ॥ नंदा० ॥ २ ॥
वोही कंस करेथा निंदा । सोई सहज पछाडा खंदा ।
मारे अगबग केसी कंदा ॥
नाथे कालिया नाग सब नागनमो रिंदा. ॥ नंदा० ॥ ३ ॥
बम्हनसाधुसंतका बंदा । चरणकमलपर मगन मिलिंदा ।
छांड दिया सब घरका धंदा ॥
कीरत गावे निसदिन ध्यावे अमृतराय नवसिंदा. ॥ नंदा० ॥ ४ ॥

पद १११ वें.

वो नर कहां पावे । निसदिन हरिगुन गावे ॥ ध्रुवपद. ॥
कुच रोटी कुच लंगोटीमा । खुशाल गुजर चलावे ॥ वो नर० ॥ १ ॥
मिन्नत करकर देवे । तो ही पैसा हात न लावे ॥ वो नर० ॥ २ ॥
दो दिनके दुनया मो । बाहवा करकर जावे ॥ वो नर० ॥ ३ ॥
औरत आगे आवे । मायबहेन बराबर भावे ॥ वो नर० ॥ ४ ॥
फिर चली रातभजनकी । भीमा चिद्गंगामो न्हावे ॥ वो नर० ॥ ५ ॥
अमृतरायके नामसुधारस । मन भरपूर पिलावे. ॥ वो नर० ॥ ६ ॥

पद ११२ वें.

काया नहि तेरी नहि तेरी । मत कर मेरी मेरी. ॥ ध्रुवपद. ॥
नाहावे हांडा पानी गरम । नहि करता कवडीका धरम. ॥ काया० ॥ १ ॥
इस कायेका कोन भरोसा । आखर जम डारेगा फांसा. ॥ काया० ॥ २ ॥
बांधे टामटीमकी पगडी । चौथे दीन मुंडावे दाढी. ॥ काया० ॥ ३ ॥
खावे घीखिचडीका खुराक । आखर जल कर जावे खाक. ॥ काया० ॥ ४ ॥
चंदन सीस लगावे टीका । आखर रामभजनबिन फीका. ॥ काया० ॥ ५ ॥
हुवा जानमे गड्डु । राम भजले धीके तट्टु. ॥ काया० ॥ ६ ॥
चावे पान सुपारी लवंगा । गल्लोगल्लि फिरत बेढंगा. ॥ काया० ॥ ७ ॥
बाजे थंड बनाया डगला । उप्पर काल फिरत है बगला. ॥ काया० ॥ ८ ॥
वोढे शाल दुशाला पटु । इसमे क्यौं भूलारे खटु. ॥ काया० ॥ ९ ॥
न्याहाली पलंगपर सोवे । इसके खातर जान खोवे. ॥ काया० ॥ १० ॥
अमृत कहे सब झूटा धंदा । भजले राम कृष्ण गोविंदा. ॥ काया० ॥ ११ ॥

पद ११३ वें.

तुम चिरंजीव कल्याण रहो । हरिकथा सुरस पिओ ।
हरिकीर्तनके साथी सज्जन । बहूत बरस जीओ ॥ ध्रुवपद. ॥
सस्ता दाना पानी निर्मल । गंगाजललहरा ।
रंगराग और बागबगीचे । रुपये होन मोहरा. ॥ तुम० ॥ १ ॥
उंचा मंदिर महाल सुनेरी । महाल मुलुख बसती ।
पुत्रपौत्रको सुंदरकामिनी । सगुणगुण आस्ती. ॥ तुम० ॥ २ ॥
अमृतरायके अमृतवचनसें । सदा सुखी रहियो ।
सबळपुष्टि आरोग्य नामसें । आनंदमों रहियो ॥ तुम० ॥ ३ ॥

पद ११४ वें.

रात सखी सपना हम देखें ।
राम लखमन सिया जनकल्लीरी. ॥ ध्रुवपद. ॥
ये दोउ कुंवर मोहेर मेंढाडे । मैं अपने गृहसें निकसीरी ॥
देख रूप चकित भई आली । मानौं अंग भुजंग डसेंरी ॥ रात०॥१॥
सपनो झूंटो सपनो सांचो । यह सपनेकी बात नहींरी ॥
जो सपनेकी सांची नामानें । मेंहदी मोरे हात रचीरी ॥ रात० ॥ २ ॥
मोर मुगुट मकरायत कुंडल । भाल तिलक गले तुलसीरी ॥
रावण मारे असुर संहारे । तेतिस कोट देवनकी कोट खुलीरी ॥रात०॥३॥
रंग भुवनमें रची रसोई । ओट करी पीतांबरकीरी ॥
बाळब आज कहां लगबरनों । अमृत बूंद घटा बरसीरी ॥ रात० ॥ ४ ॥

पद ११५ वें.

वजाई कान्ह बौंसी मधुर धून ।
जमुनातटाक तान गुं गुं गुं. ॥ ध्रुवपद. ॥
श्रवन करत चलित जसब ग्वालनी ।
पायल बाजत नाद छुं छुं छुं. ॥ १ ॥
पशुपंखी जलथल सकल तल्लीन भयें ।
मोर करे सोर तामें कोकीलाकी कुं कुं कुं. ॥ २ ॥
जम रह्यो नाद ब्रह्म सम भयो वेद ब्रह्म ।
अमृतकी झर लागी रुं झुं झुं. ॥ ३ ॥

पद ११६ वें.

करकमलसों चरनकमल लिये ।
आननकमलमों रसना सोकर मी लाप ॥ ध्रुवपद. ॥
जीत कमल और सज्जन जो रसनीं तहिलेत ।
सोरस गोरस सेवन करीत आप ॥ १ ॥
वट विपट नदराय कर पुटपत्रशयन ।
जय बाल मुकुंद जगत कारन कलाप ॥ २ ॥
ब्रह्म सनातनसे येहि येही ब्रजको कल्यान ।
अमृतराय येमन कर अलाप ॥ ३ ॥

---

१. सीता. २. लाडकी. ३. घरांत बैठकीची जागा. ४. निघाली. ५. सखो.

पद ११७ वें.

अब तो भली बनी । हर लिनी मुरली हरकर किं हूं सरकी ॥ ध्रुवपद. ॥
और सखि दौर गई सुमीरनसों लपट लपट ।
छीन लई लकुटी और कलगि सिरपरकी ॥ अब तो ०॥ १ ॥
पीत बसन छीन लियो कामिनको भेख दियो ।
अयन बयन सरस बनी नंदजिकी लरकी ॥ अब तो० ॥ २ ॥
भवसों जब मन उदास तब भयो यह बिभास ।
अमृतराय निरखत है ये छब गिरधरकी ॥ अब तो० ॥ ३ ॥

अमृतरायकृत आणखी उपलब्ध पदें.

पद ११८ वें.

गोविंद गाय तो नंद यशोमतिचा. ॥ ध्रुवपद. ॥
मोहो हाला पिउनि तूं महालांत ।
हालामध्यें हा लाभ मम कैंचा ? ॥ गोविंद० ॥ १ ॥
वंशी वाजवी गोप वंशी जन्मोनि ।
जीव अंशीं मेळवि वंशीचा ॥ गोविंद० ॥ २ ॥
केशीं धरूनि मारि केशीय करि ।
राधिकेशीं प्रसंग रैतिचा ॥ गोविंद० ॥ ३ ॥
गाई चारितां करि घाई मुलासि ।
पाई चाले सासुरा रतिचा ॥ गोविंद० ॥ ४ ॥
दांवीं बांधितां रूप दावी मातेशी ।
तो गोंसावी अमृतकविचा ॥ गोविंद० ॥ ५ ॥

पद ११९ वें.

हरि ! चालवेना माझे चरण दुखती पाई खडे खुपती ।
ये त्वरें करुनि घे कडे चालवेना ॥ ध्रुवपद. ॥
देव म्हणे बैसें खांदे खांदिं केविं बैसों जातां ।
गुप्त करुनी अतितृप्त अमृत रौसरंग सुविचार चालवेना. ॥ १ ॥

---

१. विषा २. पांवा ३. सुरताचा, निधुवनाचा. ४. रासक्रीडा.

पद १२० वें.

तूं रत हरिगाणीं । पाहतां दो दिवसांची जिंदगाणी. ॥ ध्रुवपद. ॥
कितिरे कारभार करिशी । .... ॥
नैश्वर्य लोकीं भूषण मानुनी । पंचभुतांची तनुवि गाणी ॥तूं रत०॥१॥
किती रे ! मेळविशी पैसा । पराधीन होऊनियां कैसा ।
वेश्या शरीर वोढवुनी । साधी जेंवी दुगाणी ॥ तूं रत० ॥ २ ॥
ज्या देहीं वैकुंठ ध्यावें । त्या देहा कैलासा जावें ।
तें वेचुनियां आठां प्रहरां । लाभ नव राग गाणी ॥ तूं रत० ॥ ३ ॥
आर्जवुनियां राजद्वारें । किती रे करिशी घरेंदारें ।
चोरें तें गौरविली पोरें । सोनें जडित नगांनीं. ॥ तूं रत० ॥ ४ ॥
अमृतराय तूं बसुनी हरिशी भज । दुर्लभ नरतनु सांपडली तुज ।
राज उकरडा वृथा उकरिजे । खरकुकड्यादि खगांनीं. ॥ तूं रत०॥५॥

पद १२१ वें.

संपत्तीच्या बळें रे । करसी नाना चाळे रे ।
स्वस्त्री त्यागुनि परस्त्रियेचे संगती लोळसी रे ॥ ध्रुवपद. ॥
मदगर्वाच्या बळें रे । धुरें भरले डोळे रे ।
हरिकीर्तनीं आळस मोठा चौपट बाजी खेळें रे ॥ संपत्तीच्या० ॥ १ ॥
संतवृद्धीचा विटाळ रे । कुबुद्धि ऐकें प्रबळ रे ।
संतसज्जनां त्यजुन प्राण्या निंदकाच्या जवळ रे ॥ संपत्तीच्या० ॥ २ ॥
अमृतस्वामी भोळा रे । विनवी साधू सकळां रे ।
राजहंसाचा मळा रे वायसाचा चाळारे ॥ संपत्तीच्या० ॥ ३ ॥

पद १२२ वें.

चल जाऊं विदुराघरीं । उद्धवा ! ॥ ध्रुवपद. ॥
उंच उंच माड्या नाहीं कामाच्या । साधुची झोंपडी बरी ॥ उद्धवा०॥१॥
लाडू अनारसे नाहीं कामाचे । भावाची आंबील बरी ॥ उद्धवा० ॥ २ ॥
शाल दुशाले नाहीं कामाचे । साधूची गोधडी बरी ॥ उद्धवा० ॥ ३ ॥
अमृत म्हणे कीं हीच विनंती । सोडूं नये कदापि हरी. ॥ उद्धवा० ॥४॥

पद १२३ वें.

येई येई वो श्रीरंगे ! माझे अंतररंगे करुणाकल्लोळ ! ।
निज समये निष्ठुर झालिस का ! वो ! ॥ ध्रुवपद. ॥

---

१. पृथ्वी, आप, तेज इत्यादिकांची. २. वायस=कावळा. ३. भक्तिभावाची. ४. लहरी.

रविशशिविण जैशी दिनरजनी शोभा न पवे ।
मायेवांचुनि घनबिंदु क्षिरसिंधु टाकुनि चातक जाये ।
मीना जवळ नाहीं तरि पाही दधिमधू सेविल काये ।
तैसें तुजविण वो सखये ! उपाय ते अपाये ॥ येईं येईं० ॥ १ ॥
कंठीं कृष्णमणी न विराजे, कुंकुम न वसे भाळीं ।
त्याविण वधू सर्व शृंगारा लेवुनि काय जाळी ? ।
तैसे तुजविण वो निजसखये ! विधिनें लिहिलें भाळीं ।
मंगळदायक ते अतिहरुषे मिरवी जैशी बाळी. ॥ येईं येईं० ॥ २ ॥
करुणा परिसोनि चिद्गगनीं बोले अमृत शब्द ।
सखया सावध रे ! सावध रे ! कां करिसी हा खेद ।
सत्ता एक जगीं विलसतसे तुज मज कैंचा भेद ।
शोक भंगला रंगला अवघा निजानंद. ॥ येईं येईं० ॥ ३ ॥

पद १२४ वें.

हकनाक आयुष्य जाय प्राण्या ! उगाची बससी काय? ॥ध्रुवपद.॥
मनासि मानलें तें तूं करिशि देवासी जें का न साय ।
विचार बोलुनि अवघा करिसी कृत्रिम हा व्यवसाय ॥ हकनाक० ॥१॥
अतिप्रीतीनें देहा पाळिसी भिक्षुक देति दुहाय ।
भोग भोगितां रोग उठति तुज रक्तपित्त कफवाय ॥ हकनाक० ॥ २ ॥
स्वदारा हो परदारा हो भुलणें हाचि अपाय ।
अनुतापाविण नरकीं पडसी मग हा न चले उपाय ॥ हकनाक० ॥३॥
अनादि ईश्वर सत्य अमृत हें म्हणोनि सद्गुरु माय ।
मलाहि दिसतो तुम्हां सांगतों पुढील तरणोपाय ॥ हकनाक० ॥ ४ ॥

पद १२५ वें.

गेला हरी रुसुन यमुनेतिरीं । आतां तो येइल कसा? ॥ ध्रुवपद. ॥
राधे ! तुजला किति शिकवावें । मोहुनि केला पिसा ॥ गेला० ॥ १ ॥
जेंवि जळाविण तळमळि मासा । हा जिव झाला तसा ॥ गेला० ॥ २ ॥
श्याममनोहर प्रार्थुनि आणा । सांगुनि आपुली दशा ॥ गेला० ॥ ३ ॥
रतिसौख्यानें अधरामृतपानें । लुटपुट झाला तसा ॥ गेला० ॥ ४ ॥

पद १२६ वें.

मारुते ! राम कुठें मज सांग ॥ ध्रुवपद. ॥
मृगहरणास्तव प्रभु पाठविले । कशी मी पियालें भांग ॥ मारुते० ॥ १ ॥

रावण मेला उलथुनि गेला । नाहिं राहिलें देहभान. ॥ मारुते० ॥ २ ॥
कुशब्द बोलुनि शेषा छळिलें । नेइल मज गाईसमान. ॥ मारुते० ॥ ३ ॥
अमृता प्रभु तो भेटेल केव्हां । नेइल मज निजधाम. ॥ मारुते० ॥ ४ ॥

पद १२७ वें.

देइल भेटि तुला । तरिच हरि. ॥ ध्रुवपद. ॥
व्रजयुवतींसम तन्मय होसि । सांडुनि जाती कुळा. ॥ तरिच० ॥ १ ॥
गजपति ऐसा त्यक्त कुटुंबें । अर्पिसि कंज फुला. ॥ तरिच० ॥ २ ॥
प्रल्हादापरि सर्वा भूतीं । पाहसि नरहरिला. ॥ तरिच० ॥ ३ ॥
अमृत म्हणे ध्रुव द्रौपदीसारिखा । केवळ होसि भला. ॥ तरिच० ॥ ४ ॥

पद १२८ वें.

पाय तुझे गुरुराया । भवसागर पार कराया. ॥ ध्रुवपद. ॥
तुजविण भजन पुजन आणि साधन । व्यर्थ शिणावें वायां. ॥ पाय० ॥ १ ॥
भागिरथी सरयू आणि गोदा । काशि अयोध्या माया. ॥ पाय० ॥ २ ॥
अमृतेश्वर सर्वेश्वर ईश्वर । करी अजरामर काया. ॥ पाय० ॥ ३ ॥

पद १२९ वें.

संत उदार कसे ? । पहा पहा. ॥ ध्रुवपद. ॥
दर्शनमात्रें पावन करिती । परिसीं लोहें जसें. ॥ पहा पहा० ॥ १ ॥
ज्ञानपण हें सांडुनि सगळें । दहिं कर्पूर जसे. ॥ पहा पहा० ॥ २ ॥
चरणामृत हें पाजुनि दासा । लाविति ज्ञानदशे. ॥ पहा पहा० ॥ ३ ॥
वंदी माधवा अमृतचरणीं । देती ज्ञान जसें. ॥ पहा पहा० ॥ ४ ॥

पद १३० वें.

सच्चित्सुख आत्माराम गावा हो ! ॥ ध्रुवपद. ॥
अमलकमलसम वैमल्यचरणि मन ।
रमेल तरीच भव समल शमलों हो ! ॥ सच्चित्सुख० ॥ १ ॥
विदुधमान्य शरधनुष धरण ।
कलिकलुषहरण येक निमिष भरण हो ! ॥ सच्चित्सुख० ॥ २ ॥
गीता उपदेशी भयभीता ।
पीतांबरधर सीतानाहो. ॥ सच्चित्सुख० ॥ ३ ॥

---

१. लक्ष्मणा. (लक्ष्मण हा शेषाचा अवतार होय.) २. लोखंड. ३. दोन. ४. पति.

लक्ष्मणसहित सुलक्षण क्षणभरि ।
अमृत म्हणे गुणगण ऐका हो ! ॥ सच्चित्सुख० ॥ ४ ॥

पद १३१ वें.

मींचि वो हरि वो वो जाण. ॥ ध्रुवपद. ॥
उद्धव मुखें हरि ज्ञानदेव बरवें ।
अमृतसें श्रुति सार हरि वो वो जाण ॥ मींचि वो० ॥ १ ॥

सुदामचरित्र. (हिंदुस्थानी.)

(साकीवृत्त.)

भूक लगी तव हरिहरि जपना बलसें भूकहि खावे ।
सहनसीलता कहा बखानो अतिसंतोख दिखावे ॥ १ ॥
तर्कशास्त्र मीमांसा नाटक सब व्याकरण पढावे ।
आप सदा बे वांत बिचारे प्राणायाम चढावे ॥ २ ॥
गरीब मेरी तरुन कामिनी पतिव्रता की माता ।
अधो दृष्टिसें उपर देखना नयननमों न समाता ॥ ३ ॥
देवेगा धन अपार तुमको देखतही गुरु बंधु ।
पास द्वारकानाथ बिराजत रतनाकर जलसिंधु ॥ ४ ॥
चैल खंड चौगून धरी मो छोटी गठडी पोहे ।
लिये चले द्वारका पथमो सुखमो नाम जपो हें ॥ ५ ॥
कैसो दरसन होवे मुजकूं वो राजनको राजा ।
द्वारावती देखे नयनसों बाजे नौबत बाजा ॥ ६ ॥
कूद परे मंचकसौ दौरे जो रुक्मिनि सों रूठे ।
चरनकमलपर सीस धरे उठ ऊठ कहे नहिं ऊठे ॥ ७ ॥
मैलागिरि चंदनकी चौकी ऊपर पांव धरावे ।
दीर्घ दंड सम प्रनाम पहिले सबही सोंकर वावे ॥ ८ ॥
मलिनचरनतल रेख मृत्तिका कोमल करसों पकरी ।
पाव दबावत जानु जंघ निर्मास बांस कील करी ॥ ९ ॥
ग्रंथि मुक्तकर एक मुष्टिभर मुखमें डारत चुडवे ।
अमृत फिका तहा कोन गनेहै खडरस सबही कडवे ॥ १० ॥

---

१. वार्ताविशेष. (हा शब्द आरबी आहे.) २. बायको. ३. ही पश्चिम समुद्रामध्यें गुजराथेंत आहे. ४. मैलागिरी–(मलयपर्वत) हा सह्याद्रि पर्वताचा एक भाग आहे. येथे चंदन. उंचप्रतीचा होतो. ५. चौकी–खुरची.

रावण मेला उलथुनि गेला । नाहिं राहिलें देहभान. ॥ मारुते० ॥ २ ॥
कुशब्द बोलुनि शेषा छळिलें । नेइल मज गाईसमान. ॥ मारुते० ॥ ३ ॥
अमृता प्रभु तो भेटेल केव्हां । नेइल मज निजधाम. ॥ मारुते० ॥ ४ ॥

पद १२७ वें.

देइल भेटि तुला । तरिच हरि. ॥ ध्रुवपद. ॥
व्रजयुवतींसम तन्मय होसि । सांडुनि जाती कुळा. ॥ तरिच० ॥ १ ॥
गजपति ऐसा त्यक्त कुटुंबें । अर्पिसि कंज फुला. ॥ तरिच० ॥ २ ॥
प्रल्हादापरि सर्वा भूतीं । पाहसि नरहरिला. ॥ तरिच० ॥ ३ ॥
अमृत म्हणे ध्रुव द्रौपदीसारिखा । केवळ होसि भला. ॥ तरिच० ॥ ४ ॥

पद १२८ वें.

पाय तुझे गुरुराया । भवसागर पार कराया. ॥ ध्रुवपद. ॥
तुजविण भजन पुजन आणि साधन । व्यर्थ शिणावें वायां. ॥ पाय० ॥ १ ॥
भागिरथी सरयू आणि गोदा । काशि अयोध्या माया. ॥ पाय० ॥ २ ॥
अमृतेश्वर सर्वेश्वर ईश्वर । करी अजरामर काया. ॥ पाय० ॥ ३ ॥

पद १२९ वें.

संत उदार कसे ! । पहा पहा. ॥ ध्रुवपद. ॥
दर्शनमात्रें पावन करिती । परिसीं लोहें जसें. ॥ पहा पहा० ॥ १ ॥
ज्ञानपण हें सांडुनि सगळें । दहिं कर्पूर जसे. ॥ पहा पहा० ॥ २ ॥
चरणामृत हें पाजुनि दासा । लाविति ज्ञानदशे. ॥ पहा पहा० ॥ ३ ॥
वंदी माधवा अमृतचरणीं । देती ज्ञान जसें. ॥ पहा पहा० ॥ ४ ॥

पद १३० वें.

सच्चित्सुख आत्माराम गावा हो ! ॥ ध्रुवपद. ॥
अमलकमलसम यैमलचरणिं मन ।
रमेल तरीच भव समल शमलों हो ! ॥ सच्चित्सुख० ॥ १ ॥
विदुषमान्य शरधनुष धरण ।
कलिकलुषहरण येक निमिष भरण हो ! ॥ सच्चित्सुख० ॥ २ ॥
गीता उपदेशी भयभीता ।
पीतांबरधर सीतानाहो. ॥ सच्चित्सुख० ॥ ३ ॥

---

१. लक्ष्मणा. (लक्ष्मण हा शेषाचा अवतार होय.) २. लोखंड. ३. दोन. ४. पवि.

लक्ष्मणसहित सुलक्षण क्षणभरि ।
अमृत म्हणे गुणगण ऐका हो ! ॥ सच्चित्सुख० ॥ ४ ॥

पद १३१ वें.

मींचि वो हरि वो वो जाण. ॥ ध्रुवपद. ॥
उद्धव मुखें हरि ज्ञानदेव बरवें ।
अमृतसें श्रुति सार हरि वो वो जाण·॥ मींचि वो० ॥ १ ॥

सुदामचरित्र. (हिंदुस्थानी.)

(साकीवृत्त.)

भूक लगी तब हरिहरि जपना बलसें भूकहि खावे ।
सहनसीलता कहा बखानो अतिसंतोख दिखावे ॥ १ ॥
तर्कशास्त्र मीमांसा नाटक सब व्याकरण पढावे ।
आप सदा बे वांत बिचारे प्राणायाम चढावे ॥ २ ॥
गरीब मेरी तरुन कामिनी पतिव्रता की माता ।
अधो दृष्टिसें उपर देखना नयननमों न समाता ॥ ३ ॥
देवेगा धन अपार तुमको देखतही गुरु बंधु ।
पास द्वारकानाथ बिराजत रतनाकर जलसिंधु ॥ ४ ॥
चैल खंड चौगून धरी मो छोटी गठडी पोहे ।
लिये चले द्वारका पथमो सुखमो नाम जपो हें ॥ ५ ॥
कैसो दरसन होवे मुजकूं वो राजनको राजा ।
द्वारावती देखे नयनसों बाजे नौबत बाजा ॥ ६ ॥
कूद परे मंचकसौ दौरे जो रुक्मिनि सों रूठे ।
चरनकमलपर सीस धरे उठ ऊठ कहे नहिं ऊटे ॥ ७ ॥
मैलागिरि चंदनकी चौकी ऊपर पांव धरावे ।
दीर्घ दंड सम प्रनाम पहिले सबही सोंकर वावे ॥ ८ ॥
मलिनचरनतल रेख मृत्तिका कोमल करसों पकरी ।
पाव दबावत जानु जंघ निर्मास बांस कील करी ॥ ९ ॥
ग्रंथि मुक्तकर एक मुष्टिभर मुखमें डारत चुडवे ।
अमृत फिका तहा कोन गनेंहै खडरस सबही कडवे ॥ १० ॥

---

१. वार्ताविशेष. (हा शब्द आरबी आहे.) २. बायको. ३. ही पश्चिम समुद्रामध्यें गुजराथेंत आहे. ४. मैलागिरी—(मलयपर्वत) हा सह्याद्रि पर्वताचा एक भाग आहे. येथें चंदन. उंचप्रतीचा होतो. ५. चौकी–खुरची.

अमृतरायकृत नवीन उपलब्ध झालेलीं पदें.

पद १३२ वें.

स्मरतां नित्य हरी । मग ते माया काय करी ॥ ध्रुवपद. ॥
श्रवणें मननें अद्वय वचनें । पळतो काळ दुरी ॥ मग ते० ॥ १ ॥
करुणाकर वरदायक हरि जो। ठेवित हात शिरीं ॥ मग ते० ॥ २ ॥
तोचि निरंतर उद्धवचरणीं । अमृत पान करी ॥ मग ते० ॥ ३ ॥

प्रभाती.

पद १ लें.

तूं ये मोरया । लुटुलुटुलुटुलुटु तर कर । सुंदर वर द्याया ॥ ध्रुवपद.॥
एकदंत दयावंत । शूर्पकर्ण संमत ।
सिंदुरवर लंबोदर । अति अमोघ काया ॥ तूं ये मोरया० ॥ १ ॥
पीतांबर नूपुरवर । घुळुघुळु घागरिया ।
त्रिग त्रिग थै नृत्यप्रिय । उभय भागिं जाया ॥ तूं ये मोरया० ॥ २ ॥
निशिदिनिं करि अमृत मनीं । घोष नामीं भाव धरुनी ।
करणीवरणी गुण सकल, दोष विघ्न जाया ॥ तूं ये मोरया० ॥ ३ ॥

पद २ रें.

तूं जाग भैय्या ! । त्यज त्यज त्यज निद्राभर। जोगी चित्त पैया ॥ ध्रुवपद॥
गैयां सब ठाडि रही । कांसनसे दुग्ध स्रवत ।
बच्छनको तलमलाट । पीवनकी बिरियां ॥ तूं जाग भैय्या० ॥ १ ॥
ग्वालबाल चेत भये । मंथनकी बिरिया ।
गुं गुं गुं शब्द करत । नवनीत खैया ॥ तूं जाग भैय्या० ॥ २ ॥
बिनति सुनत चेत भये । मुख पेखलैया ।
केशरके तिलक बीच । मृगमदकी बिंदियां ॥ तूं जाग भैय्या० ॥ ३ ॥
आगे आगे आप चलत । पीच्छे चलत है गैया ।
अमृतराय निरखत है । ये छब अजबैया ॥ तूं जाग भैय्या० ॥ ४ ॥

---

१. 'शिष्य' असा अन्य पाठ आहे. २. हें पद विठ्ठलकृत असें 'नवनीतां'त म्हटलें आहे, परंतु हें अमृतरायाचें असावें असें वाटतें. ३. प्रभातकाळीं म्हणण्याचीं पदें. ४. शरीर. ५. पैंजण. ६. बायका. ७. जागा हो. ८. गाय. ९. उभी. १०. वांसरूं. ११. पिण्याची. १२. वेळ. १३. जागे झाले. १४. कस्तुरीचा. १५. बिंदु, टिपका. १६. कांति. १७. आश्चर्यकारक.

पद ३ रें.

चलो सखी कुंज गलिन[1] । मोहनसों[2] मिलिया ॥ ध्रुवपद ॥
ग्वालबाल हिलमिलात[3] । बलदेवजी भय्या ।
सुन[4] बंसी[5] नृत्य करत । गायन[6] संग बछिया[7] ॥ चलो सखी० ॥ १ ॥
मोरमुकुट पीतांबर । गलेबिच[8] जुगनिया ।
अच्छि निकी किस्त बस्त । सुनत बनत धनिया ॥ चलो सखी० ॥२॥
सजल घनश्याम तनु । अच्छी सांवरिया[9] ।
अमृतराय प्रेमभरें । मिलन जात पैयां[10] ॥ चलो सखी० ॥ ३ ॥

पद ४ थें.

तूं ध्याय सांबा[11] । शिव शिव शिव शिव मनीं । प्रेमभरित अंबा ॥ध्रुवपद॥
पंचवदन[12] दिग्भूषण । बहु व्याघ्रचर्मधरण ।
फणिधर[13] कर्पूरगौर[14] । वामांकीं[15] अंबा ॥ तूं ध्याय सांबा० ॥ १ ॥
नंदीवर वहन, शूल । परशु भस्म रुंडमाल ।
जटामुकुट नरकपाल । काल काल आ गा ॥ तूं ध्याय सांबा० ॥२॥
डुबडुबडुब डमरु वाजे । शेष ग्रंथि सांगा ।
शशि गंगा शिरिं विराजे । मुकुट मनविहंगा ॥ तूं ध्याय सांबा० ॥३॥
अमृतराय पाय धरुनि । काय विनवि पाद संगीं ।
अनाहत वाजे शिंगी । दत्त शर कुरंगा ॥ तूं ध्याय सांबा० ॥ ४ ॥

पद ५ वें.

कर्पूरगौर[16] । नंदीवर बसून येशी । वामांकीं गौर[17] ॥ ध्रुवपद. ॥
बं बं बं शंख वाजे । दिग्भूषण शब्द गाजे ।
जे जे स्मरण करिति तुझें । त्यांचें संकट दूर ॥ कर्पूरगौर० ॥ १ ॥

---

१. मार्ग. २. कृष्णाशीं. ३. मिळून, मिसळून. ४. ऐकून. ५. मुरली, पांवा. ६. गाई. ७. वांसरूं. ८. गळ्यांत. ९. सांवळी. १०. पायीं. ११. स+अंबा=अंबेसहवर्तमान. १२. शंकर. १३. सर्पांची माळा घालणारा. १४. शंकर. १५. वामांक=वाम+अंक=डावी+मांडी; स्त्रीला बसण्यास उचित स्थान डावी मांडी होय आणि सून, मुलगी, बहीण यांना उचित दक्षिणांक होय अशी प्राचीन समजूत आहे. १६. शंकर. १७. गौरी (पार्वती).

व्याघ्रांबर नागसूत्र । रुंड माल हे पवित्र ।
जटाजूट गंगासंग । तृतीय नयनीं धूर ॥ कर्पूरगौर० ॥ २ ॥
चंद्र सूर्य नयनीं ज्वाळ । कटिकर भूषणव्याळ ।
शृंगी पात्र नरकपाळ । अमर संगें शूल ॥ कर्पूरगौर० ॥ ३ ॥
नीलकंठ[1] भालचंद्र । ध्यात संकटीं महेंद्र ।
त्रिपुरहर अमृतवरद । दत्तपायिं शीर ॥ कर्पूरगौर० ॥ ४ ॥

---

१. ज्याचा गळा नीलवर्ण आहे तो. (शंकर).

अमृतरायकृत आणखी मिळालेली कविता.

सीतास्वयंवर.

कटाव १.

सांबशिवानें निजकोदंड, दिधलें जनकालागिं प्रचंड, सदनीं आले भूप उदंड, इंद्रप्रस्थ लाहोर आगरा, मारवाड बजवार बुखारा, रूमशाम मुलतान विलायत सुरतीचा पंजाबी द्राविडी देशवस्तिचा सावरमतिचा थडीगांथडी आणि बंगाला तेथिल हो! तो राजा आला, खुरासान ग्वालेरी नरवर गुर्जरदेशीं वलसाड आणिक बडोदे बुंदेलखंडी मथुपुरी गोकुल द्वारावती आवंतिकपुरी साकेतापुरि दस्यस्यंदन याचा नंदन अनेक ऋषि घेउनियां आला, बागलान खरगोन बत्तिशी वराड आणिक नांदेड वसुमती खानदेश मालवाप्रांतिंचा बऱ्हाणपुर औरंगाबादी बीजापुर वेदरिचा नृपति भागानगरी तेलंगी त्रिचनापल्ली कानडकपटी रायपुरी आंदोर्ला आणिक मछलींबंदर सरकार देशिंचा आला राजा पळसपाकिचा यापरि नृपति स्वयंवराशीं सर्व पातले हो. ॥

कटाव २.

आले महोत्सवासी हो। पाहुनि सुकृतराशी हो ॥ ध्रुवपद. ॥

जपी तपी संन्यासी साधक, योगधारणी योगी याज्ञिक, सौर शैव आणि शाक्त वैष्णवी गाणपत्य गुणि गायक वैदिक विप्र पातले वेदपाठि आणि जटापाठ घनपाठ पद क्रम अष्ट विकृती कष्टसाध्य ज्या अग्निहोत्रि किति तांत्रिकमांत्रिक ऋग्वेदी यजुः साम अथर्वण गणित शास्त्रिचे मीमांसावादी धर्मशास्त्र व्याकर्ण बोलके असे आणि महिपाल पातले, भूप मुख्य छप्पन्नदेशिंचे शाण्णव कुळिंचे इष्टमित्र बहु मिष्ट बोलके पुष्ट संपदा घेउनि आले सभेंत ठेले अमृतवचनें बोलती. ॥

पद.

भूमीबाळा म्हणे नृपाळा या दशकंठा मी न वरी ।
कमलनयन रघुराज धनुर्धर नवरा त्याची मी नवरी ॥ ध्रुवपद. ॥

जनकनंदिनी उपवर झाली वरविवंचना करी पिता ।
स्वरुपसुंदरा द्यावी कोणा भूपाळाला ही सीता ॥
स्वरुप इचें लावण्यप्रभा जशि चंद्रप्रतिमा विलोकितां ।
सूर्यप्रकाशें दंत झळकती जशि लावण्याची सरिता ॥
इशीं नोवरा सैवर मांडुनि भूप अणावे स्वयंवरी ।
नियम धनूचा करुनि तयांमधि पत्रें लिहिलीं द्विपांतरीं ॥ भूमी० ॥ १
पूर्वी फरशधर चाप ठेवुनी बद्रिकाश्रमीं तो गेला ।

---

१. रा. गोविंदराव थांब्मेंडे (सांडवा) यांनी ही पाठवून दिल्याबद्दल त्यांचे आम्ही फार आभारी आहों

त्या चापाचा घोडा करुनी सीता फिरवी अंगणाला ॥
कौतुक ऐसें पाहुनि रायें मनामधें निश्चय केला ।
त्र्यंबकचाप फरशधराचें नुचले कोणा रायाला ॥
त्र्यंबकचापा भंगिल जो कां त्याला द्यावी ही नवरी ।
मल्लांकरवीं आणुन ठेवी सभामंडपामाझारीं ॥ भूमी० ॥ २
खंडोखंडिंचे भुपाळ आले सभे बैसले जनकाच्या ।
रावणाला पत्र नसतां भूप पातला लंकेचा ॥
पाहुनि बाळा रावण उठिला आनंद झाला चांडाळा ।
रावण मेला डोंगर काळा यावर कोणी घाला घाला ॥
सिता सुंदरी बैसुनि उपरी राजा विप्रांतें हेरी ।
ऋषिमंडळीं मूर्ति सांवळी जानकि तेव्हां मनें वरी ॥ भूमी० ॥ ३
रायें नवरी शृंगारुनि ती हस्तिण पृष्ठीं बैसवली ।
शुंडादंडीं माळ देउनी रंगभूमिवर उभि केली ॥
पाहुनि रावण मनीं त्रासली सखयांप्रति बाळा बोले ।
पण हा दुर्घट केला तातें मज हें संकट ओढवलें ॥
रामचि नवरा मम मनिं ठसला कैसा उचलिल चापाला ।
प्रार्थी तेव्हां शिवा भवानी सर्वहि त्या कुलदेवाला ॥ भूमी० ॥ ४
कर कर कर कर दांत चावुनी धनुष्य ओढी विसां करीं ।
थर थर थर थर कंप सूटला रावण पडला धरणिवरी ॥
भड भड भड भड रक्त ओकला धनुष्य पडलें उरावरी ।
गर गर गर गर नेत्र फिरविले रावण दहा मुखें पसरी ॥
पाहुनि विश्वामित्र खुणावी उठ रे रामा रघुराया ! ।
अंगूळीनें चाप उडवुनी परणी अपुली मुळमाया ॥ भूमी० ॥ ५
पाहुनि जनका आनंद झाला मूळ धाडिलें अयोध्येशीं ।
दशरथ कौसल्यादिकरूनी आणविली निज नगराशी ॥
कौशिकादि हे सर्व मिळवुनी आले मिथुळा नगराशी ।
ऋषीश्वरीं मग रामलक्ष्मणां नेले अतिसन्मानेशी ॥
मुहूर्त पाहुनि लग्न लाविलें साडे झाले चौदिवशीं ।
अंदण देउनि बहु सख्याने पोंचविली निजनगराशी ॥
राम जानकी घेउनि गेले गुढ्यातोरणें घरोघरीं ।
रामकथामृत अमृतमेवा पक्वान्नामधिं शिरापुरी ॥ भूमी० ॥ ६

भक्तिमाहात्म्य.

(कटिबंध.)

भगवंत भक्तांसाठीं आपुले निजदेह आटी. ॥ ध्रुवपद. ॥

द्वादशी अंबऋषिराया, आला दुर्वास गांजाया, कोपोनि शाप दिधला वायां, यास्तव धरिल्या दाही काया. मच्छ, कच्छ, वर्नि वराह, नरहरि, वामन, भार्गव, राघव, श्रीहरि, बौद्ध, कलंकी, होउनि समरीं दानव मर्दुनि, दासी उद्धरी, धर्म स्थापुनि दुरित संहरी. कलिमल वारी. भवनदी तारी. कुंजविहारी पाहि मुरारी! करुणाकर कैवारी जगजेठी. ॥ भगवंत० ॥ १

द्रौपदीसि धृतराष्ट्रपुत्रें, छळितां आळवितां निजवक्त्रें, ऐकुनि धांवे करुणापात्रें, आपण अंगें होउनि वस्त्रें, श्याम श्वेत नीळ पीत आरक्त सुरंग जडित भिगें गंगा सागर क्षीरोदक, धटी दिव्य पीतांबर मीनबंदरीं सगरइंदोरी, इंद्रकळासम चंद्रकळामुखिची चवरी पुर पैठण, मारवाड, मुलतान, इराणी, हास्यहि राणी बारिक शेला मदन गलोला ज्याला अगणित कोटी. ॥भगवंत०॥२

भस्मासुर ते पर्वतबाळी, हरितां चिंती चंद्रमौळी. शिवस्तुति परिसोनी

---

१. अंबरीष हा सूर्यवंशोत्पन्न नाभाग राजाचा पुत्र. हा मोठा दानशूर, पराक्रमी आणि भगवद्भक्त होता. एकदां द्वादशीच्या दिवशीं दुर्वास ऋषि याच्या घरीं अतिथि म्हणून आला. तेव्हां राजानें त्यास भोजनार्थ राहवून घेतलें. नंतर मुनि आपलें आन्हिक कर्म करण्यासाठीं नदीतीरीं गेला. या दिवशीं द्वादशी थोडी म्हणजे साधनद्वादशी होती. तेव्हां व्रतभंग होऊं नये म्हणून राजानें, तिथि संपली नाहीं तों देवास नैवेद्य समर्पण करून, भोजन न करतां देवाचें तीर्थ प्राशन करून पारणें सोडलें. हें जाणून मुनि संतप्त झाला. त्यानें आपल्या जटेंतील केंसापासून एक अक्राळ विक्राळ कृत्या (राक्षसी) उत्पन्न करून राजावर सोडिली. तेव्हां विष्णूच्या सुदर्शनचक्रानें तिचा नाश केला आणि त्या मुनीचा पाठलाग केला. हें पाहून दुर्वास भीतिग्रस्त असा विष्णूस शरण गेला. विष्णूनें 'परत अंबरीषाकडे जा, तो निराहार आहे, त्याचें समाधान कर म्हणजे चक्र तुला सोडील' असें सांगितलें. त्यावरून निरुपाय होऊन तो अंबरीषाकडे परत आला. दुर्वासास पाहतांच राजास हर्ष झाला. त्यानें सुदर्शनाची स्तुति करून दुर्वासाला त्यापासून मुक्त केलें आणि यथेच्छ भोजन दिलें—अशी कथा आहे. (भागवत—नवम स्कंद—अध्याय ४-६.) २. देह. ३. "कुब्जा या नांवाची अंगानें तीन ठिकाणीं वांकडी अशी कंसाची एक दासी होती; तिचें काम उत्तम चंदनाची उटी तयार करण्याचें होतें. कृष्ण व बळराम यांस कंसानें गोकुळांतून आणविलें असतां ते मथुरेंत रस्त्यांतून चालले, तेव्हां त्यांस पाहून कुब्जेनें त्यांच्या अंगास गंधाची उटी लाविली. मग कृष्णानें तिचा हनुवटी हातानें धरून व पायावर पाय देऊन तिला सरळ केलें, आणि तिच्यावर कृपा केली—अशी कथा आहे." (नवनीत.) ४. राग. ५. रक्षण कर. ६. जगज्ज्येष्ठ. ७. दुःशासनें. ८. पाटाव (क्षौम). ९. पार्वती. १०. शिव. (शशांकशेखर.)

वनमाळी, कामिनिरूप धरि तात्काळीं, रम्य हनवटी, कोकिलकंठी, सिंहकटी, परिधान धटी, पदिं पैंजण, वाळे, थैय थैय थैय थों किट दधिकिट नर्तन गायन भस्मासुर मारुनि अमृतराय सदा शिव करि संतुष्टी. ॥ भगवंत० ॥ ३

वाल्मीकिचरित्र.

(घनाक्षरी.)

बडा नष्ट दंगाबाज[1] । करे चोरी का काज ।
दुष्ट पापी सिरताज[2] । जबरदस्त जनमका. ॥ १
राह [3]गीरो का काल । कितेक मार दिये डाल ।
नष्ट पापी चंडाल । लेवे माल छीनके. ॥ २
मारे जीव नहीं दर्द[4] । चपल ढील बडा मर्द, ।
देख देख हुवे सर्द[5] । नुरा जर्द[6] धमकसे[7]. ॥ ३
हात लेवे जद[8] लठ्ठ[9] । मारे ब्रह्मन और भट्ट ।
वांको[10] माल करे चट्ट । बडा खंट[11] जनमका. ॥ ४
दंड लेवे जद हात । खडा कोई नहीं सात ।
कहे नारद सों बात, । 'करूं घात सबों का.' ॥ ५
'सुन मूरख बेफाम । तुने कियो ऐसो काम ।
आखर[12] जमराजा को धाम[13] । जाय देख नयनसे. ॥ ६
जोरू[14] बेटा तात मात । बहेन भाई कुटुंब जात ।
लुटे माल मिठी[15] बात । नहीं सांथ[16] आखर कू.' ॥ ७
'इत्तो बात पर मीस । धरे पावोंपर सीर्स[17] ।
सुनो नारद जगदीश । गुरू देव हमारे.' ॥ ८
कहे नारदजी, 'आप । कटा तेरा सब पाप, ।
ऐसा नामका प्रताप । समज बात तरन को. ॥ ९

---

१. विश्वासघातकी. २. मुकुट, शिरोमणि. ३. वाटसरू, पांथ. ४. पीडा, दुःख. ५. थंडगार. ६. हिरवा. [भयानें अथवा मारानें आंग हिरवें निळें होतें–असा भावार्थ.] ७. भयानें, धमकीनें. ८. जेव्हां. ९. काठी. १०. त्याचा. ११. शठ, नष्ट, दुष्ट. १२. शेवटीं. १३. यमराजाचें घर. १४. बायको. १५. गोड भाषण. १६. सोबत. १७. डोकें.

दो अच्छर है बस । बहोत कहना अब बस ।
मुख तेरे नव रस । सफल जन्म होय गा.' ॥ १०
ऐसा कीर्तन का रंग । बडा संतन का संग।
बिना वाजे मिरदंग । अमृतराय गावते. ॥ ११

भीष्मप्रतिज्ञा.

(घनाक्षरी.)

सुनो भारतका शुद्ध । प्रथम हेमंतका शुद्ध ।
एकादश मो जो खुद । भीखम पार्थ बन रहे. ॥ १
भीखमजी का अरथ । वोही जाने भारथ ।
पार्थजीको सारथ्य । करें रथ चलावे. ॥ २
पीतामह जूं कहे बात, । पृथाबालक अनाथ ।
कीसन पार्थजीके साथ । बहु भात रहते. ॥ ३
सुनो लेरके ! बुद्धी कम । कहे सुनो भीखम ।
तीनो जनका हाकिम । जखम वोही जानिये. ॥ ४
शुद्ध करे पुतराय । क्षोणी अकरामो राय ।
मेते दिलमो डेराय । जदुराज कहतु है. ॥ ५
भीखम सेनाको दंभ । भेरी बाजत है बंब, ।
बीच गडा रनखंब । अबीलंब करतु है. ॥ ६
नाद सुने जदुराज । भल्ली पार्थ नहीं आज ।
भीखम सुरसीरताज । महाराज कहत है. ॥ ७

---

१. दोन अक्षरें. (रामनाम.) २. वाल्मीकीस सरस्वती देवीचा प्रसाद मिळाला तेणेंकरून रामायणांत नऊ रस उतरले आहेत. नऊ रसांचीं नांवः—शृंगारहास्यकरुणरौद्रवीरभयानकाः । बीभत्साद्भुतसंज्ञौ चेत्यष्टौ नाट्ये रसाः स्मृताः ॥ निर्वेदस्थायिभावोऽस्ति शांतोऽपि नवमो रसः ॥. [काव्यप्रकाश.] ३. ऐका. ४. भारतांतील. ५. युद्ध. [संस्कृत शब्दांत 'ध' असल्यास त्याच्या स्थानीं हिंदी भाषेंत 'द' होतो:—जमुना, कारज, सूरज.] ६. 'क्रतु है' असा अन्य पाठ. ७. 'त्रयोदशमो' अन्य पाठ. ८. अर्थ. ९. आजा. (भीष्म.) १०. जू हा आदरसूचक प्रत्यय आहे. ११. अर्जुन. १२. कृष्ण. १३. रक्षिती. १४. मुला! १५. स्वामी. १६. पीडा, दुःख. १७. नीच कृष्ण. १८. राजपुत्र. १९. नक्की. २०. भितं. २१. चांगली गत. २२. देवशिरोमणि.

पार्थ[1]दिलमो अभीमान । नहीं [2]मोको [3]गुमान ।
[4]खूब [5]खैंचेत [6]कमान । [7]नीके बान लेतु है. ॥ ८
भीखम [8]खडा भुजंग । करे चाहत है जंग[9] ।
धनुख बान और फिरंग । अबी जंग झडाऊं. ॥ ९
[10]तुरंइ [10]करने [10]करनाल । [10]सुर [10]सनई [10]कांहाल[10] ।
बाजे काल्लु सुतर ताल । सुरस चाल बाजत है. ॥ १०
बीच रथ वो [11]गुलजार । लालि हीरे हजार ।
गले [12]मोतन के हार । झला झल्ल झलकते ॥ ११
उपर **पार्थ** हुवे स्वार । [13]लछोलछी असवार ।
आगे भेरी छडीदार । चोपदार अरोली. ॥ १२
करे **अर्जुन** अभिमान । चढे ध्वजी [14]हनुमान ।
बांधे [15]बखतर कमान । नीके बान लेतु हे. ॥ १३
चढे **पार्थ** बीचत्र । ऊपर झलके सुछत्र ।
आगे **नंद**जीका पुत्र । जाके [16]सूत्र हातमो. ॥ १४
छुटे बानोंपर बान । मानो मेह[17] परमान ।
[18]भूला **भीखम** तनभान । चूपी मान डुलावे. ॥ १५
नमो **भीखम** बैराय । भलो कीन्हो **जदुराय** ।
दिलमो **अर्जुन** [20]मस्ताय । **जदुराय** खैंचते. ॥ १६
हुआ **अर्जुन** [21]खुषवख्त । बात कहता है [22]सख्त ।
जींत लिया [23]नृपतख्त । [24]बडो भाग हमारा. ॥ १७
भीखम दिलमो बडे जंग । बन्यो जैसा [25]भुजंग ।
अब करता हूं जंग[26] । हा मै **गंगासुत** हों. ॥ १८
हुवा **भीखम** [27]ईतराज । शंख लेके [28]आवाज ।
[29]चीडी **अर्जुन**, मैं [30]बांज, । **जदुराय** ज्यानीयो. ॥ १९

---

१. 'किया अर्जुन बो मान । नहीं मोसो गुमान' असाही पाठ आहे. २. मला. ३. अभिमान. ४. आकर्णपर्यंत. ५. ओढतो. ६. धनुष्य. ७. चांगले बाण घेत आहे. ८. उभा. ९. युद्ध. १०. वाद्यविशेष. ११. मनोहर. १२. गळ्यांत मोत्यांचे हार. १३. लाखों. १४. ज्याच्या ध्वजावर हनुमान आहे तो. (अर्जुन.) १५. चिलखत. १६. लगाम. १७. पाऊस. १८. विसरला. १९. केलें. २०. गर्व करी. २१. प्रसन्न. २२. कठिण. २३. सिंहासन. २४. बंदोबस्त. २५. साप. २६. 'युद्ध' असाही पाठ आहे. २७. कोपायमान. २८. ध्वनि. २९. लहान पक्षी. ३०. ससाणा.

हुवे लढनेकू मस्त । मस्त रहीये है सुस्त ।
सब सेना शीकस्त । अभी दस्त करतु है. ॥ २०
पार्थ छोकैरा गुलजार । मूका मुके नहीं जार, ।
हुवा छनमो बेजार । बेडो जेर जानीये. ॥ २१
परी लस्करमे हुल्ल । आयी अर्जुनकू मूल ।
जमीन अंबरमो धूल । जदुकुल देखते. ॥ २२
आगे पीछे सडे भाल । बातनमो बेहाल ।
हुवा अर्जुन बेख्याल । भये लाल रुधीरसो. ॥ २३
अब दौरे बिथितात । सुनो म्हारो जी तौत ।
सुनी अर्जुनकी बात । करामात इनकी. ॥ २४
कीया किसनजीनें खेद । फेंक दीयो चक्रद ।
कृपासारंग अभेद । भीखम क्रोध दबावे. ॥ २५
मारनेको वो नक्र । हात लीये सुचक्र ।
कीयो नयनो है वक्र । जिमी शक्र डरत है. ॥ २६
बदन शाम, रदन कुंद, । उपर झलके जलबिंदे, ।
कान कुंडल नीके छंद । अरविंद नयनको. ॥ २७
ऐसे देखे भगवान । त्यजे धनुख और बान ।
हुवा जंगमो बहुमान । अभिमान हु त्यजु. ॥ २८
आवो रथपर जदुराय । तोको नंदकी दुहाय ।
दिलमो अर्जुन मस्ताय । अब चाहे सो करो. ॥ २९
अमृतराय कहत दंग । ताल बाजे मिरदंग ॥
राग रंग चले चंग । सफे जंग बन रहे. ॥ ३०

---

१. आवेशयुक्त. २. आळशी. ३. पराजित. ४. परसाकडे होणें. ५. मुलगा. ६. तोंडावरचा. ७. क्षणांत. ८. ग्रस्त. ९. 'हुवा जेर मानिये' असाही पाठ आहे. १०. कोलाहल. ११. कृष्ण. १२. 'देखो' अन्य पाठ. १३. आमुचा. १४. भीष्मपितामह. १५. 'नहीं भयी' पाठभेद. १६. पराक्रम. १७. अणुं. १८. 'पंच' पाठभेद. १९. बिंदु. २०. कमल. २१. जगांत. २२. तुला. २३. शपथ. २४. 'भीखम सिर को कटाय । जदुराय निरखते' अन्य पाठ. २५. 'कसी दंग सुनत है' असाही पाठ आहे.

बाळक्रीडा.

(कटिबंध.)

श्रीहरिची ऐशी लीला विचित्र खेळे हो ! ॥ ध्रुवपद. ॥

[1]बाळपणीं हरि—विश्वरूप चौऱ्यायशीं लक्ष गती देखुनी यशोमती कांपतसे मग 'झांक मुख हरी !' बोलतसे. ॥ श्रीहरि० ॥ १

शि[2]ष्ट वशिष्ट—कण्व पिप्पलायन. ॥ श्रीहरि० ॥ २

सत्यलोकिंचा ब्रह्मदेव जो गोकुळिं येउनि कौतुक केलें, गाइ गोवळे सर्व चोरिले, एक वर्ष नेउनी ठेविले, गोकुळ हरिनें नवें निर्मिलें, गाइ गोवळे आपण झाले, घरोघरींच्या धेनु सवत्सा सानू [3]धवळी [3]पिवळी [3]हिरवी [3]नाहळी [3]तांबडी [3]कपिलावर्णी केवळ हरणी एकचि शिंगी विचित्ररंगी एक रोडकी शिंगी मोडकी [4]अंजी बोडकी पाय लंगडी चाल वांकडी ज्या गृहिं जैशी होउनि तैशी सवें राखणें स्वभाव जैसे मंद आळशी क्रूर तामसी एकलोचनी बधिरा कुबडा पंगु आरडा खादडवादी बाहेरछंदी नवी घोंगडी मान वांकडी वहाण तुटकी ज्याची जैशी चरणीं तैशी नूतन रचना नकळे कवणा. संगें सौंगडे गाइ [5]गोवळे, करीं घेउनी मुरलि नागसर नृत्य करीती थै थै थै थै पैंगत पैंजण रुणझुण रुणझुण विणा ढोल डफ नादब्रह्म नाना ध्वनि अद्भुत रंग तरंगीं दंग जाहले. [6]अर्क [7]अंबरीं गर्क होउनी योगसमाधीसौख्य उपेक्षुनि मुनिजन शुकसनकादिक लोकत्रय देहभान विसरले. अमृत पंडित वर्णित आले हो ! ॥ श्रीहरि० ॥ ३

कृष्णनृत्य.

(कटिबंध.)

ब्रजमो नृत नाचे कन्हय्या । सब देवनके [8]सिर [9]पैंय्या. ॥ ध्रुवपद. ॥

एक दिना [10]वो जसोदा माई, खडी अंगनमो, कट सुखदाई, बैठे है ब्रजपाल गुसाई, लै दर्शन गौलन सब आयीं, जद मैयाने कटसों अपने [11]सौंमने,

---

१. हें कडवें पूर्वी पृष्ठ ४१ यांत छापलें आहे. २. आम्हाला मिळालेल्या पोथींत हें कडवें नाहीं. ३. हीं गाईंचीं नांवें. ४. पूर्णपणें, अगदीं. ५. गवळी. ६. सूर्य. ७. आकाशांत. ८. मस्तक. ९. सर्व देवांचीं शिरें कृष्णाचे पायांवर आहेत–असा भावार्थ. १०. ती. ११. समोर.

खडा किया है, सूरत सांवली, मुरत विचित्तर, मोर मुगुट कट कास लियी है, कानन कुंडल, तिलक केशरी, अलक सुनेरी, पैलख नयनकी, ऐन बैनै सब खुली रैयन है, मनमोहन बनमाल कंठसो लपट रही है, जद झपट सब कपट छांड अलि गुंजे रहे है, ग्वालबाल सब थेट आसपास लै, वंसी हातमो आगे ठाडा, पाव विच झनकार घागरी, तोडर ऊपर वांकी पैंजन, शाम तनू घन, घटा पटा कटि नाद किंकिणी, घन घन घंटा, खननन खननन भूज ब्रीद है, बाके विहारी, अहिमर्दन गोवर्धनधारी, एक पलखमो पुतना मारी, सो बलहारी देख, जसोदा कहे तैं नाच घडीभर, छडी हात फुल झडी नंद की, बडी अकल वो खडी रही, तब मान पडा, भगवान उसीकू, कान रखा खांदे पैरै तेढा, ठाण मंडाया, पाव देहुडा खूब गडाया, कदर बासरी राग चढाया, अधरपूटसे उसे भिडाया, अलाप छत्तीस, परज, रागनी, खूल रही जब थीरके थय्या थय्या. ॥ ब्रजमो० ॥ १

मात जसोमति तौलि बजावे, नंद बाल सब देखन आवें, शामसुंदर प्यारा मन भावे, निकल भान तनसो उड जावे, दे गिरकी, पावनकी ठोकेरे, त्रिकट त्रिकट धुं धुंदुकट धुंदुकट, पायल नर्तन चलत घुंगरू, छुम् छुम् छुम् छुम् कणित किंकिणी, रुमझुम रुमझुम बजत घागरी, झनन झनन ऊपर ब्रिद है, खननन खननन चंग सुरंग मोरचंग, अवाजहि दद्दमदमपु, ढोल गिड कडी,

---

१. काळे भोर केंस असेंच वर्णन चहूंकडे आढळतें; सुनेरी केंस हें लक्षण पाश्चिमात्यकवि वर्णितात. त्यांचा व अमृतरायाचा परिचय नसल्यामुळें केशर किंवा तेलहळद लावल्यानें केंस पिवळे झाले होते असा तर्क करावा लागतो. २. पापणी. ३. वचन. ४. निरभ्र आकाश व चंद्रप्रकाशयुक्त रजनी. ५. वनमालेचें वर्णन संस्कृतांत आहे, तें असें:—'आपादपद्मं या माला वनमालेति सा मता' इति कलिंगः; अथवा—'आजानुलंबिनी माला सर्वर्तुकुसमोज्ज्वला । मध्ये स्थूलकदंबाढ्या वनमालेति कीर्तिता ॥'; तात्पर्यार्थ—कंठांत घातली असतां पायांपर्यंत पोंचणाऱ्या मालेला 'वनमाला' असें नांव आहे. पूर्वोक्त प्रकारची माला श्रीकृष्णाची असे म्हणून त्यास 'वनमाली' असें म्हणतात. ६. 'कपट' शब्दाचा साहदय उपयोग येथें दिसत नाहीं. 'झपट' शब्दाशीं यमक मात्र साधिलें आहे. ७. भ्रमर गुंजारव करीत आहेत. ८. गोपबालक. ९. दाटी. १०. वंशी (मुरली). ११. कालियमर्दन. कालिय नांवाचा सर्प यमुनेंत होता म्हणून त्याच्या विषानें दूषित झालेलें डोहांतील पाणी पिऊन गोकुळांतील गुरेंवासरें मरूं लागलीं. हें जाणून कृष्णानें कदंबवृक्षावरून मोठ्या वेगानें डोहांत उडी टाकून त्याला इतकें चेंचलें कीं त्याचे प्राण कासावीस झाले. असें शासन झाल्यावर तो शरण आला आणि तेथून निघून समुद्रांत राहावयास गेला. (भागवत स्कंध १० वा पहा.) १२. तूं. १३. या प्रसंगाचे देखावे चित्रांत पाहावे म्हणजे हें वर्णन सहज लक्षांत येईल. १४. टाळी. १५. ठेंच.

झंगड जू झंगड जू ताल झल्लरी, धुंग धुंग मिरदंग संगसो, निकल रंग दु, बादल छायी, तामो बन्सी तों तननननन, सारिगमपधनिसी, उपज अनोटी, इमन शाम कल्याण हिंडोला, मालकंस भैरव की ताना, रामकली गौरी अपमाना, बिभास पंचम कहे तिल्लाना, कुरंग, पूर्वी, कनडा, सोरट, धनासरी, सारंग, रंग है, जैजैवंती मुलतानी का बोध बिलावर, तोडी असावरी, गुणकली, मारवा, अहंगम, ललित, भैरवी, खमाज, सोहनी, बाहार, गौड, केदारा, श्रीराग, ऐसी हरिके मुख सो गहरी लहर उठी जद, कहर हुवा गोकुलमे कैसा, नही अंदेसा, भूल परी, अठरा बरनकी धूल उडी, गर्दी तब मनकू, नाच रहे घर घरके वो सब, माता पिता जोरू लरके सुत भैया. ॥ ब्रजमो० ॥ २ ॥

भूल गयी सब गोकुल नगरी, गान लगी हैं नागन बेहेरी, नाच रहे घर घर के शहरी, ग्वालबाल सब नाच रहे हैं, गैयां बच्छडा नाच रहे हैं, सिकारखाने नाच रहे हैं, मैना तोते नाच रहे हैं, बाज कपोते नाच रहे हैं, आदमी सोते नाच रहे हैं, बिल्ल्या कुत्ते नाच रहे हैं, खांब उथाले नाच रहे हैं, कुनबी माली नाच रहे हैं, बंदर पाले नाच रहे हैं, म्हैसे काले नाच रहे हैं, घोडे हाथी नाच रहे हैं, हीरा मोती नाच रहे हैं, शेला धोती नाच रहे हैं, बजार खेती नाच रहे हैं, दुकान पोते नाच रहे हैं, सवदे लेते नाच रहे हैं, मुरदा रोते नाच रहे हैं, मसान भूतें नाच रहे हैं, घीके बुधले नाच रहे हैं, पवाड कुदले नाच रहे हैं, बरछी भाले नाच रहे हैं, हत्यारवाले नाच

---

१. स्वर सात आहेत:—'निषादर्षभगांधारषड्जमध्यमधैवताः । पंचमश्चेत्यमी सप्त तंत्रीकंठोत्थिताः स्वराः ॥' (अमरकोश.) 'षड्जं रौति मयूरस्तु गावो नर्दंति चर्षभत् । अजाविमे च गांधारं क्रौंचो नदति मध्यमम् । पुष्पसाधारणे काले कोकिलो रौति पंचमम् । अश्वस्तु धैवतं रौति निषादं रौति कुंजरः ॥' १ नि—निषाध—हा शब्द हत्तीचा, याचें नाभिस्थान; २ रि—ऋषभ—हा शब्द गाईचा, याचें नासिकास्थान; ३ ग—गांधार—हा शब्द शेळीचा, याचें स्थान गाल; ४ सा—षड्ज—हा शब्द मोराचा, याचें नाभिस्थान. ['नासाकंठमुरस्तालु जिव्हां दंतांश्च संस्पृशन् । षड्भ्यः संजायते यस्मात्तस्मात्षड्ज इति स्मृतः ॥' नाक, कंठ, उर, तालु, जिव्हा आणि दांत या सहा स्थानांपासून होणारा तो षड्ज.] ५ म—मध्यम—हा शब्द क्रौंच पक्ष्याचा, याचें हृदयस्थान; ६ ध—धैवत—हा अश्वाचा, याचें ललाटस्थान; प—पंचम—हा शब्द वसंतकाळांत कोकिलाचा—याचें कंठस्थान; [नाभीपासून उत्पन्न झालेला जो वायु, उर, हृदय, कंठ आणि मूर्धा यांमधून जातो तो पंचम.] हे सात स्वर तंत्रीपासून आणि कंठांतून उत्पन्न होतात. २. सर्पांस श्रवणेंद्रियें नसतात. म्हणून त्यांजला 'चक्षुःश्रव' हें नांव प्राप्त झालें आहे. ३. गाई. ४. पोपट. ५. मांजर. ६. तूप, Ghee.

रहे हैं, केन भुसारी नाच रहे हैं, कलम चितारी नाच रहे हैं, रंग अतारी नाच रहे हैं, धान कभारी नाच रहे हैं, बाग बगीचे नाच रहे हैं, मामे भाचे नाच रहे हैं, नौकर खासे नाच रहे हैं, घर के बांसे नाच रहे हैं, माला के फड नाच रहे हैं, तेली के घडे नाच रहे हैं, कसार बोहरी नाच रहे हैं, पटवे जोहरी नाच रहे हैं, नवरा नवरी नाच रहे हैं, उपर चवरी नाच रही हैं, सराफ चाटे नाच रहे हैं, जोगि लगोटे नाच रहे हैं, फत्तर गोटे नाच रहे हैं, छोटे मोटे नाच रहे हैं, झाड झडूले नाच रहे हैं, काजी मुल्ले नाच रहे हैं, बुरूज किल्ले नाच रहे हैं, हमाल पल्ले नाच रहे हैं, क्या कहुं तारिफ हरिकी माया, मोहन पडि सब जीव जंतुकू, अंत काहा सब लक्ष बने कहे बलहारी बैलजया. ॥ व्रजमो० ॥ २

बन्मी मुख सो उठा हजारा, गया सरग मंडलमो धारा, अमरलोक सब मार पच्छारा, करू निर्कर अब न्यारा न्यारा, इंद्र चंद्र शनि थैक थैक था, सुरज लोक गुरु थैक थैक था, शुक्र बुध मनु थैक थैक था, यक्ष मरुद्गण थैक थैक था, चारण किन्नर थैक थैक था, प्रख विद्याधर थैक थैक था, अष्टपालकर थैक थैक था, यम वरुन नैरुत्य थैक थैक था, ईशान वायु थैक थैक था, नारद तुंबर थैक थैक था, कुबेर अग्नी थैक थैक था, अष्टनायका थैक थैक था, अष्टवसु सब थैक

---

१. भिकारीविशेष. २. स्तुति. ३. कृष्ण नृत्य करीत असतां सर्व जीवजंतु व निर्जीव पदार्थ नाचायाला लागले, हा पराक्रम कृष्णनृत्याचा नव्हे. तर हा दृष्ट परिणाम दर्शनशास्त्राचा होय. नाचतांना आसमंतांतले पदार्थ नाचायला लागतात, हें प्रत्येकास अनुभवानें माहीत असावें. याच कारणास्तव ज्योतिषशास्त्रवेत्ते यांनीं सिद्धांत काढला आहे, तो हा कीं पृथ्वी चलायमान असून सूर्य अचल आहे, पण दिसण्यांत प्रकार उलट दिसतो. हा तिसरा कटिबंध स्वभावोक्तिअलंकाराचें उत्कृष्ट उदाहरण आहे. अन्य विचारानें हें वर्णन सदोष आहे. यास रसाभास म्हणतात. या दोषास कालिदासासारखे महाकवि पात्र झाले आहेत. कुमारसंभवाच्या तिसऱ्या सर्गांत कामप्रतापवर्णन करीत असतां कालिदासाच्या हातून दोष घडला आहे. येथें 'सरस्वतीकंठाभरणां'त वर्णिलेल्या 'पशुपक्षिण: रसाभासा'चें एकच उदाहरण देतों:—'ददौ रसात् पंकजरेणुगंधि: गजाय गंडूषजलं करेणु: । अर्धोपभुक्तेन बिसेन जायां संभावयामास रथांगनामा ॥' [सर्ग ३ श्लो० ३७] पण 'महाजनो येन गत: स पंथा:' या उक्तीस अनुसरून अमृतरायानें वर्णन केलें आहे म्हणून त्याजला दोषमुक्त करण्याला मार्ग आहे. ४. वर्णन. ५. पृथक्. ६. दिक्पाल हे आठ आहेत. ['इंद्रो वन्हि: पितृपतिर्नैर्ऋतो वरुणो मरुत् । कुबेर ईश: पतय: पूर्वादीनां दिशो क्रमात् ॥' १ इंद्र (पूर्वेचा), २ वन्हि (आग्नेयीचा), ३ यम (दक्षिणेचा), ४ निर्ऋति (नैर्ऋतीचा), ५ वरुण (पश्चिमेचा), ६ वायु (वायवीचा), ७ कुबेर (उत्तरेचा), ८ ईश (ऐशान्यीचा.)] ७. 'धरो ध्रुवश्च सोमश्च अहश्चैवानिलोऽनल: । प्रत्यूषश्च प्रभासश्च वसवोऽष्टाविति स्मृता: ॥'

थैक था, नवरस भक्ती थैक थैक था, दश बिदेह थैक थैक था, रुद्र एकादश थैक थैक था, बारा मितर थैक थैक था, सब के पितर थैक थैक था, बेद लोक बिधि थैक थैक था, गिरी बैकुंठा थैक थैक था, ध्रुव अढळपद थैक थैक था, गोरी राधा थैक थैक था, थै थै थै थै देवें गिरकी, गुंडाळ भिरकी, बऱ्हाणपुरकी, वा भयी वा बस खुब घटा जद, शीव जटासो गंगा झिरकी, ऋषि मुनि सब थिरका थिरकी, होय रही तब, बजा अचुक दुंदुभी अवाजा, नाच रहे त्रिभुवनके राजा, विमान आयीं सुर की भाजा, पंचारत करिती यदुराजा, महा सती कोइ पाच पचीसा, उसमे है दो मुख्य मुख्य वो अरुंधती अनसूया. ॥ ब्रजमो० ॥ ४

सप्त पैताल धुंनक उठी हैं, नागनशिरसो धरा छुटी हैं, हरकी माया नही झुटी हैं, नाच रहे अहि, मजा लुटी हैं, कोउ नहीं सावध, गाफल हो रहे हैं, शेष वासुकी गाफल हो रहे हैं, तक्षक धोंडे गाफल हो रहे हैं, कवडे धामन गाफल हो रहे हैं, तिडके बहरे गाफल हो रहे हैं, गुहो अंगारे गाफल हो रहे हैं, लहरे काले गाफल हो रहे हैं, शंखे डवरे गाफल हो रहे हैं, पीरे भवरे गाफल हो रहे हैं, डंके छितडे गाफल हो रहे हैं, फनके मनके गाफल हो रहे हैं, कार कोट कबी नहि भान, तिन ताल एकबिस सर्ग भुवन कों चौदा सतही नाच रहे हैं, लख छुट भये जद देखे कान्हा, लोट पोट सब तब बन्सी वो रखी ओंठ सो, खडे रहे जद भयी हुशारी, ग्वालबाल गोकुलकी नारी, मात जसोदा कहे बलहारी, मेरो कँहां है, नहिं मालुम वो कुंजबिहारी, सब देवन का देव करारी, जगजीवन लीला अवतारी, मधुसूदन सुजन उद्धारी, सब असुर सब मार पछारी, संत भगतकी माया हारी, सो बनवारी, उठा लिया, तनसो लपटाया, चली गवालन गृह मंदिरमो, मेरो बछडो अरे किसन, ते ऐसी कहे, दधि भात उतारे, कोट रुपया मुखपर वारे, जब त्रिभुवनमो बजे नगारे, धन्य जीव गोकुलके सारे, झाड फत्तर पशु पछी तारे, कहे अमृत सिरताज हमारे, भजो चरण, सुख ध्यान धरो, सब मीटे दुःख, मुख नाम स्मरो, येही बिनती मानो हमारी, सब जग मेरे भय्या. ॥ ब्रजमो० ॥ ५

---

१. 'धाता मित्रोऽर्यमा रुद्रो वरुणः सूर्य एव च । भगो विवस्वान् पूषा च सविता दशमः स्मृतः ॥ एकादशस्तथा त्वष्टा विष्णुर्द्वादश उच्यते ॥' २. ध्वनि. ३. अतल, वितल, सुतल, रसातल, तलातल, महातल, पाताल हे सप्तपाताल होत. ४. ध्वनि. ५. शेष. ६. पृथ्वी. ७. कोठें. ८. ठरीव. ९. विष्णु. १०. ओंवाळी.

वेदांत.

(कटिबंध.)

ध्यावोनि निजरुप सुखातें, अज अव्यय अद्वयातें, सर्वात्मक सर्वगुणातें, सर्वात्मा सर्वेशातें. ॥ ध्रुवपद. ॥

निर्गुण निर्विकार निरामय, निश्चळ निर्मळ पूर्ण सुखालय, नित्यानंद निवांत निरंजन, नित्य सदोदित निजरूपात्मक, निरहंकार निरभिमानी, निज गुज निज परिवार रहित जो, निर्विकार सनातन सद्गुरु, सर्वसाक्षी सर्वांतरव्यापक, सर्व जनांतें चेष्टविता, मग नष्टविता, कर्ता हर्ता जग आठविता, मग सांठविता आपणा उदरीं, नदरी नभरी न धरीच धरी, हृदयाभीतरी, वरि मौन्य धरी, मग निज करीं, वटपत्रि जरी, लय पूर्ण करी, लघुरूप धरी, आठव नाठव सर्व हरी, मुखीं बाळरूपें अंगुष्ठ धरी, द्वितियासि नसे मग ठाव जरी, आपण ब्रह्म सगुण सनातन, मायातीत अविनाश पुरातन, सर्व जगाचें आदिमूळ जो, ब्रह्म कल्पिचें पूर्ण बीज जो, ध्या तुम्ही त्यातें, निज स्वरुपातें, ब्रह्म रुपातें, चित्स्वरुपातें, अगुण गुणातें, आठवि निज अंतरिं परम पदातें. ॥ ध्यावोनि० ॥ १

अहंब्रह्म ब्रह्मास्मि त्वंपद तत्पद असी पदांतें आठवीं, नाठवें दृश्य पदातें, नुरवि चैतन्यात्मक चिन्मय चिद्घन, सच्चिदानंदातें उभवी, अकार, उकार, मकार, मिरवी, अर्धरुपें तन्मात्रा पुरवी, स्थूळ सूक्ष्म कारण करवी, महाकारणावस्था पुरवी, जागृति स्वप्न सुषुप्तिसि बरवी, तुर्या ही त्यावरती झडवी, रंग च्यार त्यावरते रिझवी, रक्त श्वेत शामातें बुजवी, नीळ पीत वरता तो सजवी, वरती माया सत्ता उरवी, अहं ब्रह्म मी, हें कर्ता मी, या जाणें मी, चेष्टवि या मी, पाळुनियां संहार करी मी, ऐशा रितीनें दावुनि लीला, ब्रह्मा भावें शून्यचि झाला, त्या स्वरुपातें, श्रीगुरुनाथें, करुनि कृपातें, अनुभवि मातें, अमृतनाथें, अमळ पदातें, धरुनि निज हृदयीं त्यातें. ॥ ध्यावोनि० ॥ २

संसारदुःखवर्णन.

(कटिबंध.)

हा प्राणी व्यर्थ जन्मला, जन्मोनी वायां गेला. ॥ ध्रुवपद. ॥

आदी जननीजठरिं जाचणी, नवमासानें पूर्ण भरोनी, फार दुःख तें गर्भा-

---

१. जन्मरहित. २. विकाररहित. ३. उत्पन्नकर्ता. ४. हें वर्णन श्रीशंकराचार्यकृत संस्कृत चरपटपंजरीचें भाषांतर आहे.

लागुनि, मळमूत्रामधें रुधिर तिंबला, परम गांजिला, श्रीहरिचरणीं दृढतर झाला, 'सोऽहं' 'सोऽहं' जपूं लागला, माये विटला, कष्ट सोसिले, दुर्गंधीनें चित्त वीटलें, त्वचा बांधुनी शरिर वेष्टिलें, उपाय तेथें कांहीं न चाले, पूर्व संचितें अकस्मात तो बाहेर आला, प्रपंचवारा लागे शरीरा, 'कोऽहं' 'कोऽहं' करूं लागला, चित्त स्वरुपासी दूर टाकिला, त्या बाळाला तेल माखुनी, न्हाउनी धुवुनी, निर्मल करुनी, वडिल ऐकुनी, लगबग लगबग येती धांवुनी, आम्हासी पुत्र झाला, उपमा नाहीं त्या पुरुषाला, सुलक्षणी हें बाळ भासतें, सामुद्रिक सुचिन्ह दीसतें, प्राप्त झाला वडिल सुकृतें, पंचम वर्षी खटपट करुनी, वेदांती सिद्धांती आणुनी, दशमी द्वादशी मुहूर्त केरुनी, व्रतबंधासी निश्चय करुनी, कार्यासी संसर्गासि बोलाउनी, व्याजासहित द्रैव्य घेउनी साहित्यासी लागला. ॥ हा प्राणी० ॥ १

विचार पाहतां बाळपणींचा.................... गुंतला. ॥ हा प्राणी० ॥ २

वृद्धपणींची थोर अवस्था...................... रंगला. ॥ हा प्राणी० ॥ ३

पदसंग्रह.

पद १ लें.

देखिला हनुमान् । म्यां हो ! ॥ ध्रुवपद. ॥

रामपदांबुजि मस्तक ठेउनि । नम्र करुनि हनुमान् ॥ म्यां हो० ॥ १ ॥

पाहुनि रूप सुखार्थ मी झालों । नाहीं राहिलें अनुमान ॥ म्यां हो० ॥ २ ॥

अमृत म्हणे मी तल्लीन झालों । त्यजुनियां अभिमान ॥ म्यां हो० ॥ ३ ॥

पद २ रें.

कानुड्यानें माझें मन मोहिलें. ॥ ध्रुवपद. ॥

व्रजवनिं सुमनें आणावया गेलों । .... ॥

अवचित अनुपम रूप पाहिलें ॥ कानुड्यानें० ॥ १ ॥

वाटे माझा तोचि हरी । चतुर्भुज वेणुधारी ॥

संसाराचें भान कांहीं नाहीं राहिलें ॥ कानुड्यानें० ॥ २ ॥

---

१. माया. २. 'पाहुनि' असाही पाठ आहे. ३. 'वित्त' असाही पाठ आहे. ४. हीं कडवीं पूर्वीच पृष्ठ ७२ येथें छापिलीं आहेत. ५. 'न राहिलें देहभान' असाही पाठ आहे. ६. कृष्णानें. ७. पुष्पें. ८. 'मिचि' असा अन्य पाठ आहे.

अमृतफळ हें पिके । सर्व हरी हेंचि निकें ॥
चंचल चित्त ज्याचें त्यासि वाहिलें ॥ कानुड्यांचें० ॥ ३ ॥

पद ३ रें.

तैयांचे शब्द मनीं रुतले. ॥ ध्रुवपद. ॥
सुत धन दारा गृह ही त्यजिलें, । भगवंतीं रतले ॥ तयांचे० ॥ १ ॥
हरिगुण गातां, प्रेमजळानें । सर्वांगीं धुतले ॥ तयांचे० ॥ २ ॥
मुखोद्गार ते ब्रह्मरसाचे । अमृत म्हणे सांचले ॥ तयांचे० ॥ ३ ॥

पद ४ थें.

कैलास चारी । 'शिव शिव' उच्चारी ॥ ध्रुवपद. ॥
नंदीवरती करुनी स्वारी । गंगामनकर्णिकातीरविहारी रे! ॥ कैला० ॥ १ ॥
अर्धनारी नटावतारी । सत्य ज्ञानानंत विकारी रे! ॥ कैला० ॥ २ ॥
अमृतेश्वर हा सुरसाहाकारी । काशी विश्वेश्वर मृड हर त्रिपुरारी रे! ॥कैला०॥३

पद ५ वें.

अशांतही न चुकेल आत्मसमाधी ॥ ध्रुवपद. ॥
गृहसंबंध तमोगुण यांची । कर कर नित्य उपाधी ॥ अशां० ॥ १ ॥
सुतदारादि मनोगत रक्षण । तेल मिठाची आधी ॥ अशां० ॥ २ ॥
अमृत म्हणे असे साम्याचें बळ । बोध जयासि अगाधी ॥ अशां० ॥३॥

पद ६ वें.

वद, रे! रे! राम मुखाचे ॥ ध्रुवपद. ॥
विष विषयाप्रति पीयूष मानुनि । सेउनि कोण न वांचे ॥ वद० ॥१॥

---

१. साधुसंतांचे. २. शिवाची प्रतिमा अर्धस्त्री आणि अर्धपुरुष अशी असून तिची पूजा कित्येक ठिकाणीं करतात. या आकृतीवरून त्याला अर्धनारीश, अर्धनारीश्वर, अर्धनारीनटेश्वर, असें नांव आहे. या मूर्तींत दक्षिणार्धी शिव आणि वामार्धी पार्वती अशी योजना असते. याचा विग्रहः—'अर्धं नार्या अर्धनारी सा ईश्वरा यस्य सोऽर्धनारीश्वरः' अनर्घराघव–रुचिपत्युपाध्यायकृत टीका—पृष्ठ २७२, काव्यमाला. सोलापुर जिल्ह्यांत शिवाची अशी अर्धनारीनटेश्वर मूर्ति ज्यांत आहे असें एक मंदिर आहे. अशा रूपाविषयींचा उल्लेख संस्कृत ग्रंथांत अनेक स्थळीं आढळतो. कुमारसंभव—सर्ग १ श्लोक ५०; अनर्घराघव—अंक ७ श्लोक ३६; कीर्तिकौमुदी—सर्ग १ श्लोक ३; मालविकाग्निमित्र—अंक १ श्लोक १; स्तुतिकुसुमांजलि—स्तोत्र २१ वें पहा.] ३. अमृत.

रामनामामृत पूर्ण मनोरथ । पुरले सांब शिवाचे ॥ वद० ॥ २ ॥
अमृतप्रभु हा स्मरतां चिंतितां । तुटतिल पाश भवाचे ॥ वद० ॥ ३ ॥

पद ७ वें.

तयाचें चालवणार हरी ॥ ध्रुवपद. ॥
भागवतश्रवणाची निष्ठा । निश्चळ अचळ धरी ॥ तयांचें० ॥ १ ॥
प्रातःस्नान निरंतर संध्या- । वंदन जोहि करी ॥ तयांचें० ॥ २ ॥
निद्रालु आळसि संसारीं । न कळे काय घरीं ॥ तयांचें० ॥ ३ ॥
नसतां देत अकल्पितसमयीं । परम अमृतलहरी ॥ तयांचें० ॥ ४ ॥

पद ८ वें.

तो हरि अवतारी अवतारी । मायाव्यसन विस्तारी ॥ ध्रुवपद. ॥
त्रिजगची तारी कांसे लावुनि उतारी. ॥ तो हरि० ॥ १ ॥
ब्रह्मांडचि तारी ज्याची अमृत तुतारी. ॥ तो हरि० ॥ २ ॥

पद ९ वें.

राम राम राम राम गाय रे! ।
तरिच धन्य धन्य बाप माय रे! ॥ ध्रुवपद. ॥
आत्मप्राप्तीचाच हा उपाय रे! । धरीं सद्गुरूपाय रे! ॥ राम० ॥ १ ॥
जेणें तुज दिधली नरतनुकाय[3] रे! । त्यासी तूं देसील काय रे! ॥ राम० ॥२॥
संसारीं घालुं नको हाय रे! । देव तुजला होइल साह्य रे! ॥ राम० ॥ ३ ॥
यदृच्छा मिळेल तेंची खाय रे! । रामीं न करीं अंतराय[4] रे! ॥ राम० ॥ ४ ॥
सप्रेमें मोकलोनी धाय रे! । सख्या! रामचंद्रासीं ध्याय रे! ॥ राम० ॥ ५[5] ॥
कर जोडुनि विनवि कवि अमृतराय रे! । जसी गरिब जवान गाय रे! ॥राम०॥६॥

पद १० वें.

भवभय निरसावें निरसावें । आत्मसुखांत असावें. ॥ ध्रुवपद. ॥
भागवताचें पुस्तक सोडुनि । झाडातळिंच बैसावें ॥ भव० ॥ १ ॥
या लोकाचें येणें जाणें । बसते ठायीं नसावें ॥ भव० ॥ २ ॥

---

१. समुद्रमंथनसमयीं हालाहल पिऊन शंकरास ताप उत्पन्न झाला. त्याचें शमन करण्याकरिता शंकरानें रामनामाचा जप केला—अशी कथा आहे. २. संसाराचे. ३. तनुकाय=लहानसें सुरेख शरीर. ४. अडचण, अडथळा. ५. एकांतांत मनन करावें. हे विचार आंग्लकवीच्या उक्तीशीं जुळतात. आत्मसुखार्थ तत्वविचार करणारांस लोकांचा सहवास नको असतो.

संशय आल्या वाक्य गुरूतें । एकांतांत पुसावें ॥ भव० ॥ ३ ॥
धनकामिनिच्या लोभावरुतें । चित्तांतूनि रुसावें ॥ भव० ॥ ४ ॥
त्यागाविषयीं कठिण कसोटी- । वरि मनकनक कसावें ॥ भव०॥५॥
स्वहितसिद्ध आत्मा कनक प्रपंच । केरांतूनि निसावें॥ भव० ॥ ६ ॥
अमृतत्वातें साधुनि संतां- । संनिधचि बसावें ॥ भव० ॥ ७ ॥

पद ११ वें.

ते दुर्लभ दुर्लभ हो! सज्जन भगवद्भक्त । ते साधू भगवद्भक्त ॥ध्रुवपद.॥
सर्वभूतीं भगवद्भावभावरहित ते नांव जनाची हो!। केवळ जीवन्मुक्त ॥ ते दुर्लभ० ॥ १ ॥
शांत दांत निरपेक्ष मुनीश्वर समदर्शी निर्वैर निरंतर हो!। सेविति देश विविक्त ॥ ते दुर्लभ० ॥ २ ॥
उठती बसती लोकांसम दिसती वसति तयांतहि अकृतात्मबोधें हो!। अंतरिं परम विरक्त ॥ ते दुर्लभ० ॥ ३ ॥
सदाचारसंपन्न सुशीतळ अधिगत विधिरत निगमागमवेत्ते हो!। जाणति युक्तायुक्त ॥ ते दुर्लभ० ॥ ४ ॥
केचिन्हति (?) उन्मति धरुनि जगीं देह गेह विसरुनियां विचरती हो!। ब्रह्मीं अत्यासक्त ॥ ते दुर्लभ० ॥ ५ ॥
अधिगत तत्व करिति हरिकीर्तन नर्तन नामावर्तन सभाग्य हो!। वर्णिति देशविरक्त ॥ ते दुर्लभ० ॥ ६ ॥
इतर घात अन्याय करिति परी तत्तत्प्रत्युपकारी हो!। अतिशय ते आसक्त ॥ ते दुर्लभ० ॥ ७ ॥
सहज समाधी महापुरुषेश्वर अमृतेश्वर वंदितसे अनुदिनिं हो!। ज्ञानी उपनिषदोक्त ॥ ते दुर्लभ० ॥ ८ ॥

पद १२ वें.

हरि मुखीं 'हो हो' करी रे! ॥ ध्रुवपद. ॥
पार्थाचे रथिं सारथी झाला, भारतिं कीर्ति बरी ।
भारतिचा बहु भार तिळाही नुचले निगम शिरीं ॥ हरि० ॥ १ ॥

---

१. 'ज्ञान्या' असा अन्य पाठ आहे. २. कामिनी=स्त्री. ३. प्राण्यांवर. ४. जनांस भवसागरांतून तारण्याकरितां साधुजन नौका होत. ५. उदासीन. ६. शास्त्रपारंगत. ७. कर्मकांडानुसार आचरणारे. ८. वेदांची उत्पत्ति जाणणारे. ९. नामस्मरणपर.

श्रांत हयांतें क्षाळितां हातें, दांतीं दोर धरी ।
ज्यां धरी श्री[1] अधरपिकेतें 'चुचू' करि समरीं ॥ हरि० ॥ २ ॥
बाणरवें गगनीं रथ थकतां आंवरितो समरीं ।
एकला देउनि कुरवाळित कर त्याचे चरण चुरी ॥ हरि० ॥ ३ ॥
फेनयुतें वदनें वाजींचीं[2] परिमार्जित पदरीं ।
खळ दुर्योधनादिक म्हणती हा आमुचा मुख्य अरी ॥ हरि० ॥ ४ ॥
कवच आंगिचें गांगेयादिकें भेदिलें निगमशरीं ।
क्षतजपरिप्लुत[3] ते चरण स्थित ने यमुने उदरीं ॥ हरि० ॥ ५ ॥
छंद खगेश्वर[4] स्कंधिं वाहुनी ठेविले अंघ्री उरीं ।
ते हरिपाय धरेतळिं लोळति प्रेमवेशें पसरी ॥ हरि० ॥ ६ ॥
तुरंगचरणीं धूसर आननीं पृथु[5] श्रमबिंदु वरी ।
रवि प्रतिबिंबित बिंदुल तेजसे लघु धुतां रानीं करी ॥ हरि० ॥ ७ ॥
विजयरथातें[6] करुनि कुटुंब तो खोवी प्रतोद शिरीं ।
दुर्लभ नेत्रकटाक्ष अजासि तो पाहे अश्वखुरीं ॥ हरि० ॥ ८ ॥
शत्रु पराभव जयजयकारें गर्जिजे नित्य सुरीं ।
अमृततुषारसहित कुसुमांची वृष्टि किजे अंबरीं ॥ हरि० ॥ ९ ॥

पद १३ वें.

हरि सोहिरा केला । म्यां सख्या ! ॥ ध्रुवपद. ॥
अठ्यायांसि सहस्र परिवारसहित तो मुनि[8] पातला घरा ।
कर जोडुनि वृंदावनिं विनवी धांव इंदिरावरा ॥ हरि० ॥ १ ॥
करुणाशब्द श्रवणीं पडतां कृपा आली अंतरा ।
गरुडवाहन टाकुनि मागें, त्वरित धांव झरझरा. ॥ हरि० ॥ २ ॥
शाकपत्र अणुमात्रहि नसतां निर्मि स्थाली अंतरा ।
नित्य तृप्त संतुष्ट करि द्विजां वाढित घृत शर्करा. ॥ हरि० ॥ ३ ॥
भक्तकाजकैवारी म्हणविसि गोवर्धनगिरिधरा ।
अमृतराय तव पाय ध्याय निज जन्ममरण दूर करा ॥ हरि० ॥ ४ ॥

---

१. लक्ष्मी. २. घोड्यांचीं. ३. रक्तानें भरलेले. ४. गरुड. ५. मोठे. ६. अर्जुनरथातें. ७. आकाशांत. ८. दुर्वासऋषि.

पद १४ वें.

चिंता प्रोण्यांची[1] हरीला ॥ ध्रुवपद. ॥
पक्ष्यांपदरीं संचय कैंचा । चारा पुरवि तयांला ॥ चिंता० ॥ १ ॥
कीडमुंगी कांहीं मागत नाहीं । साखर देइ तयांला ॥ चिंता० ॥ २ ॥
अमृत म्हणे हरिघरिं काय उणें । जो जें मागे देई तयाला ॥चिंता०॥३॥

पद १५ वें.

सांवळा श्रीहरी । वाट कां हो! धरी धरी? ॥ ध्रुवपद. ॥
बाई! मी पाणियाला जातां । मार्गीं उभा होता ॥
मजला झोंबला अवचीता । कां हो याचे···· । गोष्ट हे नोहे बरी ॥ सांव०॥१॥
ऐकुनी····बाजार चालिल्या गौळणी । दहीं दुध घेतलें भरोनी ॥
आनंद करूनी । वाटेवरी उभा···· । हरी उभा हरी ॥ सांव० ॥ २ ॥
जाउनी यशोदेला सांगेन । तुझा कीं मनमोहन ॥
मजला मागतसे चुंबन । हें काय लाजिरवाणं । गोष्ट नव्हे बरी ॥ सांव०॥३॥
बाई! आम्ही सासुरवासिणी । दुर्बळ आमुचा धनी ॥
याणीं धरियेल गवसुनी । काय याचे मनीं । गोष्ट नोहे बरी ॥ सांव० ॥ ४ ॥
बोले अमृतराय शाहिर । देव मोठा थोर ॥
क्रीडा करीतसे अपार । गोकुळाबाहेर । यमुनेतीरीं ॥ सांव० ॥ ५ ॥

पद १६ वें.

या या मुरलीनें माझें मन मोहिलें, राहिलें काम धाम, श्यामसुंदर कृष्ण मनीं भरुनी उरला जनीं वनीं सये! अनुदिनीं दिसतो. ॥ ध्रुवपद. ॥

सासु सासरा दीर नणद सकळही मज हरिच भासती विपरीत वृत्तांत जो लोकांत तो एकांत निज कांत श्रीकांत गमत शांत मी वेदांतिचा सिद्धांत गिळुनी मुखा आलें अमृतप्राय झालें प्यालें सतत चिन्मय रस तो. ॥ या या०॥१॥

पद १७ वें.

हरिसीं सतत भजावें रे! मनुजा! ॥ ध्रुवपद. ॥
दुर्लभ हा नरदेहचि जाणुनि । क्रोधादिक वर्जावें रे! ।
निशिदिनीं सुजनपथासि धरुनियां । मुक्तिपदावर जावें रे! ॥ हरि० ॥१॥

---

१. 'सर्वांची' असाही पाठ आहे. २. कवि.

दृश्य सकळ हें व्यर्थचि जाणुनि । सच्चित्सुखकर समजावें रे! ॥
कोण मी कैंचा कोठुनी आलों । हेंचि त्वरित उमजावें रे! ॥ हरि० ॥२॥
दीनदयाघनचरित गाउनी । प्रेमामृतें भिजवावें रे! ।
गुरुवचनीं विश्वास ठेवुनी । दुर्जनसंग त्यजावा रे! ॥ हरि० ॥ ३ ॥

पद १८ वें.

जाईं जाईं मानवा! हरिपायीं रे! ॥ ध्रुवपद. ॥
जन्ममरणमोचक रूप हरीचें । निरंतर गाईं रे! ॥ जाईं० ॥ १ ॥
दीनपणें पदीं लीन होउनी । सुखकर गुणगण गाईं रे! ॥ जाईं० ॥ २ ॥
अंतकाळीं कोणी न सोडविती । स्त्रियाबंधुसुतजांवाई रे! ॥ जाईं० ॥ ३ ॥
ज्या समयीं जें देइल ईश्वर । तें अमृत म्हणुनी खाई रे! ॥ जाईं० ॥ ४ ॥

पद १९ वें.

गुनियानके तान वंकार मत कठन ।
निपुण गावत कोऊ असल हिंदुस्थान ॥ ध्रुवपद. ॥
अपने अपने देसभाषा भेद कहत ।
दखन कोऊ सुगर मुलतान ॥ गुनि० ॥ १ ॥
जो जो देखें सुर सकल भगवान ।
चरन अर्पन रहि बिकल सब गलतान ॥ गुनि० ॥ २ ॥
अमृतराय साहेबको नायब सोहि सुलतान ।
नरेंद्र राजाराम कोऊ सुगर मुलतान ॥ गुनि० ॥ ३ ॥

पद २० वें.

जात जोबन हरवारी जिनको ल्यावना ।
रंग रंग मोरी सकल बिकल भये कामबिरहकी भावना ॥ ध्रुवपद. ॥
कहिये एक पल रहिये ना तु मनवेग चरनसो आवना ॥ जात० ॥ १ ॥
तुमसों प्यारी मुजकूं आवन हमसें क्यंव कर गावना ॥ जात० ॥ २ ॥
अमृतवचनसे बिनति करत हैं नागर लाल रिझ्यावना ॥ जात० ॥ ३ ॥

पद २१ वें.

आजि कुंजनमो फूलके फुली ब्रजपतराज ॥ ध्रुवपद. ॥
फुलनके हार रुचिर शृंगारबन ।
फूलनके मुगुट कुंडल बिचित्र सकल साज ॥ आजि० ॥ १ ॥

फूलनके राउटी, फूलनके चौकी[1] ।
फूलनको वीखो अनुपम से जहाज ॥ आजि० ॥ २ ॥
फूल रहि ग्वालन हरदम दम गावत ।
आन अलापत पखवाजन की आवाज ॥ आजि० ॥ ३ ॥
अमृतराय साहेब सों आप मों अर्पन दर्पन ।
अप सुर सुर नर सिरताज ॥ आजि० ॥ ४ ॥

पद २२ वें.

बांके बनवारी अधरपर मुरलीरव तरल तर नैन हर ॥ ध्रुवपद. ॥
चरन पर चरन धर नेक तेडे खडे ।
पाव तेंडी लग्यो शगर चंदन अत्तर ॥ बांके० ॥ १ ॥
अलखकी खलक मुद्रा तिलक केशरी ।
खलके करतार खल चंदन अति चतुर ॥ बांके० ॥ २ ॥
शक्र की बक्रता चक्रविन दुर करे थक कोया ।
पराक्रम थकित सुर असुर ॥ बांके० ॥ ३ ॥
झुलत कलगी कहत कल गीत संगीत- ।
रीतमो अमृत धुन परमपद पायो ॥ बांके० ॥ ४ ॥

---

१. चौरंग.

अमृतरायकृत नवीन पदें.

पद २३ वें.

हा देह जाइल रे! । पुण्य कामा येईल रे! ॥ ध्रुवपद. ॥
मोहित होउनियां विषयीं । किती करसिल 'बाइल बाइल' रे! ॥ हा० ॥ १ ॥
जंववरी आंगीं शक्तिधन । तंववरी ते गीत गाइल रे! ॥ हा० ॥ २ ॥
अमृतेश्वर म्हणे सर्वही सोडुनी । 'हरिहर' म्हणतां सार्थक होइल रे! ॥ ह०॥

पद २४ वें.

लाडका तुझा जेगजेठी । याला चार तूप रोटी ॥ ध्रुवपद. ॥
वोढाळाची ढाळ कोटी । मारला जाइल यासाठीं ।
घरोघरीं दूध लुटी । झाला सांड तुझ्या पोटीं ॥
चाल ॥ बाइ! यशोदे! ऐक गाऱ्हाणें । तूं तंव म्हणशील बाळक तान्हें ।
सात बाळकें वधिलीं यानें । निमित्ता केलेंसे कां सोनें? ।
तोड ॥ तुम्हा दिधलें वडिलपणें । गौळ्या शिक्षा एवढ्यासाठीं ॥ तुझा० ॥ १ ॥
तुझें गोकुळ पडो वोस । आम्हा पडेल चार देश ।
यथच काय पडतो पाउस । नाहीं आमुची मिरास ॥
चाल ॥ यशोदा म्हणे 'ऐक बाळा! ऐसें कां करणें गोपाळा! ।
या करणीनें वोस गोकुळा । पडेल कीं रे! बा! घननीळा! ।
तोड ॥ वनासी जाइ गोधनपाळा' । अमृत म्हणे उरेना गोष्टी ॥ तुझा०॥२॥

पद २५ वें.

किती करिसिल बाइल रे! बाइल रे! । तुज खाइल रे! ॥ ध्रुवपद. ॥
बाळी बुगडी चोळी लुगडी । ऐसी सगडी लावियली रे! ॥ किती० ॥ १
अटक चटक मटक दाउनी । मन तुझें मोहिलें रे! ॥ किती० ॥ २ ॥
अमृत म्हणे तुजजवळी पैसा । तोंवरी गीत गाइल रे! ॥ किती० ॥ ३ ॥

पद २६ वें.

कांहीं तरी सोय धरीं रे! ।
परमवरदकर सुरुचितर नरनारायण हा अनुदिनीं मनीं जप करीं रे! ॥ ध्रुवपद.॥
नंदनंदन गोविंद दीनबंधू म्हणुनी भव तरीं रे! ।
करुणावरुणालय शरणागतपरिपालन पदवी रे! ॥ कांहीं० ॥ १ ॥

---

१. गवळणिया कृष्णाची गाऱ्हाणीं यशोदेस सांगतात. २. जगज्ज्येष्ठ, सर्वाहून श्रेष्ठ. ३. उनाड बैल. ४. वतन. ५. संसार. ६. दयार्णव.

पशुसम होशिल विषयीं निरंतर रत किती रे! ।
परत परत अंतरीं रे! नरतनु दुर्लभ[1] दुर्लभ सखया वदवद नरहरी रे! ॥कां०॥
कांहीं भरीं भरूं, धरीं रमापती बुडशिल या भवपुरीं[2] रे! ।
अमृतराय तव पाय धरुनियां विनवी बहु बहु परी रे! ॥ कांहीं० ॥ ३ ॥

पद २७ वें.

निष्ठुर अतिक्रूर तुम्ही बोलुं नका हरिला ॥ ध्रुवपद. ॥
काय दुग्ध याचें पाणी । कोठें दुष्ट दुष्ट वाणी ।
माझा मोहन घेऊन जातो गौ[3]धन नित्य रानीं ॥ निष्ठु० ॥ १ ॥
आधींच घर असती लंके (?) । त्यावरी तो उंच शिंके ।
नित्य येतो दूध पितो वचन हे लटिकें ॥ निष्ठु० ॥ २ ॥
क्षणभरी घरीं नसतो कान्हा । माझे स्तनीं येतो पान्हा ।
जिवींचा जीव सकळ जाणा । बाळ हरी तान्हा ॥ निष्ठु० ॥ ३ ॥
अमृत म्हणे निज खुणे । हरिवांचुन व्यर्थ जीणें ।
सदनीं[4] जाउनी बैलवी[5] त्या । ध्याती प्रभुचरण ॥ निष्ठु० ॥ ४ ॥

पद २८ वें.

अंमल[6] खुब गाजा गाजा । जिनकू राजी पैरजा[7] ॥ ध्रुवपद. ॥
जनार्दन[8]का एका[9] । पैठण तख्त किया सरं[10] निको[11] ॥ अंम० ॥ १ ॥

---

१. मिळण्यास कठीण. येथें स्वाभिप्रायदार्ढ्यास्तव 'दुर्लभ' 'दुर्लभ' अशी द्विरुक्ति केली. २. संसाररूप पुरामध्यें. ३. गौ=गाय. ४. गृहीं. ५. गौळिणी. ६. ज्यांची प्रजा राजी त्यांचा अंमल खूब गाजला. ७. प्रजा. ८. हें एकनाथ स्वामींच्या गुरूचें नांव. हे महान् साधु व दत्तभक्त होते. ९. एकनाथ—हा साधु ब्राह्मण कवि ज्ञानदेवाचा अवतार असें समजतात. याचा जन्म शके १४७० या वर्षी झाला असें दिसतें. याचा मरणशक १५२१ फाल्गुन वद्य ६ असें आढळतें. याची कविता (१) एकनाथी भागवत, (२) भावार्थरामायण, (३) रुक्मिणीस्वयंवर, (४) स्वात्मसुख, (५) हस्तामलक (६) आनंदलहरी, (७) चतुःश्लोकी भागवत टीका, (८) अभंग, (९) पदें—इतकीं प्रकरणें मराठी असून कांहीं कविता हिंदुस्थानी भाषेंतही आहे. याच्या गुरूचें नांव जनार्दनपंत होतें म्हणून त्यानें आपल्या कवितेंत आपलें नांव **'एकाजनार्दन'** असें लिहिलेलें आढळतें. याची वाणी रसाळ आणि सरळ असून वर्णन करण्याची शैली मनोहर आहे. एकनाथानें मराठी भाषेवर केवढे उपकार केले या विषयाचें प्रतिपादन **'एकनाथाचें चरित्र'** नामक पुस्तकांत आणि आमची देशी भाषा विद्यापीठीं शोभण्यासारखी आहे कीं नाहीं?' या व्याख्यानांत प्रो० **रा**जाराम **रा**मकृष्ण **भा**गवत यांनीं केलें आहे तें पाहण्यासारखें आहे. महिपतीच्या 'भक्तलीलामृतां'त (अध्याय १३-२४) एकनाथाचें सविस्तर चरित्र आहे. याशिवाय रा० धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धेकृत 'श्रीएकनाथ महाराज यांचें चरित्र' हें पुस्तकही पाहण्यालायक आहे. १०. सर करणें=जिंकणें, ताब्यांत घेणें. ११. खरोखर.

ज्ञानेश्वरका ध्वजसा । डेरकर बेद बोले म्हैसा ॥ अंम० ॥ २ ॥
विठ्ठलकू देखना । लिया पंढरपुरका ठाना ॥ अंम० ॥ ३ ॥
रामानंदका पुरजी । उनकू वारा सोला राजी ॥ अंम० ॥ ४ ॥
मुकुंदराज बोले । राजा जयंतपाळ बंद खोले ॥ अंम० ॥ ५ ॥

---

१. ज्ञानदेव याचा जन्म शके ११९७ श्रावण वद्य ८ स आळंदी येथें झाला, आणि तेथेंच हा शके १२१८ कार्तिक वद्य ८ स समाधिस्थ झाला. यास ज्ञानेश्वर, ज्ञानोबा असेंही म्हणतात. याचे ज्ञानेश्वरी (भावार्थदीपिका), अमृतानुभव, आणि चांगदेवपांसष्टी असे मुख्य ग्रंथ आहेत. याची कविता प्रासादिक आणि गहन असून तिचा विषय भक्ति, वैराग्य आणि आत्मबोध हा आहे. याची वाणी रसाळ, उपमारूपकादिकालंकारपूर्ण आहे. याची वर्णन करण्याची शैली इतकी चटकदार आहे कीं वर्ण्य विषयाची प्रतिमा प्रत्यक्ष डोळ्यांपुढें उभी केलेली असते. इतकें आहे तथापि याचे ग्रंथ गहनविचारांनीं भरलेले असल्यामुळें ते सहज समजण्यासारखे नाहींत. याचीं पदें, अभंग इत्यादि कविता ही गहन आहे व तिच्यावर त्याच्या ग्रंथांतील प्रमुख विचारांची छाया पडली आहे. '**ज्ञानेश्वर महाराजांचें चरित्र**' या नांवाचा ग्रंथ रा० **बळवंत खंडोजी पारख** यांनीं लिहिला आहे तो जिज्ञासु जनांनीं पाहिला असतां या कवीची ओळख चांगली होण्यासारखी आहे. २. ध्वज, ध्वजा, पताका. ३. भिऊन. ४. रेडा, हल्या. ५. **विठोबा, विठ्ठल, विठाई** हीं सर्व एकाच देवाचीं नांवें होत. **विठोबा** हा **कृष्ण** होय. एकदां **राधा कृष्णाच्या** मांडीवर बसली असतां तेथें **रुक्मिणी** आली, तेव्हां **राधेनें** तिला अभ्युत्थान दिलें नाहीं म्हणून ती आपला अपमान झाला असें समजून रागानें **दिंडीरवनांत** येऊन तपश्चर्या करूं लागली. जेथें हल्लीं **श्रीपंढरपुर** क्षेत्र आहे तेथें पूर्वी दिंडीरनामक दैत्याचें वन होतें. या वनांत **रुक्मिणी** असतां **कृष्णानें** तेथें येऊन तिची मनधरणी करून समजूत केली. नंतर त्या दोघांनीं तेथें '**विठोबा रुक्माई**' हीं नांवें धारण करून अखंडवास केला—असें वर्णन ग्रंथांतरीं आहे. ६. ठाणें. ७. हा **कबीराचा**, व ज्ञानेश्वर, निवृत्ति इत्यादिकांचा बाप जो विठ्ठलपंत, त्याचा गुरु. याने '**आनंद**' नांवाचा नवा संप्रदाय काढिला, तो उत्तर हिंदुस्थानांत चालू आहे. हा मोठा विद्वान् होता. ८. **मुकुंदराज** या नांवाचा एक साधु कवि सुमारें सातशें वर्षांपूर्वी झाला. हा जातीचा देशस्थ ब्राह्मण असून '**जोगाईचें आंबें**' या गांवचा राहणारा होता. 'जोगाईचें आंबें' म्हणजे लातवकुळांतील जयंतपाळाचें प्रधाननगर (राजधानी) हें निजामशाहींत असून त्याला हल्लीं '**मोमीनाबाद**' म्हणतात. मुकुंदराजानें जयंतपाळास आत्मज्ञानाचा उपदेश करण्यासाठीं '**विवेकसिंधु**' नामक ग्रंथ रचिला. याचा '**परमामृत**' म्हणून दुसरा ग्रंथ आहे. या ग्रंथांतील प्रतिपादन शांकरदर्शनानुसारी आहे. याची वाणी शुद्ध, प्रौढ आणि सरळ आहे. याची समाधि 'जोगाईच्या आंब्या' स डोंगराच्या कड्यावर आहे. ९. जयंतपाळ हा वीरनाळ राजाचा पुत्र. या राजाला ब्रह्मविचार फार आवडत असे, म्हणून तो साधूंचा सन्मान करून त्यांस म्हणे कीं घोड्यावर बसतांना एका रिकिबींत पाय घालून दुसरींत घाली घाली तों मला ब्रह्मसाक्षात्कार करून द्या. कोणाच्यानेंही ही गोष्ट करवेना; म्हणून यानें पुष्कळ साधूंस बंदींत घातलें. हें वर्तमान मुकुंद-

सेना सजणा कसाई । ये मौलाके सिर्फ सिपाई ॥ अंम० ॥ ६ ॥
अमृतराय कहे बिरजीका । चलते बैंकुंठ लेवे तूका ॥ अंम० ॥ ७॥

पद २९ वें.

दौलत खुब पायी खुब पायी । हरिपँगसो अल्लाई ॥ ध्रुवपद. ॥
मागत दूध उपमन्यू । उनकू दिया क्षीरसागर ॥ दौलत० ॥ १ ॥

राजास कळतांच तो राजाकडे आला व त्यानें राजास समाधी लाविली. पुढें मुकुंदराजांनीं त्यास सावध केलें, मुकुंदराजाच्या सांगण्यावरून राजानें बंदींतील सांधूंस मुक्त केलें.

१. याची कथा 'भक्तविजय' अध्याय ३४ ग्यांत पहावी. या साधूविषयीं मोरोपंतानें आपल्या 'सन्मणिमाले'त असें म्हटलें आहे:-'जो भक्तिसरित्पूरीं पढरींची सर्व वाहवी सेना, । रुचला मनास बहुतचि, तो, भगवद्भक्त, नाहवी सेना. ।।' [गीति ५३]. २. मोरोपंतकृत 'सन्मणिमालेंत' या साधूचा असा उल्लेख आहे:-'सजणा नाम जयाचें, ज्या, गाती साधुजन, कसायास । भगवान पळहि न विसरे ज्यातें, विसरेन मी कसायास? ॥' [गीति ५४]. ३. परमेश्वराचे. ४. फक्त, केवळ. ५. हा पंढरपूरच्या पांडुरंगाचा एक भक्त होता. हा शालिवाहन शके १५३० मध्यें देहूस जन्मला. हा जातीचा वाणी होता. ह्याला दोन बायका होत्या. पहिली बायको दमेकरीण होती ती लवकरच वारली. दुसरी बायको जिजाबाई मोठी कर्कशा होती. ह्याच्या सत्राव्या वर्षी ह्याचीं आईबापें वारलीं. ह्याचा मृत्यु शके १५७१ त झाला. ह्याचे अभंग पुष्कळ आहेत. विशेष माहिती भक्तविजय अध्याय ४८ व ४९ यांत पहावी. या शूद्र कवीविषयीं आणखी माहिती कै० हंस यांच्या निबंधांत व रा० रा० **रा० वि० माडगांवकर** यांच्या पुस्तकांतही आहे. ती जिज्ञासु वाचकांनीं पहावी. ६. संपत्ती. ७. पग=पाय. ८. उपमन्यू-वसिष्ठकुलोत्पन्न व्याघ्रपाद नामक मुनीचा ज्येष्ठ पुत्र. हा लहान असतां बहुतकरून घरींच खेळत असे. एकदां हा दुसऱ्या आश्रमांतील मुलांसह खेळत असतां तेथें यानें गाईचें दूध काढतांना पाहिलें, व तेथील मुलांच्या मातेनें तेथील मुलांस व यास गोरस पान करण्यास दिलें व तें तो प्याला. नंतर तो आपले घरीं आल्यावर आपले मातेजवळ गोरस मागूं लागला. तेव्हां ह्याच्या मातेनें नित्याप्रमाणें पिष्ट पाण्यानें कालवून त्याला दिलें परंतु तें तो न घेतां 'काल मी त्या दुसऱ्या आश्रमांत दूध प्यालों तसें दे' असें म्हणूं लागला. तेव्हां त्याची आई जरा खिन्न होऊन म्हणाली कीं 'असें दूध तुला मिळण्यायोग्य तुम्ही नाहीं, कारण पूर्वजन्मीं तुझ्या हातून ईश्वराराधन घडलें नाहीं.' यावरून त्यानें ईश्वराराधन करून आकल्प आयुष्य व समग्र क्षीरसागराचें आधिपत्य अशीं संपादन केलीं-अशी कथा आहे. हा शैव होता व कृष्णासही यानेंच शैवी दीक्षा दिली. हा धौम्य ऋचीचा ज्येष्ठ भ्राता व तंडी ऋषीचा शिष्य होता. (विशेष माहिती महाभारत-अनुशासनपर्व-अध्याय १४ यांत, अथवा सौरपुराण-अध्याय ३६ यांत पहावी.)

बेटकू धुरु[1] रोवे । उनकू सबसे शिरपद[2] देवे ॥ दौलत० ॥ २ ॥
नंक्रकु दे फटका । गैजदासनके[3] छुटका ॥ दौलत० ॥ ३ ॥
अमृतरायका चुटका । लेत रामनामका घुटका[4] ॥ दौलत० ॥ ४ ॥

---

१. ध्रुव—उत्तानपाद राजास त्याच्या सुनीति नामक भार्येपासून झालेला पुत्र. या राजास सुनीति व सुरुचि अशा दोन भार्या होत्या, त्यांत सुनीति ही नावडती होती, त्यामुळें तिचा पुत्र ध्रुव हाही नावडता होता. एकदां याचा सावत्र भाऊ राजाच्या मांडीवर बसला असतां हाही बसण्यास गेला, पण हें सुरुचीला आवडलें नाहीं व तिनें त्याचा धिक्कार केला. तेव्हां हा रडत रडत आपल्या मातेकडे (सुनीतीकडे) गेला व झालेली गोष्ट तिला सांगितली, तेव्हां तिलाही फार वाईट वाटून ती म्हणाली, परमेश्वराची आराधना केल्याशिवाय हें ऐश्वर्य कोठून प्राप्त होणार? तेव्हां याला पश्चात्ताप होऊन लागलाच अरण्यांत जाऊं लागला, इतक्यांत मार्गामध्यें ध्रुवाला नारद भेटले. त्यांनीं 'तूं लहान आहेस, परत जा' असें सांगितलें, पण यानें ऐकिलें नाहीं. नारदमुनींस याची दया येऊन त्यांनी यास एक मंत्र व भगवद्ध्यान ह्यांचा उपदेश केला. अल्पकाळांत यास भगवंतांनीं भेट दिली म्हणून याच्या मनात स्तुति करावी असें वाटलें; पण सामर्थ्य नसल्यामुळें हस्त जोडून उभा राहिला. तेव्हां हें जाणून परमेश्वरानें त्यास सामर्थ्य दिलें, व यानें स्तुति केली. तीवरून परमेश्वर संतुष्ट होऊन 'तूं छत्तीस सहस्र वर्षें पित्याच्या मागें राज्य कर व या स्थानीं परत ये' असा वर दिला. हें सर्व वर्तमान उत्तानपाद राजास कळलें, व तो समारंभपूर्वक सामोरा येऊन ध्रुवास परत नगरास घेऊन गेला, व त्याला राज्याभिषेक करून आपण अरण्यगमन केलें—अशी कथा आहे. (भागवत—स्कंध. ४ अ० ८-९.) २. श्रेष्ठस्थान. ३. गजेंद्र—ही कथा श्रीमद्भागवत—स्कंध ८ अध्याय २—४ यांत आहे. क्षीरसागरांत त्रिकूट नामक एक पर्वत होता. त्याच्या खालच्या तटावर वरुणाचें ऋतुमत् नामक उद्यान होतें, आणि त्यांत एक अत्यंत रमणीय सरोवर होतें. तेथें उन्हानें संतप्त आणि तृषार्त असा एक गजेंद्र आपल्या कळपासह पाणी पिण्यासाठीं आला. तो सरोवरांत प्रवेश करून तेथील पाणी यथेच्छ पिऊन बाहेर येऊं लागला, तों त्याला एका सुसरानें पकडिलें. तेव्हां त्यानें नक्राच्या हातून सुटण्याचा पुष्कळ यत्न केला, परंतु सुटेना. त्याची सुटका करण्यासाठीं इतर गज, गजस्त्रिया, आणि कलभ (गजशावक) यांनींही पुष्कळ प्रयत्न केला. पण त्यांचेही कांही चालेना. या उद्योगांत हजार वर्षें गेलीं; सर्व उपाय हरले. अखेरीस निरुपाय होऊन गजेंद्रानें हें प्राणसंकट टाळण्यासाठीं परमेश्वराचा धांवा केला. (अध्याय २ श्लो० २-२९) 'मी ग्राहापासून मुक्त होण्याची इच्छा करीत नाहीं, तर अज्ञानमोक्षाची इच्छा करतों' इत्यादि गजेंद्रानें केलेलें स्तोत्र ऐकून प्रसन्न होऊन श्रीभगवान हरि प्रकट झाला. त्याला पाहतांच 'हे नारायणा! अखिलगुरो! भगवन्नमस्ते' असें म्हणून गजेंद्रानें सोंडेनें एक कमळ उपटून भक्तिभावानें त्याच्या प्रीत्यर्थ वर आकाशांत फेंकून दिलें. तेव्हां त्या पीडिताला पाहून विष्णूला दया आली. त्यानें एकदम गरुडावरून उतरून सग्राह गजेंद्राला सरोवराच्या बाहेर काढून चक्रानें नक्राचें तोंड कापून त्यास सोडविलें. (अध्याय ३ श्लोक ३३.) ४. 'नामरसायण घुटका' असा अन्य पाठ आढळतो.

पद ३० वें.

महाराज पांडवघरमें दासनके दास बिचारे ॥ ध्रुवपद. ॥

ब्रिजके ग्वालरूप अवतारे । बकी अघासुर संहारे ।

नेखसों गोवर्धन उठावे । सो प्रभु अघबक कंस उद्धारे ॥

उठाव ॥ सो प्रभु राजसाहिमें अग्रपूजे अति उग्र तेज शिशुपाल कालसों मार डालके व्रजको छूटी भूमी कोहे बार बार परखारे ॥ महाराज० ॥१॥

चारों भुजसों आयुध डारे । छुटे पातक मेटे सारे ।

हिरंदे उठाय लिये हे न्यारे । लक्ष्मी कौस्तुभ सो है प्यारे ॥

उठाव ॥ जापर दधि दुध घृतके प्रवाह छुटे श्यामतनूके पीतांबर पर भांत भांतके तऱ्हे तऱ्हेके बुटे चितरे न्यारे ॥ महाराज० ॥ २ ॥

कबहु छडी बगलमें मारे । ले संदेसा पटक सवारे ।

रथसे गाडीवान सवारे । तमाम घोडे चरावे दौरे ॥

उठाव ॥ रथ जोतके पोछ पांछके ललकार करतहे मुखसे 'होरे होरे' ॥ महा०॥३॥

याचक होके हात पसारे । भूप जरासंधको मारे ।

कपटी कौरवको संहारे । निर्जजन हे सों पार उतारे ॥

उठाव ॥ मखमों अर्जुनपें जब गांठ पडी तब होय सिपाइ जुलाल रथसे कूद पडे चक्र उठाय लिये जाय अकेले भीष्म पितामहाजी पर दौरे ॥महा०॥४॥

बजाज द्रौपदिके बिहारी । पट पहिरवे न्यारे न्यारे ।

छोरे मथुराके हे पौरे । ब्रिज चेटक हे नंददुलारे ॥

उठाव ॥ कामी पार्थ जानकें भये मेहरिया रूप सुभद्रा लिए लिला नाटक कैकै प्रकारे भक्त रिझावत अमृतराय कहि मायातीपर बारबार बलहारे ॥ महाराज० ॥ ५ ॥

पद ३१ वें.

राखीं लाज अनंता ! आतां ॥ ध्रुवपद. ॥

---

१. गोळ्यांच्या रूपानें. २. नखानें. ३. राजसूययज्ञांत. ४. सर्व पातकें मिटविली—नाहीशीं केली. ५. हृदयांत. ६. आपले भक्त. ७. राजसूययज्ञांत. ८. वस्त्र. ९. मुलें. १०. मथुरानिवासी. ११. मुखवीत असे, मुख देत असे. १२. द्रौपदीवस्त्रहरणप्रसंगी द्रौपदीनें केलेला कृष्णाचा धांवा.

कुमति सुयोधन विनयें जल्पत ।
मति भ्रमलीच समस्तां ॥ आतां० ॥ १ ॥
कुरळीं आकर्षुनि खळ मज पीडिति ।
कचसंचय धरूनि हातां ॥ आतां० ॥ २ ॥
स्थिरचरव्यापक श्रीहरि असतां ।
भोगीं कशी अवस्था मी ! ॥ आतां० ॥ ३ ॥
खळ आतां हे फेडति लुगडें ।
करिती कठिण अनर्था ॥ आतां० ॥ ४ ॥
अमृत माधव प्रभु मन गरुडा ।
कां न पळवि हृदयस्था ॥ आतां० ॥ ५ ॥

पद ३२ वें.

पंढरीचा नाथ पहा पांडुरंगजी ॥ ध्रुवपद. ॥
नंदनंदन हरि गोविंद श्रीमुकुंदजी ।
केशव माधव यादव कृष्ण वासुदेवजी ॥ पंढरी० ॥ १ ॥
पूर्णब्रह्म परब्रह्म हेंचि वर्म जी ।
नाभिकमळीं ब्रह्म, शिरीं ज्योतिर्लिंग जी ॥ पंढरी० ॥ २ ॥
त्र्यंबकासि अमृतराय ध्याय पाय जी ।
ब्रह्मपदीं गरुड करुनि करित दंग जी ॥ पंढरी० ॥ ३ ॥

पद ३३ वें.

पशुपति[३] ऐसें दैवत न गमे त्रिभुवनीं दुसरें ।
कृपाकटाक्षें चुकवी लक्ष चौऱ्यायशीं फेरे ॥ ध्रुवपद. ॥
वाजन करितां दिसेल जो गज अश्वांचा पाल ।
महालमंदिर सुंदर कांता मंगळवत सोहळा ॥
दीर्घायुष्य देऊनि भोगवि संपतिचा सोहळा ॥
नित्य शिवाशीं वाहति बेल ॥ पशुपति० ॥ १ ॥
त्रिकाळ मंत्र पूजुनि वाजवि हस्ताची टाळी ।
'शिव शिव' वदतां मात्र होय पापाची होळी ॥
सप्तजन्म पातक हरहर म्हणतां दुरी ॥ पशुपति० ॥ २ ॥

---

१. केशांच्या ठायीं. २. वेणी, केशकलाप. ३. शिव. यांत शिवाचें स्तवन आहे.

[1]इंदुवासर प्रदोष शिवरात्री व्रत तिसरें ।
शचिपति श्रीपति व्रत हें करिति ब्रह्मा सावित्री ।
[2]चतुर्वर्णांचे राजे करिती व्रत हें ।
सकळ मनोरथ पावुनि अंतीं [3]अमृतेश्वरप्राप्ति ॥ पशुपति० ॥ ३ ॥

पद ३४ वें.

भगवंतासाठीं जिवलगा! अवघ्या तुटी. ॥ ध्रुवपद. ॥
भरतें त्यजिली माता । प्रल्हादें चिरवीला पिता ।
बिभीषणें त्यजियेला भ्राता । एका रामपदासाठीं ॥ १ ॥
श्रवेनें उपकर्णाचे अंतीं । हरिश्चंद्रें त्यजिली तारामती ।
रोहिदासें त्यजिली कांती । एका रामपदासाठीं ॥ २ ॥
श्रियाळें त्यजिला पुत्र । भक्तराजवैकुंठपाळमित्र ।
अमृतेश्वराचे भजनीं सुमित्र । एका रामपदासाठीं ॥ ३ ॥

पद ३५ वें.

येउनियां जन्मा काय केलें रे! ॥ ध्रुवपद. ॥
मी देह हें घेउनि ओझें नाचति भोजें ।
परि खाजें काळाचें जालें रे! ॥ येउनियां० ॥ १ ॥
सकळ विषयीं मन विकळ करिसि ।
परि न कळे स्वहित वय व्यर्थचि गेलें रे! ॥ येउनियां० ॥ २ ॥
सुंदर नरतनु पावोनि उत्तम ।
श्रीसर्वोत्तमपद चुकलें रे! ॥ येउनियां० ॥ ३ ॥
अमृतवचन हें [5]बुझुनि आजुनि तरि ।
रिझुनि हरिसि भज, सार्थक कथिलें रे! ॥ येउनियां० ॥ ४ ॥

पद ३६ वें.

हरि सेवा करणें तरी हें सार [6]जिणें ॥ ध्रुवपद. ॥
हरिकथा उपदेश जयाचा । साधुसंगति आदरें धरणें रे! ॥ हरि० ॥ १ ॥
सज्जनरंजन मुख्य हें साधन । हरिगुणकीर्तनिं या रमणें रे ॥ हरि० ॥ २ ॥
विभुलीलामृत सभृत गायन । निश्चळ भवजळीं या तरणें रे! ॥ हरि० ॥ ३ ॥

---

१. सोमवार. २. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार वर्णांचे. ३. 'अंबेश्वर' असें पाठांतर आहे. ४. वियोग. ५. समजुनि. ६. जगणें.

पद ३७ वें.

(गुरुशिष्यसंवाद.)

गुरुजी! मला शिष्य करा । आत्मा आपण मौन धरा ॥ १ ॥
सनकादिकीं धरिलें मौन । त्याचें बोलणें मौनाचें मौन ॥ २ ॥
मौनासारिखे कोणते बोल । स्वानुभवाचे सहज डोल ॥ ३ ॥
स्वामी अनुभव तो कैसा भेटे । सद्गुरुकृपे संशय तुटे ॥ ४ ॥
सद्गुरु कृपा करितील कैसी । त्यांचे चरणीं व्हावें दासी ॥ ५ ॥
दासीपण तों कठीण आहे । द्वारीं पडोनि उगाचि राहें ॥ ६ ॥
उगाचि पडोनि होईल काय । येतां जातां लागतील पाय ॥ ७ ॥
पाय लागल्या कोणती सिद्धि । प्रपंचांतुनि फिरेल बुद्धि ॥ ८ ॥
फिरली बुद्धि कैसी कळे । जैं संतांचे मिळणीं मिळे ॥ ९ ॥
संत सांगा कैसे दिसती । सर्वही लोक स्तवन करिती ॥ १० ॥
लोकस्तवनीं होईल संत । स्वयें परीक्षुनि घ्याव्या अंत ॥ ११ ॥
अंत लागल्या काय झालें । नित्य सेवावीं पाउलें ॥ १२ ॥
पाउलें करितील देव ठावा । लवुनि प्रश्नही करावा ॥ १३ ॥
प्रश्न करितां देव दिसे । जनीं वनीं तोचि भासे ॥ १४ ॥
तोचि भासल्या आपण कोण । आपण देव नाहीं दोन ॥ १५ ॥
आपण देव तो कैसा लक्षी । जागतां निजतां मनाचा साक्षी ॥ १६ ॥
मजला दिसत माझेंचि मन । तरी तूंचि कीं तुम्हां वेदवचन ॥ १७ ॥
एक वेदचि काय प्रमाण । आपण वेद गुरु तिघेजण ॥ १८ ॥
तिन्ही प्रतीति जवळीच कीं त्या । विचार करितां जवळीच होत्या ॥ १९ ॥
विचार कां हो न करी सोपा । मायेनें घर घेतलें बापा ॥ २० ॥
ब्रह्मीं मायास्फुरण दिसते कैसी । सूर्यापासुनि मृगजळ जैसी ॥ २१ ॥
मृगजळडोहीं हरणें भुलती । मनुष्यें हीं हरिणेंच होती ॥ २२ ॥
मनुष्यपणा तो कठीण आहे । आपणाआपण शोधुनि पाहे ॥ २३ ॥
शोधुनि पाहतां आपणचि आघवें । मौन्यें मौन हेंचि बरवें ॥ २४ ॥
हा तों झाला बोलका मुका । उपजत मुका तो स्वरूपीं चुका ॥ २५ ॥
मुकेपण तों सुखाचें सार । कैसा होईल जगदोद्धार ॥ २६ ॥

---

१. हा समास चिंतनीय आहे.

पास्तव देव धरी अवतार । तरी तूंचि करीं बा विचार ॥ १७ ॥
आतां स्वामी वंदीन पाय । तुझेंचि नाम अमृतराय ॥ २८ ॥

पद ३८ वें.

(गुरुशिष्यसंवाद.)

गुरुजी ! मला सुखाची वाट सांगा । घर टाकुनि रानांत बागा ॥ १ ॥
रानांत काय सुख आहे । उगाचि घडीभर जाउनि पाहावें ॥ २ ॥
रानांत जाउनि काय खावें । निःसंग साचा फकीर व्हावें ॥ ३ ॥
फकिरास पाहुनि कुत्रें भुंकतें । फिरतोसि कां म्हणोनि तोंडावर थुकतें ॥ ४ ॥
फकीर बसल्या उगाच बसतें । ऐसेंच बसावें म्हणुनि उपदेश करितें ॥ ५ ॥
तेव्हां गुरु कुत्रें । भटकल्या माणसावरी सुत्रें ॥ ६ ॥
कुत्र्यास कांहीं आहे विचार । धरिलें एक तें न सांडी द्वार ॥ ७ ॥
पोटभरी भाकरी मिळे एक घरीं । ओली कोरडी हाक न मारी ॥ ८ ॥
हाकेविण दुःख कोण समजतो । निश्चयानें बैसल्यास देव देतो ॥ ९ ॥
बैसल्या कैसा निर्वाह होतो । अजगर कोठें फिरावयासी जातो ॥ १० ॥
अजगरासी नाहींत बायकांचे धोके । त्याचें संतान कोठुनि पिके ॥ ११ ॥
भुला भटकल्या होय संयोग । ऐसेंच वाटे सर्व जग ॥ १२ ॥
तरी माणसाचीच काय खटपट । मानुनि घेतलें म्हणुनि लागलें झट ॥ १३ ॥
लागलें झट हें केव्हां पळे । आपण ब्रह्म हें आपणा कळे ॥ १४ ॥
ब्रह्म कळल्या मुक्ति मिळे । मिळालेपणही समूळ गळे ॥ १५ ॥
होना झाला अद्वैतभाव । पूर्ण सुखाचा हाचि ठाव ॥ १६ ॥
रानांत जावें हा हट । कोठेंना त्याचें मन नाहीं घट ॥ १७ ॥
मन घट झाल्या गांव बरा । दुःखाच्या हवया लागती पोरा ॥ १८ ॥
दुःख तिळभरी सोसेना । चाल रानांत नको देऊं वेणा ॥ १९ ॥
रानांत जाउनि काय करावें । पोटापुरतें गांवांत यावें ॥ २० ॥
गांवचे लोक करितील उपहास । खालीं पाहुनि मागावा घांस ॥ २१ ॥
घांस न मिळे तरी पडतील उपवास । सोशीत जावे होउनि उदास ॥ २२ ॥
उदास जाहल्यावर होईल बोध । रात्रंदिवस करावा शोध ॥ २३ ॥
शोध सांगे अमृतराय । सुखस्वरूप श्रीसद्गुरूचे पाय ॥ २४ ॥

---

१. लाज, जागा.

पद ३९ वें.

या सैन्यासा काय म्हणावें ! ॥ ध्रुवपद. ॥
डोई मुंडुनि भगवें गुंडुनि । पिशवींतील द्रव्यासि गणावें ॥ या० ॥ १ ॥
भिक्षे सांगूं जातां बरवें । नित्य निमित्यासि पुसावें ॥ या०.॥ २ ॥
अमृतराय म्हणे या कपटपटूच्या । कां न म्यां तोंडांत हणावें¹ ! ॥ या० ॥३॥

पद ४० वें.

मना ! रामाचे गुण गाई ॥ ध्रुवपद. ॥
पदरजस्पर्शें गौतमजाया । पावन झाली पाहीं ॥ मना० ॥ १ ॥
भंगुनि चापा, लज्जित रावण । पर्णुनियां² वैदेही³ ॥ मना० ॥ २ ॥
मारुनि दुष्टां अमृतराय । सदा हृदयीं ध्यायी ॥ मना० ॥ ३ ॥

उपदेश.

(कटिबंध.)

संतांचा सेवक होउनि श्रीहरिलागीं भजेना ॥ ध्रुवपद. ॥

आपण असतां आत्माराम, केवळ उपनिषद विश्राम, चित्तीं चिंती नाना काम, इच्छी धनसुत आराम⁴, वितभर पोटासाठीं केवळ मांजर जैसें उंदीर देखुनि टपुनि बसुनि अति पिलगुनि करी पाऊल तैसें धनवंताचे द्वारीं केवळ हरि मानुनि निर्धारीं समान वारी मागत दीनवदन नृप सदन सधनिं निजरदन विचकितो जी महाराज अजी महाराज, अंजलिपुट जोडुनि लवुनि मिस्लित मिळुनि तैस्लिम करित परी आयुष्य सरतें बरवें हें उमजेना ॥ १

त्याला⁵ परोपरीं ये राग, शीतें कांपवी जैसा माघ, उष्णें कोपे तीव्र निदाघ, फाडूं धांवे जैसा वाघ, तेथें कठोर वाक्य कुठार सोशी कीं चित्त सेवा हेचि असोशी वाटे म्हणवुनि इलु लु लु लु लु लु लु काम पुरेना, उलु कुलु लुलु लुलु करितो अनुदिनिं हळ हळ हळ हळ समागमावरी कळकळ कळकळ हृदयीं जळ जळ जळ जळ तळमळ पोटीं वचनीं वळवळ चळ चळ धन्यासि कांपे, घरांत कोपे, वश हो झोंपे, अळसें थोपे, शरीर चापे, परि हे सोपे, गुणानुवाद हरीचे नामप्रबंध गाउनि सत्वर सार्थक कांहीं करिना ॥ २

---

१. हाणावें, मारावें. २. परिणय=विवाह. पर्णुनियां=विवाह करून. ३. सीता. ४. सकाम. ५. श्रीमंताला.

पाहतां आत्मानात्म विचारीं, केवळ सच्चित्सुख अविकारी, म्हणवी मी देही अविचारी, शरीर मळमूत्राची मोरी, येथें ममता, ठेवुनि समता, विसरे रमतां, भ्रमतां न धरी, बदरीनाथ न चिंतित केदरीं, पदरीं पाप म्हणुनि रत उदरीं, नदरी सेवुनि, सदरीं बसतो, बरवा दिसतो, ऊर्जित पुसतो, मान न होतां घडि घडि रुसतो, आधीं गुंतुनि, लटिका कुंथुनि, त्यांतचि धसतो, जीवन्मुक्तहि असोनि उगाच, भवपंकीं फसतो, अहीमुखीं दर्दुरपाशा, माजी दुराशा, योगें आमिषा, संधित जैशा, माशा कवळी, पाशाला अटकुनिही, महिशा नाशालागीं न समजे, अवकाशांतही आकाशात्म दे महेशालागुनि न भजे, पाउस उन्हांत दुःखें कण्हत, चिखलीं झडांत, वांझेपरी देखत देखत, अमोल्य जीवित वेंचे, त्यांतुनि वृत्ति कदा फिरवेना. ॥ ३

करुनियां वर्ती मान, हिंडे दारोदारीं श्वान, इच्छित चित्तीं मानापमान, विषयांलागीं करी वण वण वण वण, आस्था मनांत, धन धन धन धन, आल्यावरी करी, फण फण फण फण, चण चण चण चण वचन बोलतो, खण खण खण खण रुपये मोजितो, पालखीमध्यें बसुनि धांवतो, पालखीसवें चरणीं धांवतो, अधिक हांव तो, धरुनि, मिरवी जगीं रूप नांव तो लटंबरातें वागवुनीयां, विटंबनेनें कुटुंब पोशी, आत्मा जो अविकार मूढ बेकार, म्हणुनि हय शिकारबंद धरुनियां धांवे लग लग लग लग, न करी आचमन, आहे चैमन, परमार्थसमयीं कैंचें ध्यान, स्त्रियेचें ध्यान, आत्मविषयीं तो अंधावृत्ति, बंध्या मोहरा, देखुनि विसरे, संध्या जाहली वंध्यापासुनि, देहसंबंध्यां लागुनि गौरवी, नकळे कैकाय, होउनि पुष्कळ पैका, असोनि पैका, पैका पैका पैका पैका, हें पुराण ऐकायाला स्वस्थ बसेना, मेघःश्याम चतुर्भुज आकृति, अनस्खलित कमनीय वदे, दर्शनीय पीतपट गोपबालिका, कृष्ण कालिका, करुनि मालिका, मिरविती त्यावरी वरदानीं विधियुक्त, विष्णूचें चिंतन नित्य करिना. ४

जेणें साधे इहपरलोक, त्या त्या करीत जड जग दोख, निरसे अज्ञानादिक शोक, अंतीं भासे जैसों वोक, ऐसा प्रसादकारक, जडजनतारक, दुर्मतिमारक, अतिसुखकारक, मूर्तिमंत नंदाचा नंदन, वृंदांचा वृंदावनवासी, वृंदारकजनवृंदवंद्य, श्रीमुकुंद सुंदर, कुंदरदन, मुचकुंदवरद, परम गोविंद, शरदिंदुवदन, श्यामवर्ण सुनासिक, सुनयन, अयन जगाचें, शेषशयन तो, चित्सुख

---

१. गुंतत. २. नवा.

घन, शाश्वत, विश्वपाल, अमृतेश्वर वरदायक, नायक गावा ध्यावा हें समजेना. ॥ ५

द्वादशमासवर्णन.

(कार्तिकमासवर्णन.)

चिंतातुर राधा कामिनी । सांगे साजणी ॥ ध्रुवपद ॥
पुण्यमास सये! कार्तिक, न्हाति जनलोक, विश्व करिति आनंद ।
षड्रस पक्वान्न भोजन कृष्णाकारणें गाति नंदाचा नंद ॥
नानापरि धर्म करिती, दीप लाविती, नारींस होय आल्हाद ।
हरि माझा स्वामि हो! मथुरेसी, मी तो परदेशी, मज वाटे खेद ॥ चिंता० ॥

(श्लोक.)

परम कठिण काळीं राधिका रम्य बाळी,
चहुंकडे वनमाळी नेत्रबिंबें न्याहाळी ।
तदुपरि मृगनयनी वेधिली कामबाणीं,
विरहविकळ झाली राधिका कृष्णराणी. ॥ १

(मार्गशीर्षमासवर्णन.)

मार्गशीर्ष धन्य आयिका, न्हाति बायका, पतिसेजे पहुडती ।
नानापरि भोगविलास, अति उल्हास, सुखगोष्टी करिती ॥
परस्परें गोडी आनंदें, बहु विनोदें, कैसी उभयतां प्रीति? ।
कृष्णरायें मज त्यजिलें, कां हो! रुसले? किति करूं मीं खंती ॥ चिंता० ॥

(श्लोक.)

कमलनयन कान्हा काय झालें कळेना?
यदुपतिविरहाची वेदना साहवेना ।
लवकर हरि आणा प्राण जाईल जाणा,
टकमक बघतां कां कृष्ण शोधूनि आणा. ॥ २

(पौष्यमासवर्णन.)

पौष्यमासीं पतिवियोग गमे क्षण युग, तयाविण करमेना ।
विरहानल अति पेटला, जीव कष्टला, अंगीं दाह शमेना ॥

---

१. मदनशरहत राधेची कृष्णविरहानें बारा महिन्यांत कशी स्थिति झाली ती यांत वर्णिली आहे. २. 'विप्राकारणें' असा अन्य पाठ आहे. ३. स्त्रियांस. ४. 'मासानां मार्गशीर्षोऽहम्' असें भगवद्गीतेंत म्हटलें आहे. ५. दुःख. ६. करमेना, चैन पडेना.

दीननाथ! कां हो! कोपला, कंठ शोषला, मज निद्रा कां येना।
करुं किती दुःख साजणी! नये आझुनी, माझी करुणा कां येना! ॥ चिंता० ॥

(श्लोक.)

जळत जळत कुंडामाजि नेत्रोनि दंडा,
घळ घळ नयनाची धार तुम्ही विखंडा।
ढळ ढळ निढळाशीं घाम कोठोनि येतो!
झुळ झुळ उदकाचा पूर कोठूनि जातो! ॥ ३

(माघमासवर्णन.)

माघमास आला गे साजणी! मी वो! विरहिणी, पति नाहिं शेजेसी।
पूर्वी पापें मज घडलीं, तीं फळलीं, म्हणोनि विघडे यासी ॥
दारुण हें शीत वाजतें, मज पीडतें, कोण सांगे कृष्णासी।
तूं वो! सखी माझि जिवलगा, आणि श्रीरंगा, चरण झाडीन केशीं ॥ चिंता० ॥

(श्लोक.)

दहद दहद कुंडामाजि कोंडून दिल्हें
फणिपतिशयनानें कां मला मोकलीलें।
म्हणुनि विकळ आंगीं राधिका ते शुभांगी,
धिक धिक जिव माझा कृष्णजीच्या वियोगीं. ॥ ४

(फाल्गुनमासवर्णन.)

फाल्गुन वसंत खेळती, जन हर्षती, माझें दुःख शरीरीं।
धन्य धन्य गोष्टी आठवीं, कृष्ण भेटवीं, शेजे नाहीं मुरारी ॥
भरंवसा नाहीं या देहाचा, तरुणपणाचा, बहु झुरें अंतरीं।
हरिविण काळ जातसे, श्रम होतसे, बोले राधा सुंदरी ॥ चिंता० ॥

श्लोक.

सुरस मधुर वाजे वेणु कोठें विचारा,
विकळ मि सखियांनो! धीर नाहीं शरीरा।
तंव तिज सखि बोले, 'जो हरी वेणुनादें
त्रिभुवनमन तेव्हां मोहिलें नादछंदें.' ॥ ५

---

१. पायांवर डोकें ठेवीन—असा भाव. २. शेषशयनानें (कृष्णानें). ३. मोहिलें, लाजिलें.

(चैत्रमासवर्णन.)

चैत्र मास उष्णकाळ, हा महा ज्वाळ, मज होय जाचणी ।
जळाविण जैशि मासोळी, तैसी तळमळी, तेणें कष्टि मी मनीं ॥
विरहानल अति पेटला, जीव कष्टला, सेजे नाहीं चक्रपाणी ।
विविधोपचार करितां, न सरे हो ! व्यथा, नये कृष्ण अजुंनी. ॥ चिंता० ॥

(श्लोक.)

तळमळ करिताहे चैत्र वैशाख भारी,
हर हर सदनातें कोण आणी मुरारी ? ।
जळ जळ जिव माझा, प्राण व्याकूळ झाला,
क्षण युग, जगदीशा ! काळ हा व्यर्थ गेला. ॥ ६

(वैशाखमासवर्णन.)

वैशाख शीतळ चांदणें, देहाकारणें, बहु उपचार केले, ।
कर्पूर चंदन चर्चिलें, तेंहि सूकलें, चर्चवीलें ॥
घननीळा हेममंचकीं सेज घातली, पुष्पें रेखिलीं ।
ये ना कृष्ण,············बहु कष्टी मी झाली ॥
गोविंद सेजेसि नाहीं हो ! करूं काय हो ! कांहिं गोष्टि सूचेना ।
अखंड ध्यान हो तयाचें, स्मरण देवाचें, अजुनि आले कां ना ? ॥
सेजेसि अंतर पडलें, म्हणुनि रूसवे, कोणी प्रार्थुनी आणा ।
··· ॥ चिंता० ॥

(श्लोक.)

हृदय जळत भारी, कंचुकी शीघ्र सोडा,
लवकर सखियांनो ! कंठिंचा हार काढा ।
मदन पिडित भारी, थोर होतो उकाडा,
लवकरि मुळ[2] धाडा, कृष्ण आणा बिऱ्हाडा. ॥ ७

(ज्येष्ठमासवर्णन.)

ज्येष्ठमास प्रीय तुम्हासी विवेक मानसीं होईल कैसें कळेना ।
चातकांस आस घनाची इच्छा मनाची दुःख कैसें साहेना ॥
मेघावीण मेदिनी[3] पिकेना, आशा पुरेना, जीव कैसा धरावा ।
हरिविण शून्य झालें हो ! चैन गेलें हो ! जाउनि कृष्णासी आणा.॥ चिंता०॥

---

१. श्वास. २. आमंत्रण—बोलावणें पाठवा. ३. पृथ्वी.

(श्लोक.)

थरथर तनु कांपे पाठिशीं धीर था गे।
कळकळ करिताहे कोकिला व्यर्थ कां गे ।।
गरगर फिरताहे नेत्रबिंबेंहि दोनी,
परि हरिविण याची वासना कोण मानी ? ॥ ८

(आषाढमासवर्णन.)

आषाढ तृप्त हो मेदिनी चातकां ध्वनी आर्त पुरवी तयांची ।
मजलागीं कैसे भेटती सुख तें देती ऐसी आशा मोठी मनाची ॥
राधेची मोठी हो! अवस्था चिंती भगवंता दासी होइन त्याची ।
म्हणते श्रीरंगा भेटवीं, इच्छा पूरवीं सुख नाहीं जिवासी. ॥ चिंता० ॥

(श्लोक.)

आतां जरी हरि नये तरि शस्त्रधारा, घेउनियां तुम्हि करा मजलागीं मारा ।
ऐसा विलाप करुनी मग फार बोले, ऐकूनियां निजजना बहु त्रास झाले. ॥ ९

(श्रावणमासवर्णन.)

चिंता हो मनाची भेटि कृष्णाची होईल कैसि कळेना ।
हृदय वेधलें, श्रीहरी ! तथा सुंदरी कांहीं गोष्टि सूचेना ॥
अखंड ध्यान हो ! तयाचें स्मरण देवाचें अजुनि आले कां ना ! ।
शेजेसि अंतर पडलें म्हणूनि रूसले कोणी प्रार्थुनि आणा ॥ चिंता०

(श्लोक.)

धनधान्य सखी करिं घेई, दक्षिणा द्विजवरां बहु देई ।
ज्योतिषास पुसती सखि बा गा, कृष्णनाथ कधिं येतील सांगा. ॥ १०

(भाद्रपदमासवर्णन.)

भाद्रपदीं मोठी अवस्था, आणीं अनंता, नाना यत्न करुनी ।
तूं हो ! माझी सखि सोयरी विनंति मी करीं माये ! सांगातिणी ! ॥
ऐकूनि दूति चालली कृष्णासि बोलली विनवि जोडूनि पाणी ।
राधेची अवस्था ऐकतां कृपा अच्युता, पंक्ष्यीं आले उडोनी ॥ चिंता० ॥

(श्लोक.)

सारिका गजबजे बहु बोले, आंगणीं फिरत नाचत डोले ।
वामनेत्र सखि कां लवतो गे, प्राणनाथ कधिं येतिल सांगें ? ॥ ११

---

१. इच्छा. २. ब्राह्मणां. ३. निरोप नेणारी स्त्री. ४. हात. ५. पक्ष्यावरून, गरुडावरून.
६. डावा डोळा. स्त्रियांना डावा डोळा लवणें हें शुभ चिन्ह आहे.

(आश्विनमासवर्णन.)

आश्विनीं नवरात्र आनंद, आले गोविंद, फार उत्साह झाला ।
चांफेल मर्दुनि षड्मार्जनें कृष्णाकारणें आरत्या ओंवाळिल्या ॥
भोजन सारुनि एकांतीं सुखें नीजती, राधा मनीं निवाली ।
अनाथ मी हरिनायिका, बोले त्र्यंबका, ऐसें········विश्वा कळलें. ॥ चिंता० ॥

(श्लोक.)

हृदय जळत होतें साजणी शांत झालें,
सरस वदन चुंबें आंग माझें निवालें ।
हरिकर सखि बाई लागतां आजि आंगा,
तनु मन धन तेंही सर्व आलें उपेगा. ॥ १२

(अधिकमासवर्णन.)

अधिकमासीं बहु सोहाळा बोलसी बाळा कृपाळा ।
कृपा आली कृष्णासी येऊनियां राधा भोगिली, मनिं तोषला ॥
महाल्हाद झाला नाना प्रकारचीं वायनें विप्राकारणें ।
देत राधा सुंदरी, हर्षयुक्त राधा कामिनी सांगे साजणी. ॥ चिंता० ॥

(श्लोक.)

अधिकमास सखे गे ! हीत माझें पुरे ना
क्षणभरि सखि बाई स्वामी सन्निध आणां ।
घडि घडि सखि बाई पाहतां तृप्ति हो ना
ह्मणत अमृत हेंची वासना सांठवेनी. ॥

अविनाशसंदेहहरण.

(ओव्या.)

जय जय जगन्नाथा । तूं एक दाता अनंता आनंता । एकाएकीं ऐसे पाहतां । तोचि पाहणें. ॥ १ ॥ आतां नमूं ते शारदा । जे आदिशक्ति महाराजा । ब्रह्मतनया आदिबीजा । हंसवाहिनी. ॥ २ ॥ मग नमूं महासद्गुरु ।

१. या प्रकरणाच्या दुसऱ्या प्रतींत 'अधिकमासवर्णन' नसून 'आश्विनमासवर्णना'चा शेवटील श्लोक असा आहे:—

बहुतचि सुख झालें अच्युतें भेट दिल्ही
तळमळ विरहाची पातकें सर्व गेलीं ।
सुदिन उगवला हा कृष्ण सेजेशि आला,
अमृत चरित वर्णी तत्पदीं लीन झाला. ॥

जो करी प्रपंचाचा संहारु । जयाचे रूपें निर्धारु । कलश रूपाचा. ॥ ३ ॥ ऐसिया सद्गुरूसी शरण । व्हावें कायावाचामन । मग निर्धारें प्रसन्न होऊन । दाखवी स्वरूप. ॥ ४ ॥ हा अवतार यादववंशीं । विश्वरूपा दाविलें अर्जुनाशीं । तैसेंच आदरें उद्धवाशीं । दाविलें स्वरूप. ॥ ५ ॥ येणेंच रीती पार्वतीप्रती । उपदेश केला पशुपती । आपुली दाविली स्वरूपस्थिती । हिमनगतनयेसी. ॥ ६ ॥ ऋषिवर्या ते शिरोमणी । जो वसिष्ठ महामुनी । तेणें दाशरथीलागोनि । बोधविलें. ॥ ७ ॥ ऐसेंच जी कपिलेश्वरें । ऋषिसिद्धाप्रति आदरें । स्वरूप दाविलें साचोकारें । निर्धारेंसी. ॥ ८ ॥ सूतें शौनकादिकांप्रति । स्वरूप दाविलें स्वस्थिती । हेचि युगीं हेचि प्राप्ती । गुरुप्रसादें. ॥ ९ ॥ ऐसा हा सद्गुरुनाथ । पाहतां पाहावे तो समर्थ । हाची धरूं निश्चयार्थ । निजमानसीं. ॥ १० ॥ सद्गुरूशीं घालूं दंडवत । माझा प्रश्न तो पुरविता समर्थ । मज करूनि कृतकृत्यार्थ । तारावें जी ! ॥ ११ ॥ पांच अवस्था बोलिला वेद । हाची अर्थ वेद उपनिषद । शब्दींच दावी निःशब्द । हा ऐसा पैं. ॥ १२ ॥ अहो ! गुरुवर्यशिराणी । अवस्थाचे वर्णव्यक्ति दावा नयनपणीं । स्थानमात्रा कृपा करूनि । सांगा स्वामी ! ॥ १३ ॥ मग म्हणे श्रीगुरुनाथ, । 'बरवा प्रश्न केला समर्थ । तरी दावीन स्वरूप सत्य । निर्धारेंसी. ॥ १४ ॥ जागृति रक्तवर्ण औट हात । ऋग्वेद आकारमात्रा नेमस्त । स्थूळदेह हे समस्त । जाणावें तुवां. ॥ १५ ॥ स्वप्नावस्था श्वेतवर्ण । यजुर्वेद अंगुष्ठपर्ण प्रमाण । उकारमात्रा देह सूक्ष्म जाण । प्रत्यक्ष पैं. ॥ १६ ॥ सुषुप्ति अवस्था कृष्णवर्ण । सामवेद पर्वार्धप्रमाण । मकारमात्रा देह कारण । जाणिजे ऐसें. ॥ १७ ॥ तुर्या अवस्था नीळवर्ण । अथर्वणवेद मसुराप्रमाण । ईकारमात्रा देह महाकारण । देह ओळखे. ॥ १८ ॥ उन्मनी अवस्था पीतवर्ण । सूक्ष्मवेद ज्योतीरूप प्रमाण । ॐकारमात्रा व्यापक देह निर्वाण । एवं प्रणवपिंड. ॥ १९ ॥ ऐसा हा पंचांग प्रणवें । हाची वेदाधार अनुभवें । सच्चिदानंद स्वरूप जाणावें । सद्गुरुखुण. ॥ २० ॥ हाचि होय ऐसा निर्धारू । पार्था सांगे शार्ङ्गधरू । जो हा स्वरूप प्रकारू । लेवविला जी ! ॥ २१ ॥ परी काय सांगू नवल थोर । प्रसन्न होउनि कपिलेश्वर । ऋषिसिद्धा अनुग्रह सार । सांगे दश देह. ॥ २२ ॥ हें देखणें परम अवघडें । ज्यावरी सद्गुरुकृपा घडे । तरीच उकलेल हें कोडें । इतरां का नेडे तुमजेची. ॥ २३ ॥

---

१. आंगठ्याच्या पेराएवढा. २. न उकले.

मागें सांगितला विस्तार । पंचमुखें प्रणवप्रकार । सावध श्रोता होऊनि सादर । परिसीजे. ॥ २४ ॥ स्थूळ सूक्ष्म कारण महाकारण । हे चार देह झाले संपूर्ण । पांचवें व्यापक देह असे जाण । निजमानसीं. ॥ २५ ॥ आतां हेतुदेह सहावें । हेतु अवस्था जाणावें । अंगुष्ठपर्वप्रमाण ओळखावें । हृदयस्थानीं. ॥ २६ ॥ तेथिंची काय सांगूं शोभा । ज्योतिःस्वरूप पूर्णप्रभा । सद्गुरुवाक्य अमृतगर्भा । हाचि हा घनदाट. ॥ २७ ॥ याचे पाहतां स्थानक । पहातया पाहते हेची कौतुक । अनुभव पाहतां अलौकिक । वाटे परम. ॥ २८ ॥ पुढें सांगूं देह सातवें । निर्हेतु ऐसें जाणावें । निर्हेतुअवस्था स्वभावें । जाणिजे पैं. ॥ २९ ॥ देखणा गगनीं पूर्ण जळ । भरलें दिसे निर्मळ । अर्ध ज्योति केवळ । प्रमाण अनुअर्ध. ॥ ३० ॥ सांगूं उल्लेखदेह आठवें । उल्लेखअवस्था ऐसें जाणावें । स्वप्रकाशरूपीं भरावें । सोज्वळ शोभा. ॥ ३१ ॥ नववें देह अनुलेख । अवस्था देख । चतुर्थासी अनुओळख । प्रमाण ऐसें. ॥ ३२ ॥ या चतुर्थ अंशाभीतरी । शिखा दिसे अतिसुंदरी । तयेमध्यें स्वरूप झळस झळ करी । दिसे प्रत्यक्ष पैं. ॥ ३३ ॥ अखा नवाचें जालें बोलणें । परम सखोल गहन । सांगूं दाहवें परिपूर्ण । शून्यची होय. ॥ ३४ ॥ नवपर्यंत नवखंड । दाहावें काशी खंड । विश्वेश्वर हा प्रचंड । असे तेथें. ॥ ३५ ॥ तया नांव विश्वनाथ । नेत्राग्नि असे निश्चयार्थ । सद्गुरु भेटेल समर्थ । तरीच हे अकळे. ॥ ३६ ॥ या महाशून्याचा प्रकाशक । अकरावा श्रीगुरु ओळख । एकापुढें एक निष्टंक । ऐसा निष्कळंक शोभला. ॥ ३७ ॥ कोटिसूर्यांची एक प्रभा । की रत्नकीळीची दिसे शोभा । लखलखीत नयनगर्भा । माजी भरला असे. ॥ ३८ ॥ हाचि अंतरीं तोचि बाहेरी । जैसा चंद्रसूर्यांचिया हारी । व्यापिला दिसे चराचरीं । राजहंसापरि जैसा. ॥ ३९ ॥ हाची डोळां पाहतां । हाची श्रोत्रीं परिसतां । खपुष्पहि तत्वतां । तोच कीं. ॥ ४० ॥ ऐसा देखणा श्रीगुरुदेवो । नासाग्रीं असे ऐसा वो । डोळां दिसे पाहा वो । स्वतः सिद्ध. ॥ ४१ ॥ ऐसें पाहाणें डोळियांसी । त्या माजी जो समरसी । पाहाता पहाणें घडे यासी । नयनाचा नयन होऊनि ठाके. ॥ ४२ ॥ जो नयनाचा नयन होय । आंत बाहेर तोची पाहे । परिपूर्ण भरूनि ठाय । देखणा होय निजांगें. ॥ ४३ ॥ चळ नसे तें अचळ । मळ नसे तें निर्मळ । परम सोज्वळ । दिसे वो ! हा. ॥ ४४ ॥ शुद्ध जैसो स्फटिक शिळा । चंद्रकांति प्रभा अगळा । ऐसा हा लखलखिला सोज्वळा । तेजोमय. ॥ ४५ ॥ सूर्यकोटिप्रकाश एकवटला । कीं चंद्रकोटिप्रकाश फांकला । ऐसा शुभ्र तेजें

शोभला । तेजोराशी. ॥ ४६ ॥ सकळ तेजें एका सरसीं । केलिया होय तेजोराशी । ऐसीया परब्रह्म मूर्तीसी । धरी प्राणेसी निजभावें. ॥४७॥ तोची सच्चिदानंद सर्वांगीं । व्याप्त असोनियां जगीं । न दिसे अज्ञान दृष्टीलागीं । ज्ञानयोगियां दृश्य होय. ॥ ४८ ॥ सद् म्हणजे अस्ति आहे । चिदत्वें भ्रांति भास पाहे । आनंद हा प्रेम लाहे । सच्चिदानंद पाहे निजात्मा. ॥४९॥ जैं सद्गुरूची होय भेटी । त्याचिये चरणीं पडे मिठी । तैं सच्चिदानंद त्रिपुटी । ज्ञानदृष्टि दृश्य होय. ॥५०॥ अहं सदत्वें जीव बोले । सोहं चिदत्वें शिव चाले । आनंद ऐकस्वलीळें । अखिल खेळे डोळां पाहा. ॥ ५१ ॥ ऐसा सच्चिदानंद प्रकाश डोळां । तेणें प्रकाशे सृष्टीस कळा । ज्ञानदृष्टी होय उजळा । गुरुकृपाळु देखोनियां. ॥ ५२ ॥ देह अहंतेजो भुलला । माया ममतेनें व्यापिला । अज्ञान पडदे सांकोळला । जवळी ओळखिला नव जाये. ॥ ५३ ॥ जैसा सूर्य माध्यान्हासी येतां । किरणें दृष्टी न पाहवे सर्वथा । तेंवी आत्मसूर्य प्रकाशतां । न दिसे तत्वता अज्ञान दृष्टी. ॥ ५४ ॥ या अज्ञानासीहि गुरु भेटे । डोळां झांकोनियां बोटें, । आत्मसूर्य दावी नेहटे । कृपाळु सदय सद्गुरुराव. ॥ ५५ ॥ अज्ञान चर्म दृष्टीसी । आच्छादूनि निज करासी । ज्ञान दृष्टी स्वयं प्रकाशी । देखे भानूसी प्रत्यक्ष. ॥५६॥ डोळा नसतांहि पाहणें । श्रवण नसतां ऐकणें । घ्राण नसतां सुगंध घेणें । जिव्हेविणें रस चाखे. ॥ ५७ ॥ चरणाविण चालणें । हस्ताविण घेणें देणें । गुदेंविण मळ विसर्जन करणें । रतीविण भोगणें भोग. ॥५८॥ ऐसा अनुभव न जाणतां । वृथा करिती इंद्रियांची वार्ता । जो तयाचा अधिष्ठिता । तो सहज तत्वता निजात्मा. ॥ ५९ ॥ तरी ऐसें जें कां लक्षण । तें सहज जाणावें विचक्षण । गर्भाधाचें जेंवि पाहणें । केलें खंडण या शब्दें. ॥ ६० ॥ नाश झाला म्हणे डोळा । तरी डोळा राहे तो निराळा । दश दिशा प्रकाश कळा । तया डोळा प्रगट दिसे. ॥ ६१ ॥ तो निज डोळा अविनाश । तया कैसा असे नाश । संशय न धरावा निःशेष । धरावा विश्वास सद्बुद्धि. ॥ ६२ ॥ पर्वतमस्तकीं पडती वज्रें । तेणें छिन्न विच्छिन्न होती गात्रें । तेंवि महावाक्य वज्र शस्त्रें । छेदा संशय दुर्बुद्धि. ॥ ६३ ॥ ऐसीया प्राप्तीकारणें । करिती हटयोग साधनें । परि नकळे निधान । जवळीं असतां. ॥ ६४ ॥ एक कलवरि ऊर्ध्वगती । आत्मा ब्रह्मांडासी नेती । ऐसे समाधिस्थ होती । हटयोगी जे. ॥ ६५ ॥ नानापरीचे अभ्यास । करितां कष्ट होय बहुवस । तैसें नोव्हे या मार्गास । राजयोग अति सोपा. ॥ ६६ ॥ गुरुपदीं टेऊनि विश्वास । भोगावा हा योग राजस । प्रपंच होय परब्रह्मास । न लगतां तत्क्षणें. ॥ ६७ ॥

राजयोग श्रवण होय । राजयोग डोळां पाहे । राजयोग सुगंध वाहे । घ्राणामाजी राहे निरंतर. ॥ ६८ ॥ माझिया डोळां सद्गुरु । अखंड असे स्थिरु । जेणें हा विश्वंभरु । विश्वाकार दिसे पैं. ॥ ६९ ॥ कृतकृतार्थ जी ! दयाळा ! । अगाध पूर्ण तुमची लीळा । अहंभाव आमचा गळाला । दीन-दयाळा गुरुवर्या ! ॥ ७० ॥ जयजयाजि जगदादिकंदा । जयजयाजी अलक्ष-भेदा । जयजयाजी निजबोधा । सच्चिदानंदा गुरुवर्या. ॥ ७१ ॥ जयजयाजी परात्परा । परमपुरुषा दिगंबरा । परमानंदपरिकरा । नाहीं पारा तुझिया. ॥ ७२ ॥ सद्गुरु ! तूं आम्हांसी । प्रसन्न झालासी प्रबोधासी । हारूनि आमुच्या जिवासी । स्वानंदपदासी दीधलें. ॥ ७३ ॥ नवल सद्गुरूनें केलें । माझें अ-ज्ञानत्व हारिलें । ऐसें हें स्वरूप दाविलें । निजडोळा. ॥ ७४ ॥ हृदयीं ज्योति स्थिर । प्रत्यक्ष होय दृष्टिगोचर । पद्मगर्भीं पाहे नर । तो मुक्त निर्धारें संशय नाहीं. ॥ ७५ ॥ नेत्र पद्मगर्भ पोटीं । ज्योति प्रत्यक्ष दिसे दृष्टी । ते हृदय-स्थानसंपुटि पाहे स्वानंद पोटी । तोचि मुक्त. ॥ ७६ ॥ स्वामिचे प्रसादें-करून । आम्हा झालें आत्मज्ञान । साक्षात्कारें स्वरूपदर्शन । तुमचे नयनें देखिलें. ॥ ७७ ॥ अनिर्वाच्य स्वरूप जाण । ते अनुभविली निजखूण । अ-गाध कृपा तुमची पूर्ण । आत्मा देखियला नयनीं. ॥ ७८ ॥ आतां असो हा अनुभवप्रकार । परंपरा सांगों जी निधार । शृंगेरीमठ साचार । तेथें अधिष्ठान सरस्वती. ॥ ७९ ॥ तोचि सांप्रदाय माधवसरस्वती । वास गोदातीरनाभी-तीर्थीं । असतां अनुग्रह प्राप्ती । विठ्ठलसरस्वतीसी. ॥ ८० ॥ मग तयाचा उपदेश । प्राप्त अंबिकासरस्वतीस । तयाचा अभयकर अमृतास । असे सत्य. ॥ ८१ ॥ श्रोता करील अनुमान । म्हणेल पिढ्या सात नसेल पूर्ण । तरी साक्षेप केलें कथन । क्षमा संतीं मज कीजे. ॥ ८२ ॥ तरी पुन्हां सांगों साचार । जे परंपरा असे पूर्वापार । तेची सांगूं जी गंभीर । ऐकतां कर्णीं मन निवे. ॥ ८३ ॥ आदिगुरु श्रीउमापती । तेथून विष्णु उत्पत्ति । तया प्र-जापती । शिष्य होय. ॥ ८४ ॥ यापासोन वसिष्ठमुनीश्वर । तेथूनियां पारा-शर । याचा अभयकर । श्रीव्यासदेवासी ॥ ८५ ॥ व्यासापासून शुकदेव । तेथून गौडपादा उगव । मग शंकराचार्य । वैभव प्रगटलें. ॥ ८६ ॥

---

१. 'शके १७७१ सौम्यनाम संवत्सरे ऊर्फ वैशाख वद्य ३० रोज सोमवार' असा लेख-काचा समाप्तिलेख आहे.

परिशिष्टें.

(१)

अमृतरायकृत कवितेंतील जास्त मजकूर.

कडवें.	ओळ.	
		ध्रुवचरित्र. (पृष्ठ ३–१४.)
४	९	'जाई रे वेगीं' यापुढें 'वनाला' असें पाहिजे.
११	१२	'वदुनि' यापुढें 'अशेषदु:ख हरुनि' असें पाहिजे.
		शुकचरित्र. (पृष्ठ १४–२९.)
१	१९	'श्रीहरिला' या पाठिमागें 'भावार्थानें' असें पाहिजे.
२	५	'कर्म फळे' यापुढें 'वर्म तयाचे फळ' असें पाहिजे.
३	७	'हा बाजार' यापुढें 'फिरता त्याला' असें पाहिजे.
६	११	'शब्दें' यापुढें 'ऐसा द्विजाप्रति विनवी' असें पाहिजे.
८	२१	'करीन वेडा' यापुढें 'मोडा चिंता हरीन पीडा' असें पाहिजे.
९	११	'भूषणें' यापुढें 'देति दूषणें' असें पाहिजे.
,,	२५	'भरजरी' यापुढें 'धऱ्या निर्जरी, नेसूं रंगभाळी केशर' असें पाहिजे.
१०	१२	'पाट जळाचे' यापुढें 'माट, गहन त्या पाट' असें पाहिजे.
१३	९	'कृष्णहि भोळा' यापुढें 'आणखी गौळणींचा चाळा' असें पाहिजे.
,,	१२	'डोळे लावुनी' यापुढें 'पाषाणातें दडता खाळें' असें पाहिजे.
१५	१६	'येउनि' यापुढें 'अधो' असें पाहिजे.
१६	१७	'मांबाहूनी' यापुढें 'उदास होऊनि' असें पाहिजे.
,,	२४	'विषधमदनीं' यापुढें 'लज्जित तथापि आर्जवानें' असें पाहिजे.
,,	,,	'लोलो म्हणतां' यापुढें 'कशि निष्ठुर बोले, स्वामी आम्ही श्वानें तुमची, मू मू म्हणतां' असें पाहिजे.
,,	३१	'ऐसी रंभा' यापुढें 'करुणारुपें' असें पाहिजे.
		गोचरण. (पृष्ठ ५८–६१.)
२	५	'भवगाळ वाळवुनि' यापुढें 'बाळ वाढतो' असें पाहिजे.
,,	८	'टाळ वाजविति' यापुढें 'काहाळ विठ्ठल न्याहाळिती' असें पाहिजे.
३	१	'बिंदु निगाळे कनकचवाळे' यापुढें 'पाटिसि स्कंध महा मामाळें' असें पाहिजे.
,,	२	'पदरज लागतांचि अघ क्षाळे' यापुढें 'सुरभिक्ति' असें पाहिजे.
,,	३	'त्यांत कोणी काळ्या' यापुढें 'कोणी पिवळ्या अरुणा दवळ्या' असें पाहिजे.
,,	४	'सावळ्या हरिनें' यापुढें 'पोंवळ्या समान कोंवळ्या अधरें' असें पाहिजे.
,,	५	'कवळ मुखांतचि' यापुढें 'केवळ विवशश्रुतियुगुल उभारुनि उतावीळपणें' असें पाहिजे.
,,	,,	'टवकारुनिया, तिला मेघावें' यापुढें 'गोचिड काढुनि' असें पाहिजे.
,,	,,	'तिला मेचावें, खाजवावें' यापुढें 'लाड देउनि' असें पाहिजे.
,,	६	'पहावें' यापुढें 'लेकुरवाळें' असें पाहिजे.

कडवें.	ओळ.	
३	७	'कृपाकटाक्षें बरवें पाहावें' यापुढें 'प्रदक्षणुनियां नमन करावें भोंवतें भोंवतें उगे फिरावें स्वच्छ पुच्छ तें शिरीं फिरवावें' असें पाहिजे.
,,	९	'नारदे! ये' यापुढें 'हिरण्ये! ये, प्रल्हादे! ये, हनुमंते! ये' असें पाहिजे.
,,	,,	'गंगे! ये' यापुढें 'गांगेये! ये, यमुने! ये, सरस्वती! ये' असें पाहिजे.
,,	१०	'कृष्णे ये' यापुढें 'पायोष्टी! ये, क्षीरसागरी! ये, 'कालिंदि! ये, देवकीये! ये, अंबिके! ये, काळिके! ये' असें पाहिजे.
,,	१२	'प्रत्यक्ष पाहातो विठ्ठल' यापुढें 'अमुचा समान चरणीं उभा राहिला कर ठेउनि' असें पाहिजे.
४	१०	'भवधंदा मोकळिला' यापुढें 'हरि आकळिला' असें पाहिजे.
,,	१४	'पुसूनि टिरि कक्षेला' यापुढें 'उष्टें ताट धरुनि कक्षेला' असें पाहिजे.
,,	२१	'ग्रास मांडिला' यापुढें 'वरद पाणि प्रीतिनें चाटिला' असें पाहिजे.
,,	४१	'लाजविला' यापुढें 'कामिनीमनीं स्मर माजवला, व्रजस्त्रियांचा समाज वरिला' असें पाहिजे.
,,	४२	'शंखचूड खळ धरा सीधला' यापुढें 'मणि हरुनि हलधरासि दिधला' असें पाहिजे.
,,	४३	'दिव्यदेह तेणें पाठविला' यापुढें 'सुदर्शनत्वें नरी पाठविला अहिग्रस्त नंदही सोडविला' असें पाहिजे.
,,	४६	'अमृतवरदकर, वरधरसुंदर' यापुढें 'हरि अति सुंदर' असें पाहिजे.
,,	४७	'गोकुळांत असल्या बसल्या' यापुढें 'अहर्निशीं' असें पाहिजे.
,,	,,	'दुष्ट दैत्य निर्दाळुनि' यापुढें 'आधीं' असें पाहिजे.

अमृतरायकृत कवितेंतील पाठभेद.

कडवें.	ओळ.	मूळपाठ.	पाठभेद.
		ध्रुवचरित्र. (पृष्ठ ३–१४.)	
६	४	साकर	नावद
११	९	ध्याल	ध्याल
		शुकचरित्र. (१४–२९)	
१	४	अतिप्रकर्षें	अतिनिकर्षें
,,	८	तळतळ	तळमळ
,,	१३	फोडिन कर्माचीं हि कपाटें	तोडिन कर्मांचि हीं किचाटें
,,	१४	उत्पाटिन	उघडिन
,,	१८	पडवीता	बोलवीता
२	८	पाध्या	साध्या
३	१	भूतद्रोहानें	भूतद्रवानें
,,	२	दुष्ट जन्म घे उपद्रवानें	छळितां साधु उपद्रवानें
,,	५	झांकुनि	बांधुनि
,,	१४	वस्तुचा	कुत्तीचा
५	६	निसटला	निष्टला
६	४	न घडे जन्म तों तत्क्षणातें	निघे जन्मतां ते क्षणातें
,,	९	चळचळ	चंचळ
,,	२०	नको रे!	न करीं रे!
,,	२१	सत्व	तत्त्व
,,	२७	आत्म्याला	आम्हांला
९	१५	उजळे तनु ते	उज्वल तनु वरि
,,	३३	पात्रे	पवित्र
१०	१६	हरूं पहाती	हलवूं पहाती.
१२	४	दृष्टी	चेष्टी
,,	९	दूर	सादर
,,	२०	पथा	यथार्थ
		गोचरण. (पृष्ठ ५८–६१.)	
४	४	यमविला	खेळविला
,,	९	पोंसिला	पुसिला
,,	१७	बोधिला	बोलाविला
,,	२७	यमलार्जुन	विमलार्जुन
,,	४२	खळ धरा मारिला	खळ दुर्धर वधिला
,,	४४	त्याना	बाणा
श्लोक.	चरण.	**श्लोक.** (पृष्ठ ९७ वे.)	
२	४	गंगातिरीं झोंपडी	गोदातिरीं टेकडी.

अमृतरायकृत कवितेवर आणखी टीपा.

कडवें.

गणपतिवर्णन. (पृष्ठ १–२)

१ अळि–भ्रमर, भुंगा.
चंद्रखंडधर–शिव.
विपक्ष–शत्रु.
२ करवाल–तरवार.
३ सुमन–पुष्प.
अवसान–संहार.
वारण–हत्ती.
चारण–भाट, स्तुतिपाठक.
आगम–शास्त्र.

जगदंबावर्णन. (पृष्ठ २–३)

१ कृपापांग–कृपावलोकन, कृपाकटाक्ष.
किसलय–कोमल पल्लव.
सुरविटप–कल्पवृक्ष.
वनिता–स्त्री.
२ भालचंद्र–शिव.
सुरसरिता–देवनदी, गंगा.
३ रजतनग–सुवर्णपर्वत.
इभ–गज, हत्ती.
इभी–हत्तीण.
चौंर डौल–हत्तीवर अंबारीसारखें बसावयाचें वितानयुक्त आसन.

ध्रुवचरित्र. (पृष्ठ ३–१४)

१ आयुर्दाय–जीविताचा भाग.
वायस–कावळा.
अंतराय–अडचण.
बोभाय–हांक मारी.
प्रत्यवाय–अडचण.

कडवें.

२ भा–कांति (मुखाची).
अवदान–एके आहूतीस पुरायाजोगें होमद्रव्य.
विंदाण–कौशल्य, विज्ञान, कळसूत्र.
३ कोकनद–तांबडें कमळ, कमोद पुष्प.
श्रुति–वेद.
धिवसा–धैर्य, हव्यास, इच्छा.
४ दुरित–पाप.
घटल–कमी होईल.
निगमोदधी–वेदसागर.
रति–भक्ति, प्रेम, अनुराग.
५ अलोल–निश्चळ, स्थिर.
आंदोलताति–सकंप, अस्थिर होती.
फोल–व्यर्थ, निष्फळ.
६ वाडेकोडें–कौतुकानें, आवडीनें.
दिठी–नयनीं.
७ परमहंस–संन्यासी, योगी.
षोडशोपचारें–सोळा उपचारांनीं (प्रकारांनीं). आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, वस्त्र, यज्ञोपवीत, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, प्रदक्षिणा, नमस्कार व पुष्पांजलि.
अष्टमूर्ति–शंकर.
विग्रह–शरीर.
ईषत्–अल्प. (इवलासा.)
वनमाला–पायघोळ लोंबणारी व कधी

कडवें.

न म्लान होणारी अशी कृष्णाच्या गळ्यांतील पुष्पमाळा.

शनैःशनैः—हळू हळू.

प्रणव—ओंकार.

द्वादशाक्षर—'ओं नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र.

चामीकर—सोनें.

देशिक—गुरु, शिक्षक.

८ दुकूल—पातळ वस्त्र.

तूल—कापूस.

९ मृणाल—कमळाचा देंठ.

तरुत्वचा—वल्कल.

नग—पर्वत.

अग—वृक्ष.

भगण—तारासमूह.

१० अधुना—सांप्रत.

परिणालिका—परंपरा.

सूकर—डुकर.

११ तरुणतरणि—बालसूर्य.

१२ सप्तऋषि—मरीचि, अत्रि, आंगिरस्, पुलस्त्य, पुलह, क्रतु आणि वसिष्ठ असे सात तारे आकाशांत दृष्टिगोचर होतात ते.

१४ पाद्य—पादक्षालन करण्याचें उदक.

अर्घ्य—पूजाद्रव्य (चंदन, पुष्प, अक्षता, इत्यादि.)

मधुपर्क—विवाहसमयीं वर वधूच्या द्वारीं आला असतां अथवा मुनि, राजा, विप्र यांसारखा कोणी वंद्य पुरुष आला असतां, पादप्रक्षालनादि करून मध, तूप आणि दहीं हीं मिश्रित करून त्यास समर्पून गंध, वस्त्र इत्यादिकांनीं त्या वराची अथवा पुरुषाची पूजा करणें, या विधीला 'मधुपर्क' म्हणतात.

१५ कसे—बंध.

वातक—बातमीदार.

जातरूप— } सोनें, सुवर्ण.
कार्तस्वर— }

१६ समरस—एकरस, ब्रह्मानंद.

१७ प्रतीकार—निवारण, निवारणाचा उपाय.

वसुमतीचें—पृथ्वीचें.

यत्करोषि—जें करतोस.

यदश्नासि—जें खातोस. [भगवद्गीता. अध्याय ९ श्लोक २७ पहा. 'यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्। यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥' याचा भावार्थ—हे अर्जुना! जें कांहीं करतोस, जें खातोस, जें हवन करतोस, जें देतोस, जें तप आचरितोस, तें सर्व मला अर्पण होवो अशा बुद्धीनें करीत जा.

चामीकर—सोनें.

दांत—हस्तिदंताचें.

वैदूर्य—रत्नविशेष.

सोपान—पायरी, शिडी.

सौध—मंदिर.

रातला—रममाण झाला.

पार्षद—सेवक, देवाचा गण.

१८ सव्य—डावा. (येथें दक्षिण असें समजावें)

वेंघला—चढला.

१९ मातुकें—खाद्यें, भक्ष्यें.

न भूतो न भविष्यति—झालें नाहीं व होणार नाहीं.

गरिमा—गरिमन्, गुरुता, मोठेपणा.

कडवें.

शुकचरित्र. (पृष्ठ १४–१९.)

१ ताप–त्रिविध ताप. आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक असे त्रिविध ताप.

सोहं सोहं–प्राणी गर्भांत असतो तोंपर्यंत 'सोहं' म्हणजे मी ईश्वर आहें असें म्हणतो, जन्मास आला म्हणजे 'कोहं' म्हणजे मी कोण आहे असें म्हणतो आणि पुढें मोठा होऊन समजूं लागलें म्हणजे 'अहं' म्हणजे मीच काय तो असें म्हणतो. म्हणजे देवास विसरतो. (नवनीत पृ० ३७४.)

हव्यास–इच्छा.

२ उलीसा–इवलासा. (संस्कृत–ईषत्).

चौऱ्यांशी पेणें–चौऱ्यांशी मुक्कामाचीं स्थळें–चौऱ्यांशी योनी–२० लक्ष वृक्षयोनी, ११ लक्ष कीटकयोनी, ३० लक्ष पशुयोनी, ९ लक्ष जलचरयोनी, १० लक्ष पक्षीयोनी, ४ लक्ष मनुष्ययोनी मिळून एकंदर चौऱ्यांशी लक्ष योनी.

काया–शरीराला.

मूषक–उंदीर.

३ जोजार–त्रास, कंटाळा.

कारागार–तुरुंग, बंदिखाना.

४ गोरस–गाईचें दूध.

पंचयज्ञ–पंचमहायज्ञ–ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ आणि मनुष्ययज्ञ असे पांच यज्ञ. 'अध्यापनं ब्रह्मयज्ञः पितृयज्ञस्तु तर्पणम् । होमो दैवबलिर्भौतो नृयज्ञोऽतिथिपूजनम् ॥' अर्थ–वेदाध्यापन अथवा वेदाध्ययन यास **ब्रह्मयज्ञ**, अन्नोदकानें तर्पण करण्यास **पितृयज्ञ**, अग्नीचे ठायीं जो होम त्यास **देवयज्ञ**, भूतबलीस **भूतयज्ञ** व अतिथीच्या पूजनास **मनुष्ययज्ञ** अशा संज्ञा आहेत. 'पंचैतान्यो महायज्ञान्नहापयति शक्तितः । स गृहेऽपि वसन्नित्यं सूनादोषैर्न लिप्यते ॥' जो यथाशक्ति नित्य नेमानें हे पंचमहायज्ञ आचरण करितो तो गृहस्थाश्रमांत राहून देखील पंचसूना दोषापासून अलिप्त असतो. [मनुस्मृति–अध्याय ३ श्लोक ७०–७१].

६ सांकडें–संकट.

विवरुनी–विचार करून.

गिरेनें–वाणीनें.

७ योगासन–योगाभ्यास करण्यासाठीं बसण्याचें योग्याचें आसन.

जीवन्मुक्त–वेदांतवेत्ता, ब्रह्मज्ञानी.

८ सुकृत–पुण्य.

चेववीले–चेव आणिला, आसक्त केले, सचेतन केले, जागृत केले.

अंभोदधिजा–सागरोत्पन्न.

कडासन–चर्मासन, कटासन.

९ चंद्री–तंद्रा.

चकोर–पक्षिविशेष. हा पक्षी चंद्राच्या किरणांतून स्रवणारें अमृत सेवून उपजीवन करतो, अशी कविप्रसिद्धि आहे.

शचीपति–इंद्र.

निशा–रात्रि.

१० चोहाटे–चव्हाटे.

विवशी–जखीण.

अक्षकपाटें–नेत्रकपाटें.

कडवें.

११ गोमटी–सुंदरी.

निग्रह–शासन, दंड.

पिंगा–पिंगरा, खेळ.

अनुग्रह–प्रसाद, कृपा.

१२ अकांबर्वाली–विवर्ण, फिक्की.

धमार्वे–घुमावें.

घ्राण–नाक.

१३ सोळा महस्र–प्राग्ज्योतिषपुरचा राजा भौमासुर यानें सोळा हजार जमविलेल्या राजकन्या कृष्णानें द्वारकेस आणून त्यांशीं विवाह केला–अशी कथा आहे.

१४ उदंड–पुष्कळ.

शशांक–चंद्र.

चाट–चाटु, मनोहर.

१५ साष्टांग प्रणिपात–साष्टांगवंदन, 'जानुभ्यां च तथा पद्भ्यां पाणिभ्यामुरसा धिया । शिरसा वचसा दृष्ट्या प्रणामोऽष्टांग ईरितः ॥' अर्थ–दोन पाय, दोन हात, दोन गुडघे, भाळ, वाचा, नेत्र, उर आणि बुद्धि, या अंगांनीं केलेला नमस्कार.

१ निर्जरी–अमरी.

१६ अचंबा–आश्चर्य.

पंकजनयनी–कमलेक्षणा.

वैकुंठीं–विष्णूच्या निवासस्थानीं.

सुदामचरित्र. (पृष्ठ २९–३६.)

२ वामा–स्त्री.

कडवें.

क्षुत्क्षामा–क्षुधेनें थकलेली, कृश झालेली.

४ निलय–घर.

कुवलय–कमळ.

६ यूप–यज्ञस्तंभ.

तूळ–कापूस.

नारदी. (पृष्ठ ३७–३८.)

१ अष्टनायका–पृष्ठ ३४ पहा.

२ यामिनी–रात्र.

समीचीन–उचित, योग्य.

कृष्णलीला. (पृष्ठ ३८.)

गहरे–गंभीर.

निपट मुलायम–अतिकोमल.

बिराजत–शोभत.

द्रौपदीवस्त्रहरण. (पृष्ठ ३८–३९.)

कथलों–कोठपर्यंत.

खलक जनावर–पृथ्वीतील एकंदर श्वापदें.

गुले अनारी–डाळिंबाच्या फुलाच्या रंगाची.

जर्द–पिंवळी.

जस–यश.

जोरके–झुंपून.

तोते–कीर.

विपन(त)–विपत्ति.

भैया–बंधु.

मोहे–मला.

१. या प्रकरणापासून पुढच्या प्रत्येक प्रकरणांतील शब्दांची रचना कोशाप्रमाणें अकारादि अनुक्रमानें केली आहे. हे [illegible] 'कोश' तयार करून पाठविल्याचें श्रेय रा० रा० रामजी [illegible] (कुंटा) आणि रा० रा० गोविंद विष्णु [illegible] (मालवण) यांस असून ते [illegible] श्रेय [illegible] एम. ए. [illegible] एका विद्वानास आहे. या कामगिरीबद्दल आम्ही या पंडितत्रयांचे फार फार आभार मानतों.

कडवें.

रीछ–आस्वल.
सारी–साडी.
सिताब–लौकर.

वत्सहरण. (पृष्ठ ४२–४३.)

अछिया–चांगली.
अजपत(ति)–गोपाळ.
आनपर–येऊन पडे.
कर पुच्छ धरत–हातानें शेंपटी धरीत.
कामरी–कामळी.
गोपभेखहर(रि)–गोपवेष धारण केलेला हरि.
गोवनके–गाईचे.
पन्हय्या–जोडा.
पासुरी–पासोडी.
बच्छा बालसह–वांसुरें मुलांसहवर्तमान.
बलपरिच्छवेको–बळपरीक्षा करण्यास.
लकुट–काठी.
लघु रछ(च्छ)पाल–लहान रक्षपाळ.

रासक्रीडा. (पृष्ठ ४३.)

धुन–ध्वनि.
पूत–पुत्र.
बंसीकी–मुरलीची.

रामजन्म. (पृष्ठ ६६.)

ठाड रहे–उभा राहिला.
तामो–त्यांत.
मलबस्तर–मळवस्त्र.
पटपीत सुभितकट–पीतांबर शोभला आहे कटीवर ज्याच्या.

लंकावर्णन. (पृष्ठ ६६.)

अस्मानबराबर–आकाशाएवढा (उंच)
खलक–प्राणी.

कडवें.

जड्या–जडविल्या.
जुहर–जवाहीर.
दादा आदम–महादेव.
दुराई–द्वाही.
फते–जय.
बाहपर–बाजूवर.
मड्या–मढविल्या.
राकेस–राक्षस.

कृष्णनृत्य. (पृष्ठ ६७.)

अगुरिया–बोटें.
ऋषीसहस–ऋषिसहस्र.
कब–कवि शुक्राचार्य.
केत–केतू.
ग्वालबिच–गौळ्यामध्यें.
च्छहु–साही (राग.)
जम–यम.
जक्षगण–यक्षगण.
जिवजंत्र–जीवजंतू.
नचबे न बचाया–नाचविल्याशिवाय सोडिला नाहीं.
निधिपति–कुबेर.
पगते–पायानें.
बरई–तांबोळी.
बढइ–सुतार.
येविधसे–याप्रकारें.
राह–राहु.

कृष्णवर्णन. (पृष्ठ ७१.)

कवार–द्वारें.
जोगमाय वह जनी जसोदा–त्या योगमायेस यशोदा प्रसवली.
तटउमंड–दोन्ही तटावरून.
न्यहारके–पाहून.

कडवें.

रछक—रक्षक.
हरख—हर्ष.

पूतनावधाख्यान. (पृष्ठ ७४—७६.)

अकेला—एकटा.
अचरजु—आश्चर्य.
अचानक—अकस्मात्.
अटत अटत—फिरत फिरत.
अनार—डाळिंब.
अहिर—गौळी.
आप—आपण (शुकमुनि.)
खुली—फुलली.
गय्ये—लागणें.
छमा—क्षमा.
जसोमति—यशोदा.
डायल—डांकिण.
ढोरे—ढोर.
धुनि—वार्ता.
नासिक—नाक.
बावरी—वेडी.
बिखलतिका—विषवल्ली.
बिरिया—वेळ.
बेनी—वेणी.
भाग—भाग्य.
भेख—वेष.
मुगुत—मुक्ति.
मोतनकी—मरण्याची.
रछ्या—रक्षा.
लरकोंका—मुलांचा.
सौतिगृह— सूतिकागृह.
हाल—नांगर.
हिरदा—हृदय.

सुदामचरित्र. (पृष्ठ ७६—८३.)

अचार—लोणचें.

कडवें.

अचंबा—आश्चर्य.
अजब—चमत्कारिक, विचित्र.
अना—दुःख—अना मत धरो—दुःख करूं नका.
अबस—वृथा.
आजज—दीन.
अमानत धरो—कोणतें ही काम हातीं घेणें. (अमानत—ठेव).
अस्व—अश्व.
आजब—चमत्कारिक.
आतस(ष)—अग्नि.
आब—पाणी.
आबताब—प्रकाश.
आफताब—सूर्य.
आलम—लोक, जगत्.
आलंमनी—जगत्श्रेष्ठ.
आसमान—आकाश.
आस्वकोतल—कोतवाली घोडे.
आश्रफी—मोहोर.
इसम—नांव.
उधारे—उद्धरी.
कदम—पाय.
कबीला—कुटुंब, बायको.
कमाल—प्रवीण, परिपूर्ण.
करामात—कर्तृत्व, पराक्रम.
करंपक्ष—मेहेरबानी, कृपाघन.
कारसाल—कर्ता.
किसम—प्रकार.
कुरंगन—हरिणी.
कूल—सर्व.
कंगाल—गरीब, दरिद्री.
खलक—जगत्.
खलक बीचम्यानें—पृथ्वीमध्यें.
ख्याल—ध्यान.

कडवें.

खुदा–ईश्वर.
खुषबोय–सुगंधी.
खुर्दसाल–बाळपणीं.
खोय–सवय.
ख्वाप–स्वप्न.
गदा–भिकारी, भिक्षेकरी.
गनी–धनवान्.
गमी–दुःख, दुःखी.
गलेसो गले–गळ्यांत गळा.
गिरफ्तार–पीडित, गुंतलेला, बंधन-युक्त.
गुन्हेगार–अपराधी.
गोरु–गुरें.
गंदगी–पाप; दुर्दशा.
चमन–सदाबहार, सुखशांति, बागें-तील जागा.
चिरा–पगडी.
चुडवे–पोहे.
च्छांच–ताक, तक्र.
जबरदस्त–मोठी.
जमाल–सुंदर.
जमी–जमीन.
जसवल (डासोल)–वेत्रधार.
जिकर–नामस्मरण.
जिकिर–गोष्ट, वार्ता.
जिगर–काळीज, प्रिय.
जिन्स–पदार्थ.
जुबानी–तोंडानें.
जिंदगी–आयुष्य, जन्म.
ज्याबजा–जागोजाग.
ठौर–जागा, स्थळ.
तकसीर–अपराध.
तखेत–सिंहासन.
तबरुख–प्रसाद.

कडवें.

तबाक–तबक.
तपसील–सविस्तर.
ताजुब–आश्चर्य.
ताश–पक्षिविशेष.
तिनखा–तुकडा, काडी, तृण.
था(ठा)डा–उभा.
दरख–वृक्ष.
दरगाह–मशीद, देवडी.
दलिद्दर–दारिद्र्य.
दिवाणा–पागल.
दिलभ(ब)री–आगतस्वागत, समाधान.
दीनदुनिया–धर्म, आचारविचार इ०
दुवा–प्रार्थना करणें, कल्याण इच्छिणें.
दर्बदर–द्वारोदार.
दर्बान–द्वारपाल, देवडीवाला.
दर्मांदगी–श्रमामध्यें, गरीबीमध्यें.
दर्स–दर्शन.
दस्त–हात.
दस्तरास्त–उजव्या हाताकडे.
नजर–भेट, उपायन, दृष्टि.
नवाजस–कृपा.
निमक–मीठ.
नन्होपन–बाळपण.
निवाला–ग्रास.
न्यामत–समृद्धि, चांगले पदार्थ.
परोसीगई–वाढलें (पक्वान्न).
परी–रंभा.
पलख–क्षण.
पाजर–पहांट.
पिसर–मूलबाळ; लेंकरें.
पुन्न–पुण्य.
प्रेमआंसू–प्रेमाश्रु.
फजर–प्रातःकाळ.

कडवें.

फर्श—आजम, विलायत.
फिकिरमंद—व्यग्र.
बजाया मु(शु)कर—उपकार मानले.
बट्टी—बह्या.
बदन—अंग, शरीर.
बदी—निंदा.
बनाम—यांचें नांव.
बनारस— काशी.
बरन—वरण.
बा आदाब—सविनय, अदबीनें.
बिरादर—बंधु.
बंदगी—सेवा, नमस्कार.
बंदा—सेवक.
बं(ब)दी—निंदा.
बेखबर—विस्मृति.
भगल—कपटवेष.
भवरजाल—भवजाल, आवर्तजाल.
भांतभांत—प्रकारप्रकारचे.
मकर—ढोंग, भुलथाप.
मकान—घर.
मखी—मक्षिका.
मगन—मग्न.
मजाख—थट्टा.
मांदगी—श्रम, थकवा.
मामूर—पूर्ण.
मामूल—वाजवी.
माहीमरातब—मीनचिन्हांकित ध्वज.
मिसाल—सदृश, सारखी.
मिसालेपरी—अप्सरेप्रमाणें.
मिहर—कृपा करणारा.
मीसरी—सडीमाकर.
मुकशी—जरीकांठ.
मुरब्बी—पाळक, पोषक, परमश्रेष्ठ.

कडवें.

मुसल—मुसळ.
मेहू—पर्जन्य.
मोरचल—चौऱ्या.
मौला—परमेश्वर.
म्याने—मध्यें.
रसोइ—पक्वान्न.
रहाबीच—मार्गांत.
रुखा—सुका, नम्र.
रुषेसर—ऋषेश्वर.
लाल—सुख.
वस्ता—न्हाव्याची धोकटी.
सखावत—औदार्य, दान.
सजावर—अपराधी, दंडार्ह.
सरग—स्वर्ग.
सरअनजाम—सामान.
सहेल्या—सौंगड्या, सख्या.
साहेब जमाल—प्रतापश्रेष्ठ.
सिताबी—त्वरित, लौकर.
सिधारु—जाऊं.
सिरनी—खिरापत.
सिप्त—तारीफ, स्तुती.
सु(शु)कर—उपकार मानणे.
सुमरो—स्मरा.
शुकर—आभार.
शुतर—उंट.
सुमार—संख्या.
हता—होता.
हमसाह—शेजारीण.
हरगीज—कांहीं केल्या, अगदीं.

महादेवप्रयाणवर्णन. (पृष्ठ ९१.)

असवारी—स्वारी.
उडते—उडतात.
फिलकारते—ललकारताहेत.

कडवें.

चऱ्हाई–चढविली.
चवर–चौरी.
जिलिबमो–आघाडीस.
झुरझुर–झुळझुळ.
धवल–पांढरा.
निकसो–निघाला.
सजो(ज्यो)–सजविला.

रासक्रीडा. (पृष्ठ ९१.)

अकुलाई–घाबरले.
अरचन–अर्चन.
अंगिया–कंचुकी.
आई तुव सरन–तुला शरण आलों.
आंखनमे–नेत्रामध्यें.
आंगनछिरकत–अंगणांत सडे घालीत.
आंजत–लेवित.
ओंठ दाब रदन–दांतानें ओंठ दाबून.
इहिविध–याप्रकारें.
उत–तेथें.
क(कं)टक–कांटे.
कहर–गजब.
कामर कारी–कामळी काळी.
किलकीलावे–किलकिलाट करी.
कुलत्रिय–कुलस्त्रिया.
कोऊ–कोणी.
गोपी नेनन जल बरसे–गोपीच्या नेत्रांतून पाणी वाहे.
ग्यानिन–ज्ञानी पुरुषांनीं.
घरिन्–घटिका.
चाहतहै–वांच्छिताहेत.
चिलक–तेज.
चंद्रकलारी–चंद्रकळा (साडी).
छांडपत–पति सोडून.
छुभितहृद–क्षोभितहृदय.

कडवें.

जलमुरगी–पानकोंबडी.
जाचे–त्रास देई.
जूरो (जियरो) खरकत–हृदय कांपत
ठरमुकट–झुकता मुकुट.
तब हरि सरके–तेव्हां हरि सरकला.
तरकत–१ तरफे, २ तर्क करी.
तामन–त्यांच्या मनांतील.
तुम दयाल सुमनस जग सांई–तुम्ही दयाळ, उत्तम पुरुष, जगाचे धनी.
तुहि न देख–तुला न पाहून.
नखन भू लिखन–नाखटानें जमीन उकरूं लागल्या.
नारि निवारी–एका प्रकारची भाजी.
निरखी–पाहून.
नेगड–निगड.
नेनन–नेत्रानें.
पटायर(ड)–गवतविशेष.
पसुपंछि–पशुपक्षी.
पोतत–पोतेरें देत.
प्रभु कहे चढव हमारे कांधे–ईश्वर म्हणाला माझ्या खांद्यावर चढ.
फरक बहि–बाहुस्फुरण.
फूलन मांग गुही प्रभुसाची–परमेश्वरानें तिचा (राधेचा) भांग फुलांनीं गुंथला.
बडीजान कदर–आपली फार कदर झाली असें पाहून.
बदन–शरीर.
बनमारी–वनमाळी.
बांका(को)–वांकडा.
बारू–वाळू.
बिकट लट–अजब, लटक.

कडवें.

बिखमय–विषमय.

बिंद्रियन छोर–बिंदीचीं टोकें.

बिबरन–विवर्ण.

बोलत गहि चरन–पाय धरून बोलत.

भरपूर–परिपूर्ण.

भाखित–कथित.

भावत–आठवित.

मकमद–मतलब.

मनभाया–मनास आवडला.

मम समा नाहीं–मजसारखा नाहीं.

ममकत–घांसत.

मानस येसे–मनुष्याप्रमाणें.

मुरकत–मागें फिरून पाही.

या जोडी थाकी–ही त्याची जोडी.

यार–प्रिय.

रहबन–वनमार्ग.

रहस रचो(च्यो)री–रास रचिला.

लकुटिया–काठी.

लख प्रभु आदर–परमेश्वराचा आदर पाहून.

लर्खां जिस व्याली–सर्पिणीप्रमाणें दिसे.

लगि आसु गिरन–अश्रु गळूं लागले.

लरकत–लोंबत.

लिपत–सारवीत.

वह–तो.

वा(बा)दर–बादळ.

वाली–धनी.

सकयनथ तोर गुण गाई–तुझे गुण गाण्यास शकत नाहीं.

सटकत–निसटत.

सबे त्याग हरि हमको सेई–सर्वांचा त्याग करून परमेश्वर मलाच सेवितो.

कडवें.

समाया–सांठवला.

समकत–संकोचित होत.

सामले–सांवळा.

सारी–साडी.

सिघारी–सिंगाडा.

सुखमा–सुखामध्यें.

सुनरी–कंकणें.

सुरेखत–रेखित.

सोभाकूल कलारी–शोभित आहेत तट जीचे अशी कालिंदी.

सो विलोक मन कीनो ख्याली–याप्रमाणें पाहून आपलें मन ख्याली केलें.

सोहत–शोभत.

हमहीसे सोहत–माझ्यानेंच (हरी) शोभतो.

हरखत–हर्ष पावत.

हरितन हेरी–हरीच्या स्वरूपाकडे निरखी.

हियमें–हृदयांत.

हिंदुस्थानी पदें. (पृष्ठें १३२–१३६.)

अलादा–भिन्न.

असवारी–स्वारी.

कबीला–बायको.

करोर–कोटि.

खाक–राख.

खिलोना–करमणुकीचा पदार्थ.

खुराक–खाणें.

गत–चाल.

गीडा–भोळें.

चांदा–चंद्र.

चूवेकू–उंदिरास.

जम–यम.

कडवें.

जमात–मेळा.
जर्दा–पिवळें.
जंजाल–जँवजाळ.
दादा–आजा.
दुल्हारी–कन्या.
धी–मुलगी. (कोंकणांत या शब्दाचा प्रयोग 'धू' असा होतो.) धीके–मुलीच्या.
नरमादा–स्त्रीपुरुष.
नवसिंदा (नवीसिंदा)–लेखक.
न्याहाली–कामिनी.
पगसो–पायानें.
पटु(टू)–ऊर्णावस्त्र.
पेशानीपर–मस्तकावर.
प्यादा–पदाति.
बगला–बगळा.

कडवें.

बलहारी–कुरवंडी जाणें.
बा फराक–सुटलेलें, दिलें.
बाला–कन्या.
बिदिया–विद्या.
विधिजा–अहल्या.
बेरसे–बोरांनीं.
भावे–आवडे.
मर्जादा–मान, प्रतिष्ठा.
मिसरी–साखर.
मिन्नत–प्रार्थना.
मुखसो–तोंडानें.
शरमिंदा–खजील होणें.
सगरी–सर्व.
सरजू–शरयू.
साजिंदे–संगीत, मागून तालसूर धरणारे.

अमृतरायकृत हिंदुस्तानी कवितेचें शुद्धिपत्र.

द्रौपदीवस्त्रहरण. (पृष्ठें ३८-३९.)

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध.
३८	४	बिपन	विपत.
,,	१०	अपेस	अपजस
,,	,,	आवें गो	आवेगो.
३९	२	करारी	किनारी.
,,	१०	चिते	चीते.
,,	११	भेंसा	भैंसा
,,	,,	'औंर' आणि 'चित्र' यामध्यें	'चक्रनिकारे भांत भांतके तऱ्हे तऱ्हे के' हें पाहिजे.

कृष्णवर्णन. (पृष्ठें ३९-४०.)

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध.
३९	२	हय	है.
४०	३	रदनछब	मदनछब.

मृत्तिकाभक्षण. (पृष्ठें ४१-४२.)

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध.
४१	१	लय	भये.
४२	२	म्हारे	हमारे.

वत्सहरण. (पृष्ठ ४३.)

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध.
४३	४	परिच्छवेको	परिछवेको.
,,	६	पियरी	पीरी.
,,	,,	हारी	हरी.

रासक्रीडा. (पृष्ठ ४३.)

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध.
४३	२	रयनको	रैनको.
,,	४	बनावे	बजावे.
,,	५	उरावे	उडावे.

रामजन्म. (पृष्ठ ६६.)

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध.
६६	११	प्रेमल कूबसहय	प्रेमलको बस व्हय.

लंकावर्णन. (पृष्ठें ६६-६७.)

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध.
६७	१	गडा	गढा.
,,	९	एतनमो	इतनेमो.
,,	,,	ज्या	जा.
,,	१५	मुले	झूले.

---

१. हें शुद्धिपत्र रा० गोविंद विष्णु श्रीखंडे (सांडवा) यांनीं करून पाठविल्याबद्दल त्यांचे आम्ही आभार मानितों.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध.
६७	१७	दुराई	दुहाई.
,,	२१	ळॆं	ल.
		कृष्णनृत्य. (पृष्ठें ६७-६९.)	
६७	१	इह	यह.
६८	२	च्छद्दु	छद्दु.
,,	३	जी	जंह.
,,	,,	हटत	अष्ट.
,,	४	गर्जहि	गर्जत.
,,	१५	मज्यावत	में जावत.
,,	,,	नचाय्या	लजाया.
,,	२१	'मुत्सदी' यानंतर	'हटकरजिद्दी तुरकन सिद्दी' हें पाहिजे.
,,	,,	हटघट	हाट घाट.
,,	,,	बाजारबीच	बीच.
,,	,,	अत	अति
,,	,,	सुकत	झुकत.
,,	,,	जडक	उखत.
,,	२४	कामगर	कमंगर.
,,	२५	रजपुत	रजक.
,,	,,	'पच्छिनसे' यानंतर	'पशु व्याघ्र स्यार हय सिंघनसे जलनक्र कमटदल मच्छनसे' हें पाहिजे.[1]
,,	२६	दढ	दृढ.
,,	२८	चबे	बचे.
६८	२९	सहसबिलासी	सहस विहासी.
६९	५	अंब	अंबरिख.
,,	६	यते	एते.
,,	८	पृथमी	पृथवी.
,,	११	बकको	कविको.
		कृष्णलीला. (पृष्ठ ६९.)	
६९	४	नैनमो	नैननमों.
,,	,,	बनवारी	बनमाली.

१. हिंदीलिपींत 'ळ' नाहीं.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध.
		कृष्णवर्णन. (पृष्ठें ७१-७२.)	
७१	१	बन्हाई	बहाई.
,,	,,	ज्याहा	जहा
,,	२	ज्याको	जाको.
७२	२	जोगम यावह	जोग माया वह.
,,	३	पोहोचाय	पोहडायं.
,,	,,	कुमर	कुमरि.

पूतनावधाख्यान. (पृष्ठें ७४-७६.)

पृष्ठ	दोहा	चरण	अशुद्ध	शुद्ध.
७४	१	१	हार हार हार	हरहरहर.
,,	२	२	अटत अटत	भ्रमत भ्रमत.
,,	,,	३	गय्ये	गहे.
,,	३	१	कहान	कान्ह.
,,	४	३	हय	है
,,	७	२	भेक	भेस.
,,	८	४	कुच	मृदु.
७५	१२	३	ज्यानक	जानकर.
,,	,,	४	रजोबधसें	रजोबुद्धिसें.
,,	,,	,,	धरकर	करधर.
,,	१४	३	अपने	अपनो.
,,	१७	२	अज	कबहु.
,,	१९	१	आये	आवे.
,,	२२	३	किलो	कियो.
,,	,,	४	ईतननकु	ईतनको.
,,	२३	२	जुवा	दुवा.
७६	३०	२	नर हयो	न रह्यो.
,,	३१	१	देहे	देह.

सुदामचरित्र. (पृष्ठें ७६-८३.)

पृष्ठ	ओळ	चरण	अशुद्ध	शुद्ध.
७६	१	१	कारसाल	कारसाज.
,,	,,	२	वोहीका रसाल	वोही कारसाज.
,,	,,	४	आलंगनी	आलम गनी.
,,	२	१	जमी	जमीन.
,,	,,	२	आतस	आतश.
,,	३	२	जान तावों	जानता वो.

पृष्ठ	दोहा	चरण	अशुद्ध	शुद्ध.
७७	६	१	तपसील	तफसील.
,,	,,	२	मेहर	मिहर.
,,	,,	३	आ जब	आजज.
,,	८	२	फीकर	फिकरे.
,,	,,	३	उघाडे	उघारे.
,,	,,	४	ख्वापमो	ख्वाबमो.
,,	१०	१	मामूल	मामूर.
,,	१२	३	अप्सरोज	अबस रोज.
,,	,,	४	अनामत	अमानत.
,,	१३	३	हमसा हके	हमसायाके.
,,	१४	१	सिताबी	शिताबी.
,,	१५	२	शाबुत	साबुत.
,,	१६	२	आप	आब.
,,	,,	,,	दस्तरास	दस्त रास्त.
,,	,,	३	तास	ताश.
,,	१७	१	सुकर	शुकर.
,,	,,	,,	वै	वो.
,,	,,	२	कूल	भूल.
,,	१९	३	बागशाई	बादशाई.
७८	२०	२	ज्या बजाज्यों	जाबजा ज्यों.
,,	,,	३	काहां	कहां.
,,	२१	२	कबीला	किला.
,,	२२	४	ज्यानता	जानता.
,,	२४	१	तक्त	तख्त.
,,	२७	४	नगारे	नकारे.
,,	२८	१	सिरनी	शिरनी.
,,	२९	२	मिशाले	मिसाले.
,,	,,	३	सरंज्याम	सरमजाम.
,,	,,	४	आबताब	आफताब.
,,	३०	३	तमासेके	तमाशेके.
,,	,,	४	किसका	जिसका
७९	३५	४	च्छाचकी	छाचकी.
,,	३६	४	जिन्नसोका	जिनसोंका.
,,	,,	,,	सुमार	शुमार.

Vijay